# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूर शिक्षण केंद्र

# मध्ययुगीन भारतीय इतिहासातील मूलभूत घटक

**(Aspects of Medieval Indian History)**

(१२०६ ते १७५०)

(शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून)

**एम. ए. भाग-१**

**इतिहास**

HIST-102 (Compulsory Paper)

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
**प्रथमावृत्ती :** २०१८
एम. ए. भाग - १ करिता (मध्ययुगीन भारतीय इतिहासातील मूलभूत घटक)
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती : १,०००**

■

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. डी. नांदवडेकर**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

ISBN-978-81-938801-0-4

★ दूरशिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
  शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

★ दूर शिक्षण विभाग-विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांच्या विकसन अनुदानातून या साहित्याची निर्मिती केली आहे.

## दूर शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

### सल्लागार समिति


**प्रा. (डॉ.) डी. बी. शिंदे**
मा. कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एम. साळुंखे**
माजी कुलगुरू,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**प्रा. (डॉ.) के. एस. रंगाप्पा**
माजी कुलगुरू,
म्हैसूर विद्यापीठ, म्हैसूर

**प्रा. पी. प्रकाश**
अतिरिक्त सचिव-II,
विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
I/c अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) ए. एम. गुरव**
I/c अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) भारती पाटील**
I/c अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. डी. राऊत**
I/c अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. डी. नांदवडेकर**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. एम. ए. काकडे**
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. व्ही. टी. पाटील**
वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. ए. अनुसे** (सदस्य सचिव)
संचालक, दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


### इतिहास समन्वय समिती


अध्यक्ष - **प्राचार्य ए. एल. बेलवटकर**
मालती वसंतदादा पाटील कन्या महाविद्यालय, इस्लामपूर, जि. सांगली

- **डॉ. व्ही. आर. पाटील**
  आर्टस् कॉलेज, कोवाड,
  ता. चंदगड, जि. कोल्हापूर
- **प्रा. डॉ. नंदा पारेकर**
  इतिहास अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

दूर शिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर

**(मध्ययुगीन भारतीय इतिहासातील मूलभूत घटक)**
**एम. ए. भाग–१ : इतिहास** HIST 102

## अभ्यास घटकांचे लेखक

| लेखक | घटक क्रमांक |
|---|---|
| **डॉ. सुरेश वसंत शिखरे**<br>श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, दसरा चौक, कोल्हापूर | १ |
| **डॉ. गौतम ढाले**<br>श्रीमती गंगाबाई खिवराज घोडावत कन्या महाविद्यालय, जयसिंगपूर | २ |
| **डॉ. एम. व्ही. जाधव**<br>यशवंतराव चव्हाण कॉलेज, हलकर्णी | ३, ४ |

**■ संपादक ■**

**डॉ. गौतम ढाले**
श्रीमती गंगाबाई खिवराज घोडावत कन्या महाविद्यालय,
जयसिंगपूर

# प्रस्तावना

शिवाजी विद्यापीठाच्या दूर शिक्षण केंद्रामार्फत शैक्षणिक वर्ष २००७-०८ पासून बहिःस्थ विद्यार्थ्यांकरिता दूरशिक्षण कार्यक्रम राबविण्यास सुरुवात झाली. यंदाच्या शैक्षणिक वर्षापासून म्हणजेच २०१८-१९ पासून सत्रपद्धती राबविण्यात येत आहे व त्यानुसार अभ्यासक्रमाचीही पुनर्रचना करण्यात आली आहे. यावर्षी इतिहास विषयाच्या एम. ए. भाग-१ या वर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी ''मध्ययुगीन भारतीय इतिहासातील मूलभूत घटक'' (१२०६ ते १७५०). या विषयाच्या स्वयं अध्ययनासाठी हे पुस्तक लिहिले आहे. या पुस्तकातील विविध घटकांचे लेखन शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील पदव्युत्तर विभागात अध्यापन करणाऱ्या अनुभवी व तज्ज्ञ लेखकांनी केले आहे. यात साधी-सोपी, ओघवती भाषा, स्पष्ट मांडणी, समर्पक उदाहरणे, संकल्पनांचे विवेचन, विषय आकलनासाठी तक्ते-आकडेवारी इ. चा वापर केला आहे. त्याचबरोबर प्रत्येक घटकाच्या शेवटी प्रश्न व त्यांची उत्तरे आणि सरावासाठी स्वाध्याय, पारिभाषिक शब्द दिलेले आहेत. घटक विषयासंबंधी अधिक वाचनासाठी मराठी व इंग्रजी भाषेतील संदर्भ ग्रंथांची सूची दिलेली आहे.

मध्ययुगीन भारताचा इतिहास अभ्यासण्यासाठी व इतिहास लेखनासाठी उपयुक्त असणाऱ्या विविध लिखित व अलिखित साधनांची माहिती या पुस्तकात दिलेली आहे. मध्ययुगीन भारतातील विविध राजसत्तांचे स्वरूप, हिंदू-मुस्लिम राजांचा राजपदाचा सिद्धांत, वारसा व त्यामधील समस्या अभ्यासायच्या आहेत. पुढे सुलतान, मुघल, विजयनगर आणि बहामनी या मध्ययुगीन काळातील सत्तांच्या मुलकी प्रशासनाची सविस्तर माहिती दिली आहे. या पुस्तकात वरील सत्तांचे लष्करी व मुलकी न्याय प्रशासनाचा विस्ताराने परिचय करून दिला आहे. या सर्वांचा अभ्यास सदर पुस्तकाद्वारे करावयाचा आहे.

या पुस्तक लेखनात स्पष्टता आणि अचूकता आणण्याचा प्रयत्न केलेला आहे. तरीही काही दोष किंवा उणिवा जाणवल्यास विद्यार्थ्यांनी व वाचकांनी आमच्या निदर्शनास आणून दिल्यास पुढील आवृत्ती अधिक सुधारित करता येईल. हे पुस्तक विद्यार्थ्यांबरोबरच इतिहास अभ्यासकांनाही उपयुक्त ठरेल याची आम्हाला खात्री वाटते. पुस्तक प्रकाशनासाठी शिवाजी विद्यापीठाचे सर्व प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी, दूर शिक्षण विभागाचे संचालक, सर्व प्रशासकीय अधिकारी आणि कर्मचारी वर्गाने अत्यंत परिश्रम घेतले आहेत. त्याबद्दल त्या सर्वांचे मनःपूर्वक आभार. या पुस्तकासाठी घटक लेखन करून सहकार्य केल्याबद्दल सर्व लेखकांचा मी आभारी आहे.

**■ संपादक ■**

**डॉ. गौतम ढाले**

श्रीमती गंगाबाई खिवराज घोडावत कन्या महाविद्यालय,

जयसिंगपूर

# दूर शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


## ■ अभ्यासमंडळ : इतिहास ■

अध्यक्ष **– डॉ. अवनिश पाटील**
इतिहास अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **डॉ. श्रीमती एन. डी. पारेकर**
  इतिहास अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. डी. बी. मासाळ**
  छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा
- **डॉ. श्रीमती संघमित्रा व्ही. सरवदे**
  आण्णासाहेब डांगे कॉलेज, हातकणंगले,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. दिपक शंकरराव जाधव**
  लाल बहाद्दूर शास्त्री कॉलेज, सातारा
- **डॉ. सुप्रिया चंद्रशेखर खोले**
  चंद्राबाई शांताप्पा शेंडूरे कॉलेज, हुपरी,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. एम. व्ही. जाधव**
  यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, हलकर्णी,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. निवासराव अधिकराव वरेकर**
  आदर्श महाविद्यालय, विटा, ता. खानापूर,
  जि. सांगली
- **डॉ. सुरेश मारूती चव्हाण**
  आर्टस, कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेज, गडहिंग्लज,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. राजश्री दिलीप निकम**
  कृष्णा महाविद्यालय, रेठरे बु।।, शिवनगर,
  ता. कराड, जि. सातारा
- **डॉ. श्रीमती मंजिरी कामत**
  इतिहास अधिविभाग, मुंबई विद्यापीठ, मुंबई.
- **डॉ. चंद्रकांत अबंग**
  सचिव, भारत इतिहास संशोधक मंडळ,
  इमिनंट स्कॉलर ऑफ मराठा हिस्ट्री.
- **डॉ. अरुण भोसले**
  निवृत्त प्राध्यापक, इतिहास अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. भारतभुषण माळी**
  सचिव, शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषद
- **डॉ. अमर आडके**
  सल्लागार, किल्ले जतन आणि संवर्धन, कोल्हापूर

# अनुक्रमणिका


| घटक क्रमांक | घटकाचे शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| १. | मध्यकालीन भारताच्या इतिहासलेखनाची साधने | १ |
| २. | दिल्लीची सुल्तानशाही | ३६ |
| ३. | मुघल | ७१ |
| ४. | विजयनगर | ९८ |

## ■ विद्यार्थ्यांना सूचना

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

---

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०१७-१८ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

## घटक –१

# मध्यकालीन भारताच्या इतिहास लेखनाची साधने

अनुक्रमणिका :

१.० उद्दिष्टे

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

१.२.१ भारतीय साधने

१.२.२ परकीय साधने

१.२.३ इंडो–पर्शियन इतिहासलेखन

१.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

१.४ स्वयं–अध्ययन प्रश्न व प्रश्नांची उत्तरे

१.५ सारांश

१.६ सरावासाठी स्वाध्याय

१.७ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके

## १.० उद्दिष्टे :

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपणास खालील माहिती विशद करता येईल.

- मध्यकालीन भारताची संदर्भ साधने सांगता येतील.
- ऐतिहासिक संदर्भ साधनांचे वर्गीकरण करता येईल.
- इतिहासलेखन व पुन:लेखनासाठी संदर्भ साधनांचे महत्त्व स्पष्ट करता येईल.
- सदर साधनांच्या माध्यमातून सुलतानशाही, विजयनगर व मुघल साम्राज्याचे स्वरूप समजण्यास मदत होईल.
- इतिहासलेखन पद्धतीमध्ये साधनांचे महत्त्व स्पष्ट होईल.
- मध्ययुगीन भारताच्या अभ्यासासाठी अरबी, फारसी, इंग्रजी व प्रादेशिक भाषेतील साधनांचे आकलन होईल.
- मध्ययुगीन इतिहासलेखन परंपरेचा आढावा घेता येईल.

## १.१ प्रस्तावना :

इतिहासलेखन प्रक्रियेत संदर्भ साधनांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. संदर्भ साधनांच्या आधाराशिवाय लिहिलेल्या कोणत्याही इतिहास ग्रंथाला 'इतिहास' ही संज्ञा प्राप्त होऊ शकत नाही. त्यामुळे कोणत्याही राष्ट्राचा अथवा कोणत्याही कालखंडाच्या राजकीय, सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक इतिहास लेखनासाठी पुरावा म्हणून संदर्भ साधनांचा आधार द्यावा लागतो. इतिहास लेखनासाठी वापरलेल्या पुराव्यांना साधन अथवा संदर्भ ग्रंथ असे म्हणतात. एखादा लेखक स्वत:च्या कल्पना शक्तीच्या जोरावर ललित लेखन करू शकतो. कारण तिथे सत्य घटनांचा प्रश्न नसतो. परंतु इतिहास लेखनास हा नियम लागू होत नाही. 'इतिहासलेखन म्हणजे मानवी जीवनात घडून गेलेल्या सत्य घटना असतात'. त्यामुळे त्या लिहिताना कल्पनाशक्तीच्या जोरावर लिहिल्या जाऊ शकत नाहीत अथवा लिहिल्यास तो इतिहास होऊ शकत नाही. एखादी घटना जशी घडली तशीच लिहिण्यासाठी पुरावा द्यावा लागतो. म्हणून इतिहासलेखनात साधनांना अनन्यसाधारण महत्त्व आहे.

इतिहासलेखन संपूर्णत: भूतकालीन अवशेष व साधनांच्यावर आधारित असते, कारण इतिहास या वर्ण्य विषयाचा संबंध भूतकाळाशी असतो. इतिहासामधून म्हणजेच साधनांच्यामधून आपणास भूतकालीन घडामोडीची सुसंगतवार माहिती मिळते. ऐतिहासिक संशोधनांचे मूल्य त्या संशोधकाने कोणत्या प्रकारची साधने वापरली आहेत त्याच्यावर अवलंबून असते. अस्सल साधने हीच इतिहासलेखनांची पायाभूत साधने असतात. म्हणून इतिहासामध्ये No Documents, No History असे म्हटले जाते. संदर्भ साधनाशिवाय इतिहास म्हणजे एक प्रकारची कथा होय.

प्रस्तुत प्रकरणात आपणास मध्यकालीन भारताच्या इतिहास लेखनाची साधने व इतिसलेखनपरंपरेचा अभ्यास करणार आहोत. सुलतानशाही, मुघलकालखंड आणि या दोन्ही सत्तांच्या दरम्यानच्या कालखंडात उदयास आलेले विजयनगरचे हिंदू साम्राज्य या घटना मध्यकालीन भारताच्या इतिहासाच्या दृष्टीकोणातून महत्त्वाच्या आहेत. इस्लामिक राज्यकर्त्यांनी आपल्या दरबारातील घटनांच्या नोंदी ठेवण्यासाठी दरबारी लेखक नेमलेले दिसतात. या लेखकांनी दरबारातील छोट्या-मोठ्या घटनांच्या नोंदी घेतलेल्या दिसतात. मध्यकालीन भारतात लिखित साधनांच्या बरोबर भौतिक साधनांचाही मोठ्या प्रमाणात विकास झालेला दिसतो. इस्लामिक आक्रमणांच्या बरोबर भारतात इतिहासलेखनांची परंपराही आलेचे दिसून येते, यातून मध्यकालीन भारताचा इतिहास परिपूर्णपणे पहावयास मिळतो.

## १.२ विषय विवेचन :

- **संदर्भ साधन किंवा पुरावा म्हणजे काय?**

ऐतिहासिक घटनांचा अन्वयार्थ ज्याच्या आधारे काढता येतो व ज्यांच्यापासून इतिहासलेखनासाठी उपयुक्त माहिती मिळते अशा वस्तू अथवा वास्तू, लिखित अथवा अलिखित साधनांना सर्वसाधारणपणे इतिहासाचा पुरावा किंवा संदर्भ साधन असे म्हटले जाते. इतिहासलेखनशास्त्राच्या दृष्टीकोणातून ऐतिहासिक लेखणास पुरावा किंवा संदर्भ देणे महत्त्वाचे असते. प्रो. मायकेल स्टॅन फोर्ड यांनी म्हटल्याप्रमाणे ऐतिहासिक घटिते पुरावा निर्माण

करतात व हेच पुरावे ऐतिहासिक ज्ञानाचा आधार ठरतात. पुराव्याशिवाय लिहिलेले अथवा बोललेले इतिहास होणार नाही. कोणत्याही इतिहासकालीन घटना किंवा गोष्टींचा पुरावा देणाऱ्या वस्तूला साधारणपणे इतिहासाचे साधन असे म्हणतात. साधन या शब्दाला 'कागदपत्रे' हा पर्यायी शब्द वापरला जातो. साधन म्हणजे नेमके कशाला म्हणावे या संबंधी तीन महत्त्वाच्या व्याख्या Shorter Oxford English Dictionary मध्ये खालीलप्रमाणे दिलेल्या आहेत.

१) ज्यामधून पुरावा आहे असे दिसून येते ते साधन.

२) ज्यामधून सहजासहजी पुरावा दृष्टीस पडतो ते साधन.

३) ज्याचा निर्णय देता येईल किंवा जाणून घेता येईल असे कोणतेही साधन.

- **भारतीय साधने :**

मध्यकालीन भारताची माहिती देणारी अनेक संदर्भ साधने विविध भाषामध्ये उपलब्ध आहेत. सुलतानशाही कालखंडातील साधने प्रामुख्याने आरबी व फार्सी भाषेतील आहेत. मुघल कालखंडातील आरबी व फार्शी साधनाशिवाय परकीय भाषेतील साधनेही उपलब्ध आहेत. या साधनांच्या अभ्यासासाठी सुलतानशाही, मुघल, विजयनगर, बहामनी, मराठा अशा कालखंडात ही साधने वर्गीकृत करण्यात येतात. प्रस्तुत प्रकरणात आपणास प्रामुख्याने सुलतानशाही, मुघल व विजयनगरकालीन स्थानिक व परकीय साधनांचा अभ्यास घ्यावयाचा आहे.

**अ) सुलतानशाही कालखंड :** (१२०६ ते १५२६)

इ.स. १२०६ ते १५२६ हा सुलतानशाहीचा कालखंड आहे. या काळात दिल्लीच्या सत्तेवर खालील घराण्यांनी सत्ता प्रस्तापित केलेली दिसते. गुलाम घराणे (१२०६ ते १२९०) खिलजी घराणे, (१२९०-१३२०) तुघलक घराणे, (१३२०-१४१४) सय्यद घराणे, (१४१४-१४५१) व लोदी घराणे. (१४५१-१५२६) या कालखंडातील प्रमुख साधने खालीलप्रमाणे -

- **ताजुल मासीर :**

सुलतानशाही कालखंडाच्या प्रारंभिक टप्प्यातील माहिती ग्रंथ म्हणून ताजुल मासीरचा उल्लेख होतो. हा ग्रंथ हसन निझामीने लिहिलेला आहे. महंमद घोरीच्या स्वारीबरोबर हसन निझामी भारतात आलेला होता. पुढे तो इथेच स्थायिक झाला. कुतुबुद्दीन ऐबक ते अल्तमश पर्यंतचा इतिहास समजून घेण्यासाठी हा ग्रंथ महत्त्वाचा आहे.

- **तबकात-ए-नासिरी :**

महंम्मद घोरीची भारतातील स्वारी ते पुढे इ.स. १२६० पर्यतंचा सुलतानशाहीचा इतिहास समजून घेण्यासाठी हा ग्रंथ महत्त्वाचा आहे. मिनहाज-उस-सिराज यांने हा ग्रंथ लिहिला आहे. मिनहाज-उस-सिराज अल्तमशच्या कारकिर्दीत भारतात आला. तो रझिया सुलतानच्या विशेष मर्जीतील व्यक्तीपैकी एक होता.

या ग्रंथामध्ये सुलतानशाही कालखंडाला समांतर असलेल्या इतर काही इस्लामिक देशांचा इतिहास यामध्ये नमूद आहे. मुहंम्मद घोरी अल्तमश व बल्तबन या सुलतानाच्या विषयी सिराजने विशेष लिखाण केलेले आहे.

### ३) तारीख–ए–फिरोजशाही :

सुलतान बल्बनच्या कारकीर्दीपासून ते पुढे मुहमद तुघलक पर्यंतच्या कालखंडाचा घटनाक्रम या ग्रंथात सापडतो. झियाउद्दीन बर्नी हा या ग्रंथाचा लेखक आहे. बर्नी हा सुलतानशाही काळातील दरबारी इतिहासकार म्हणून परिचित होता. अल्लाउद्दीन खिलजी व मुहंमुद तुघलकांच्या काळातील अनेक प्रशासकीय योजनांची याने चिकित्सा केलेली आहे. खास करून तत्कालीन जमीन महसुलाची विस्तृत माहिती दिलेली आहे.

### ४) अमीर खुस्रोचे साहित्य :

सुलतानशाही कालखंडातील एक प्रख्यात साहित्यिक म्हणून अमीर खुस्रो ओळखला जातो. त्याने बल्बन पासून ते हियासुद्दीन तुलक पर्यंतच्या सुलतानांचा राजकवी म्हणून काम केले. गद्य व पद्य या दोन्ही प्रकारात त्याने विपुल ग्रंथांचे लिखाण केलेले आहे. प्रसिद्ध सुफी संत निजामुद्दीन अवलियांचा खुस्रो हा शिष्य असल्या कारणाने सुलतानशाही दरबारात याला विशेष मान होता. परिणामी दरबारात व इतर ठिकाणी त्याचा मुक्तपणे वापर असल्याकारणाने त्यांने राजकीय घटनांचे अचूक लिखाण केलेले आहे. त्याचा अल्लाउद्दीन खिलजीच्या कारकीर्दीवरील 'तारीख–इ–इलाहा' हा ग्रंथ अल्लाउद्दीनच्या १६ वर्षाचा इतिहास आहे. 'तुघलकनामा' या त्यांच्या दुसऱ्या ग्रंथात हियासुद्दीन तुघलकाने सत्ता कशाप्रकारे प्राप्त केली याची माहिती आहे. 'मिफ्ताहुल फतूह' या ग्रंथात खुस्रोने जलालुद्दीन खिलजीच्या एका लष्करी स्वारीचे कथन केलेले आहे. 'नूरसिफर' हा ग्रंथ मुबारक शहाच्या लष्करी स्वारीचे वर्णन करतो. तर आशिक–इ–देवलरानी या ग्रंथात खुस्रोने गुजरातचा राजा करणसिंह यांची मुलगी देवलदेवी व उल्लाउद्दीनचा मुलगा खिज्रखान यांची प्रेमकथा वर्णन केलेली आहे. 'किरानुस सादैन' ही खुस्रोची पद्य रचना आहे. यामध्ये त्यांने बुघराखान व कैकुबाद यांच्या भेटीचा प्रसंग काव्यबद्ध केलेला आहे. एकूणच अमीर खुस्रोच्या गद्य व पद्य रचनेमधून राजकीय घटनांच्या बरोबरच तत्कालीन सामाजिक परिस्थितीवरही प्रकाश पडतो.

### ५) तारीख–ए–फिरोजशाही :

शम्स–ए–सिराज अफीफ हा फिरोज तुघलकांचा दरबारी लेखक होता. झियाउद्दीन बर्नीच्या ग्रंथाचे नाव घेऊन अफीफने हा दुसरा ग्रंथ लिहिलेला आहे. बर्नीचा ग्रंथ जेथे संपतो तेथून पुढच्या घटना अफीफच्या ग्रंथात येतात. फिरोज तुघलकांच्या संपूर्ण कारकीर्दीची माहिती यामध्ये नमूद केलेली आहे.

### ६) फुतुहाने फिरोजशाही :

फिरोज तुघलक या सुलतानाने स्वत:च आपल्या कारकीर्दीचा घटनाक्रम सांगणारा ग्रंथ लिहिला आहे. फिरोज तुघलकाने स्वत: या ग्रंथाचे लिखाण केलेले असल्याने या ग्रंथाचा दर्जाही तितकाच महत्त्वाचा आहे. तत्कालीन राजकीय, धार्मिक घटनावर या ग्रंथातून चांगलाच प्रकाश पडतो.

**७) फुतुह–उस–सलातीन :**

महंमद गझनी ते महंमद बीन तुघलक पर्यंतच्या कालखंडाचा इतिहास इसामी या लेखकाने शब्दबद्ध केलेला आहे. महंमदबीन तुघलकाने त्यांच्यावर अन्याय केल्याने पुढे तो सुलतान अल्लाउद्दीन हसन बहामनी यांच्या राजाश्रयास गेला. त्यांच्या लिखानातून तत्कालीन अनेक राजकीय घटनावर प्रकाश पडतो.

**८) तारीख ए–मुबारकशाही :**

सुलतानशाही कालखंडातील सय्यद घराण्याची माहिती जाणून घेण्यासाठी तारीख–ए–मुबारकशाही शिवाय पर्याय नाही. याह्या बीन अहमद यांने हा ग्रंथ लिहिलेला असून इ.स. १४०० ते इ.स. १४३४ पर्यंतचा सय्यद घराण्याचा इतिहास यामध्ये पहावयास मिळतो.

**९) तारीख–ए–सलातीन–ए–अफगाणा :**

इ.स. १६०१ मध्ये पहिला अहमद यादगार याने लिहिलेला हा ग्रंथ 'तारीख–ए–शाही' या नावानेही ओळखला जातो. लोदी घराण्याची माहिती प्राप्त करण्यास हा ग्रंथ अतिशय महत्त्वाचा आहे. बहलोल लोदी पासून ते पुढे हेमूच्या मृत्युपर्यंतची माहिती यामधून प्राप्त होते.

**१०) मखजन–ए–अफगाणा :**

इ.स. १६१२ मध्ये दुसरा नियामतुल्ला याने हा ग्रंथ लिहिला आहे. या ग्रंथातही बहलोल लोदी पासून ते पुढे इब्राहीम लोदीच्या कारकीर्दीपर्यंतचा इतिहास आहे.

**ब) मुघलकालीन साधने (इ.स. १५२६ ते १७०७) :**

मध्ययुगीन भारतात प्रदीर्घकाळ सत्ता वर्चस्व मुघलांनी ठेवले. इ.स. १५२६ ते १७०७ या कालखंडात बहुतांश भारतीय प्रदेशावर एकसंघ वर्चस्व ठेवण्यात मुघलांना यश मिळालेले होते. मुघल सम्राट बाबराने इ.स. १५२६ पानिपतच्या पहिल्या युद्धात मुघल साम्राज्याचा पाया घातला. त्यानंतर सत्तेवर आलेला हुमायुन अकबर, जहांगीर, शहाजहान व औरंगजेब इत्यादीनी मुघल सत्तेवर आपले वर्चस्व प्रस्थापित केलेले दिसते. या प्रदीर्घ कालखंडातील माहिती अनेक ऐत्तदेशीय लिखित साधनांच्या माद्यमातून मिळते. प्रस्तुत उपघटकात आपण मुघलकालीन ऐत्तदेशीय लिखित साधनांचा अभ्यास करावयाचा आहे.

**१) तुझुक–ए–बाबरी (बाबरनामा) :**

बाबरनामा हा ग्रंथ म्हणजे स्वत: बाबराने आपले लिहिलेले आत्मचरित्र होय. बाबराने छगताई तुर्की या त्यांच्या मातृभाषेत या आत्मचरित्राचे लेखन केलेले आहे. 'तुझुक–ए–बाबरी', 'वाकियात बाबरी' व 'बाबरनामा'' या नावाने ते परिचित आहे. बाबरनामा या आत्मचरित्राचे प्रथम झैनखान याने पार्शियन भाषेत भाषांतर केले तर पुढे अकबराच्या काळात अब्दुल रहीम खान–खानान याने तिसरे भाषांतर केले. बाबर व त्यांच्या कारकीर्दीवर प्रकाश टाकणारे आतिशय महत्वाचे साधन म्हणून याचा उल्लेख करावा लागतो. परंतु या आत्मचरित्रात मधल्या काही काळातील लिखाण दिसत नाही. बाबराचे लिखाण तत्कालीन अनेक

घटनाच्यावर प्रकाश टाकण्यास उपयुक्त असून भारतातील सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, भौगोलिक व राजकीय घटनांची माहिती यामधून मिळते. ऐतिहासिक लेखन पद्धतीनुसार या ग्रंथाचे अवलोकन केले असता यामध्ये काही त्रुटीसह अतिशयोक्तीही दिसून येते. तत्कालीन भारतातील भौगोलिक वैशिष्ट्ये बाबराने नमूद केलेली दिसतात.

**२) तारीख-ई-रशिदी :**

भारतातील मुघल सत्तेच्या प्रारंभिक हालचालीशी संबंधीत प्राथमिक माहिती देणारा बाबरनामा नंतरचा ग्रंथ म्हणून याचा उल्लेख करावा लागतो. मिर्झा महंमद हैदर 'दुघलस' हा या ग्रंथाचा लेखक असून बाबराचा तो मावस भाऊ होता. हा ग्रंथ दोन भागात असून पहिल्या भागात मुघलांचा इतिहास आहे. त्यामध्ये बाबराच्या प्रारंभिक हालचाली, हुमायून, शेरशहा संघर्ष, बिलग्रामची लढाई, हुमायुनचे पलायन व काश्मीरमधील काही घडामोडी तर दुसऱ्या भागात लेखकाने काही आठवणी नमूद केलेल्या आहेत. लेखक बाबराबरोबर स्वत: विविध ठिकाणी हजर असल्याने या ग्रंथाचे ऐतिहासिक साधन म्हणून महत्त्वाचे स्थान आहे. (उदा. बिलग्रामच्या लढाईत तो स्वत:च सेनापती म्हणून हजर होता). या ग्रंथामधून बाबरनाम्यात ज्या घटना अथवा भाग नाही त्यावर देखील प्रकाश टाकण्यास मदत होते.

**४) हुमायुननामा :**

गुलबदन बेगम उर्फ गुलशन बेगम ही या ग्रंथाची लेखिका आहे. बाबराची ही मुलगी व हुमायुनची सावत्र बहीण. अकबराच्या विनंतीमुळे तिने हा ग्रंथ पर्शियन व तुर्की भाषेत लिहिलेला आहे. गुलबदन बेगम बाबर ते अकबरपर्यंतच्या अनेक घटनांची साक्षीदार असल्याने खाजगी घटनांच्यावर यामधून प्रकाश पडतो. विशेषत: हुमायून व कामरान यांच्यातील संघर्षाचे विस्तृत विवेचन केले आहे. मॅडम बेव्हरीज यांनी हुमायुननामाचे इंग्रजीत भाषांतर केलेले आहे.

**५) तारीख-इ-हुमायुनी उर्फ तझकिरत-उल-बाकाईत :**

हुमायुनचा अतिशय जवळचा नोकर असलेल्या जौहर आफताब याने हा ग्रंथ लिहिला आहे. हुमायुन बरोबर तो सतत असल्याने हुमायुनच्या व्यक्तीत्वाचे अनेक पैलू यामधून पहावयास मिळतात. परंतु जौहरने हा ग्रंथ त्यांच्या जीवनाच्या अखेर स्मरणावर लिहिलेला असल्याने घटनाक्रमामध्ये गडबड झालेली दिसते.

**६) तारीख-ए-शेरशाही :**

मुघल कालखंडाच्या मधल्या काळात इ.स. १५४० ते १५५५ या काळात दिल्ली येथे अफगाण शासकांची सत्ता होती. या कालखंडाविषयी माहिती देणारा हा ग्रंथ अकबराच्या आज्ञेवरून अब्बासखान शेरवानी यांने लिहिला आहे. तीन भागात लिहिलेल्या या ग्रंथात शेरखान सुरी यांची कारकिर्द, शासकीय व्यवस्था, धोरणे इत्यादीची माहिती मिळते.

### ७) अबुल फजलचे साहित्य :

मुघल काळातील अतिशय महत्त्वाचा लेखक म्हणून अबुल फजलाचा उल्लेख होतो. प्रसिद्ध सुफी संत शेख मुबारक नागोरीचा तो मुलगा होता. त्याचा जन्म आग्रा येथे १४ जानेवारी १५५१ रोजी झाला होता. अबुल फजल हा अकबराचा जवळचा मित्र व सल्लागार होता. शिवाय त्याच्या विचाराचा अकबरावर प्रभाव होता. अकबराने स्वतःच्या कारकिर्दीचा इतिहास लिहिण्यास अबुल फझलला सांगितलेले होते. त्यामुळे मुघल काळातील अत्यंत महत्त्वाचे साधन म्हणून अबुल फझलच्या साहित्याच्या साहित्य उल्लेख होता तो खालीलप्रमाणे-

### अ) अकबरनामा :

अकबरनामाचे प्रमुख तीन भाग आहेत. पहिल्या भागात मुघल घराण्याचा तिमूरपासून ते अकबराच्या पहिल्या १७ वर्षापर्यंतच्या कालखंडाचा इतिहास दिलेला आहे. पहिला भाग पुन्हा दोन उपघटकात विभाजित केलेला आहे. पहिल्या उपघटकात अकबराचा जन्म, तिमूर घराण्याची वंशावळ, बाबरचा राज्यविस्तार इ. तर दुसऱ्या उपघटकात अकबराच्या राज्यारोहणापासून पुढील १७ वर्षाच्या घटना नमूद केलेल्या आहेत. अकबरनाम्याच्या दुसऱ्या भागात अकबराच्या कार्यकाळातील १७ व्या वर्षापासून ते पुढे ४६ वर्षापर्यंतच्या घटना नमूद केलेल्या आहेत आणि तिसरा भाग 'ऐने-ए-अकबरी' चा आहे. हा भाग म्हणजे एक प्रकारचा स्वतंत्र ग्रंथच आहे. यामध्ये वर्षा-वर्षाच्या घटना नमूद केलेल्या आहेत.

### ब) ऐने-ए-अकबरी :

अबुल फझलचा या अकबरनामा तिसरा भाग म्हणजे हा ग्रंथ आहे. या ग्रंथात अकबर कालीन बऱ्याच बारीक-सारीक आकडेवारीचा उल्लेख आहे. मुघल साम्राज्याच्या भौगोलिक व ऐतिहासिक घटनांचे विवरण दिलेले आहे. त्याचबरोबर अकबराच्या काळातील विविध संस्थांचे वर्णन दिलेले आहे. हा ग्रंथ पाच उपघटकात विभाजित केलेला आहे. या पाच उपघटकात मुघल साम्राज्यातील सर्वच घटकांचा समावेश केलेला आहे. उदा. शाही परिवार, दरबार, टाकसाळ, खाद्यानांचे प्रकार, सैन्य, अधिकारी रचना, शिक्षण, जमीनीचे वर्गीकरण, महसूल, सुफी संप्रदाय इत्यादी संबंधी माहिती आहे.

### क) इन्शा-ए-अबुल फजल/ मुक्तुबात-ए-अलामी :

अबुल फजलने स्वतः जमविलेल्या सरकारी पत्राचा हा ग्रंथ आहे. या ग्रंथाचे तीन भाग आहेत. पहिल्या भागात स्वतः अकबराने विविध सत्ताधिशांना लिहिलेली पत्रे व फर्माने आहेत. दुसऱ्या भागात स्वतः अबुल फजलने अकबराला लिहिलेली पत्रे आहेत. तर तिसरा भाग अनेक पत्रांची सरळ मिसळ आहे. या पत्राच्या माध्यमातून अकबर कालीन अनेक ऐतिहासिक घटनावर प्रकाश पडतो.

### ड) रुक्कात-ए-अबुल फझल :

अबुल फझलच्या व्यक्तीगत पत्राचा संग्रह या ग्रंथात आहे. या ग्रंथाचे संकलन नूर मुहम्मद याने केलेले

आहे. अबुल फझलने सम्राट अकबर, राजपुत्र, राण्या, स्वत:चे आई वडील, भाऊ व इतर सरदारांना लिहिलेली पत्रे यामध्ये आहेत.

**८) तबकात-ए-अकबरी :**

ख्वाजा निजामुद्दीन अहमद हा या ग्रंथाचा लेखक आहे. तो अकबराच्या दरबारात मीरबक्षी होता तर बाबराच्या काळात त्याचे वडील ख्वाजा मुहम्मद मुकीम हर्वी दीवार-ए-ब्यूता च्या पदावर काम करत होते. हा ग्रंथ एकूण नऊ भागात विभागलेला असून महंमद घोरीच्या आक्रमणापासून पुढे इ.स. १५९२ पर्यंतचा इतिहास समाविष्ठ आहे. पहिल्या भागात मुहंमद घोरी पासून ते अकबराच्या राज्यारोहणापर्यंतचा इतिहास आहे. दुसऱ्या भागात दक्षिणेकडील मुस्लिम सत्तांचा इतिहास आहे. तिसऱ्या भागात गुजरातच्या सुलतानांचा इतिहास आहे. चौथ्या भागात माळव्याचा इतिहास आहे. पाचव्या भागात बंगालचा इतिहास, सहावा भाग जोनूरच्या शर्की राजवंशाचा इतिहास, सातवा भाग कश्मीरच्या मुसलमान शासकांचा इतिहास, आठव्या भागात सिंधचा इतिहास व नवव्या भागात मुलतानचा शासक मोहम्मद काशिम याचा इतिहास आहे. तत्कालीन इतर लेखकांच्या तुलनेत ख्वाजा निजामुद्दीन अहमद यांचा हा ग्रंथ ऐतिहासिक साधन म्हणून उच्च कोटीचा आहे.

**९) मुन्तखाब-उत-तवारीख (तारीख-ए-बदायुनी) :**

अबराच्या समकालीन असलेल्या अब्दुल कादिर बदायुनीं हा या ग्रंथाचा लेखक आहे. इ.स. १५४१ मध्ये रोडा येथे जन्माला आलेल्या बदायुनी हा पर्शियन, अरबी व संस्कृती भाषेचा पंडित होता. इस्लामी तत्त्वज्ञान, खगोलविज्ञान व इतिहासाचा तो चांगला अभ्यासक होता. अकबराच्या दरबारात तो इमाम पदावर काम करत होता. हा ग्रंथ त्यांच्या मृत्यूनंतर प्रकाशात आला. कारण या ग्रंथात त्यांने अकबराची निंदा केलेली आहे. त्यामुळे जहाँगिराने त्यांच्या प्रती नष्ठ करण्याचा आदेश दिलेला होता. हा ग्रंथ तीन भागात विभाजीत केलेला आहे. पहिल्या भागात सुक्तगीम पासून ते हुमायूनच्या मृत्यूपर्यंतचा इतिहास आहे. दुसऱ्या भागात अकबराच्या कालखंडातील विस्तृत विवेचन केलेले आहे. तिसऱ्या भागात विविध धार्मिक शेख, विद्वान, तत्त्वज्ञ, कवि व वैद्यकांची माहिती दिलेली आहे. याशिवाय बदायुनीने निजात-उद-रशीद हा सुफी संप्रदायावर प्रकाश टाकणारा ग्रंथ आहे. तर्जुअमा-ए-सिंहासन बत्तीसी हा अकबराच्या आज्ञेनुसार विकमारित्यांच्या ३२ कथांचा संग्रह आहे. याशिवाय तर्जुमा-ए-रामायण हे रामायणाचे भाषांतर, तर्जुमा-ए-महाभारत हे महाभारताचे पार्शिय भाषांतर आहे, तर्जुमा-ए-तारीख-ए-कश्मीर हा कल्हणाच्या 'राजतरंगिणीचे' पार्शियन भाषांतर आहे.

**१०) तारीख-ए-अल्फी :**

मुल्ला अहमद तलाबी याचा हा ग्रंथ आहे. अकबराच्या आदेशानुसार या ग्रंथाचे लेखन कार्य सुरू झाले. हजरत मुहम्मद याच्या हिजरतला १००० वर्ष पूर्ण झाल्याच्या निमित्ताने हा ग्रंथ लिहिला आहे. इ.स. १५८५ मध्ये या ग्रंथाची रचना करण्यास सुरूवात झाली, पुढे इ.स. १५५८ मध्ये मुल्ला मुहम्मदाची हत्या झाली. तेव्हा उर्वरित लिखाण आसफ खाँ याने पूर्ण केले. हा ग्रंथ तीन भागात विभागलेला आहे.

### ११) इकबालनामा :

जहाँगीराच्या कारकीर्दीची माहिती देणारा विश्वसनीय ग्रंथ म्हणून इकबालनामाचा उल्लेख करावा लागतो. मुतामीद खान हा या ग्रंथाचा कर्ता असून जहाँगिरांच्या दरबारात तो बक्षी या पदावर होता. जहाँगीराच्या दरबारातील महत्त्वाच्या घटनांचा तो स्वत: साक्षीदार असल्याने त्यांच्या लिखाणास महत्त्व आहे.

### १२) तुझुक-ए-जहाँगिरी :

जहॉंगिरीच्या कालखंडाविषयी अत्यंत विश्वसनीय असा हा ग्रंथ स्वत: जहाँगिराने आत्मचरित्र स्वरुपात लिहिला आहे. या ग्रंथात जहाँगिराने आपल्या कालखंडातील १२ वर्षाचा इतिहास लिहिला आहे. त्यानंतर या ग्रंथाचे लिखाण मोतामीद खाँन यांने पूर्ण केले. तो जहाँगिराच्या काळात बक्षीच्या पदावर काम करीत होता. मोतामीद खानाने पुढे १९ वर्षापर्यंतचा इतिहास जहाँगिरांच्या निरीक्षणाखाली लिहिलेला आहे. या ग्रंथांच्या लिखाणासाठी त्याने अबुल फझल, निजामुद्दीन अहमद यांच्या लिखाणाचा आधार घेतला आहे. पुढे या ग्रंथाचे नाव इकबाल नामा-ए-जहाँगिरी असे ठेवण्यात आले. या ग्रंथाच्या संकलनाचे काम पुढे अनेक वर्षे चालू होते. मुघल बादशहा मोहम्मदशाह (१७१९-१७४८) यांच्या काळात मोहम्मद हादी यांनी हा ग्रंथ पुन्हा संपादित केला व त्यास 'ततीम्मा-ए-वाकियात-ए-जहाँगिरी' असे नाव देण्यात आले. या ग्रंथाच्या अनेक प्रतीही पहावयास मिळतात. या ग्रंथाचा जहाँगिरनामा असा पहिला उल्लेख 'मआसिर-उल-उमरा' या ग्रंथाचा लेखक अब्दुल हई खाने यांने केला असून त्याचा इंग्रजी अनुवाद मेजर डेव्हीड प्राईस यांने केलेला आहे.

### १३) तारीख-ए-फेरिस्ता :

मुल्ला महंमद कासिम हिंदू शाह यांने हा ग्रंथ लिहिला आहे. गुलशन-इ-इब्राहिमी या किंवा नौरसनामा नावानेही हा ग्रंथ ओळखला जातो. फेरिस्ता कॅस्पियन समुद्र किनाऱ्या लगतचा अटतराबाद येथील होता. त्याचे वडील गुलाम अली हिंदू शाह एक विद्वान होता. मुल्ला महंमद प्रथम अहमदनगरच्या निझाम शाहीत नोकरीस होता. पुढे तो विजापूरच्या इब्राहिम आदिलशाहच्या दरबारात गेला व नंतर जहाँगिर बादशहाकडे इब्राहिम आदिलशाच्या आज्ञेनुसार भारतातील मुस्लिम राज्यकर्ताचा इतिहास लिहिण्यास प्रारंभ केला. फेरिस्ताचा हा ग्रंथ १२ उपघटकांत विभाजित केलेला आहे. फेरिस्ताने या ग्रंथासाठी तत्कालीन ३५ ग्रंथाचा आधार घेतलेला होता.

### १४) मआसिर-ए-रहिमी :

अब्दुल बाकी याने हा ग्रंथ लिहिलेला आहे. अबुल फैजी व अब्दुल रहीम खान खाना यांच्या निमंत्रणावरून तो भारतात आला व बऱ्हाणपूर येथे स्थायिक झाला. या ग्रंथात ४ हजार इतकी पृष्ठ संख्या असून चार भागात हा ग्रंथ विभागलेला आहे. या ग्रंथात बाकीने भारतातील मुस्लिमांच्या आक्रमणापासून जहाँगीर बादशहा पर्यंतचा इतिहास कथन केलेला आहे. याशिवाय बंगाल, जौनपूर, माळवा, काश्मिर, दिल्ली सुलतशाही इत्यादीची माहिती दिलेली आहे. उर्वरित तीन भागांत त्याला आश्रय देणाऱ्या अब्दुलरहीम खान खाना याच्या विषयीचे लिखाण आहे.

**१५) अनफा-उल अखबार :**

मुहम्मद अमीन यांने हा ग्रंथ लिहिलेला आहे. अमीन अहमदनगर मध्ये अनेक वर्षे वास्तव्यास होता. त्यामुळे त्याच्या लिखाणात वारंवार अहमदनरचा उल्लेख येतो. हा ग्रंथ दहा भागात विभाजित आहे. मुहंम्मद पैगंबरापासून जहाँगिर पर्यंतचा इतिहास दिलेला आहे. विशेषत: खलिफाचा इतिहास यामध्ये विस्तृतपणे दिलेला आहे. जहाँगिर काळातील अंतर्गत घडामोडीचाही यामध्ये समावेश आहे.

**१६) मुहम्मद अमीन कृत पातशहानामा :**

मुघल सम्राट शहाजहानच्या कारकीर्दीतील पहिल्या १० वर्षाचा इतिहास या ग्रंथात पहावयास मिळतो. मिर्झा मुहम्मद अमीन बिन अब्दुल हसन कजवीनी हा या ग्रंथाचा लेखक आहे. हा ग्रंथ 'तारीख-ए-शाहजहाँनी', 'दहसाला' या नावानेही ओळखला जातो. फारसी भाषेत लिहिलेला हा ग्रंथ समकालीन घटकांचे उत्तम चित्रण करतो. या ग्रंथात मुहम्मद अमीन यांने नूरजहाँची कठोर शब्दात निंदा केलेली आहे. प्रारंभिक काळात जी राजकीय अस्थिरता निर्माण झाली त्याला नूरजहाँ कारणीभूत होती असे महंमदचे मत आहे.

**१७) तबा तबाईकृत पातशहानामा :**

'पातशहानामा' हा ग्रंथ तबा तबाई या लेखकांने लिहिलेला आहे. या ग्रंथात शहाजहांनच्या पहिल्या आठ वर्षाचे विवरण मिळते. या ग्रंथावर मुहम्मद अमीनच्या लिखाणाचा प्रभाव स्पष्टपणे जाणवतो.

**१८) अब्दुल हमीद लाहोरी कृत 'पातशहानामा' :**

मुघल काळातील प्रसिद्ध इतिहासकार अब्दुल हमीद लाहोरी हा या ग्रंथाचा लेखक आहे. लोहोरीचा हा ग्रंथ 'बादशहानामा' म्हणून देखील ओळखला जातो. १६६२ पृष्ठाचा हा ग्रंथ प्रामुख्याने शहाजहाँनच्या कार्यावर आधारीत आहे. या ग्रंथात शहाजहानच्या पूर्वजांच्या संक्षिप्त इतिहास असून शहाजहानच्या जन्मपत्रिका ते राज्यरोहण व पुढे २० वर्षाचा इतिहास नमूद केलेला आहे. शहाजहाँनकालीन सामाजिक, आर्थिक व राजकीय जीवनाविषयी या ग्रंथातून महत्त्वाची माहिती प्राप्त होते.

**१९) मुहम्मद वारिस कृत 'पातशहानामा'**

अब्दुल हमीद लाहोरीचा शिष्य मुहम्मद वारिस यांने हा ग्रंथ लिहिलेला आहे. लाहोरीचे अपूर्ण कार्य वारिस याने पूर्ण केलेले दिसते. शहाजहाच्या कारकीर्दीच्या २० व्या वर्षापासून पुढे ३० व्या वर्षापर्यंतच्या इतिहास वारिसने नमूद केलेला आहे. मुहम्मद वारिसचा हा ग्रंथ 'शहाजहानामा' म्हणून सुद्धा ओळखला जातो. या ग्रंथाचे वैशिष्ट्य म्हणजे शहाजनहानचे इराण विषयीचे धोरण या ग्रंथातून पहावयास मिळते.

**२०) मुहम्मद सारित खान कृत शहाजहाँननामा :**

मुघल कालखंडातील आणखी एक महत्त्वाचा इतिहासकार म्हणून मुहम्मद सादिन खान यांचा उल्लेख होतो. शहाजहानच्या प्रारंभिक काळापासून सादित खान वाकनिस म्हणून त्याच्या बरोबर होता. त्यानंतर तो दरोगा-ए-गुसलखाना या पदावर गेला. सादित खान ही उपाधी होती. शहाजहाँन काळातील विविध घटनांचा

तो प्रत्यक्ष साक्षीदार असल्याने त्याच्या लिखाणाला महत्त्व प्राप्त होते. शिवाय त्याचे लेखन निष्पक्ष स्वरूपाचे आहे. या ग्रंथात त्याने जहाँगिरच्या मृत्यू पासून ते शहाजहाँनला नजर कैदेत टाकेपर्यंतचा इतिहास कथन केलेला आहे.

**२१) मुहम्मद ताहिर कृत शहाजहाँनामा :**

मुहम्मद ताहीर उर्फ इनायत खान हा या ग्रंथाचा लेखक आहे. इनायतखान शहाजहाँनच्या काळात काबूल व काश्मीरचा सुभेदार म्हणून काम करत होता. शहाजहानच्या काळातील प्रत्यक्ष साक्षीदार म्हणून त्याच्या लिखाणाला महत्त्व प्राप्त आहे. औरंगजेब बादशाने आगऱ्याचा किल्ला जिंकला तिथपर्यंतचा शहाजहानच्या कारकीर्दीचा इतिहास या ग्रंथात नमूद आहे. या ग्रंथात एकूण ३६० पृष्ठ असून त्यांचा इंग्रजी अनुवाद मेजर फुलर यांने केलेला आहे.

**२२) अमल–ए–सालीह :**

मुहम्मद सालीह हा या ग्रंथाचा लेखक आहे. मुहम्मद सालीह हा मुलतः कवी होता. तो 'काश्फी' व 'शुभान' नावाने हिंदीमध्ये कविता करत असे. मुघलांच्या दप्तर खान्यात नोकरीस असल्याने त्यांने या ठिकाणच्या कागदाचा वापर आपल्या लिखानासाठी केलेला दिसतो. शहाजहॉनच्या जन्मापासून ते मृत्यूपर्यंतच्या घटना त्याने या ग्रंथात नमूद केलेल्या असून ग्रंथाच्या शेवटी सय्यद शेख, विद्वान, कवि, वैद्याची माहिती दिलेली आहे. या ग्रंथातून मनसबदाराच्या रचनेवर चांगला प्रकाश पडतो.

**२३) चहारचमन :**

चंद्रभान हा या ग्रंथाचा लेखक असून तो एक हिंदू ब्राह्मण होता. फारसीवर तचे प्रभुत्व होते व शहाजनाच्या दरबारात फडणवीस म्हणून काम करत होता. दरबारात फडणीस असल्याने दरबारातील सर्वच बारीक–सारीक घटना व सरदाराशी त्णयांचा चांगला संबंध होता. अर्थातच त्याच्या लिखानातून हे सर्व जाणवते. शहाजहानच्या प्रशासन व्यवस्थेवर या ग्रंथातून चांगला प्रकाश पडतो.

**२४) आलमगीरनामा :**

मिर्झा मोहम्मद काजिम यांने औरंगजेबाच्या आज्ञेवरून हा ग्रंथ लिहिला आहे. औरंगजेबाच्या दरबारात तो लेखक म्हणून होता. या ग्रंथात औरंगजेबाच्या पहिल्या १० वर्षाचा इतिहास आहे. शहाजहानच्या आजारपणापासून हा ग्रंथ सुरू होतो व औरंगजेबाच्या पहिल्या १० वर्षापर्यंत येतो. मोहम्मद काजिम दरबारी लेखक असल्याने साहजिकच त्यांच्या लिखानात शत्रूसंबंधी निंदा दिसून येते. छ. शिवाजी महाराजांच्या संबंधीच्या काही घटना त्यांने यामध्ये नमूद केलेल्या आहेत, मात्र त्या सदोष आहेत.

**२५) मासिरे–आलमगिरी :**

मुहम्मद साकी मुस्तैदखान हा या ग्रंथाचा लेखक आहे. हा औरंगजेबाच्या दरबारी लेखक होता. औरंगजेबाच्या संपूर्ण कारकिर्दीचा समावेश यामध्ये आहे. त्यामुळे तो औरंगजेबाचा चरित्र ग्रंथच ठरतो.

मुस्तैदखान सलग ४० वर्षे औरंगजेबासोबत असल्याने त्यांच्या सर्व घटना त्याने स्वत: अनुभवलेल्या आहेत. औरंगजेबाच्या दक्षिण स्वारीत तो हजर होता. या ग्रंथाचे दोन भाग असून पहिल्या भागात औरंगजेबाच्या राज्याभिषेकाच्या पूर्वीच्या १० वर्षाचा इतिहास आहे. दुसऱ्या भागात औरंगजेबाच्या शेवटच्या ४० वर्षाचा इतिहास आहे. या ग्रंथात छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकापासून पुढे मुघल-मराठा संघर्षाची माहिती आहे. संभाजी महाराज, राजाराम, महाराणी, ताराबाई यांच्या संबंधी अभ्यासासाठी हा ग्रंथ महत्त्वपूर्ण आहे. इ.स. १८७१ मध्ये बंगालमधील रॉयल एशियाटीक सोसायटीने याचे प्रथम इंग्रजीत भाषांतर केले. पुढे सर जदुनाथ सरकार यांनी स्वतंत्रपणे याचे इंग्रजीत भाषांतर केले. सेतु माधवराव पगडी यांनी 'मराठे व औरंगजेब' या नावाने मराठीत भाषांतर केले आहे.

### २६) तारीखे-इ-दिल्कुशा/नुस्खा-ए-दिलकुशा :

भीमसेन सक्सेना याने हा ग्रंथ लिहिलेला आहे. रघुनाथ दास सकसेना याचा हा मुलगा होता. बुंदेल वंशातील राव दलपत यांच्या पेशकार होता. राव दलपत दक्षिणेत मराठ्याच्या विरोधात औरंगजेबासोबत आला तेव्हा भीमसेन सक्सेना हा ही त्याच्या सोबत होता. दक्षिणेतील अनेक घटनांचा तो प्रत्यक्ष साक्षीदार असल्याने मराठा इतिहाससंबंधी अनेक घटनांचा उलगडा यामधून होतो. खासकरून दक्षिणेतील तत्कालीन राजकीय, सामाजिक, आर्थिक परिस्थिती, सामाजिक चालीरीती, आचार विचार इत्यादी संबंधी माहिती मिळते. सक्सेनाने मुघल सैन्यातील सर्व घटकावर प्रकाश टाकलेला आहे. खास करून छत्रपती शिवाजी महाराज, संभाजी महाराज, माहाराणी ताराबाई यांचा मुघलाशी झालेला संघर्ष त्याने नमूद केलेला आहे. मराठ्यांच्या इतिहासातील अनेक घटना सक्सेनाने नमूद केलेल्या आहेत. पांडूरंग नरहरी पटवर्धन यांनी 'बुंदेल्यांची बखर' या नावाने मराठी भाषांतर केले आहे. तर सेतू माधवराव पगडी यांनी 'मोगल व मराठे' या नावाने मराठीत भाषांतर केले आहे. जॉन्सन स्कॉट यांने त्यांचे इंग्रजी भाषांतर केलेले आहे.

### २७) मुन्तखब-उल-लुबाब मुहम्मदशाही :

मुहम्मद हासिम को हासिम अलीखान उर्फ खाफीखान यांने हा ग्रंथ लिहिलेला आहे. खाफीखान यांचा हा ग्रंथ तारीखे काफीखान म्हणूनही ओळखला जातो. या ग्रंथात त्यांने (तैमूर) इ.स. १५१९ पासून ते १७३४ पर्यंतचा मुघलांचा इतिहास कथन केलेला आहे. या ग्रंथाचे एकूण तीन भाग आहेत. पहिल्या भागात तुर्कांचा भारत विजय ते लोदी वंश, दुसऱ्या भागात मुघलांचा पूर्ण इतिहास, विशेषत: गुजरात, खानदेश व दक्षिण भारताचा इतिहहस व तिसऱ्या भागात औरंगजेबाच्या संपूर्ण कारकीर्दीचा इतिहास दिलेला आहे. खाफीखानाच्या या ग्रंथामधून मराठ्यांच्या इतिहासावर चांगलाच प्रकाश पडतो. छत्रपती शिवाजी महाराज, धनाजी, संताजी पर्यंतच्या अनेक घटना खाफीखानाने नमूद केलेल्या आहेत. बंगालच्या रॉयल एशियाटीक सोसायटीने यांचे इंग्रजीत भाषांतर केलेले आहे. ग. ह. खरे व सेतू माधवराव पगडी यांनी त्याचे मराठीत भाषांतर केलेले आहे.

### २८) फुत्तुहाते आलमगिरी :

ईश्वरदास नागर यांने हा ग्रंथ लिहिलेला आहे. औरंगजेब बादशहाच्या मुख्य न्यायाधिशांचा लेखनिक

असलेला ईश्वरदास नागर सतत औरंगजेबासोबत असे. मुघलांच्या इ.स. १६६० ते १७०० पर्यंतच्या मोहिमांचे या ग्रंथात वर्णन आहे. विशेषत: या ग्रंथामधून राजस्थान व मराठ्यांच्या इतिहासावर प्रकाश टाकण्यास मदत होते.

**क) प्रादेशिक भाषेतील साहित्य :**

मध्यकालीन भारताचा इतिहास लिहीत असताना केवळ फार्शी साधनावरच अवलंबून न राहता इतर प्रादेशिक भाषेतील साधनांचाही उपयोग होतो. यामध्ये राजस्थानी, मराठी, संस्कृत, कन्नड, तमीळ आदी भाषांचा समावेश होतो.

- **राजस्थानी ख्यात साहित्य :**

ख्यात मुलत: संस्कृत भाषेतील शब्द आहे. याचा अर्थ प्रख्यात, कीर्तीवंत, ख्यातीवंत असा आहे. इतिहासाला समानार्थी शब्द म्हणून याचा वापर राजस्थामध्ये केला जातो. इ.स. १६ व्या शतकात ख्यात लेखन परंपरा उदयास आली. अकबराचे राजपूतांच्या बरोबर संबंध प्रस्थापित झाल्यानंतर अकबराने त्यांना आपल्या राजवंशाबद्दल ऐतिहासिक विवरण पाठवण्यास सांगितले. तेव्हा ख्यात साहित्यास चालना मिळाली. या साहित्यामधून तत्कालीन राजकीय, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक व धार्मिक माहिती, आचार-विचार, आहार, वेशभूषा इत्यादी संबंधी माहिती पहावयास मिळते. यामध्ये मुहणोत नैणसीचे ख्यातयात साहित्य प्रसिद्ध आहे. त्यांच्या साहित्यकृतीमध्ये मुहणोत नैणसी री ख्यात, मारवाडा रा परगना री विगत विशेष उल्लेखनीय आहे. याची भाषा मारवाडी आहे.

- **बही साहित्य (वहीलेखन) :**

राजस्थानमधील वही साहित्य परंपराही इतिहासाशी मिळती जुळती आहे. ख्यात साहित्याबरोबर वही लेखन परंपराही प्राचीन आहे. यामध्ये 'जोधपुर हुकूमत की वही' याचा विशेषत्वाने उल्लेख करता येईल. यामध्ये जसवंतसिंगाचा संपूर्ण इतिहास चित्रित केलेला असून तो ५ भागात दिलेला आहे. राजस्थानमध्ये वरील साहित्याबरोबर रासो काव्य हे ही इतिहासाचे महत्त्वाचे साहित्य आहे. यामध्ये 'पृथ्वीराज रासो' हे प्रसिद्ध काव्य आहे.

- **काव्य ग्रंथ :**

मध्यकालीन कालखंडात निर्माण झालेले काव्य ग्रंथही इतिहासाचे महत्त्वपूर्ण स्त्रोत आहेत. भारताच्या संपूर्ण भागात अशा प्रकारचे काव्य ग्रंथ उपलब्ध होतात. यामध्ये प्रामुख्याने केशवदास कृत 'रत्न बावनी', 'वीरसिहदेव चरित', 'जहाँगिर जस चन्द्रिका', जटमल कृत, 'गोराबादल', राजकवितकृत 'जयसिंह चरित', 'किशोरदास भाट कृत 'राज प्रकाश', भूषण कृत 'शिवराज भूषण', 'शिव बावनी', 'छत्रसाल दशक', निवाज तिवारी कृत 'छत्रसाल विरुदावल', लाल कविकृत 'छत्रप्रकाश', सुदन कृत 'सुजान चरित' व वृऋभदास जैन कृत 'कुमार पाल रासो' इत्यादींचा यामध्ये समावेश होतो.

## • संस्कृत काव्य :

मध्यकालीन कालखंडाची ऐतिहासिक माहिती देणारे संस्कृत ग्रंथ फारच कमी आहे. काश्मीरचा सुलतान जैनुल आबिदी यांच्या आज्ञेवरून कल्हणाने काश्मीरच्या इतिहासावर लिहिलेला 'राजतरंगिणी' हा ग्रंथ प्रमुख आहे. किंवा उदयराज यांने गुजरातचा सुलतान महंमद बेगडा यांच्या शासन काळावर लिहिलेला 'राज विनोद' महेश ठाकूर कृत 'सर्वदेश वृत्तांत संग्रह' परमसुंदर कृत 'अकबरशाही शृंगार दर्पण', सिधी चंद्र उपाध्याय कृत, 'भानुचंद्र चरित्र' देवविमल कृत 'हिरा सौभाग्यम्', चंद्रशेखर लिखित 'सुर्जन चरित्र' रणछोडभट कृत 'अमरकाव्य' यामध्ये मेवाडच्या राण्यांचा इतिहास आहे. वीरभानुदास काव्य यामध्ये अकबर व वाघेला राजांचे संबंध स्पष्ट केलेले आहेत.

## • अमुक्त्यमाल्याद :

विजयनगर साम्राज्याचा इतिहास जाणून घेण्यासाठी 'अमुक्त्यमाल्याद' हा ग्रंथ महत्त्वाचा ऐतिहासिक साधन ग्रंथ आहे. विजयनगरचा राजा कृष्णदेवराय याने हा ग्रंथ लिहिलेला आहे. मुलत: हा काव्यग्रंथ आहे. या ग्रंथाची भाषा संमिश्र आहे. कृष्णदेवराय याला अनेक भाषा येत होत्या. त्यांने संस्कृतमध्ये पाच ग्रंथ लिहिलेले आहेत. कृष्णदेवरायांच्या या ग्रंथामधून तत्कालीन राजकीय विचार, प्रथा, परंपरा, न्यायव्यवस्था, शिक्षेचे प्रकार, सैन्य व्यवस्था, प्रशासन, उद्योगधंदे, व्यापार, दळणवळणाची साधने, शेती, शेतीचे प्रकार, पाणी व्यवस्था इत्यादी बरोबरच दरबारी रीतीरिवाज व सांस्कृतिक माहिती या ग्रंथामधून मिळते. विजयनगर साम्राज्यांच्या सांस्कृतिक इतिहासात या ग्रंथाला फार मोठे महत्त्व आहे.

## • स्वयं अध्ययन प्रश्न क्र. १

**अ) रिकाम्या जागा भरा.**

१) तबकात-ए-नासिरी हा ग्रंथ ............. यांने लिहिला.

२) तारीख-ए-फिरोजशाही हा ग्रंथ ............ याने लिहिला.

३) बाबरनामा हा ग्रंथ ............ भाषेत आहे.

४) अबुल फझल ............. याचा मुलगा होता.

५) फेरिस्ता .............. मधील रहिवाशी होता.

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) ताजुल मासीरचा लेखक कोण आहे?

२) आशिक-इ-देवलरानी हा ग्रंथ कोणी लिहिला?

३) गुलबदन बेगम हिने कोणता ग्रंथ लिहिला?

४) ईश्वरदास नागर औरंगजेबाच्या दरबारात कोणत्या पदावर होता?

५) ख्यात म्हणजे काय ?

### १.२.२ परकीय साधने :

मध्ययुगीन भारताच्या अभ्यासासाठी ज्याप्रकारे फार्शी, अरबी, हिंदी, संस्कृत साधने उपयुत आहेत त्या प्रमाणे परकीय साधने सुद्धा तितकीच महत्त्वाची आहेत. यामध्ये मुख्यत्वेकरून पोर्तुगीज, इंग्रजी व डच साधनांचा समावेश आहे. परकीय प्रवासी अथवा विविध कंपन्यांचे प्रतिनिधी भारतात व्यापाराच्या निमित्ताने आले होते, त्यामुळे त्यांच्याकडून झालेल्या नोंदी त्रयस्थपणे झालेल्या दिसतात. पहिल्या काही दशकात परकीय लोकांचा स्थानिक राजकारणात फारसा हस्तक्षेप नव्हता. त्यामुळे त्यांच्या तटस्थ वृत्तीचा या साधनांच्या मधून दृष्टीकोण दिसतो.

#### अ) प्रवास वर्णने :

प्राचीन काळापासून भारताचे आकर्षण परकीयांना असलेले दिसते. काही आक्रमक वृत्तीने भारतात आले तर काही उत्सुकतेपोटी आलेले दिसतात. मध्ययुगीन कालखंडातही विविध देशातील प्रतिनिधी व प्रवासी भारतात आलेले दिसतात. त्यांच्या प्रवास वर्णनातून तत्कालीन राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक घटकांवर प्रकाश पडतो.

#### १) इब्न बतूता (१३०४ – १३७८) :

प्रसिद्ध मोरोक्कन प्रवासी इब्न बतुता महंमद तुघलकाच्या काळात भारतात आलेला होता. ‘किताब–उल–रहेला’ हे त्याचे प्रसिद्ध प्रवास वर्णन आहे. इब्न बतूताचे मूळ नाव शेख फकीह अबू अब्दुल्ला मुहम्मद इब्न अब्दुल्लाल्ह इब्न मुहम्मद इब्न इब्राहिम असे होते. २४ फेब्रुवारी १३०४ रोजी त्याचा जन्म मोरक्कोमधील तानजीर (टॅनजीयर) येथे काझी कुटुंबात झाला. वयाच्या २१ वर्षी तो मक्का मदीनेच्या यात्रेला निघाला. अनेक शहरांना भेटी दिल्या व नंतर इ.स. १३३३ मध्ये तो भारतात आला. पुढे तो इ.स. १३४७ पर्यंत तो भारतात राहिला. त्यापैकी १८ वर्षे तो दिल्लीत वास्तव्यास होता. मुहम्मद बिन तुघलकाने त्याला काझी या पदावर नियुक्त केलेले होते. तुघलकांचा राजदूत म्हणून तो इ.स. १३४२ मध्ये चीनला जाणार होता. परंतु त्यांचे जहाज दुर्घटनाग्रस्त झाल्याने तो जाऊ शकला नाही. मात्र पुन्हा तो मुहम्मद तुघलकाकडे गेला नाही, तेथून तो मालदीवला गेला. मालदीववरून श्रीलंका, मलबार, बंगाल, आसाम, सुमात्रा, चीन, पार्शियन खाडी पार करून बगदादला पोहचला व तेथून तो टॅनजीयर या आपल्या मूळ गावी गेला. दरम्यान त्याने मध्य अशियायी देशांना भेटी दिलेल्या होत्या.

मोरक्कोच्या सुलतान अबु इनआम मरीनी यांने त्याला त्यांचे प्रवास वर्णन लिहिण्यास प्रोत्साहित केले. त्याचा अरबी हस्तलिखीतचे पूर्वीचे नाव ‘तुहफतुन्नुज्जार फी गराइविल अमसार’ व ‘अजाईसुल अफसार’ असे होते. पुढे ते ‘किताब–उल–रेहेला’ या नावाने प्रसिद्ध झाले. हे पुस्तक इ.स. १३५५–५६ मध्ये पूर्ण झाले. इब्न बतुताने मुहम्मद बीन तुघलकांच्या बरोबर पूर्वीच्या सुलतानांचा संक्षिप्त इतिहास दिलेला आहे. बतुता ऐतिहासिक घटनाच्याकडे अतिशय सूक्ष्म दृष्टीकोनातून पाहत होता. भारतातील न्यायव्यवस्था, लष्करी संघटन व प्रशासन राजकीय घडामोडी, सामाजिक रचना, भौगोलिक परिस्थिती, पशू–पक्षी, कृषी उत्पादने, दरबारी

समारंभ, व्यापार, व्यापारी पद्धती, वाहतूक व्यवस्था, हेरखाते, वेशभूषा, विविध नगरे, टपाल व्यवस्था, खाद्य पदार्थ, सुफी संत, फळे, फुले, आहार-विहार अशा अनेक विध घटकांच्या बरोबर मुहम्मद तुघलकाच्या काळातील समकालीन सर्वच घटकांची अतिशय सखोल माहिती मिळविण्याचे हे अतिशय महत्त्वाचे साधन आहे. बतुता परकीय प्रवासी असल्याने त्याच्यावर कोणतेही बंधन अथवा दडपण नव्हते. त्यामुळे त्याने अतिशय मुक्तपणे लिहिलेले आहे.

**२) अब्दुल रझाक :**

अब्दुल रझाक हा पार्शियन वकील होता. इ.स. १४१३ मध्ये हेरात मध्ये त्याचा जन्म झालेला होता. त्याचे वडील जलालुद्दीन इशाक काफी खुरासनचा सुलतान शाह मख याच्या कारकीर्दीत सरकंदाचा काझी होता. वडिलांच्या मृत्यूनंतर तो खुरासनच्या सुलतानाच्या सेवेत आला. इ.स. १४४२ मध्ये समुद्रमार्गे तो औरमुज मार्गे कलिकत येथे आला. परंतु फार काळ तो त्या ठिकाणी राहिला नाही. तेथून तो विजयनगरला आला, तेथे तो २ वर्षे वास्तव्यास होता. इ.स. १४४४ मध्ये तो मंगलोर मार्गे इरानला गेला. रझाकने परत गेल्यानंतर मध्यआशियाच्या इतिहासावर आधारित 'मतलौस सादाई व मजमौल बहराई'' (दोन भाग्यशाली ग्रह) हा दोन खंडात्मक ग्रंथ लिहिला. या ग्रंथात त्याने तैमूरच्या आक्रमणापासूनचा इतिहास लिहिलेला आहे. दुसऱ्या खंडात विजयनगर मधील प्रवासवर्णन लिहिलेले आहे. यामध्ये विजयनगरचे राजे, दरबार, रितीरिवाज जीवन शैली, सामाजिक व सांस्कृतिक परिस्थितीची विस्तृत वर्णन दिले आहे. विजयनगरच्या सांस्कृतिक घटकाचा अभ्यास करण्यासाठी रझाकचा ग्रंथ प्रमुख आधार ग्रंथ आहे.

**३) मार्को पोलो :**

आधुनिक भूगोलचा जनक म्हणून ज्यांची ओळख आहे तो मार्को पोलो वेनिस शहरात रहीवासी होता. इ.स. १२७१ मध्ये तो आपल्या वडिलासोबत विश्व भ्रमंतीसाठी निघाला. इ.स. १२७४ मध्ये चीनमधील मंगोल सम्राट कुबलाई खानाच्या दरबारात पोहचले. मार्को पोलो कुबलाई खानाच्या सेवेत १७ वर्षे राहिला. इ.स. १२९४-९५ मध्ये परत वेनिसला जाताना त्याने भारताच्या पूर्व-पश्चिम किनारपट्टीवरील विविध ठिकाणांना भेटी दिल्या. या प्रवासकाळात त्याने येथील प्राकृतिक इतिहास, कृषी उत्पादने, औद्योगिक उत्पादन, भारत व युरोपमधील महत्त्वपूर्ण व्यापारी वस्तू इत्यादीची माहिती दिलेली आहे. सर्वसामान्य लोकांच्या दैनंदिन जीवनाचे चित्रण आपल्या प्रवास वर्णनात केलेले आहे.

**४) निकोलो द कौटी :**

निकोलो कौटी हा इटालियन प्रवासी होता. तो वेनिस शहरातील रहवासी होता. १५ व्या शतकाच्या प्रारंभी कौटी एक व्यापारी म्हणून बाहेर पडलेला होता. त्याने आपल्या प्रवासात भारत, श्रीलंका, सुमात्रा, जावा व चीन बरोबर इतर अनेक देशांना भेटी दिल्या. २५ वर्षे प्रवास करून तो इ.स. १४४४ मध्ये आपल्यामूळ शहरात परत गेला. इटलीत परत गेल्यावर त्याने आपले प्रवास कथन पोप युजीन चौथा यांच्या समोर कैरो मध्ये ख्रिश्चन धर्म बदलाची कबुली दिली तेव्हा पोपने त्याचे प्रवास वर्णन सर्वांना सांगण्याच्या

अटीवर माफ करण्याची अट घातली. तेव्हा पोपच्या सचिव पोगियो वैकियोलिनी याने त्यांचे प्रवास वर्णन लॅटिन मध्ये शब्दबद्ध केले. त्याच्या प्रवास वर्णनात विजयनगर मधील अनेक घटना सापडतात. विशेषत: दक्षिण भारतातील सामाजिक, आर्थिक परिस्थितीवर प्रकाश पडतो.

**५) अथेन्सियस निकीतीन :**

रशियन व्यापारी असलेल्या निकीतीनने इ.स.१४७० मध्ये बहामनी राज्याला भेट दिली. चौल मार्गे तो येथे आलेला होता. त्याने बहामनी शासकांचा दरबार, सैन्यदल व लोकांचे राहणीमान याबाबत विस्तृत वर्णन केलेले आहे.

**६) लुडोव्हीको दी वर्थेमा :**

वर्थेमा हा इटलीचा रहिवाशी होता. इ.स. १५०२-०४ च्या दरम्यान तो भारतात आलेला होता. पोर्तुगालच्या लोकांनी वर्थेमाला 'सर' हा किताब दिलेला आहे. आपल्या प्रवासादरम्यान त्याने गोवा, कालिकत व पश्चिम किनारपट्टीवरील अनेक बंदरांना भेटी दिलेल्या होत्या. आपल्या प्रवास वर्णनात त्याने अनेक वैशिष्ट्यपूर्ण घटनांची नोंद घेतलेली आहे.

**७) डोमिंगो पायस :**

डोमिंगो पायस हा पोर्तुगीज प्रवासी होता. मध्ययुगीन काळात भारतात येऊन गेलेल्या युरोपीय प्रवाशांच्या मध्ये पायस हा एक महत्त्वपूर्ण प्रवासी आहे. त्यांने मध्ययुगीन काळात भरभराटीस आलेल्या विजयनगर साम्राज्यास भेट दिलेली होती व तेथे तो काही काळ वास्तव्यास देखील होता. विजयनगर साम्राज्यातील अनेक घटकावर त्यांच्या लिखाणातून प्रकाश पडतो. विजयनगर या राजधानीचे वर्णन, विजयनगरचा वैभवशाली व्यापार, आर्थिक संपत्तीचे वर्णन, आर्थिक संपन्नता, दळणवळणाचे मार्ग, सामाजिक परिस्थिती, सांस्कृतिक विरासत, प्रथा-परंपरा, व्यापारी मार्गाबरोबर व्यापारी माल व त्यांचे दर, मसाल्याचे उत्पादन व व्यापार, विविध फळाचे उत्पादन व व्यापार, अलंकार, जड-जवाहिर, धातुकाम, जहाज बांधणी, चलन व्यवस्था अशा अनेक बाबींचे सविस्तर वर्णन पायस आपल्या लिखाणात करतो.

**८) बार्बोसा :**

बार्बोसा पोर्तुगालचा रहिवाशी होता. इ.स. १५०० मध्ये तो भारतात आला व पुढे इ.स. १५१६ पर्यंत भारतात होता. त्याला मल्याळी भाषा अवगत होती. कन्नानूरच्या राज्याकडे तो दुभाषी म्हणून काम करत होता. अल बुकर्कच्या काळात तो कन्नानूरच्या राजाकडे दुभाषी म्हणून होता. त्यानंतर तो अल बुकर्कच्या सेवेत गेला. व इ.स. १५१७-१८ मध्ये परत पोर्तुगालला गेला. आपल्या गावी परत गेल्यानंतर त्याने आपले प्रवास वर्णन लिहून काढले. त्यांच्या प्रवासवर्णनात विजयनगरमधील विस्तृत माहिती पहावयास मिळते.

**९) फादर एन्थोनी मोसेरात :**

अकबर बादशहाच्या काळात फादर एक्नाविवा यांच्या बरोबर इ.स. १५७८ मध्ये तो मुघल दरबारात

आला त्याने आपल्या प्रवास वर्णनात इ.स. १५८०-८२ या काळातील मुघल दरबाराचे विस्तृत वर्णन दिलेले आहे. मोसेरातला शाहजादा मुरादचा शिक्षक म्हणून नियुक्त केलेले होते. त्यामुळे त्याच्या प्रवास वर्णनास तत्कालीन शिक्षण पद्धतीची बरीच माहिती मिळते. त्यांच्या भारतातील वास्तव्याच्या काळात त्याने भारतातील शहरे पाहिली व त्या शहराबद्दल सखोल माहिती त्याने दिलेली आहे. अकबराच्या काबूल अभियानात तो अकबरा समवेत होता. त्याने मुघल सैन्याच्या हालचालीची विस्तृत माहिती दिलेली आहे. सर्वसामान्य माणसांच्या राहणीमानाबाबतही मोसेरातने लिहिलेले आहे.

### १०) राल्फफिच :

अकबर बादशहाच्या काळात आलेला हा दुसरा युरोपिय प्रवासी होता. इ.स. १५८८-९१ या दरम्यान तो भारतात होता. या काळात त्याने भारतातील अनेक शहरांना भेटी दिलेल्या होत्या. गुजरातमधील खंबायत बंदराचे त्याने विस्तृत वर्णन केलेले आहे. आग्रा, फत्तेपूर सिक्री, बनारस, पटना, बऱ्हाणपूर या शहराविषयी महत्त्वाची माहिती त्यांच्या प्रवास वर्णनात आहे. याशिवाय त्यांने सामाजिक प्रथा-परंपरा विषयी देखील लिहिलेले आहे. यामध्ये बालविवाह, सतीप्रथा, विधवाचे जीवन इ. संबंधी विस्तृत माहिती मिळते.

### ११) विल्यिम हॉकिन्स :

मुघल सम्राट जहाँगिराच्या काळात विल्यिम हॉकिन्स भारतात आला. इ.स. १६१८ ते १६१३ पर्यंत तो भारतात वास्तव्यास होता. ईस्ट इंडिया कंपनीचा तो नोकर होता. हॉकिन्सला उत्तम पार्शीयन भाषा अवगत होती. जहाँगिरांचे वैयक्तिक जीवन, चैनी स्वभाव, दरबारी रितीरिवाज यासंबंधी हॉकिन्सने विस्तृत माहिती दिलेली आहे. त्यांच्या प्रवास वर्णनातून तत्कालीन शासन पद्धतीवरही प्रकाश पडतो.

### १२) विल्यिम फिच :

विल्यिम हॉकिन्सच्या समकालीन काळात विल्यिम फिच इ.स. १६०८ मध्ये तो भारतात आला. फिचचे लिखाण साधे असले तरी विश्वसनीय स्वरूपाचे आहे. त्यांने आपल्या प्रवास वर्णनात येथील व्यक्ती, पशू, पक्षी, झाडे, शहरे, किल्ले, पुल, धार्मिक श्रद्धा इत्यादी संबंध भरपूर वर्णन केलेले आहे. फिचच्या प्रवास वर्णनाचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांने तत्कालीन काळात अस्तित्वात असलेले व्यापारी मार्ग व शहरांचे विस्तृत वर्णन केलेले आहे. त्यांच्या लिखानात अनारकलीच्या दंतकथेचा उल्लेख आहे.

### १३) जोन जुरदा :

जहाँगिरच्या कारकीर्दीत आलेला हा युरोपीय प्रवासी होता. इ.स. १६०८ ते १६१७ पर्यंत तो भारतात होता. या काळात त्याने उत्तर भारतातील बहुतांश शहरांनी भेटी दिल्या. आग्रा शहरासंबंधी त्यांने विस्तृत वर्णन केलले आहे. व्यापारी शहर म्हणून आग्रा हे भारतातील सर्वात मोठे शहर असल्याचा तो दावा करतो. याशिवाय त्यांने अहमदाबाद व खंबायत या व्यापारी शहरासंबंधीही लिखाण केलेले आहे.

### १४) थॉमस कोर्यत :

जहाँगिरच्या काळात कोर्टात आलेला होता व सर थॉमस रो सोबत तो जहाँगिर बादशहाला भेटलेला

होता. त्याने आपल्या प्रवास वर्णनात जहाँगिरच्या दैनंदिन जीवनासंबंधी व मनोरंजनांच्या साधना विषयी भरपूर लिखाण केले. यामध्ये जहाँगिराचे झरोका दर्शन व तुलादान याविषयी लिहिलेले आहे.

**१५) सर थॉमस रो :**

'सर थॉमस रो' जहाँगिर बादशहाच्या काळातील प्रमुख युरोपीय प्रवासी होता. इ.स. १६१५ पासून ते १६१९ पर्यंत तो भारतात होता. इंग्लंडचा राजा पहिला जेम्स याने त्याला भारतात पाठविलेले होते. त्याच्या सोबत फादर एडवर्ड पेरी हा सुद्धा भारतात आलेला होता. सुरतमध्ये इंग्रजांच्या व्यापारी वखारीसाठी त्याला जहाँगिर बादशहाने परवाना दिलेला होता. जहाँगिर बादशहा बरोबर त्यांची चांगली मैत्री जमलेली होती. त्यामुळे बऱ्याच वेळा तो त्याच्या बरोबर असे. त्यामुळे त्याने जहाँगिराबाबत भरपूर लिखाण केलेले आहे. मुघलांचे दरबारी रितीरिवाज, सण-समारंभ, तुलादान, झरोका दर्शन, शासन व्यवस्था, लष्करी व्यवस्था, कृषी व्यवस्था, भ्रष्टाचार यासंबंधी विस्तृत लिखाण केलेले आहे. खास करून 'खुसरो प्रकरण' त्याने सविस्तर लिहिलेले आहे. जहाँगिरच्या काळातील माहिती प्राप्त करण्याचे हे उत्तम व वस्तुनिष्ठ साधन आहे.

**१६) एडवर्ड टैरी :**

सर थॉमस रो बरोबर टैरी आलेला होता. टैरी थॉमस रोचा पादरी होता, त्यामुळे सतत त्याच्या सोबत राहत असे. टैरीने भारतातील चांदी व्यापारासंबंधी विस्तृत लिहिलेले आहे. मुघलांचे लष्करी संघटन, शस्त्रास्त्रे, तोफा, दारूगोळा, कपडे, रितीरिवाज, घरांची रचना, तंबाकू उत्पादन, विविध उद्योगधंदे, पशुपालन, कारगिरी, वैदक व्यवसाय, बागवानी, विविध पेय व आहारविषयी खूप काही लिहिलेले आहे. स्त्रियांचे अलंकार व वस्त्रप्रवण यासंबंधी तो अनेक बारकावे नोंद करतो.

**१७) फ्रान्सिस बर्नियर :**

बर्नियर हा फ्रेंच डॉक्टर होत. इ.स. १६५८ मध्ये तो भारतात आला व मुघल दरबारात दरबारी वैदक म्हणून काम करत होता. त्याने इंग्लंड, जर्मनी, पोलंड इत्यादी देशांना भेटी दिलेल्या होत्या. भारतात त्याने काश्मीरपासून मच्छलीपटणम् पर्यंत प्रवास केलेला होता. मुघल काळातील माहिती मिळणारे एक ऐतिहासिक साधन म्हणून बर्नियरचा प्रवास वृत्तांत महत्त्वाचा आहे. "Travells in the Mughal Empire" नावांने त्याने आपले प्रवासवर्णन लिहिलेले आहे. मुघल दरबारातील अंतर्गत राजकारण, मुघलांचे वारस युद्ध, शहाजहाँनची कैद, औरंगजेबाची राजकीय महत्त्वकांक्षा, शाहीखानदाण, रितीरिवाज, नोकर-चाकर व मनसबदारी पद्धतीची सखोल माहिती दिलेली आहे. काश्मीरच्या इतिहासावर त्यांने विस्तृत लिखाण केलेले आहे. याशिवाय बर्नियरच्या प्रवास वर्णनात तत्कालीन शेती व्यवस्था, शेतकरी, जमिनीचे प्रकार, सारा पद्धती, वर्गवारी, विविध कृती उत्पादने, व्यापार-उद्योगधंदे, व्यापारी मार्ग, व्यापारी शहरे व केंद्रे, बंदरे, याविषयी सर्व इत्यंभूत माहिती त्यांने आपल्या प्रवास वर्णनात नमूद केलेली आहे. याशिवाय तत्कालीन सामाजिक व सांस्कृतिक घटकांची अतिशय महत्त्वपूर्ण माहिती आपल्या वर्णनात तो नमूद करतो. फ्रान्सिस बर्नियारने आपल्या प्रवास वर्णनात छ. शिवाजी महाराजांचे चित्र दिलेले आहे. बर्नियर हा पेशाने डॉक्टर होता. उच्चशिक्षित असल्याने त्यांच्यावर कोणत्याही प्रकारचा दबाव नव्हता. त्यामुळे त्याने आपले लिखाण मुक्तपणे केलेले दिसते.

**१८) जॉन बॅप्टिस्ट ट्रॅवेनियर :**

ट्रॅवेनियर हा फ्रेंच जडजवाहिऱ्याचा व्यापारी होता. भारतात तो सहा वेळा आलेला होता. (इ.स. १६४१-४२, १६४५-४७, १६५१-५४, १६५७-६१ व १६६५-६७, १६८६-८७) शहाजहाँन व औरंगजेबाच्या काळात तो भारतात आलेला होता. त्यांने भारतातील सुरत, बऱ्हाणपूर, आग्रा, ढाका, गोवा, गोवळकोंडा, दौलताबाद, सिरोज, ग्वाल्लेर इत्यादी शहरांना भेटी दिलेल्या होत्या. ट्रॅवेनियर एक व्यापारी असल्याने त्यांने आपल्या लिखाणात अनेक व्यापारी प्रथांचा उल्लेख केलेला आहे. मध्ययुगीन व्यापारी प्रथा-परंपरांचा अभ्यास करण्यासाठी त्याचे लिखाण महत्त्वपूर्ण आहे.

**१९) निकोलय मनुची :**

मनुची हा इटालियन प्रवासी होता. इ.स. १६५६ मध्ये तो भारतात आला व इ.स. १७१७ मध्ये भारतातच मृत्यू पावला. पहिले काही काळ त्याने दाराशुकोकडे नोकरीस केली व नंतर तो मिर्झाराजा जयसिंगाकडे नोकरीस राहिला. औरंगजेबाच्या दक्षिण मोहिमेत तो सहभागी होता. दरम्यान त्याने भारतातील अनेक ठिकाणांना भेटी दिलेल्या होत्या. 'स्टोरिया-द-मोगोर (Storio-Do-Mogor) या आपल्या प्रवास वर्णनात त्याने भारतातील अनेक घडामोडीचा इतिवृत्तांत नमूद केलेला आहे. पोर्तुगीज, फ्रेंच व इटालीयन भाषेत त्याने हा ग्रंथ लिहिलेला आहे. भारत भ्रमणात त्यांने जे ऐकले, पाहिले व अनुभवले त्याचे चित्रण आपल्या लिखानात केलेले आहे. विल्यम आयर्विन यांने पहिल्यांदा या ग्रंथाचे इंग्रजी भाषांतर केले आहे. या भाषांतराचे ४ खंड आहेत. त्या ४ खंडांचे मराठी भाषांतर ज.स.चौबळे यांनी 'असे होते मोगल' या शीर्षकाखाली केलेले आहे. मुघल व मराठ्यांचा इतिहास जाणून घेण्यासाठी हा एक महत्त्वाचा ऐतिहासिक दस्तऐवज आहे.

**ब) परकीय कागदपत्रे :**

मध्ययुगीन कालखंडाचा अभ्यास करताना अनेक परकीय साधने तत्कालीन घटनांच्या संदर्भात महत्त्वपूर्ण माहिती उपलब्ध करून देतात. यामध्ये पोर्तुगीज, इंग्रजी व डच कागदपत्राचा समावेश होतो. भारताच्या पश्चिम किनारपट्टीवर पहिली युरोपीय वसाहत निर्माण करणारे पोर्तुगीज, मुघल सम्राट जहाँगिरांच्या काळात सुरतमध्ये वखार निर्माण करणारे इंग्रज व वेंगुर्ल्याला वखार स्थापणारे डच असोत या सर्व युरोपिय कंपन्या या ना त्या कारणाने मुघल व तत्कालीन स्थानिक सत्ताधिशांच्या संपर्कात होत्या. किंबहुना त्यांचा व्यापार त्यांच्या मर्जीवरच अवलंबून होता. परिणामी मुघल ही भारतातील केंद्रीय व प्रबळ सत्ता असल्याने या युरोपीय कंपन्या अथवा व्यापारी पत्रव्यवहारात त्यांचा सतत उल्लेख करतात. त्यांच्या पत्र व्यवहारामधून तत्कालीन राजकीय, सामाजिक व आर्थिक माहिती मिळते की, जी बऱ्याच वेळा स्थानिक भाषांच्या साधनामधून प्राप्त होत नाही.

- **पोर्तुगीज कागदपत्रे :**

इ.स. १४९८ मध्ये वास्को-द-गामा हा पोर्तुगी खलाशी कलिकत बंदरात आला. पोर्तुगीजांचे धोरण

व्यापाऱ्याच्या माध्यमातून सत्ताकारण व सत्ताकारणांच्या माध्यमातून धर्मकारण असे असल्याने त्यावरच त्यांनी इ.स. १५१० मध्ये गोवा जिंकून घेतले. गोवा हे आदिलशाही अंतर्गतचा भाग होता. पुढे मुघलांनी आदिलशाही अंकित केल्यानंतर किंबहुना अगोदर पासूनच दिल्लीच्या केंद्रीय सत्तेशी पोर्तुगीजांचे संबंध होते. हे त्यांच्या पत्रव्यवहारातून स्पष्ट होते.

**१) राज्याची मान्सून पत्रके (लिव्हरुश दश मॉसोइटा दु रैनु) :**

पोर्तुगालमधून गोव्याच्या व्हिजरईस पाठविलेल्या या पत्रांना मान्सून पत्रे असे म्हणतात. इ.स. १५६० ते २० व्या शतकाच्या पूर्वार्धापर्यंतच्या पत्राचा संग्रह यामध्ये आहे. या पत्रांचे एकूण ४५६ खंड आहेत. या सर्व खंडाचे जतन गोवा व लिस्बन पुराभिलेखागारात केलले आहे. या कागदपत्राच्या मधून मुघल, आदिलशाही व मराठ्यांच्या तत्कालीन राजकीय घडामोडीवर प्रकाश पडतो.

**२) शेजारील राजांची पुस्तके (लिव्हरूश दश रैश विझीन्मुश))**

भारतातील पोर्तुगीज अधिकाऱ्यांनी त्यांच्या शेजारील राज्यांना पाठविलेल्या पत्रांचा यामध्ये समावेश आहे. यांचे एकूण २२ खंड असून त्यामधून इ.स. १६१९ ते १८४२ पर्यंतच्या काळातील विविध घटनावर प्रकाश पडतो.

**३) भारतातील तह व कराराची पुस्तके (लिव्हरुश दश पाझेशई त्रानादुश दंद्वरिया) :**

भारतातील पोर्तुगीज अधिकाऱ्यांनी त्यांच्या शेजारील राज्यांशी वेळोवेळी केलेले करार मदार व तहांचा यामध्ये समावेश आहे. याचे एकूण ५ खंड आहेत. पोर्तुगीजांचे तत्कालीन विविध सत्ताधिशांशी कशा प्रकारचे संबंध होते यावरून दिसून येते.

**४) राज्य सल्लागार मंडळाची इतिवृत्ते (आसेंतुश दु कॉसन्यु दु इश्या दु) :**

गोव्यामधील पोर्तुगीज व्हिजरईच्या सल्लागार मंहळाच्या सभा होत. या सभेमध्ये त्यांना आलेली पत्रे व तत्कालीन राजकीय घटना यावर सखोल चर्चा होत. या चर्चा इतिवृत्तामध्ये नमूद केलेल्या दिसतात. किंबहुना यामध्ये सल्लागार मंडळाने केलेले ठरावही पहावयास मिळतात. इ.स. १६१८ ते १७५० या काळातील इतिवृत्ते डॉ. पांडुरंग पिसुर्लेकर यांनी ५ खण्डात संपादित केलेली आहे. यामधून मुघल व मराठा इतिहासावर खूपच प्रभाव पडतो.

**५) भारताविषयी सुटी कागदपत्रे (दुकूमेतुश आव्हूल सुश रलातीव्हुशइंदिया)**

या पत्रसंग्रहात भारतासंबंधीची संकीर्ण स्वरुपाची कागदपत्रे जमा केलेली असून या कागदपत्राचा संग्रह पोर्तुगाल मधील लिस्बन पुराभिलेखागारात संग्रहीत आहेत.

वरील सर्व कागदपत्रातून मुघल खासकरून मराठ्यांच्या इतिहाससंबंधी पोर्तुगीज कागदपत्रे डॉ. पांडुरंग पिसुर्लेकर व डॉ. ए. द. बाग्रास पैरैरा यांनी अनुवादित करून संपादित केलेली आहेत. मराठ्यांच्या इतिहासाची साधने खंड १ ते ३ ही महत्त्वपूर्ण आहेत.

- **इंग्रजी साधने :**

भारतामध्ये १७ व्या शतकाच्या प्रारंभी इंग्रजांचा प्रवेश झाला. प्रारंभी सूरत व नंतर मुंबई, कलकत्ता, मद्रास येथे ईस्ट इंडिया कंपनीच्या प्रमुख वखारी स्थापन झाल्या. या वखारीचा खूप मोठा पत्रव्यवहार व सल्लागार मंडळाचे इतिवृत्त, हिशोब, अहवाल आज इंग्लंडमधील इंडिया ऑफीस ग्रंथालयात उपलब्ध आहेत. इंग्रज वखारीच्या या कागदपत्रांना फॅक्टरी रेकॉर्ड (Factory Records) असे म्हणतात. सुरत, मुंबई, राजापूर, कारवार, मद्रास, कलकत्ता इत्यादी ठिकाणच्या वखारीचा पत्रव्यवहार १७ व्या व १८ व्या शतकातील तत्कालीन राजकीय घडामोडीवर प्रकाश टाकण्यास महत्त्वाचे साधन आहे. The English factories in India चे १७ खंड इ.स. १६१८ ते १६८४ या कालखंडाविषयी महत्त्वाची माहिती उपलब्ध करून देतात.

- **डच साधने :**

इंग्रजांच्या बरोबरीने भारतात आणखी एका युरोपीय व्यापारी कंपनीचे आगमन झालेले होते ते म्हणजे डच. डच वखारींचा पत्र व्यवहार सुद्धा खूप मोठा असून राजाराम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाळकृष्ण यांनी प्रथम ही कागपत्रे प्रकाशात आणली. याला वसाहतीची दप्तरे (Kolonial Archief) असे म्हणतात. जावा बेटात बटेव्हिया येथे डच कंपनीचे मुख्य कार्यालय होते. तेथून हॉलंडला पाठविलेली ही पत्रे आहेत. याशिवाय डाग रजिस्टर ज्यामध्ये दैनंदिन कामकाजांच्या नोंदी ठेवल्या जात. लंडन येथील इंडिया ऑफिसमध्ये ही डच रेकॉर्डस नावाचा उप विभाग आहे. यामध्ये डच कागदपत्राच्या नकला संरक्षित करून ठेवलेल्या आहेत. या डच कागदपत्रामधून मध्ययुगीन काळातील राजकीय व व्यापारी घडामोडीवर प्रकाश पडतो. औरंगजेबाचे दक्षिण धोरण व छ. शिवाजी महाराज, संभाजी महाराज यांच्या हालचालीवर खूपच प्रकाश पडतो.

- **स्वयं अध्ययन प्रश्न क्र. २**

**अ) रिकाम्या जागा भरा.**

१) इब्ज बतूता ................. च्या काळात भारतात आला.

२) .............. ला आधुनिक भूगोलाचा जनक म्हणतात.

३) .............. या पोर्तुगीज व्यापाऱ्यांने विजयनगरला भेट दिली.

४) .............. जहाँगिरांच्या दरबारात आलेला इंग्रज वकील कोण.

५) .............. हा मुघल दरबारात आलेला फ्रेंच डॉक्टर होता.

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) अब्दुल रझाक वकील म्हणून कोणत्या दरबारी आला?

२) निकोलो कोटी कोणत्या देशाचा रहिवाशी होता?

३) बहामनी राज्याला भेट देणाऱ्या रशियन व्यापाऱ्याचे नाव काय?

४) सर थॉमस रो कोणत्या कालखंडात भारतात वास्तव्यास होता?

५) फ्रान्सिस बर्नियरच्या प्रवास वर्णनाचे नाव काय?

### १.२.३ इंडो-पार्शियन इतिहासलेखन :

मध्ययुगीन इतिहासलेखन परंपरेचा अभ्यास करत असताना आपणास अरब अथवा इराणी इतिहासलेखन परंपरेचा आढावा किंवा त्याचा अभ्यास केल्याशिवाय मध्ययुगीन भारतीय इतिहासलेखन परंपरेचा व्यवस्थित बोध होणार नाही. किंबहुना तसे करणेही योग्य नाही. मध्ययुगीन कालखंडातील इतिहासलेखन प्रामुख्याने अरबी व फार्सी भाषेतून झालेले दिसते. इतिहासाचे विषय, दृष्टीकोण, लेखन पद्धती व तंत्र हे अरबी इतिहास लेखनाचे वैशिष्ट्य होते. अरबस्तानात इस्लाम धर्माचा उदय झाल्याच्या नंतर म्हणजेच इ.स. ७ व्या शतकाच्या अखेरीस अरब इतिहास लेखन झालेले दिसते. या प्रारंभिक अरब इतिहासलेखनावर युरोपीय म्हणजे पाश्चात्य इतिहास लेखनाचा प्रभाव दिसून येतो. कारण मध्ययुगीन कालखंडात अरबस्थान हे खुश्कीच्या मार्गाचे प्रमुख केंद्र असल्या कारणाने अरबी व्यापाऱ्यांचा पाश्चिमात्य व पौर्वात्य अशा दोन्ही संस्कृतीशी संबध होता. युरोपमध्ये त्या अगोदर इतिहासलेखन परंपरा चांगलीच विकसित झालेली होती. त्याचा प्रभाव अरबी इतिहास लेखनावर झालेला दिसतो. त्याअगोदरच्या अरबस्थानातील घडामोडी या मौखिक स्वरुपात होत्या.

#### अ) अरब इतिहासलेखनाच्या प्रमुख प्रेरणा :

अरब जगतात हजरत महंमद पैगंबर यांनी इस्लाम धर्माची स्थापना केल्यानंतर अरब इतिहास लेखनांला प्रेरणा मिळाल्याचे दिसते. पहिल्यांदा इ.स. ८२८ मध्ये पैगंबर यांचे चरित्र इब्न-ए-ईशाम या इतिहासकाराने लिहिलेले दिसते. मौखिक घडामोडी लिपीबद्ध झाल्याने इतिहास लेखनाचे महत्त्व लक्षात आल्याने पुढील काळात इतिहास लेखनांची प्रवृत्ती वाढीस लागली. यामध्ये प्रामुख्याने खालील प्रेरणा महत्त्वाच्या होत्या.

१) अरब जगतात इस्लाम धर्माचा उदय.

२) इस्लाम धर्माचा प्रादेशिक विस्तार व साम्राज्य निर्मिती

३) पर्शियन इतिहासलेखनांचा प्रभाव.

भटक्या अरबी समाजाच्या टोळ्यात इस्लाम धर्माच्या स्थापनेने त्यांना एका छताखाली आणले. त्यातून ते इस्लामच्या धर्मप्रसाराकडे वळलेले दिसतात. यासाठी त्यांनी तलवारीच्या बळाचा वापर केल्याने इस्लाम धर्माचा प्रादेशिक विस्तार उत्तर अफ्रिका, भूमध्यसमुद्रालगतचा प्रदेश व पश्चिमअशिया पर्यंत झाला. प्रादेशिक विस्तारामुळे एक इस्लामिक साम्राज्य निर्माण होण्यास मदत झाली. पुढील काळात अरबांनी, युरोप व आशियाच्या व्यापारावरही प्रभुत्व निर्माण केले. व्यापारातून दोन्ही भिन्न संस्कृतीमधील संक्रमण, भौगोलिक भिन्नता, ज्ञानाच्या विस्तारलेल कक्षा व स्व:पराक्रमांच्या नोंदी ठेवणे महत्त्वाचे वाटत होते. धर्मप्रचार व साम्राज्य निर्मिती हे अरब इतिहासलेखन परंपरेच्या प्रेरणेचा स्त्रोत होती.

- **अरब इतिहासलेखन परंपरेवर पर्शियन इतिहासलेखन परंपरेचा प्रभाव :**

इ.स. पूर्व ४ थ्या शतकात अलेक्झांडरने इराणवर विजय प्राप्त केल्यानंतर त्याने इराणमध्ये ग्रीक संस्कृतीचे संक्रमण घडवून आणले. दरम्यानच्या काळात बायझंटाईन राज्यकर्त्यांनी स्विकारलेल्या असहिष्णू धोरणामुळे अनेक ग्रीक अभ्यासक इराणच्या आश्रयाला आले व इराणमधील ससानियन राज्यकर्त्यांनी या अभ्यासकांना आश्रय दिल्याने इराणमध्ये मोठ्या प्रमाणात वाङ्‌मय निर्मिती झाली. पुढे अमीर खलीफच्या नेतृत्वाखाली त्यांनी इराणचा ताबा घेतला. त्यावेळी इराणमधील प्रगत संस्कृतीची व इतिहासलेखन परंपरेची जाणीव अरबांना झाली, त्यातून त्यांनी 'बुक्स ऑफ किंग्ज' ह्या प्रसिद्ध इतिहासग्रंथाचे अरबीत भाषांतर केले. हे अरबी भाषांतर अरब इतिहासलेखन परंपरेला प्रभावीत करून गेले. तत्कालीन अनेक इराणी परंपरा अरबांनी स्विकारलेल्या दिसतात. किंबहुना ते प्रभावित झालेले दिसतात. उदा. ग्रीकांची इराणमध्ये रुजलेली वस्तुनिष्ठता, विवेकवाद, लोकजीवन, भाषा, ऐतिहासिक घटनांचे विवरण इ.

अरब इतिहासलेखन परंपरेवर पर्शियन इतिहास लेखनांचा प्रभाव होता. पुढे अब्बासिद घराण्याकडे खलिफापद आल्यानंतर अरब इतिहास लेखनाला उर्जित अवस्था आली. अब्बासिद शासकांनी विद्धांताना राजाश्रय दिल्याने अरबी इतिहास लेखनाला धार आली, त्यामाध्यमातून अरब संस्कृती व धर्माचाही प्रसार व प्रचार झाला.

- **अरब इतिहासलेखन परंपरा :**

अरब इतिहास लेखन परंपरेत अनेक इतिहासकार होऊन गेले. यामध्ये प्रारंभिक काळात प्रामुख्याने अबू इब्न याह्या, अल वकीदी, अल मदाईनी, अल बहादुरी, दीनावरी, मिस्कावाही, अल मसुदी, अल तहारी इब्ज खलीखान, रशीद अलदीन, इत्यादीचा उल्लेख होतो. तेराव्या शतकातील पेशाने वैद्यक असलेल्या रशीद अलदीन यांने पार्शियन भाषेत इतिहासलेखन केले. त्यांच्या जामी-अल-तवारीख' या ग्रंथात मंगोलांच्या विविध प्रदेशावरील स्वाऱ्यांचा इतिहास लिहिलेला आहे. शिवाय याच ग्रंथात त्यांने चीन, भारत, तुर्क, ज्यू इत्यादी संबंध माहिती दिलेली आहे. अरब इतिहासलेखन परंपरेत खालील इतिहासकारांचा प्रामुख्याने उल्लेख होतो.

**१) अल्बेरुनी (९७३-१०४८) :**

गझनीच्या महम्मदाने ज्यावेळी भारतावर स्वारी केली तेव्हा अल्बेरूनी त्यांच्या सोबत होता. इराण मध्ये जन्माला आलेला अल्बेरूनी हा एक महत्त्वाचा इतिहासकार म्हणून संबोधला जातो. तो ग्रीक, अरबी, संस्कृत भाषांचा पंडित होता. त्यांने इतिहास लेखनात शास्त्रशुद्ध व विश्लेषणात्मक पद्धतीचा अवलंब केला. भारताच्या इतिहासावर आधारित त्यांचा 'किताब-उल-हिंद' किंवा 'तहकिक-ए-हिंद' हा महत्त्वाचा ग्रंथ होय. भारतीय तत्त्वज्ञान, गणित, खगोलशास्त्र, समाजपद्धती याविषयी त्यांने स्वत:ची चिकित्सक मते मांडलेली आहेत. त्यांच्या लिखानात जिज्ञासा, सुक्ष्म, निरीक्षण, शास्त्रीय दृष्टीकोण व विषयाचे आकलन दिसून येते. अल्बेरुनीने भारतात राहून २० ग्रंथांचे लेखन केलेले आहे. यामध्ये अनेक भाषांतरे आहेत.

### २) इब्न बतूता (१३०४–१३७८) :

उत्तर अफ्रिकेतील रहिवासी असलेला इब्न बतूता, आफ्रिका अरेबिया, पार्शिया, इजिप्त, सिरीया, श्रीलंका, जावा, सुमात्रा व भारत इत्यादी देशांना भेटी देणारा एक विद्वान प्रवासी व इतिहासकार म्हणून तो ओळखला जातो. इ.स. १३३४ मध्ये जो भारतात आला व महंमद तुघलकांच्या दरबारात राहिला. त्याने लिहिलेले 'रहेला' किंवा 'किताब–उल–रहेला' हा प्रवास वर्णन ग्रंथ असून त्यामध्ये कुतबुद्दीन ऐबकापासून ते घियासुद्दीन तुघलका पर्यंतची माहिती दिलेली आहे. सुलतान काळातील राजकीय, सामाजिक, आर्थिक, व सांस्कृतिक माहिती प्राप्त करण्याचे एक महत्त्वाचे ऐतिहासिक साधन म्हणून 'रहेलाचा' उल्लेख होतो.

### ३) इब्न खल्दून (१३३२–१४०६) :

अरब इतिहासलेखन परंपरेतील अतिशय अग्रगण्य व प्रमुख इतिहासकार म्हणून इब्न खल्दूनचा उल्लेख केला जातो. आफ्रिकेतील ट्यूनिशस शहरात जन्मलेला इब्न खल्दूतने इतिहास लेखनात नवीन शास्त्रीय दृष्टीकोन आणला. रॉबर्ट फ्लिंट त्याचा इतिहास शास्त्राचा संस्थापक म्हणून उल्लेख करतो, त्याने 'किताब–अल–इबार' हा ग्रंथ लिहिला. तीन भागात लिहिलेल्या या ग्रंथातील पहिल्या भागात मानवी संस्कृती, वैशिष्ट्ये यांचे तर्कशुद्ध विवेचन केलेले आहे. दुसऱ्या भागात मध्य आशिया पासून ते इटलीपर्यंत विस्तारीत झालेल्या इस्लामिक अरब देशांचा इतिहास असून तिसऱ्या भागात आफ्रिकेच्या वायव्येकडील भागाचे ऐतिहासिक वर्णन आहे. या ग्रंथाचे वैशिष्ट्य म्हणजे तो स्वतः मुस्लिम असून देखील त्यांच्या लिखानात कुठेही इतराबद्दल निंदा किंवा कटूता दिसत नाही. त्याचे कारण त्यांने या ग्रंथाला लिहिलेल्या प्रदीर्घ प्रस्तावनेतून दिसते. आपल्या प्रस्तावनेत इतिहासाबाबतचे आपले तत्त्वज्ञान शास्त्रीय दृष्टीने व विस्तृतपणे मांडलेले आहे. ह्या प्रस्तावनेतील इतिहास विवेचनात त्याने इतिहासाच्या तत्त्वज्ञानात क्रांती घडवून आणलेली आहे. इतिहास म्हणजे 'संस्कृतीचे शास्त्र' हा नवीन विचार त्यांने प्रस्तुत केला. त्याने संस्कृती निर्मितीची प्रक्रिया चार घटकातून होते असे नमूद केले आहे. यामध्ये १) मानवाच्या भौतिक गरजा २) राजकीय संस्था, ३) नैतिक अधिष्ठान, ४) मानवी जीवनाचे ध्येय. इब्न खल्दूनची इतिहास लेखनाविषयीचे विचार समाजशास्त्रीय दृष्टी, विषय चिकित्सा, तर्कनिष्ठ विश्लेषण, वैयक्तिक भूमिका इत्यादीमुळे तो त्यांचा अरब इतिहासलेखन परंपरेत वरचा दर्जा आहे. म्हणून त्याला मध्ययुगीन इतिहास लेखनातील 'रॉजर बेकन' असे संबोधले जाते.

- **अरब इतिहासलेखनात परंपरेची वैशिष्ट्ये :**

अरब इतिहासलेखन परंपरेवर ग्रीक इतिहास लेखन परंपरेचा प्रभाव दिसून येतो. ग्रीक इतिहासलेखन परंपरेतील बुद्धिप्रामाण्यवादात अरब लेखनात दिसतो. तसेच ख्रिस्ती इतिहासलेखन परंपरेत 'दैवी इच्छा' ही मुलभूत संकल्पनाही दिसते. त्यामुळे समकालीन ख्रिस्ती इतिहासलेखन परंपरेत न आढळणारी काही वैशिष्ट्ये आढळून येतात.

१) लौकिक मानवी जीवनाविषयीची सकारात्मक दृष्टी

२) ऐतिहासिक दृष्टीकोण.

३) धार्मिक व राजकीय विषय हाताळलेले दिसतात.

४) इतिहास लेखनात संदर्भ साधनांच्या चिकित्सेला महत्त्व दिले.

५) वस्तुनिष्ठता व तर्कशुद्ध विचाराला प्राधान्य.

६) एकसूत्री कालगणांना पद्धती प्रचलित केली.

७) ऐतिहासिक स्त्रोतांच्या विश्वसनीयतेला त्यांनी प्राधान्य दिले.

८) आधुनिक इतिहासलेखन पद्धतीचा पाया घातला.

९) अरब इतिहास लेखनाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे मानवी जीवनाचे धर्मनिष्ठ व दैववादी भाष्य नसून मानवी कृतीचे व मानवी व्यवहाराचे वस्तुनिष्ठ भाष्य आहे.

१०) इतिहासातील महान व्यक्ती व घटनांच्या नोंदीना अरबांनी महत्व दिलेले दिसते.

**ब) मध्यकालीन भारतीय इतिहास लेखन :**

इ.स. ८ व्या शतकापासून अरबी व्यापारी भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर व्यापाराच्या निमित्ताने येत होते. मात्र त्यांचे संबंध व्यापारी व धर्मप्रसारापुरते मर्यादित होते. त्यानंतर मध्य आशियातून राजकीय व धार्मिक प्रेरणेतून भारतावर इस्लामिक आक्रमणे होवू लागली. त्याचे पर्यावसन पुढे सुलतानशाहीची स्थापना होण्यामध्ये झालेली दिसते. या इस्लामिक आक्रमकांच्या बरोबर अरबी व पार्शियन संस्कृतीही भारतात आलेली दिसते. त्यातून अरबी व पार्शियन इतिहास लेखन परंपरा येथे निर्माण होण्यास मदत झाली. सुलतानशाही काळातील इतिहास लेखन प्रामुख्याने पर्शियन वाटते. १२ व्या शतकातील कल्हणांच्या राजतरंगिणीवर या अरबी परंपरेचा प्रभाव दिसतो. मध्ययुगीन कालखंडात अरबी बरोबर तुर्की, इराणी पर्शियन व उर्दू भाषेतून लिखाण झाले दिसते.

- **मध्ययुगीन भारतीय इतिहासलेखनाची प्रेरणा :**

इ.स. १२०६ मध्ये दिल्ली येथे सुलतानशाहीची स्थापना झाली. सुलतानशाही बरोबर अरबी, तुर्की, इराणी, लेखनकलाही आली. आपण मिळविलेल्या विजयांच्या नोंदी ठेवण्यास तत्कालीन राज्यकर्त्यांनी आश्रय दिल्याने अनेक विधान व लेखक उदयास आले. राजाश्रयाशिवाय इतर काही लेखकांनी स्वतंत्रपणे इतिहास लेखनही केलेले दिसते. या काळातील इतिहास लेखनांचा दृष्टीकोण व विषय धर्मनिष्ठ नव्हता तर लौकिक स्वरूपाचा होता. मध्ययुगीन भारतात सुलतानशाहीच्या स्थापने अगोदर इतिहास लेखनपरंपरा अस्तित्वात नव्हती हे राजतरंगिणीवरून दिसते. त्यामुळे अरबी संस्कृतीच्या प्रभावाने भारतात इतिहास लेखनास प्रेरणा व चालना मिळाली हे जरी खरे असले तरी मुलत: भारतीय इतिहासकार किंवा इतिहासलेखक अभावाने मिळतात. ते ही मुघल कालखंडात किंवा इतर शाह्यांच्या दरबारी होते. सुलतानशाही कालखंडात लिहिलेल्या इतिहासात महत्त्वाच्या घटनांच्या नोंदी, लष्करी मोहिमा, राजकीय घडामोडी अथवा बातमीवजा होते. खास

करून निवेदनवजा होते. त्यामुळे त्यामध्ये माहितीचे विश्लेषण चिकित्सा किंवा त्यांची विश्वसनीयता पडताळून पाहण्याची काळजी तत्कालीन लेखकांनी घेतलेली दिसत नाही.

- **मध्ययुगीन इतिहासलेखनाचे प्रमुख प्रकार :**

मध्ययुगीन काळात अनेक प्रकारचे इतिहासलेखन झालेले दिसते. लिखाणाच्या प्रेरणा व उद्देश वेगवेगळे असलेचे दिसतात. प्रवासवर्णन, वसीयतनामा, मनकिब, तवारिखा, करीने, वाकियात, आत्मचरित्र, शकावल्या, स्थानपोथी, आख्यातकाव्य, बखर, रासोकाव्य, ख्यात, रोजनिशी व अखबरात इ. या लिखाणातून तत्कालन राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक व आर्थिक घटकांवर प्रकाश पडण्यास मदत होते. याशिवाय सुलतानशाही कालखंडातील इतिहास लेखनांच्या उद्देशानुसार सहा प्रकार पडतात.

- **सुलतानशाही कालखंडातील इतिहास लेखन प्रकार :**

सुलतानशाही कालखंडातील इतिहासलेखनांचे स्थूलमानाने खालील प्रकार दिसून येतात.

१) इस्लामिक देशाचा इतिहास, त्यांच्या लष्करी मोहिमा, सुलतानांच्या वंशावळी इ.

२) आत्मस्तुतीवर करवून घेतलेले लिखाण.

३) उपेदशपर ग्रंथ.

४) काव्यात्मक व कलात्मक लिखाण.

५) सुफी संतांचे चरित्र ग्रंथ.

६) वसीयतनामा हा नवीन इतिहास लेखन प्रकार सुलतानशाही कालखंडात विकसित झालेला दिसतो.

- **सुलतानशाही कालखंडातील इतिहासलेखन :**

सुलतानशाही कालखंडात इतिहासलेखक म्हणून ज्यांचा उल्लेख होतो. त्यात प्रामुख्याने खालील लेखकांचा समावेश होतो.

**१) मिनाज–उस–सिराज :**

नसीरुद्दीन सुलतानाच्या कार्यकाळात तो भारतात आला. त्याने 'तबकत–इ–नासिरी' हा ग्रंथ लिहिला. तबकत म्हणजे एक भाग. या ग्रंथात गझनी पासून ते मोंगल आक्रमकापर्यंतचा इतिहास आहे. या ग्रंथात लेखकांची शैली निवेदनाची आहे. धोरणांची चिकित्सा केलेली नाही. शिवाय त्यांच्या लिखाणात दैववादी दृष्टी दिसून येतो.

**२) याह्या–इब्न–अहमद–सरहिंदी :**

सरहिंदी यांने 'तारीख–ए–मुबारक शाही' हा ग्रंथ लिहिला. सरहिंदी सय्यद घराण्याच्या सुलतानांच्या दरबारी लेखक म्हणून होता. महंमद घोरी पासून ते पुढे १४३८ पर्यंतच्या राजकीय इतिहास, पहावयास

मिळतो. त्यांच्या ग्रंथात सरहिंदीने घटनांचा अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न केलेला दिसत नाही. प्रस्तुत लेखकांचा सर्व घटना ईश्वरापासून घडतात असा सूर दिसून येतो.

**३) शमसुद्दीन सिराज अफीफ :**

'अफीफ यांने 'तारीख-ए-फिरोजशाह' हा ग्रंथ लिहिला आहे. ह्या ग्रंथातील लिखान स्तुतीपर आहे. अफीफने केवळ घटना नमूद केलेल्या नसून त्यांने तत्त्वचिंतन केलेले दिसते. त्याने आपल्या लिखाणात सर्वच घटनांची विस्तृत माहिती दिली असून फिरोज तुघलकांची स्तुती केलेली आहे.

**४) झियाउद्दीन बरनी :**

सुलतानशाही कालखंडातील अतिशय महत्त्वाचा इतिहासलेखक म्हणून बरनीचा उल्लेख हाते. नऊ सुलतानांची कारकिर्दी पाहणारा लेखक म्हणून तो परिचित आहे. त्यांने 'तारीख-ए-फिरोजशाही' हा ग्रंथ लिहिला. बल्बन ते फिरोजशहाच्या काळातील इतिहास त्यांने शब्दबद्ध केलेला आहे. या ग्रंथाचे वैशिष्ट्ये म्हणजे त्याचा स्वअनुभव, आठवणी व सूक्ष्म निरीक्षण, बरनी आपल्या लिखाणात इतिहासकार व इतिहासाच्या स्वरूपाविषयीची मते नि:संदिग्धपणे स्पष्ट करतो. इतिहासकारांचे कर्तव्य केवळ घटनांची यादी देणे नसून सत्य कथन करणे हे आहे असे नमूद करतो. अतिशयोक्ती व असत्य विधाने करू नयेत, असत्य विधाने करणाऱ्याला ईश्वर क्षमा करणार नाही यावर त्याचा विश्वास होता. बरनीच्या लिखाणात मीमांसा दिसून येते. मानवी जीवनातील इतिहासाचे महत्त्व विशद करताना तो इतिहासाला 'शास्त्राची राणी' असे म्हणतो.

**५) हसन निझामी :**

१३ व्या शतकातील महत्त्वाचा इतिहास लेखक म्हणून निझामांचा उल्लेख होतो. त्यांने फतुहत-उल-सलातीन हा महंमद तुघलकाच्या काळावर लिहिलेला पद्यग्रंथ आहे. या ग्रंथात त्यांने महंमद गझनी ते महंमद घोरी पर्यंतचे वर्णन दिलेले आहे. याशिवाय दरबारी रितीरिवाज, कटकारस्थाने, लष्करी मोहिमांची माहिती दिलेली आहे. निझामीचे इतिहास लेखन निवेदनात्मक स्वरूपाचे आहे.

**६) अमीर खुस्रो :**

सुलतानशाही कालखंडातील एक प्रसिद्ध कवी म्हणून खुस्रो परिचित आहे. सुलतानशाहीतील सहा राजवटीचा तो साक्षीदार असल्याने त्याच्या लिखाणास निश्चितच महत्त्व आहे. खुस्रोचे अनेक ग्रंथ आज उपलब्ध असून त्यांची भाषा अलंकारिक, काव्यात्मक शैली आहे. खुस्रोच्या लिखाणात सुसुत्रतेचा अभाव व कालगणनेची संदिग्धता जाणवते. दरबारी इतिहासकार असल्याने त्यांने आश्रयदात्यांची मुक्तपणे स्तुती व वर्णन केलेले दिसते.

**७) फेरिस्ता (१५५२-१६२३) :**

मोहम्मद कासिम हिंदूशहा अस्तराबादी उर्फ फेरिस्ता १६ व्या शतकातील एक महत्त्वाचा इतिहास लेखक म्हणून ओळखला जातो. अहमदनगरच्या निजामशाही दरबारात आश्रयाला आला होता. नंतर तो आदिलशाही

दरबारात गेला. त्याच्या लिखाणाला 'गुलशन-ए-इब्राहिमी' म्हणून ओळखले जाते. त्याने 'तारीख-ए-फेरिस्ता' या ग्रंथात १२ व्या शतकापासून ते पुढे १६ व्या शतकापर्यंत राजकीय घडामोडीचा इतिहास निवेदन करणारा ग्रंथ आहे. या ग्रंथाचे वैशिष्ट्य म्हणजे त्याने सुलतानशाही काळापासूनची साधने उपलब्ध करून हा ग्रंथ लिहिलेला आहे. भारतातील इस्लामिक सत्तेचा इतिहास कथन करणे हे त्याचे ध्येय होते.

- **सुलतानशाही कालखंडातील इतिहास लेखनाची ठळक वैशिष्ट्ये :**

सुलतानशाही कालखंडातील इतिहासलेखनांची काही ठळक वैशिष्ट्ये अधोरेखित करण्याजोगी आहेत. ती खालीलप्रमाणे -

१) सुलतानशाही कालखंडातील इतिहासलेखक प्रामुख्याने दरबारी किंवा आश्रित असल्या कारणाने वस्तुनिष्ठतेऐवजी व्यक्तीनिष्ठतेवर भर देणारे होते.

२) इतिहासलेखनांचे विषय मुख्यत्वेकरून राजकीय आहेत.

३) इतिहासलेखनांची पद्धती निवेदनात्मक पद्धतीची आहे.

४) इतिहास लेखनांत कालगणनेचे पालन केलेले दिसते.

५) ऐतिहासिक घटनांची कारणमीमांसा करण्याचा प्रयत्न केलेला दिसत नाही.

६) इतिहासलेखन समकालीन असल्याने लिखाणात अचूकता व वर्णनात्मकता आहे.

७) सुलतानशाही कालखंडात इतिहास विषयांची राज्यकर्त्याला जाणीव व्हावी या उद्देशाने प्रेरित होवून लिखाण केलेले दिसते.

८) बहुतांश इतिहासलेखक मुस्लिम असून देखील त्यांच्या लिखानात ईश्वरवाद अथवा दैववाद दिसून येत नाही.

**क) मुघल कालखंडातील इतिहासलेखन :**

सुलतानशाही कालखंडातील इतिहासलेखनांचा पुढचा टप्पा म्हणून मुघलकालखंडाचा उल्लेख केला जातो. मुघलकालखंडातील इतिहासलेखनाचे स्वरूप, तंत्र व पद्धती ही वेगळी दिसून येते. इतिहासलेखनात निवेदनाऐवजी विविधता आलेली दिसते. राजकीय इतिहासाबरोबर सामाजिक घटनांचा समावेश लिखाणात आला. सांस्कृतिक जीवनातील विविध अंगांचा त्यांच्या लिखाणात समावेश तर झालाच, शिवाय वस्तुनिष्ठ दृष्टीकोणातून काहीनी ऐतिहासिक घटनांची चिकित्सा करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. मुघलकाळात इतिहासलेखनांचा नवीन प्रवाह अस्तित्वात आलेला दिसतो. तो म्हणजे आत्मचरित्रे. मुघल कालखंडात इतिहास लेखना बरोबरच तत्कालीन विविध घटनांची माहिती देवू शकणारा अनेक प्रकारची साधनेही या काळात निर्माण झाली. त्यामुळे मुघल कालखंडात अधिक विस्तृत व सलग इतिहास मांडणे शक्य झाले. मुघलकालखंडात पार्शियन भाषेला राजभाषेचा दर्जा मिळाल्यासारखी स्थिती निर्माण झालेली होती. त्यामुळे

पार्शियन भाषेला प्रतिष्ठा मिळाली, बहुतांश इतिहासलेखन पार्शियन भाषेतून झालेले दिसते. त्याच बरोबर या कालखंडात अनेक इराणी विद्वान भारतात आले व त्यांनी पार्शियन भाषेत वाङ्मय निर्मिती केलेली दिसते. परिणामी जहाँगिरांच्या काळात पार्शियन भाषा उच्चतम स्थानावर गेलेली दिसते.

- **मुघल कालखंडातील इतिहासलेखनांचे प्रकार :**

मुघल कालखंडात प्रामुख्याने खालील प्रकारात अधिक लिखाण झालेले दिसते ते खालीलप्रमाणे -

१) आत्मवृत्त/आत्मचरित्रे

२) दरबारी इतिहासलेखकांचे अधिकृत इतिहासलेखन.

३) खाजगी अनधिकृत इतिहासलेखन

४) प्रादेशिक इतिहास.

५) सुफी संताची चरित्रे.

- **इतिहास लेखनांचा नवीन प्रवाह : आत्मचरित्रे :**

मुघल कालखंडात आत्मचरित्रावर लिखाण करण्याचा नवीन प्रवाह अस्तित्वात आलेला दिसतो. मुघल शासनकर्त्यांनी या लिखाणास सुरूवात केली. यामध्ये बाबराने 'तुझुक-इ-बाबरी' व जहाँगिराचे 'तुझुक-इ-जहाँगिरी' या दोन्ही आत्मचरित्रावरून त्यांच्या व्यक्तीमत्वावर व तत्कालीन अनेक घटकांवर प्रकाश पडतो. दोघांच्याही कथनात निवेदन आढळते, परंतु ते सुसंगत आहे.

- **मुघल कालखंडातील प्रमुख इतिहासलेखक :**

मुघलकालखंडात विपुल प्रमाणात इतिहासलेखन झालेले दिसते. प्रस्तुत ठिकाणी सर्वाचाच उल्लेख करणे शक्य नाही. काही प्रातिनिधिक स्वरूपात उल्लेख करणे गरजेचे आहे. इ.स. १६ वे शतक ते १८ वे शतक अशा प्रदीर्घ कालखंडात झालेले हे लिखाण महत्त्वपूर्ण आहे. अकबराच्या आज्ञेने लिहिलेला 'तारीख-इ-आल्ली' गुलबदन बेगमचा 'हुमायुनामा', जौहर आफताबचा 'तारीख-ए-हुमायुनी', अब्बास खानाच 'तारीख-ए-शेरशाही' व ख्वाजा निजामुद्दीन अहमदचा 'तबकत-इ-अकबरी' अशा अेक ग्रंथकर्त्यांचा उल्लेख करता येईल.

### १) बदायुनी (१५४१-१५९६)

मुघल बादशहा अकबराच्या काळातील प्रसिद्ध लेखक बदायुनी म्हणून ओळखला जातो. फार्सी, अरबी व संस्कृत भाषेचा तो विद्वान होता. तसाच तो धर्मशास्त्राचा अभ्यासकही होता. बदायुनी हा इस्लामचा कट्टर समर्थक होता. त्यामुळे अकबराने स्विकारलेले सहिष्णू धार्मिक धोरण, दीने-इ-इलाहीचा पुरस्कार व हिंदू प्रजेसाठीचे त्यांचे उदार धोरण यामुळे अकबर बादशहांशी त्यांचे मतभेद झालेले होते. 'मुन्तखब-उल-तवारिख' या आपल्या ग्रंथात बदायुनीने अकबरावर टिका केलेली दिसते. बदायुनीचे लिखाण आत्मनिष्ठ असून

## घटक –२

# दिल्लीची सुल्तानशाही

**अनुक्रमणिका :**


२.० उद्दिष्टे

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय विवेचन

२.२.१ राजसत्तेचा सिद्धांत

सारांश

२.२.२ व्यापार – अंतर्गत आणि परकीय

सारांश

२.२.३ समाज – गुलामगिरी

सारांश

२.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

२.४ स्वयं-अध्ययन, प्रश्न व प्रश्नांची उत्तरे

२.५ सरावासाठी स्वाध्याय

२.६ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके


## १.० उद्दिष्टे :

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला खालील माहिती विशद करता येईल.

- इस्लामी सत्तेच्या स्वरुपाची माहिती मिळेल.
- सुलतान सत्तेच्या पूर्व इतिहासाची माहिती मिळेल.
- या घटकाच्या अभ्यासानंतर आपणास मध्ययुगीन भारताच्या इतिहासातील दिल्ली सलतनतच्या राज सत्तेच्या सिध्दांताची माहिती मिळेल.
- मध्ययुगीन भारताच्या इतिहासातील अंतर्गत व परकीय व्यापाराची माहिती मिळेल.
- सुलतानशाहीतील समाजव्यवस्था व गुलामगिरी पद्धतीची माहिती मिळेल.

## १.१ प्रस्तावना :

भारतात हर्षवर्धनानंतर पराक्रमी असा राजा झाला नाही. प्राचीन भारतातील शेवटचा सम्राट म्हणून हर्षवर्धनकडे पाहिले जाते. हर्षाच्या मृत्यूनंतर उत्तर व दक्षिणेत अनेक छोटी मोठी घराणी उदयास आली. पण यांच्यात एकवाक्यता व सघंटितपणा नसल्यामुळे परकीय आक्रमकांनी याचा फायदा घेऊन भारतावर आपले वर्चस्व निर्माण केले.


## १.२ विषय विवेचन :

- **इस्लामी सत्तेचे स्वरूप–**

इस्लामच्या राजनैतिक विचारांचा आधार म्हणजे 'कुराण' हा धर्मग्रंथ होय. कुराण, हदीस आणि इज्मा या ग्रंथांच्या आधारेच सुल्तानकाळात राज्य निर्माण झाले. कुराणामध्ये अल्लाची शिकवण व आदेश आहेत. त्यांना सार्वकालिक व सार्वभौमिक म्हटले जाते. हदीस या ग्रंथात महंमद पैगंबरांचे कार्य व उपदेशाचे वर्णन आहे यातून इस्लामी राज्याच्या प्रशासनाचे स्वरूप स्पष्ट होते. इस्लामी कायदे शरियत आणि हदीस या ग्रंथावर आधारीत आहेत. खलिफाच्या काळात इस्लाम राज्याचा मोठा विस्तार झाला. खलिफा हा सर्व इस्लाम धर्मियांचा प्रमुख होता. मध्ययुगातील इस्लाम राज्य धर्मावर आधारीत होते त्यातील उलेमांचा वर्ग प्रशासनात सक्रिय होता. दिल्ली सल्तनतला 'सल्तनत-ए-हिंद' असे म्हणतात. दिल्ली सल्तनताचा कालखंड १२०६ ते १५२६ या कालखंडात दिल्ली सल्तनतवर पाच वंशांनी राज्यकारभार केला. यामध्ये गुलाम वंश १२०६ ते १२९०, खिलजी वंश १२९० ते १३२०, तुघलक वंश १३२० ते १४१४ आणि सय्यद वंश १४१४ ते १४५१ हे चारही वंश तुर्की होते मात्र पाचवा लोदी वंश हा अफगाण वंश होता. कुतुबुद्दिन ऐबक हा दिल्लीचा पहिला सुल्तान त्याने दिल्ली येथे सुल्तान सत्तेची स्थापना केली त्याला सुल्तान सत्तेचा संस्थापक म्हणतात. अशा या सुल्तानी सत्तेचा इतिहास खालीलप्रमाणे मांडण्यात आलेला आहे.

महंमद-बिन-कासीम ने ७११ मध्ये भारतावर पहिली स्वारी केली. हीच स्वारी भारतामध्ये इस्लामचा प्रसार होण्यास कारणीभूत ठरली. यानंतर अलप्तगीन सबक्तगीन या तुर्कांनी भारतावर आक्रमणे केली.

सबक्तगीनच्या मृत्युनंतर त्याचा मुलगा अब्दुल कासिम महंमद उर्फ गझनीच्या महंमद सत्तेवर आला त्याची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे.




- **महंमद गझनीच्या १७ – १८ स्वाऱ्या :**

१. हिंदुशाही राज्याचा प्रदेशावर ताबा – वायव्य भागात वर्चस्व (१०००-१००१)

२. पंजाबच्या जयपालवर विजय १००१

३. भटीयाचा शासक बिजीरायचा पराभव १००४-०५

४. मुलतानवर स्वारी १००५-०६ अब्दुलफतेदाउद शरण, आनंदपालचा पराभव

५. नवासाशहावर स्वारी ४,०००००० दिसार देऊन सुटका – जाटांचा पराभव १०२६-२७

६. आनंदपालवर स्वारी रजपुतांचा संयुक्त आघाडीचा पराभव नगरकोरची लूट ७०० मण सोने, २० मण हिरे ७,०००,००० सुवर्ण मुद्रा अगणित मोती – १००८-०९

७. नारायणपूर वर विजय १००९-१०

८. मुलतान स्वारी, दाऊदचा पराभव १०१०-११

९. स्थानेश्वर स्वारी व लूट १०१२-१३

१०. त्रिलोचनपाल व याचा मुलगा भीमपालचा पराभव १०१३-१४

११. काश्मीर स्वारी अपयश फसलेली ११ वी स्वारी

१२. कनौजचा राजा राज्यपाल व मथुरेचा कुलचंदचा पराभव १०१८-२०

१३. ग्वाल्हेरचा राजा किर्तीजय व कालिंजर राजा गडचा पराभव १०२०-२१


१४. पंजाबवर स्वारी व त्रिलोचनपालचा पुन्हा पराभव १०२१-२२


१५. कालिंजरवर स्वारी राजा गडची मैत्री केली १०२२


१६. काठेवाडच्या सोरटी सोमनाथवर स्वारी १०२५-२६

१७. जाटांचा पराभव १०२६-२७

**महंमद घौरी**




गझनी वंशाचे राज्य
पेशावर जिंकले
(११७९)
महंमद
घौरी
सियालकोट स्वारी
व खुसरो मलिकचा
पराभव (११८५)
लाहोर येथील
खुसरो मलिकचा
पराभव (११८१)
सिंधवर स्वारी व
सुमरांचा पराभव
(११८२)


तराईचे प्रथम युद्ध
पृथ्वीराज चौव्हाण
(११९०)
महंमद
घौरी
तराईचे दुसरे युद्ध
पृथ्वीराजचा पराभव मृत्यू
(११९२)

यानंतर भारतातील जिंकलेल्या प्रदेशाची पाहणी करण्यासाठी महंमद घोरीने कुतुबुद्दिन ऐबकाची नियुक्ती केली. हीच सुल्तानशाहीची सुरूवात व गुलाम वशांचे राज्य म्हणता येईल. कुतुबुद्दिन ऐबकाने गुलाम घराण्याची स्थापना केली (१२०६) त्याला सुल्तानशाहीचा संस्थापक म्हणतात.

११९३ दिल्ली ताब्यात

⇩

कनौजचा पराभव जयचंद्र राठोड ठार

⇩

गढवाल घराण्याचा खजिना लुटला

⇩

अजमेर विजय

⇩

बयाना विजय

⇩

ग्वाल्हेर जिंकले (१२००)

⇩

महोबा जिंकले

⇩

बिहार बंगाल स्वारी

⇩

बदायुन जिंकले

अशा प्रकारे ऐबकाने जवळ जवळ संपूर्ण मध्य भारत आपल्या वर्चस्वाखाली आणला अशा या गुलाम घराण्याला कुतुबुद्दिन ऐबकाने नावारूपाला आणले

कुतुबुद्दिन ऐबक (१२०६-२०१०)

⇩

आरामशहा (१२१०-११)

⇩

शमशुद्दिन अल्तमश (१२१० ते १२११)

⇩

रझिया सुल्तान (१२३६-१२४०)

⇩

बहरामशाह (१२४०-४२)

⇩

अल्लाउद्दिन मसूदशहा (१२४२-४६)

⇩

नासीरुद्दिन मोहंमदशहा (१२४६-६५)

⇩


घियासुद्दिन बल्बन (१२६६-८६)

⇩

कैकुबाद (१२८७-१२९०)

कैकुबादला ठार करून व त्याचा मुलगा कैकुमारला कैदेत ठेवून जलालुद्दिन खिलजीने खिलजी घराण्याची स्थापना केली.

## खिलजी घराणे (१२९०–१३२०)




खिलजी घराण्यानंतर तुघलक घराणे सत्तेवर आले.

घियासुद्दिन उर्फ 'गाझी मलिक' - संस्थापक.

त्याचा मृत्यू (१३२५)

याच्यानंतर 'फक्रुद्दिन मोहम्मद जौनाखान' हा महंमद तुघलक हे नाव धारण करुन गादीवर बसला. (बापाला ठार मारुन)


**सुलतान फिरोजशहा तुघलक (चुलत भाऊ)**





**सय्यद घराणे**

संस्थापक - खिज्रखान ( १४१४ ते १४५१ )

हा महंमद पैगंबरांचा वंशज होता.







मुबारकशहाचा पुतण्या महंमदशहा सत्तेवर


खरी सत्ता वजीर सखऊल मुल्कच्याच हाती होती.


महंमदशहाने सखऊल चा काटा काढला व सर्व सत्ता काबीज केली.

१४४५ व स्वत:ला आलमशहा हा किताब घेतला. त्याला सय्यद घराण्यातील सर्वात अकार्यक्षम व शेवटचा सुल्तान होता.


## लोदी घराणे (१४५१-१५२६)




सिकंदर लोदी (१९४८ ते १५१७)
सर्व अफगाणांना एकत्र करण्याचा प्रयत्न केला.
(१५१७) मध्ये मृत्यू
धोलपूर चंदेर येथील विजय


इब्राहिम लोदी (१५१७ ते १५२६)
ग्वाल्हेर विजय
इब्राहिमचे काका आलमखान दिल्लीवर दावा
घटोली युद्धात पराभव राणासंगचा विजय
बकरौल लढाई पुन्हा पराभव
पानिपतची प्रथम लढाई इब्राहिम लोदीचा पराभव मृत्यू - (१५२६)

## इब्राहिम लोदी (१५१७ ते १५२६)




अशाप्रकारे सुलतानशाहीतील वेगवेगळया पराक्रमी सुल्तानांची माहिती मिळते त्याचबरोबर आपणांस त्यांनी केलेल्या सुधारणा, रचना, व्यवस्था याविषयी बरीच माहिती मिळते. अशा या सुल्तानशाहीतील राज्यव्यवस्थेच्या सिध्दांताची माहिती पुढीलप्रमाणे -


### **१.२.१ राजसत्तेचा सिध्दांत** (Theory of Kingship)

- **प्रस्तावना :**

इतिहासाचा अभ्यास करीत असताना राजसत्ता आणि राजसत्ताधारी हे महत्त्वाचे होते. कारण राज्याचे प्रशासन ते चालवत होते. प्रजेच्या अडचणी सोडवणे, प्रशासनात उपाययोजना करणे, ही राजाची कर्तव्ये होती राजा प्रजेवर प्रेम करणारा प्रामाणिक असेल तर प्रजा ही राजाशी प्रामाणिक राहते मात्र राजा अत्याचारी असेल तर त्याची सत्ता व पद टिकत नसे, या विचारातूनच राजसत्ताविषयक सिध्दांताचा जन्म झाला. राजा हा ईश्वराचा प्रतिनिधी त्याची आज्ञा म्हणजे ईश्वराची आज्ञा राजपद श्रेष्ठ मानाचे असल्यामुळे राजाने कनिष्ठ गोष्टीपासून अलिप्त रहावे राजाची पात्रता उच्च असावी. त्याचा प्रजेवर, प्रशासनावर आणि नोकरवर्गावर धाक असला पाहिजे


तरच सर्व व्यवहार सुरळीत चालू शकतात. राजाला कार्य करण्याची प्रेरणा 'ईश्वराकडून' मिळत असते या विचारातूनच राजसत्तविषयक सिध्दांताचा उदय झाला. सन १२०० ते १५२६ पर्यंत वारसाहक्कावरुन अनेक संघर्ष सुल्तान काळात पहावयाला मिळाले.

यामध्ये...




याच्या काळातील वारसाहक्क संघर्षातून असे दिसते की एका निश्‍चित वारसा हक्काचा याठिकाणी अभाव दिसून येतो.

''ज्याच्या मनगटात ताकद त्याची सत्ता'' हा नियम लागू पडलेला दिसतो. या व्यवस्थेमुळे अत्यंत पराक्रमी राजांनाही नेहमी संघर्षाला तयार रहावे लागत असे. सत्ता मिळविण्यासाठी कोणत्याही स्तरापर्यंत पोहचण्याची सर्वांची तयारी होती याला काही राजे अपवाद होते. यामुळे नियमांच्या अभावामुळे सत्ता शासक बदलत असत. याचा परिणाम म्हणजे –




हे सर्वत्र दिसून येत होते. व याचाच परिणाम म्हणजे सुल्तानशाहीचा शेवट होण्यात झाला. प्रत्येक राजाने स्वत:चा राजसत्तेचा सिध्दांत मांडल्यासारखे दिसून येते.

- **राजसत्तेचे ६ ते ७ सिध्दांत ते पुढीलप्रमाणे :**

**१. अल्तमशचा राजसत्तेचा सिध्दांत :**

अल्तमशने बगदादचा खलिफा उल-मुस्तनासिर-बिल्लाह यांच्याकडून हिंदुस्थानचा सुल्तान/सुल्तान-ए-हिंद व नासिर-अमीर-उल्-मोमीन या मान्यता मिळविल्यामुळे त्याच्या राज्याला कायद्याचे व धर्माचे अधिष्ठान लाभले. या अधिष्ठानामुळेच त्याच्या वारसांना गादी मिळण्याचा कायदेशीर हक्क प्राप्त झाला.

अल्तमश हा इ.स. १२१० मध्येच सुल्तान झाला होता परंतू त्याने कुबाचाच्या मृत्यूनंतरच स्वत:च्या राजपदाची मंजूरी आणली होती. त्यामुळेच दिल्लीचा पहिला कायदेशीर सुल्तान म्हणून अल्तमशकडे पाहिले जाते.

अल्तमशने आपली इस्लाम परंपरा जपण्यापेक्षा हिंदूस्थानच्या राज्याची सुव्यवस्था लावण्याकडे अधिक लक्ष दिले. त्याने राज्यव्यवस्थेच्या पारशी परंपरांची जपणूक करण्याकडे लक्ष दिले.

या अनुषंगानेच त्याने आपल्या मुलापेक्षा मुलगी रझिया हिलाच राजगादी देणे उचित मानले. रझिया

सुल्तानने असे सांगितले कि सुल्तानांची सत्ता ही ज्यांच्यावर राज्य करणार त्याच्यावर निर्भर असते व यासाठी रझियाने आपल्या सत्तेसाठी जनतेचा कौल मागितला होता.

**२. बल्बनचा राजसत्तेचा सिध्दांत :**

बल्बन हा दिल्लीचा प्रसिध्द सुल्तान त्याने सुल्तानपद आणि त्याच्या अधिकाराबाबत विस्तृत विचार व्यक्त केले तो म्हणतो मी ईश्वरी इच्छेमुळे सुल्तान बनलो हा विचार त्याने आपल्या सरदारांच्या मनात निर्माण केला त्याच्या मते सुल्तान हा निरंकुश असावा आणि सुल्तानपद हे ईश्वराने बहाल केले आहे. सुल्तानपदाला हानी पोहचणार नाही याची दक्षता बल्बनने घेतलेली खालील उदाहरणावरून दिसून येते यासंदर्भात दरबार भरला असताना मुलाच्या मृत्यूची वार्ता समजली असतानाही त्याने भावनांवर ताबा ठेवून दरबारातील कामकाज सुरूच ठेवले यावरून बल्बनच्या व्यक्तिमत्त्वाची ओळख होते. बल्बन हा (Divine Right Theory) चा पुरस्कर्ता दैवी राजसत्तेचा सिध्दांत मांडला. या सिध्दांतानुसार त्याने बादशहा परमेश्वराचा प्रतिनिधी व परमेश्वराचाच अंश आहे असे सांगितले. याठिकाणी अल्तमशने सुल्तान पदाची रुपरेखा सांगितली तर बल्बनने त्याला उच्च पातळीवर नेऊन बसविले. याअंतर्गत त्याने स्वत:ला इतरांपेक्षा श्रेष्ठ सांगितले. आपल्या राजपदाला मजबुती आणण्यासाठीच त्याने दैवी राजसत्तेचा सिध्दांत मांडला कारण 'मिन्हाज-उस-सिराज' व बरनीच्या लिखाणामधून त्याला दास्यत्वातून मुक्ती मिळाल्याचे दिसत नाही त्यामुळे तो सुल्तान बनण्यास योग्य नाही असे सर्वांना वाटत होते. त्यामुळे त्याने स्वत:ला 'जिल-ए-अल्लाह' म्हणजे 'ईश्वराची सावली' ही उपाधी धारण केली होती.

बल्बनने पारशी परंपरांची उद्घोषणा करत दरबारात खालील गोष्टी केल्या -

१. सिजदा (साष्टांग नमस्कार) पध्दत आणली. सिजदा म्हणजे सुल्तानाला अभिवादन करणे. याचबरोबर पैबीस घेणे म्हणजे पायाचे चुंबन घेणे ही पध्दत सुरू झाली. बल्बनने सुल्तानपदाची वैभव व प्रतिष्ठा दाखवण्यासाठी नौरोज हा वार्षिक उत्सव सुरू केला.

२. पारशी रितीरीवाजांचे अनुकरण केले.

३. आपल्या नातवांची नावे फारशी राजांच्या नावावर ठेवली.

४. दरबारात होणाऱ्या सार्वजनिक समारोहात नृत्य संगीत मद्यपान या सर्वांवर बंदी घातली.

५. सुल्तानची आज्ञा न पाळणे राजद्रोह ठरविला.

६. दरबारात हसणे, मोठयाने बोलणे, या गोष्टींना पायबंद घातला.

७. मुल्ला मौलवींनी राज्य कारभारात हस्तक्षेप करु नये असे बंधन घातले.

आपल्या राजगादीची प्रतिष्ठा राखण्यासाठी बल्बनने ''तुर्कान-ए-चहलगानी'' (चाळीस सरदारांचा गट) यांचा बिमोड करण्याची निती आखली. तसेच १२५८ मध्ये खलिफाची हत्या झाल्यावरही त्याने त्याचे नाव चालू ठेवले व त्याचा नावाचा खुतबा वाचन सुरू ठेवले व खलिफाच्या प्रती त्याचा दृष्टिकोण व्यवहारवादी होता.

### ३. अल्लाउद्दिन खिलजीचा सिध्दांत :

खिलजी घराण्यातील अल्लाउद्दिन खिलजी हा शक्तिशाली सुल्तान होता. इतिहासकार झियाउद्दीन बर्नीने 'तारीख-ए-फिरोजशाही' या ग्रंथात तो म्हणतो अल्लाउद्दिनने शासनव्यवस्थेत इस्लाम सिध्दांताचे पालन केले नाही, त्याने धर्म आणि राजनीती यापासून धर्माला वेगळे केले यापूर्वीच्या सुल्तानांनी मात्र धर्माचा राज्यावर पगडा राहू देण्यात व खलिफाकडून राजवस्त्रे मिळवण्यात धन्यता मानली. मात्र अल्लाउद्दिन स्वत: सर्वश्रेष्ठ सुल्तान होणे हे ध्येय मानत होता उलेमांचा सल्ला त्याला महत्त्वाचा वाटत नसे, अल्लाउद्दिन हा अनियंत्रित राज्यपध्दतीवर विश्वास ठेवणारा होता. बल्बनप्रमाणेच राजसत्तेचा ईश्वरी सिध्दांत सांगितला यामध्ये...

१. राजा हा ईश्वराचा अंश असून त्याला कोणीही नातेवाईक नसतात.

२. त्याची प्रजा म्हणजे सर्व लोक आहेत.

३. या विश्वामध्ये श्रेष्ठ व्यक्ती सुल्तान आहे.

४. प्रजेला राजाला प्रश्न विचारण्याचा अधिकार नाही.

५. धर्मगुरुंनी/धर्ममार्तंडांनी राज्यकारभारात हस्तक्षेप करु नये.

६. त्याने धर्म व राजकारणाची फारकत केली.

बल्बन प्रमाणे अल्लाउद्दिन ही स्वत:ला जिल-ए-अल्लाह (ईश्वराची सावली) म्हणत असे.

जनतेने हे कधीही विचारु नये कि सत्ता कशी मिळविली तर त्यांनी हे पहावे कि सत्ता कोणाजवळ आहे. अल्लाऊद्दिनने गैर तुर्कांना ही आमीर वर्गात सामील करुन घेण्याची सुरुवात केली. खलीफा त्याच्या अगोदर ४ दशके मूत्यू पावला असला तरी त्याने स्वत:ला 'मोमीन-अल-खिलाफत' (खलिफाचा उजवा हात) तर नासिर-'ए-आमीर-अलमोमीन' (खलिफाचा सहायक) असे स्वत:ला म्हणवून घेत असे. अशा प्रकारे अल्लाउद्दीनने कठोर धोरण राबवून हुकूमशाही पध्दतीने राज्यकारभार केला.

### ४. महंमद तुघलकाचा राजसत्तेचा सिध्दांत :

महंमदाने राज सत्तेच्या सिध्दांताला एक नवी ओळख प्राप्त करुन दिली त्याने खलिफाच्या नावाची कोठेही चर्चा केली नाही तरी त्याच्या प्रसिध्द नाण्यांवर एका बाजूला कलमा, तारीख, टांकसाळेचे नाव आणि दुसऱ्या बाजूला आपले नाव 'अल-मुजाहिद-बिस्मिल्लाह' आणि पहिल्या चार खलिफांची नावे कोरली होती. महंमदाच्या बहुतांश योजना फसल्यानंतर त्याच्या विरुद्ध असंतोष वाढू लागला त्यावेळी त्याला खलिफाची मंजुरी आपल्या शासनाला सिद्ध करण्यासाठी घ्यावीशी वाटली. त्यानंतर त्याने बगदादच्या खलिफाच्या वंशजांना शोधून 'अब्बासी' वंशातील 'अलमुस्तिकिफी' कडून मंजुरी घेतली. त्याने आपल्या नाण्यावर त्याचे नाव कोरलेले व खुतबा सुध्दा वाचला. यादृष्टिने महंमद तुघलकाने या सिध्दांताच्याद्वारे स्वत:चे अस्तित्व सिध्द केले असले तरी त्याला इतिहासात वेडा किंवा लहरी महंमद म्हणतात.

### ५. फिरोजशाह तुघलकाचा राजसत्तेचा सिध्दांत :

या सुल्तानाची निवड उलेमा अमीर वर्गाने केल्यामूळे त्यांना खुश ठेवण्याचा तो नेहमी प्रयत्न करीत असे. आपल्या राजसत्तेला त्याने खलिफांकडून दोन वेळा मंजुरी आणली. त्याने आपल्या नाण्यांवर खलिफांची नावे कोरली. फिरोजशहाच्या सुवर्ण नाण्यावर 'खलादश खिलाफत' असे खलिफाचे नाव कोरले आहे. त्याने आपल्या खुतबा वाचनात सुरूवातीच्या चार खलिफांची नावे ही जोडली आहेत. तसेच दिल्लीच्या सर्व सुल्तानाची नावे 'कुतुबुद्दिन ऐबक सोडून' घातली आहेत. त्याने सर्व प्रकारचे कर हटविले तसेच मुल्ला वर्गाच्या सांगण्यावरुन इसरा कर लावला. फिरोजशहाने राजकारणात वंशपरंपरागत गोष्टी लागू केल्यामुळे राजपदाचे महत्त्व कमी झाले याला तो स्वत: जबाबदार होता.

### ६. सय्यद घराण्याचा राजसत्तेचा सिध्दांत :

सय्यदांनी खिलाफत वर विशेष लक्ष दिले नाही. त्यांनी खलिफांकडुन मंजुरी आणण्याचा प्रयत्नही केला नाही. यामुळे त्यांचे राज्यकारभारातील महत्त्व कमी झाले परिणामी राज्यपदाचे महत्त्व कमी होत गेले.

### ७. लोदी घराण्याचा राजतत्त्व सिध्दांत :

यांच्या काळात राजपद शक्तीशाली राहीले नाही. बहलोलखान लोदी आपल्या सरदारांच्या बरोबर सिंहासनावर बसण्यापेक्षा खाली गालिचावर बसत होता. आपल्या अमीर वर्गाला तो मनसद-ए-अली म्हणून बोलवत होता. सिकंदर लोदीने या बाबींना काही प्रमाणात नियंत्रित करण्याचा प्रयत्न केला. तसेच इब्राहिम लोदीने राजसत्तेवर आपली पकड मजबूत करण्याचा प्रयत्न करू लागताच त्याच्या सरदारांमध्ये असंतोष पसरला व पंजाबच्या दौलतखानने बाबरला निमंत्रण दिले.


- **सारांश :**

अशा प्रकारे सुल्तान काळातील राजांनी आपल्या विचारानुरुप राजसत्तेचा वापर करायला सुरूवात केली व आपल्या राजसत्तेला धक्का लागू नये यासाठी प्रयत्न केल्याचे दिसून येते. तसेच खलिफाच्या मान्यतेचे धोरण स्विकारून आपल्या राजसत्तेला दैवी बनविण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. यामध्ये काही सुल्तान यशस्वी झाल्याचे स्पष्ट होते.


### २.२.३ व्यापार : अंतर्गत व परराष्ट्र (Trade : Internal and External)

सुल्तानशाहीचा कालखंड हा १२०६ ते १५२६ असा होय. या काळात शेतीवर आणि उद्योगधंद्यांवर आधारित व्यापार जास्त होताना दिसत होता. तसेच गरजा आणि परिस्थिती व त्यासाठी लागणारी साधने ही सीमांत होती व त्याचे स्वरूपही वेगळे होते.


प्रगत उद्योग हा या काळाचा ठसा म्हणावा लागेल. या काळामध्ये सामान्यलोक -




तर सत्ताधारी व वरील वर्ग -




सुल्तान काळातील व्यापारी जमाती





या मुख्य असून इतरही काही जमाती व्यापार करीत होत्या सुल्तानशाहीतील व्यापारा संदर्भात माहिती बार्बोसा याने लिहून ठेवली आहे.

अशा या ठिकाणी अंतर्गत व्यापार पुढीलप्रमाणे चालत -




भूमार्गापेक्षा जलमार्ग अधिक उपयुक्त होई कारण जलमार्गाच्या मध्ये अनेक मोठी गावे लागत. तसेच मोठमोठया बाजारपेठा, व्यापारीकेंद्रे, बंदरे यामुळे हा व्यापार दूरवर पसरला होता.


मलबारी व्यापारी लोक हे




या ठिकाणी जलमार्गाने व्यापार करीत. त्यांच्या व्यापारी पदार्थांमध्ये खालील वस्तूंचा अंतर्भाव होता...



देशातील प्रमुख व्यापारी मार्ग एकमेकांशी जोडले होते यामध्ये -




व्यापार वाढीला उत्तेजन देण्यासाठी अल्तमशने पहिल्यांदाच प्रमाणीत चलन सुरू केले.

ते प्रमाणित चलन टंका व जितल होय. तसेच दिरहम व दाम हेही नाणी चलनात आणली.

रिजवी यांच्या मते,

एक जीतल म्हणजे एक पैसा तर

एक टंका म्हणजे एक रूपयाबरोबरीचा होता.

तसेच या ठिकाणी एक टंका म्हणजे.....

१ टंका= ४८ जीतल

१ टंका= १९२ दाम


१ टंका= २९० दिरहम

असे अनुपात पहावयास मिळतात.

अंतर्गत शांतता निर्माण करण्याचे प्रथम कार्य बल्बने केला. त्याने लुटारूंचा बंदोबस्त केला शेती व्यापार वाढीसाठी ही प्रयत्न केला. अल्लाउद्दिनने आर्थिक परिस्थितीत सुधारणा करण्यासाठी अनेक कठोर निर्णय लादले.

अल्लाउद्दिनने व्यापारासंदर्भात पुढील कायदे केले यामध्ये

**अल्लाउद्दीनने व्यापारासंदर्भात केलेले कायदे**





उदा....


| वस्तू | किंमत | वजन |
|---|---|---|
| गहू | ७ १/२ जीतल (साडेसात जीतल) | १ मण |
| तांदूळ | ५ जीतल | १ मण |
| डाळ | ५ जीतल | १ मण |
| तूप | १ जीतल | १ $^{1}/_{2}$ शेर (दिड शेर) |
| मलमल | १ टंका | २० वार |

अल्लाउद्दिन द्वारा स्थापित

अंतर्गत व्यापारतील महत्त्वाच्या बाजारपेठा मंडी व 'सराय-ए-अदल' यांच्या बाबतचे नियम खालील प्रमाणे होते...

इतिहासकार बर्नीच्या मते मंडीचे नियम....



सराय-ए-अदालचे नियम खालीलप्रमाणे :-

१. परिसरातीलच ठिकाणी दुकाने बसविली. बाहेरून येणाऱ्या सर्व वस्तू याच ठिकाणी यासाठी दक्षता.

२. सामानांचे भाव निश्चित केले.


३. प्रत्येक व्यापाऱ्याने नोंदणी करणे आवश्यक.

४. सुल्तानी व्यापाऱ्यांना व्यापारासाठी उत्तेजन देण्यासाठी २० लाख टंका इतकी रक्कम मागावून द्यावी ज्यायोगे ते दूरवरून माल आणून दिल्लीत विकतील.


५. परवाना अधिकारी नियुक्त केला.

- **परराष्ट्र व्यापार :**


मार्ग- १. भूमार्ग, २. जलमार्ग



• **सुल्तान काळात भरभराटीला आलेली बंदरे :**




सुल्तानशाहीच्या काळामध्ये व त्यापूर्वीही भारताचा परदेशाशी व्यापार चालत असे. भारतातून परदेशात निर्यात होणारे प्रमुख पदार्थ.



भारतामध्ये प्रामुख्याने अरबी घोडे आयात होत. भारतामध्ये कापसाचे मोठया प्रमाणावर उत्पादन होत त्याची निर्यात होत असे. हिंदूस्थानात आयात व्यापारापेक्षा निर्यात व्यापार अधिक होत असे त्यामुळे हिंदूस्थानाकडे सोन्या चांदीचा प्रचंड ओघ येत राहीला. परदेशाशी चालणाऱ्या उद्योगधंद्यामुळे जहाजबांधणीचा व्यापार मोठया प्रमाणात उदयास आला.

मार्कोपोलोने भारतातून चीनमध्ये मिरे मोठया प्रमाणात निर्यात होत असल्याचे सांगितले तर बार्बोसाने सांगितल्यानुसार एडेन व ओर्मुस येथे मोठ्या प्रमाणात तांदळाची निर्यात होत होती. त्याचप्रमाणे

खंबायत - हस्तोद्योग, विविध प्रकारचे कापड तयार सुती, रेशमी कापड

चेडुल - तांदूळ निर्यात

सुरत, धंधार, भडोच - सुती मलमल, जाडे भरडे कापड

बंगाल - साखर, कापूस, धान्य, आले, सुंठ, मांस, रेषमी रूमाल, रंगवलेली वस्त्रे

- **सारांश :**

अशा प्रकारे वरील बंदरातून अशा अनेक वस्तू निर्यात होत असत. सतत युद्धे बंडाळ्या चालू असल्यातरी व्यापार सुरळीत सुरू होता. त्याचप्रमाणे खेड्यातील ग्रामीण जीवन अबाधितपणे सुरू होते. भारतीय कारागिरांनी बनविलेल्या सोन्या चांदीच्या दागिन्यांना युरोपमध्ये मोठी मागणी होती. यारून भारतातील अंतर्गत व परदेशी व्यापाराचे स्वरूप स्पष्ट होते.


### २.२.५ समाज : गुलामगिरी (Society : Slavery)

फार प्राचीन कालापासून गुलामगिरीची प्रथा अस्तित्वात होती. यामध्ये ग्रीस, भारत तसेच युरोपियन राष्ट्रामध्येही गुलामगिरीची पद्धती अस्तित्चात होती.

मध्ययुगीन/सुल्तानकाळामध्ये गुलामांचे बाजार भरून खरेदी विक्री होत असे.

मुस्लिम समाजामध्ये श्रीमंत वर्गात गुलाम बाळगण्याची प्रथा अस्तित्वात होती. गुलामांकडून सर्व कष्टाची कामे करवून घेतली जात. गुलामांमध्ये स्त्री-पुरूष दोन्हीही गुलाम असत.

• **गुलामांचे प्रकार :**




१. **विकत घेतलेला** – गुलामाचा हा पहिला प्रकार यामध्ये काहीवेळा इतर मालकाकडून दुसऱ्या मालकाला विकलेला तसेच कामाच्या स्वरूपावरून इतरांना विकलेला अशा व्यक्तिंची संख्या यामध्ये समाविष्ट होत असे.

२. **स्वत:हून विकणारा** – काही आर्थिक अडचणीमुळे, सावकाराचे कर्ज फेडण्यासाठी व्यक्ती स्वत:ला गुलाम म्हणून विकत असे.

३. **सावकारांचा गुलाम**– शेती किंवा बाहय कामावर असणारा तसेच कर्जबाजारी व्यक्ती सावकाराकडे गुलाम म्हणून राबत असे.

४. **भेट** – काही वेळा अमीर उमराव किंवा सुल्तान आपल्याकडे आलेल्या पाहुण्यांना भेट म्हणून गुलाम देत असत.

५. **पराभूत लोक** – यामध्ये विशेषकरून महिलांचा जास्त भरणा असे. शत्रुप्रदेशातून पकडून आणलेल्या महिलांना गुलाम म्हणून ठेवण्याची प्रथा होती.

६. **आयात –** हा गुलामांचा प्रकार परदेशी गुलाम आयात केले जात असे. यामध्ये ॲबेसेमियन तसेच इथिओपियन व युरोपमधून गुलामांची आयात करून याठिकाणी त्यांची विक्री होत असे.

७. **युध्द कैदी –** याप्रकारामध्ये पराभूत झालेले सैनिक जास्तकरून गुलाम म्हणून राबवून घेतले जात असत. हे युध्दकैदी असल्यामुळे त्यांना जास्त स्वातंत्र्य नसे. पडेल ती कामे करणे हे त्यांचे कार्य असे.

आमीर खुस्रोने आपल्या 'एझाझ-ए-खुरसाणी' ग्रंथात गुलामांचे प्रकार व वैशिष्ट्ये खालील प्रमाणे सांगितली.

| **गुलाम प्रकार** | **वैशिष्ट्ये** |
|---|---|
| १. तुर्की गुलाम मुली | गोऱ्या व नाजुक |
| २. चीनी गुलाम मुली | सुगंधित |
| ३. हिंदूस्थानी गुलाम मुली | हळव्या स्वभावाच्या |
| ४. हिंदू गुलाम मुले | स्वर्गीय लोभसवाणे |
| ५. ॲबेसिनियन, इथियोपियन गुलाम मुले | शीघ्रतापी व धावणारी |

## • गुलामांच्या किंमती :

प्राचीन काळापासून गुलामांची खरेदी-विक्री खुलेआम होत होती त्याला मध्यकाळ अपवाद नव्हता.

| **गुलामाचा प्रकार** | **किंमत** |
|---|---|
| कष्ट करणारा पुरूष | १० ते १५ टंका |
| कष्ट करणारा सुंदर पुरूष | २० ते २५ टंका |
| कष्ट करणारी स्त्री | ५ ते १२ टंका |
| सुंदर स्त्री | २० ते ४० टंका किंवा २०० ते २००० टंका |

काही वेळा गुलामांची किंमत सोन्यातही होत असे.

इतिहासकार झियाउद्दिन बर्नीच्या मते,

लहान मुलगा किंवा सुंदर मुलीची किंमत ५००, १००० किंवा २००० टंका इतकी असे.

- **गुलामांचे जीवन :**

    १. मालकाच्या परवानगीशिवाय कोणतेही कार्य करू नये.

    २. मालकाच्या परवानगीशिवाय कोठेही जाणे नाही.

    ३. स्वत:चे लग्न ठरविण्यावर पायबंद.


    ४. कमावलेली संपत्ती मालकाला.

    ५. गुलामाच्या मृत्यूनंतर संपत्ती मालकाकडे जमा होत.

    ६. मुस्लिम समाजात गुलाम स्त्रीला मालकापासून अपत्य झाले तरी ती स्त्री गुलामगिरीतून मुक्त होत असे व तिला पत्नीचा दर्जा प्राप्त होत.


    ७. एखाद्या राजाने गुलामाला त्याच्या चांगल्या कार्यामुळे मुक्त केले तर त्या राजाला त्या मालकाला गुलामाची किंमत द्यावी लागत असे.

खालील परिस्थितीत गुलामाची मुक्तता केली जात. यामध्ये.....





या काळात गुलामाला मुक्त केल्याचे मुक्ती पत्र मालक गुलामाला देत असे. व तो त्यातून मुक्त समजला जाई.

मुस्लिम समाजामध्ये गुलाम आपल्या स्वकर्तृत्वाने पुढे गेल्याचे दिसते याठिकाणी प्रसिध्द गुलाम पुढील प्रमाणे –




- **मालक – गुलाम संबंध :**

मालकाकडून गुलामाला परंपरागत अधिकार दिलेले असत यामध्ये



मुसलमान समाजात गुलाम हे त्यांचे अनुयायी असत. त्यांना स्वत:चा विकास करण्याची परवानगी होती. हिंदू गुलामाने धर्मांतर केल्यास त्याची चांगली परिस्थिती निर्माण होत असे.

- **गुलामांची कार्ये :**

१. प्रामाणिक वागणे

२. सर्वप्रकारच्या सेवा करणे

३. संरक्षक म्हणून काम पाहणे

४. मालकाला आर्थिक मदतीस हातभार लावणे

५. वेळप्रसंगी शौर्याची कार्ये करणे

६. कारागीर म्हणून कार्य करणे

- **सारांश :**

अशा प्रकारे हिंदूस्थानातल्या अनेक भागामध्ये कमी अधिक प्रमाणात ही गुलामगिरीची प्रथा चालू होती. व काही राज्यकर्त्यांनी गुलामांचा योग्य तो वापर करून घेतला. व आपले राज्य सुरळित चालू ठेवले. अनेक वेळा ऐषआरामी जीवन जगण्यासाठीच जास्त करून गुलामांचा वापर करण्याची प्रथा चालू होती असे दिसून येते.

## २.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ :

१. पैबीस-पायाचे चुंबन घेणे

२. सिजदा - साष्टांग नमस्कार

३. नौरोज - वार्षिक उत्सव

४. सल्तनत - सरकार

५. खलिफा - धर्मप्रमुख

६. जिल-ए-अल्लाह - ईश्वराची सावली

७. चहलगानी - चाळीस सरदारांचा गट

८. इसरा - कर

९. सराया-ए-आदल व शहाना-ए-मंडी - बाजारपेठा

## २.४ स्वयंअध्ययन, प्रश्न व प्रश्नांची उत्तरे :

### अ) एका वाक्यात उत्तरे लिहा

१. इस्लाम धर्माचा पवित्र धर्मग्रंथ कोणता?

२. दिल्ली येथे सुल्तान सत्तेची स्थापना कोणी केली?

३. दिल्लीचा शेवटचा सुल्तान कोण?

४. खिलजी घराण्यातील सर्वात शक्तिशाली सुल्तान कोण?

५. तुर्कान-ए-चहलगानी हा गट कोणत्या सुल्तानाने स्थापन केला?

**उत्तरे :**

१. कुराण　　२. कुतुबुद्दिन ऐबक　　३. इब्राहिम खान लोदी

४. अल्लाउद्दिन खिलजी　　५. बल्बन

### ब) योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा.

१. ज्याच्या मनगटात ताकद त्याची सत्ता हा नियम ---- काळात लागू पडला.

अ) मराठा काळ　ब) पेशवे काळ　क) सुल्तान काळ　ड) मुघल काळ

२. हिंदूस्थानावर अठरा स्वाऱ्या करणारा ---- हा आक्रमक होता.

अ) महंमद घोरी　ब) महंमद गझनी　क) महंमद तुघलक　ड) महंमद कासीम

३. सर्व इस्लाम धर्मियांचा ---- हा प्रमुख होता.

अ) राजा　ब) सुल्तान　क) प्रधान　ड) खलिफा

४. गुलाम वंशातील पहिला सुल्तान ---- हा होता.

अ) गझनीचा महंमद　ब) कुतुबुद्दिन ऐबक　क) अल्तमश　ड) बल्बन

५. महंमद घोरीने पृथ्वीराज चौहानचा ---- च्या लढाईत पराभव केला.

अ) पानिपतची लढाई　ब) प्लासीची लढाई　क) बक्सारची लढाई　ड) तराईची लढाई

**उत्तरे-**

१. सुल्तान काळ,　　२. महंमद गझनी,　　३. खलिफा,

४. कुतुबुद्दिन ऐबक,　　५. तराईची लढाई.

**अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. सुल्तान कालखंडातील व्यापार कोणत्या गोष्टीवर अवलंबून होता?

२. सुल्तान काळातील व्यापरी जमातींची नावे सांगा.

३. सुल्तान काळातील व्यापार कोणकोणत्या मार्गाने होत असे?

४. सुल्तान काळात व्यापारामध्ये कोणते पदार्थ होते?

५. व्यापारवाढीला उत्तेजन देण्यासाठी कोणत्या सुल्तानाने प्रमाणित चलन सुरू केले?

**उत्तरे–**

१.शेती व उद्योगधंदे, २.बनिया, वंजारी, खुरासाना, मुल्तानी

३. भूमार्ग आणि जलमार्ग ४.नारळ, वेलची, मसाले, सुंठ, आले ५.अल्तमश

**ब. योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा.**

१. सुल्तानकाळातील व्यापारासंबधी ---- याने माहिती लिहून ठेवली.

अ) बर्निअर ब) बार्बोसा क) मार्कोपोलो ड) अल्बेरूनी

२. अल्लाउद्दिन खिलजीच्या मंडीचा ---- हा प्रमुख होता.

अ) उलुखखान ब) फिरोजखान क) बहिलोलखान ड) इब्राहिमखान

३. १ टंका म्हणजे ---- होय.

अ) ४८ जीतल ब) १९२ जीतल क) ५० जीतल ड) ६० जीतल

४. सुल्तानकाळातील ---- हा अंतर्गत व परराष्ट्र उद्योगाचा ठसा होता.

अ) लोखंड उद्योग ब) विकसनशील उद्योग क) आर्थिक उद्योग ड) प्रगत उद्योग

५. 'सराय-ए-आदल' व 'शहना-ए-मंडी' या बाजारपेठा ---- या सुल्तानाने वसवल्या.

अ)महंमद तुघलक ब)कुतुबुद्दिन ऐबक क)अल्लउद्दिन खिलजी ड)अल्तमश

**उत्तरे–**

१. बार्बोस २. उलुघखान ३. ४८ जीतल

४. प्रगत उदयोग ५. अल्लाउद्दिन खिलजी

**अ. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. गुलामगिरीची प्रथा कोणकोणत्या देशात अस्तित्वात होती?

२. गुलामाकडून कोणती कामे करवून घेतली जात होती?

३. विकत घेतलेला गुलाम म्हणजे काय?

४. गुलामांची आयात कोणकोणत्या देशातून केली जात होती?

५. स्वत:हून विकणारा गुलाम म्हणजे काय?

**उत्तरे–**

१. ग्रीस, भारत, युरोप २. कष्टाची ३. मालकाकडून दुसऱ्याला विकलेला

४. ॲबेसिनिया, इथोपियन व युरोप ५. आर्थिक अडचणी व सावकारांचे कर्ज फेडण्यासाठी

**ब. योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा.**

१. गुलामांमध्ये ---- प्रकारचे गुलाम होते.

अ) मालक–मजूर ब) स्त्री–पुरूष क) पुरूष ड) वडील

२. आमिर खुस्रोने ---- या ग्रंथात गुलामांचे प्रकार सांगितले.

अ) अकबरनामा ब) बाबरनामा

क) तारीख–ए–फिरोजशाही ड) एझाझ–ए–खुरसाणी

३. चिनी गुलाम मुली ---- असत.

अ) सुगंधित ब) नाजूक क) हळवे ड) लोभस

४. दिल्ली येथे ---- हा सुल्तान स्वकर्तृत्वाने पुढे आला.

अ) बाबर ब) महंमद तुघलक क) अल्तमश ड) कुतुबुद्दिन ऐबक

५. गुलामामध्ये कष्ट करणारा पुरूष ---- टंकांमध्ये मिळत असे.

अ) २० ते २५ टंका ब) १० ते १५ टंका क) ५ ते १२ टंका ड) १५ ते ४० टंका

**उत्तरे–**

१. स्त्री–पुरूष २. एझाझ–ए–खुरसाणी ३. सुगंधित

४. कुतुबुद्दिन ऐबक ५. १० ते १५ टंका

**१.५ सरावासाठी स्वाध्याय –**

१. सुल्तान सत्तेच्या प्रारंभिक इतिहासाची माहिती लिहा.

२. सुल्तान काळातील राजसत्तेचा सिद्धांत स्पष्ट करा.

३. सुल्तान काळातील अंतर्गत आणि परकीय व्यापाराची माहिती लिहा.

४. सुल्तान काळातील गुलामगिरी व्यवस्थेची माहिती स्पष्ट करा.

५. अल्लाउद्दिन खिलजीचे व्यापारासंबंधी धोरण स्पष्ट करा.

## १.६ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके :


१. वि. वि. कुलकर्णी– मध्ययुगीन भारताचा इतिहास, विद्या प्रकाशन नागपूर

२. मदन मार्डीकर दिल्ली सल्तनत १२०० मे १५२६, विद्या बुक पब्लिशर्स, औरंगाबाद

३. के. एन. चिटणीस, मध्ययुगीन भारतीय संकल्पना व संस्था

४. प्रो. शर्मा आर. एस.– भारत मे मुस्लीम शासन का इतिहास

५. कोलारकर रा. गो. – मध्ययुगीन भारताचा इतिहास, श्री मंगेश प्रकाशन १९९४

६. बारगळ व ढवळे – मध्यकालीन भारत १२०६–१७०७, विद्या प्रकाशन नागपूर १९८७

७. J. L. Mehta Medieval India Vol - III

८. R. C. Mujumdar Medieval India Vol - III

९. K. S. Lal Studies in Medieval India History

१०. R. C. Mujumdar The Delhi Sultana Bhartiya Vidya Bhavan Bombay.

११. Qureshi I. H. Administration of the sultanate of Delhi Lahore - 1994.

१२. A. L. Srivastav – The Sultana of Delhi.


❖ ❖ ❖

## घटक –३

# मुघल

**अनुक्रमणिका :**

३.० उद्दिष्टे

३.१ प्रास्ताविक

३.२ विषय विवेचन

    ३.२.१ अकबराची राज्यपद्धती / राज्यव्यवस्था

    ३.२.२ व्यापार : अंतर्गत व परराष्ट्रीय

    ३.२.३ संमिश्र संस्कृती

३.३ सारांश

३.४ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

३.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

३.६ सरावासाठी स्वाध्याय

३.७ अधिक वाचनासाठी संदर्भ

## ३.० उद्दिष्टे :

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला खालील माहिती विषद करता येईल.

- अकबराची राज्यपद्धत समजून घेता येईल.
- मुघल राज्याचा अंतर्गत व्यापार सांगता येईल.
- मुघल राज्याचा परराष्ट्रीय व्यापार जाणून घेता येईल.
- मुघल कालखंडातील व्यापारी जमातींची माहिती समजून घेता येईल.
- मुघल राज्यातील समिश्र संस्कृतीचे महत्त्व समजून घेता येईल.

## ३:१ प्रास्ताविक :

इ.सनाच्या १६ व्या शतकामध्ये दिल्लीच्या तख्तावर लोदी घराण्यातील शेवटचा सुलतान इब्राहिम खान

लोदीची सत्ता होती. २१ एप्रिल १५२६ च्या पानिपतचा शेवटचा सुलतान इब्राहिम खान लोदीचा एप्रिल १५२६ च्या पानिपताच्या पहिल्या लढाईमध्ये बाबराने त्याचा पराभव केला व भारतामध्ये मुघल सत्तेची स्थापना केली. पानिपतच्या विजयानंतर बाबराने दिल्ली व आग्रा ही शहरे काबीज केली. मुघल घराण्यातील पहिला सम्राट म्हणून बाबर दिल्लीच्या तक्तावर विराजमान झाला. त्यानंतर त्याचा मुलगा हुमायून मुघल सत्तेवर आला. परंतु त्याचा शेरशहा बरोबरच्या युद्धामध्ये पराभव झाला व दिल्ली शेरशहाच्या ताब्यात आली. त्याच्याकडून पुन्हा मुघलांनी सत्ता काबीज केली. हुमायून नंतर त्याचा मुलगा अकबर सत्तेवर आला. सम्राट अकबराने साम्राज्यविस्तार करून रजपुतांबराबेर मैत्रीचे धोरण स्विकारले. सम्राट अकबराने उत्तम प्रशासनव्यवस्था निर्माण केली. तो एक उत्कृष्ठ राज्यकर्ता होता. त्यानंतर अकबराचा मुलगा जहाँगिर सत्तेवरती आला. त्याच्या राज्यकारभारावर त्याची पत्नी नूरजहाँनचा जास्त प्रभाव होता. जहाँगिरनंतर त्याचा मुलगा शहाजहान मुघल सत्तेवर आला. त्याची कारकिर्द मोठी वैभवशाली भरभराटीची होती. परंतु त्याच्या मुलाने म्हणजे औरंगजेबाने त्याला कैदेत टाकून तो मुघल बादशहा बनला. या प्रकरणामध्ये सम्राट अकबराची राज्यपद्धती, मुघलकालीन अंतर्गत व परराष्ट्रीय व्यापार आणि संमिश्र संस्कृती या उपघटकांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

## ३.२ विषय विवेचन :

### ३.२.१ अकबराची राज्यसिद्धांत पद्धत :

- **प्रस्तावना :**

सम्राट अकबर हा मुघल प्रशासनप्रणालीचा शिल्पकार होय. हिंदुस्थानात एक उत्तम शासन व्यवस्था निर्माण करणारा पहिला मुघल शासक म्हणून त्याचे नाव घेतले जाते. अकबराने हिंदू-मुस्लिम यांना समानतेने वागविले. त्याने सत्तेचा कधीही गैर उपयोग केला नाही. सम्राट अकबराने सुरू केलेली राज्यव्यवस्था म्हणजे त्याचा श्रेष्ठ बुद्धीमत्तेचे प्रतिक होते. श्रेष्ठ प्रशासन हा राज्याचा आत्मा असेल. तरच शासनव्यवस्था मजबुत होऊ शकते. सम्राट अकबराने निर्माण केलेली राज्यपद्धती पुढे थोड्याफार फरकाने मुघल सत्ताधीशानी अनेक वर्षे चालू ठेवली.

- **राजाची प्रजेसाठी गुण वैशिष्टे :**

अबूल फलजने 'ऐन-ए-अकबरी' या ग्रंथात अकबराच्या राज्यपद्धतीची माहिती दिली आहे. त्याने राजाची प्रजेसाठी गुण वैशिष्ट्ये सांगितली आहेत. ती खालीलप्रमाणे सांगता येतील.

१) राजाचे प्रजेवर पुत्रवत प्रेम असावे.

२) ईश्वराप्रति निष्ठा असावी.

३) राजाने उदारमतवादी व क्षमाशील असावे.

- **मंत्रिमंडळ :**

सम्राट अकबराचे साम्राज्य मोठे होते. अकबराने राज्यकारभाराच्या सोयीसाठी आठरा विभाग पाडले

होते. त्या प्रत्येकाला 'सुभा' म्हटले होते. त्यामध्ये मोठे १५ व छोटे ३ सुभे होते. या प्रत्येक सुभ्यावर एक-एक सुभेदार नेमला होता. अकबराने प्रशासनाच्या सोयीसाठी जे सुभे पाडले ते पुढीलप्रमाणे होते. १) आग्रा, २) अलाहाबाद, ३) अयोध्या, ४) अजमेर, ५) आग्रा, ६) बंगाल, ७) बिहार, ८) काबूल, ९) दिल्ली, १०) माळवा, ११) खानदेश, १२) वऱ्हाड, १३) मुलतान, १४) अहमदनगर या प्रत्येक सुभ्यामध्ये जिल्हे होते. जिल्ह्याच्या लहान विभागाला महाल म्हणत. त्याच प्रमाणे लहान विभागास दस्तुर असे ही म्हणत. या सुभ्यातून जमीन महसूल व जकात मिळत असे. अकबराच्या राज्याचे उत्पन्न जवळ-जवळ ४० कोटी होते. अकबराने विविध खाती पाडून ती विविध अधिकाऱ्यांकडे सोपविली होती. हे अधिकारी असे होते. १) मुख्य प्रधान - हा सर्वात श्रेष्ठ अधिकारी होता. २) दिवाण उर्फ वझीर - या अधिकाऱ्याकडे फडणविसाचे काम सोपविले होते. ३) बक्षी उर्फ लष्करी दिवाण - नोकरांचा व फौजेतील सैनिकांचा पगार देण्याचे काम या मंत्र्याकडे असे. ४) सदर उर्फ धर्ममंत्री - या मंत्र्याकडे धर्मखाते सांभाळण्याची जबाबदारी होती. ५) काझी - हा न्यायखात्याचा प्रमुख होता. ६) कोतवाल - हा पोलीस खात्याचा प्रमुख होता. ७) वाकणीस - हा दप्तरखात्याचा प्रमुख होता. ही पद्धत पुढे अनेक दिवस वापरल्याचे दिसून येते. अकबराची महत्त्वाची सुधारणा म्हणजे त्याने जाचक अशी सरंजामशाही पद्धती बंद केली. त्याने सरंजामदारांच्या जहांगिरी खालसा करून त्या बादशाही जमिनीत समाविष्ट केल्या.

- **मुलकी व्यवस्था :**

अकबराच्या जमिनीच्या वसुलीची व्यवस्था लावण्याचे श्रेय राजा तोडरमलला दिले जाते. अकबराने असदखान व मुझफ्फरखानला जमाबंदीच्या कामावर नेमले होते. त्यानंतर राजा तोडरमलकडे ही जबाबदारी दिली. सर्व प्रथम राजा तोडरमलने जमिनीची मोजणी केली. उत्तम, मध्यम व कनिष्ठ अशा जमिनीची प्रत ठरवून दिली. त्याने त्या जमिनीवर एकतृतिअंश (१/३) सारा ठरवून दिला. प्रथमतः हा शेतसारा धान्याच्या स्वरूपात जमा केला जात असे. नंतर तो पैशाच्या स्वरूपात घेतला जाऊ लागला. दर दहा वर्षांनी शेतसारा ठरविला जाई. सारा आकारणी झाल्यावर कबुलायत लिहून घेतली जाई. कुळास सरकारकडून पट्टा दिला जात असे. या पद्धतीला बंदोबस्त असे नाव होते. पुढे ही पद्धत 'तोडरमल बंदोबस्त'या नावाने ओळखली जात असे. अकबराने पडीक जमीन लागवडीला प्रोत्साहन दिले. त्यासाठी कर्जाची योजना केली. नैसर्गिक संकटाच्या वेळी म्हणजे दुष्काळ व अवर्षण पडल्यास अकबर सारा माफी देत असे. यासाठी त्याने काही नियम ही केले होते. शेतकऱ्यांनी स्वतः व्यवहार करावा, मध्यस्थी ठेऊ नये, शेतकऱ्यांना कर्ज देऊन त्याची फेड हळू-हळू करावी, ठरलेल्या रकमेपेक्षा जास्त सारा वसूल करू नये, वसूल गोळा करताना जबरदस्ती करू नये, त्रासदायक कर वसूल करू नयेत. यावरून सम्राट अकबराचा शेतकऱ्यांकडे पाहण्याचा दृष्टीकोण लक्षात येतो.

- **लष्करी सुधारणा :**

सम्राट अकबराने आपल्या साम्राज्यामध्ये लष्करी व्यवस्था चांगली ठेवली होती. मनसबदार, आसामदार, अमीर असे लष्करात अधिकारी होते. सर्वात मोठा लष्कर अधिकारी अमीर असे शहाजाद्यांशिवाय ही जागा दुसऱ्यां कोणाला मिळत नसे. या लष्करी व्यवस्थेचे वर्णन ऐन-ए-अकबरीमध्ये आलेली आहे. अकबर हाच

आपल्या लष्कराचा मुख्य सेनापती असून लष्कराच्या हालचाली कशा व्हाव्यात हे तो सांगतो. 'लष्कर' अवाढव्य असल्यामुळे त्याने त्याचे निरनिराळे विभाग पाडून राज्यात शांतता राखावी मनसबदार पायदळ असे त्याचे निरनिराळे विभाग पाडून राज्यात शांतता राखावी असे लष्कराचे मुख्य विभाग होते. दहा स्वारावरील अधिकाऱ्यास दहा हजारी ही संज्ञा होती. दहा हजारी मनसबदारास महिना साठ रुपये पगार मिळत असे. फौजेच्या संख्येनुसार मनसबदाराच्या संख्येनुसार श्रेणी व पगार ठरविला जाई. मनसबदाराला मोठा मान व दर्जा होता. तो लष्करातील श्रेष्ठ अधिकारी होता.''

अकबराच्या कालखंडामध्ये अमीर व मनसबदार यांची संख्या जवळ-जवळ ४१५ एवढी होती. अकबराच्या कालखंडामध्ये जहागिरदारी पद्धत बंद झाली. मनसबदारांना पगार श्रेणीनुसार दिला जात असे. त्यांचा पगार कमीत-कमी १५० व जास्तीत जास्त ७०० असे. यासाठी हजेरीपत्रक ठेवले होते. लष्कर भरती वेळी हिंदू-मुस्लिम असा भेदभाव केला जात नसे. प्रत्येक सुभेदाराच्या हाताखाली लष्करी अधिकारी असत. लष्करातील अधिकाऱ्याने चांगले काम केले तर त्यास तो अमीर, उमराव, खानखानान आदि पदव्या देत असे.

- **अकबराचा नवरत्न दरबार :**

अकबराच्या साम्राज्यामध्ये अनेक बुद्धीमान गुणी विद्वान होते. त्यातील नऊ विद्वान मुख्य होते. त्या नऊ जणांना नवरत्न म्हणून ओळखले जाते. त्यामध्ये १) अबूल फजल, २) फैजी, ३) मुल्ला देप्याजा, ४) राजा मानसिंह, ५) राजा तोडरमल, ६) राजा बीरबल, ७) बदाउनी, ८) हकीम हुमाम, ९) तानसेन ही नवरत्ने होती.

- **मनसबदारी पद्धत :**

मुघल प्रशासन व्यवस्थेमध्ये सम्राट अकबराने इ. सन १५७१ मध्ये मनसबदारी पद्धतीचे संघटन पूर्ण स्वरूपात केले. बाबराच्या मृत्यूनंतर हुमायूनच्या कमकुवत नेतृत्वामुळे सैन्यावरील मुघल सत्ताधीशांचे नियंत्रण कमी झाले. त्यातून लष्करी सामर्थ्य कमी होऊ लागले. यातून मार्ग काढण्यासाठी सम्राट अकबराने मुघल सत्तेचे सामर्थ्य वाढविण्याच्या भूमिकेतून मनसबदारी पद्धत अस्तित्वात आली.

'मनसब' हा अरबी शब्द असून याचा याचा अर्थ दर्जा, हुद्दा किंवा स्थान असा होतो. मनसबदारी मुघलप्रशासनास व्यवस्थेतील हुद्दा किंवा प्रतिष्ठा मोजण्याचे साधन होते. लष्करी किंवा मुलकी अशा दोन्ही प्रकारच्या अधिकाऱ्यांना लढाईत निरनिराळ्या सैन्य तुकड्यांचे नेतृत्व करावे लागत असे. त्याच्या हुद्यावरून त्याने वेतन व दरबारातील त्याचे स्थान निश्चित होत असे.

- **मनसबदाराची वैशिष्ट्ये :**

१) मनसबदार म्हणून सर्वांना संधी देण्यात आली होती. इराणी, तुर्क, अफगाणी, रजपूत यांचा त्यामध्ये समावेश असे.

२) मनसबदाराकडे असणाऱ्या लष्कराची शस्त्रास्त्रे, घोडे, हत्ती, उंट आदिचा तपशील ठेवावा लागत असे. यावरती सरकारी नियंत्रण असे.

३) मनसबदारांच्या प्रथम, द्वितीय, तृतीय अशा तीन श्रेणी करण्यात आल्या होत्या. त्यानुसार त्याचे वेतन व दर्जा ठरविला होता.

४) अकबराने मनसबदार पद्धतीत जात व सवाल हे हुद्दे निर्माण केले होते.

५) मनसबदारात दरबारी मनसबदार व प्रांतिक मनसबदार असे दोन प्रकार होते.

६) अमीर-उमराव कुटुंबातील व्यक्तींना मनसबदाराचे वारस म्हणून मनसब देण्यात येत असे.

७) मांडलिकत्व स्विकारणाऱ्या राजांनाही ठराविक श्रेणी देण्यात येत असे. युद्ध प्रसंगी ते राजाला मदत करीत असत.

८) लष्करी आणि मुलकी अशा दोन्ही स्वरुपाची कामे मनसबदाराला करावी लागत असत.

- **मनसबदारांची नेमणूक :**

मनसबदाराची नेमणूक स्वत: बादशहाकडून केली जात असे. मनसबदारांच्या नेमणुकीसाठी राजपुत्र, प्रांताचे अधिकारी किंवा सैन्याचे अधिकारी शिफारस करीत असत. त्यातून बादशहा मुलाखत घेऊन नेमणूक करीत असत. बादशहाच्या जन्मदिनी किंवा दरबारातील विशेष समारंभ किंवा उत्सवाच्यावेळी मनसबदारांना बढत्या दिल्या जात असत. दर तीन वर्षांनी मनसबदाराचे निरिक्षण केले जात असे. मनसबदाराने त्याच्याकडे असलेल्या बंधनांचे व्यवस्थितपणे पालन न केल्यास त्याची मनसबदारी रद्द केली जात असे.

- **मनसबदाराचे कर्तव्य :**

राज्य व लष्करी प्रशासनातील एक महत्त्वाचा घटक म्हणजे मनसबदार होता. या मनसबदारांच्या साह्याने मुघल बादशाहाने लष्करी सैन्य बळकट केल्याचे दिसून येते. मनसबदाराला लष्करी शस्त्रास्त्रे, घोडदळ, हत्ती, उंट व आवश्यक पायदळ बाळगावे लागत असे. मनसबदाराला आपल्या सैन्यास घोडे व अन्य लष्करी साहित्य स्वत: खरेदी करावे लागत असे. त्यांच्याकडे असणाऱ्या लष्कराची प्रथम तपासणी करून नोंद केली जात असे. मनसबदाराची खुण व सरकारी खुणेचा शिक्का घोड्याच्या पुट्ट्यांवर मारला जात असे. दरवर्षी किंवा तीन वर्षांनी मनसबदारांच्या सैन्याची तपासणी केली जात असे. युद्ध प्रसंगी मनसबदाराने सर्व सैन्यासह राजाला मदत करावी लागत असे. मनसबदारी पुढील काळात त्याच्या वारसाला मिळत नसे. त्याने जमविलेली मालमत्ता सरकारी जमा करावी लगात असे. त्यामुळे मनसबदाराचा कल विलासी व चैनी जीवन जगण्याकडे होता.

**मनसबदारांचे वेतन :**

मनसबदारी पद्धत राज्यातील वेतन व पद निश्चित करण्याचे माध्यम होते. या हुद्यामुळे मनसबदाराला समाजात व दरबारात मान व प्रतिष्ठा मिळत असे. नगदी मनसबदार व जहागीरदार असे मनसबदाराचे दोन प्रकार होते. पाच हजारी मनसबदाराला प्रत्येक महिन्याला २८ ते ३० हजार रुपये वेतनाच्या स्वरूपात मिळत असत. तर आपल्या नियंत्रणाखाली सैन्याला दहा हजार रुपये खर्च करण्याची परवानगी असे. एक हजारी

मनसबदाराला महिना आठ हजार रुपये वेतन व लष्करासाठी तीन हजार रुपये खर्च करण्याची परवानगी होती. पन्नास स्वाराच्या मनसबदाराला महिना दोनशे पन्नास रुपये वेतन व एकशे पंच्याऐंशी रुपये सैन्याच्या खर्चासाठी मिळत असत. मनसबदारांना वर्षभर हे रोख वेतन दिले जात असे. डॉ. श्रीवास्तव ए. एल. म्हणतात, ''मनसबदारांना वर्षभर पगार दिला जात होता.'' तर डॉ. व्ही. ए. स्मिथ म्हणतात ''मनसबदारांना जास्तीत जास्त नऊ महिन्याचा पगार दिला जात होता.''

- **मनसबदारी पद्धतीचे गुण :**

१) मनसबदारी पद्धतीमुळे सैन्यात सुधारणा घडून कार्यक्षम सैन्य निर्माण झाले.

२) मनसबदाराची नियुक्ती प्रत्यक्ष सम्राटाकडून होत असल्यामुळे ते सम्राटाशी एकनिष्ठ राहत होते.

३) मनसबदार पद्धतीमुळे मुघल साम्राज्य स्थिर व सामर्थ्यशाली होण्यास मनसबदार पद्धतीचा मोठा हातभार लागला.

४) मनसबदारांच्या वारंवार बदल्या होत असल्यामुळे एकाच भागामध्ये त्याचे हितसंबंध वाढणार नाहीत व ते शिरजोर होणार नाहीत याची दक्षता घेतली जात असे. सम्राटाचा त्यांच्यावर अंकुश असे.

५) लष्करी व मुलकी कारभारामध्ये कर्तबगारी दाखविणाऱ्या व्यक्तीला मनसबदार पद्धतीत संधी मिळत होती. कर्तबगारी दाखविणाऱ्यांना बढती मिळत असे.

६) मनसबदारी पद्धतीमुळे साम्राज्यात शांतता व सुव्यवस्था निर्माण झाली.

- **मनसबदारी पद्धतीचे दोष :**

१) मनसबदारी तपासणीच्या वेळी खोटी सैन्य भरती दाखवत असत. ते तपासणीच्या वेळी तात्पुरत्या सैन्याची उभारणी करीत असत. पायदळ व घोडदळामध्ये अशा प्रकारची फसवणूक होत असे.

२) मनसबदार पद्धतीत मोठ्या प्रमाणावर लाचलुचपतपणा व भ्रष्टाचार चाले. लष्करी साहित्यात व सैन्याच्या पगारात मनसबदार भ्रष्टाचार करत. यामध्ये तपासणी करणाऱ्या अधिकाऱ्यास लाच दिली जात असे.

३) मनसबदारी व्यवस्थेमध्ये लष्कराचा संबंध प्रत्यक्ष मुघल सम्राटाशी येत नसे. ते मनसबदाराशी एकनिष्ठ असत. सैनिकास राजापेक्षा मनसबदार जवळचा वाटे.

४) मनसबदार पद्धतीमुळे सैन्यामध्ये तुर्क, अफगाण, मंगोलियन, इराणी या परकियांचा मोठ्या प्रमाणात भरणा झाला. त्यांना मुघल शासकाबद्दल आपुलकी व आत्मीयता नव्हती. त्यामुळे या पद्धतीमुळे मुघल राष्ट्रीय सैन्याची उभारणी करू शकले नाहीत.

५) मुघल सैन्यामध्ये एकतेचा अभाव निर्माण झाला. प्रत्येक मनसबदारात वेगळेपणा होते. शस्त्रास्त्रे, शिस्त, युद्धपद्धती, कार्यपद्धती यामध्ये भिन्नता असल्यामुळे एकतेचा अभाव जाणवत असे.

६) मनसबदारी व्यक्तिगत नसल्यामुळे मनसबदाराच्या मृत्यूनंतर त्याची मालमत्ता वारसांना न मिळता

सरकार जमा होत असे. त्यामुळे मनसबदार चैनी व विलासी बनत.

७) मुघल शासन काळामध्ये मनसबदारीच्या पद्धतीतून मोठे सैन्य उभारणीसाठी प्रचंड खर्च केला जात असे. परंतु कार्यक्षम, एकसंघी व संघटीत सैन्याची निर्मिती होऊ शकली नाही.

सम्राट अकबराच्या या मनसबदारी पद्धतीमध्ये अनेक गुण व दोष असले तरीही सम्राट अकबराने निर्माण केलेली ही मनसबदारी पद्धत नागरी व लष्करी सेवेमध्ये उपयुक्त पद्धत होती. जोपर्यंत या मनसबदारी पद्धतीवर चांगले नियंत्रण राहिले. तो पर्यंत ही पद्धत उपयुक्त व फायदेशीर ठरली.

- **सारांश :**

सम्राट अकबराने सुरू केलेली राज्यव्यवस्था म्हणजे त्यांच्या श्रेष्ठ बुद्धीमत्तेचे प्रतिक होते. श्रेष्ठ प्रशासन हा राज्याचा आत्मा असतो. तरच शासनव्यवस्था मजबुत होऊ शकते. सम्राट अकबराने निर्माण केलेली राज्यपद्धती पुढे थोड्याफार फरकाने मुघल सत्ताधीशानी अनेक वर्षे चालू ठेवली. अकबराने, राजाने प्रजेच्या कल्याणासाठी घ्यावाची काळजी, त्यासाठी लागणारे मंत्रीमंडळ, लष्करी प्रशासन, महसूल व्यवस्था, आणि त्याने सुरू केलेली मनसबदारी पद्धत या सर्व गोष्टी मध्ययुगीन कालखंडामध्ये महत्त्वपूर्ण ठरल्याचे चित्र स्पष्ट होते.

- **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न :**

**अ) योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागा भरा.**

१) ............. याने ऐन-ए-अकबरी हा ग्रंथ लिहिला.

अ) निकोलस मनुची  ब) अबुल फजल  क) अबूल फौजी  ड) अब्दुल रज्जाक

२) ............. हा दप्तरखात्याचा प्रमुख होता.

अ) वाकनीस  ब) सबनीस  क) कोतवाल  ड) हवलदार

३) मनसब हा ............. भाषेतील शब्द आहे.

अ) तुर्क  ब) फारशी  क) हिंदी  क) अरबी

४) अकबराच्या काळामध्ये ............. याने जमिनीची मोजणी केली.

अ) मानसिंग  ब) बिरबल  क) तोडरमल  ड) नारिसखान

५) अकबराच्या नवरत्न दरबारामध्ये ............. हा विद्वान नव्हता.

अ) बदाउनी  ब) हकीम हुमम  क) तानसेन  ड) मिर्झा गाली

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) अकबराने राज्यकारभाराच्या सोयीसाठी किती विभाग पाडले होते.

२) न्यायखात्याचा प्रमुख कोण होता?

३) कोणत्या साली सम्राट अकबराने मनसबदारी पद्धती सुरू केली?

४) जिल्ह्याच्या लहान विभागाला काय म्हणत?

५) अकबराच्या काळामध्ये सर्वात मोठा लष्कर अधिकारी कोण होता?

### ३.२.२ मुघलकालीन व्यापार :

- **अंतर्गत व्यापार :**

**प्रस्तावना :**

मध्ययुगीन कालखंडामध्ये अंतर्गत व परराष्ट्रीय व्यापार मोठ्या प्रमाणात विकसित झाला होता. मुघल कालखंडामध्ये अंतर्गत व्यापाराला महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले होते. अंतर्गत व्यापार हा प्रामुख्याने नद्यांमधुन चालत असे. नद्यातून चालणारा व्यापार हा अधिक सोयीस्कर व स्वस्थ व सामान्यांना परवडणारा होता. किनाऱ्याच्या प्रदेशातून केला जाणारा व्यापार व देशांतर्गत व्यापार या दोन प्रकारातून व्यापार चालत असला तरीही खुष्कीच्या मार्गाने चालणारा व्यापार ही महत्त्वाचा होता. साधारणपणे पावसाळा संपल्यानंतर म्हणजे सप्टेंबर ते मे या कालावधीमध्ये अंतर्गत व्यापार चालत असे.

- **अंतर्गत व्यापाराचे प्रकार :**

मुघलकालीन व्यापार प्रामुख्याने तीन प्रकारे चालत असे. १) किनाऱ्यावरील व्यापार किंवा सागरी व्यापार, २) नद्यांच्या मार्गे होणारा व्यापार, ३) खुष्कीच्या मार्गावरून चालणारा व्यापार.

**१) किनाऱ्यावरील व्यापार किंवा सागरी व्यापार :**

सागरी व्यापार सुरक्षित व फायदेशिर होता. सागरी व्यापारावरील चाच्यांचा धोका टाळण्यासाठी व्यापारी जहाजे मार्गदर्शकाच्या नियंत्रणाखाली व्यापार करीत. सागरी व्यापार हा प्रामुख्याने सप्टेंबर ते मे या कालावधीमध्ये चालत असे. कारण या कालखंडामध्ये पावासाचे प्रमाण कमी झालेले असे. संरक्षण गलबतामुळे गोव्यातील पोर्तुगिज व्यापारी जहाजे सुखरूपपणे व्यापार करीत असत. गलबताचा पहिला गट – खंबायत ते गोवा मार्गावरील समुद्रामध्ये ३०० तराफे संरक्षण करीत. त्याचा साधारण वार्षिक व्यापार ३०,००० टन एवढा असे. संरक्षक गलबतांचा दुसरा गट – गोवा ते कोचीन यामध्ये चालत असे. आणि त्यांचा वार्षिक व्यापार १०,००० टना एवढा असे. पूर्वेकडील किनाऱ्यावर संरक्षक गलबताचा तिसरा गट दक्षिणेकडील नागपट्टणम आणि उत्तरेकडे ओरिसामधील बंदरामध्ये ये–जा करीत असावीत.

**२) नद्यांच्या मार्गे होणारा व्यापार :**

मुघलकालीन भारतामध्ये मोठ्या व महत्त्वाच्या नद्यामधून व्यापार चालत असे. प्रामुख्याने या व्यापाराचे वाहतुकीचे चार नद्यावरील जलमार्ग होते.

**१) सिंधू नदीचा मार्ग :** सिंध, लोहार, मुलतान, काश्मिर या प्रदेशातून सिंधू नदीचा मार्ग जात असे. या प्रदेशात तयार होणारा माल लहरी बंदर येथे पाठविण्यात येत असे. या बंदरातून आयात आणि निर्यातीचा माल बाहेर पाठविला जात असे. या नद्यांच्या किनाऱ्यावर औद्योगिक केंद्राची वाढ झाली. सिंधू नदी व तिच्या उपनद्यांच्या किनाऱ्यावर ठठ्ठा, भक्कर, मुलतान ही शहरे वाढली. भक्कर हे शहर सिंधू व रावी या नद्यांच्या संगमावर वसलेले होते. तर मुलतान हे शहर सिंधू व झेलम या नद्यांच्या संगमावर वसले होते. उत्तरेकडील असण्यातून सिंधच्या जहाज बांधणी उद्योगाला लागणाऱ्या लाकडाचा पुरवठा होत असे.

**२) गंगानदीवरील जलमार्ग :** या जलमार्गामध्ये चंबळ, शोण, घोग्रा या महत्त्वपूर्ण नद्यांचा समावेश होत असे. या जलमार्गामुळे उत्तर भारतातील व्यापाराला मोठ्या प्रमाणात उत्तेजन मिळाले होते. गंगा, जमुना आणि चंबळ या नद्यांमधून नौकातरण करणे शक्य होते. या नद्यांमधून मोठी वर्दळ असे. दिल्ली, आग्रा, अलाहाबाद, डाक्का, सोनारगाव, जैनपूर या सारखी औद्योगिक केंद्रे या नद्यांमुळे जोडली गेली होती. गंगा-जमुना या जलमार्गातून माल बंगालला पाठविण्यात येत असे. बंगालमधून हा माल सोनारगाव आणि ढाक्का आदि. अंतर्गत बाजारपेठांमध्ये पाठविण्यात येत असे.

**३) बंगालचा त्रिभुज प्रदेश :** गंगा-जमुना या नद्यांतून अंतर्गत माल बंगालला पाठविण्यात येत असे. बंगालमधून हा माल सोनारगाव आणि ढाक्का आदि बाजारपेठांमध्ये पाठविण्यात येत असे. सतगाव आणि हुगळी या बंगालच्या त्रिभुज प्रदेशाच्या मुखाशी वसलेल्या शहरातून अंतर्गत माल पश्चिमेकडील व पूर्वेकडील देशांना निर्यात केला जात असे. सागरी बंदरात उतरविला जाणारा माल बंगाल व बिहार या व्यापारी पेठांमध्ये पाठविला जात असे. याबरोबरच दक्षिण भारतात सुद्धा हा माल पाठविला जात असे.

**४) तापी नदीवरील मार्ग :** सूरत, खंबायत या पश्चिम किनाऱ्यावरील व्यापारी मार्गाचा तापी-नर्मदा नदीवरचा जलमार्ग हा एक अविभाज्य घटक होता. या नद्यांमधून माळवा, दख्खन, खानदेश या देशांतर्गत भागातील एलिचपूर, बऱ्हाणपूर व उज्जयिनी या व्यापार केंद्रातील माल भडोच, सूरत आणि खंबायत येथे पाठविण्यात येत असे.

### • खुष्कीच्या मार्गातून केला जाणारा व्यापार :

मुघलकालीन व्यापारी केंद्रांचे देशाअंतर्गत खुष्कीच्या मार्गाने व्यापार पुढील शहरातून चालत असे. आग्रा, दिल्ली, सरहिंद, अलाहाबाद, चितोड, अजमेर, लाहेर, काश्मीर, जोधपूर, फत्तेपूरसिक्री अशा केंद्रातून अंतर्गत व्यापार चालत असे. आग्रा या शहरामधून शिसे, मीठ, अफू, साखर, नीळ, कापड अशा वस्तू निर्यात केल्या जात असत. तर कापड सूरत, अहमदाबाद, खंबायत येथून, चैनीच्या वस्तू बंगालमधून, सुती व रेश्मी कापड सिंधहून, चमड्याच्या वस्तू सिरोंजमधून, या विविध वस्तू आयात केल्या जात असत. यावरून आपणास या शहराच्या व्यापाराची कल्पना येऊ शकते.

### • मुघलकालीन व्यापारी केंद्रे :

जलमार्गावर, नद्यांच्या संगमावर, उद्योगधंद्यांच्या ठिकाणी, यात्रेच्या ठिकाणी, कच्चा माल ज्या ठिकाणी

उपलब्ध असेल अशा ठिकाणी व्यापारी केंद्राची वाढ झाली. महामार्गावरती अशी अनेक शहरे निर्माण झाली. अशी शहरे व्यापार उद्योगाच्या मुख्य प्रवाहाशी जोडली गेली. काबूल कंदाहार लाहोर मुलतान ही वायव्येकडील ठिकाणे आग्रा, दिल्ली, अलाहाबाद, जौनपूर, लखनौ ही मध्य भारतातील केंद्र ठठ्ठा व भक्कर ही सिंधमधील शहरे दक्षिणेकडील बऱ्हाणपूर, एलिचपूर, सोनरगाव, ढाक्का, बालासोर, काटक, उज्जयिनी ही मुघलकालखंडामध्ये भरभराटीला आलेली व्यापारी केंद्रे होती.

**१) काबूल :** काबूल या महत्त्वाच्या व्यापारी केंद्रावर मुघलांची सत्ता होती. आग्रा, दिल्ली, बंगाल या भारतातील महत्त्वाच्या शहरातून काबूलला जोडणारा महामार्ग जात असे. काबूल या शहराला जोडणारे एतदेशातून महामार्ग होते. चीन, इराण, कंदाहार आदि देशांना ते मार्ग जोडले होते. मुघल बादशहाने येथील व्यापार मोठ्या प्रमाणात विकसित केला होता. काबूल या शहराची जकात मुघल बादशहा जहाँगिरने माफ केली होती. काबूलच्या व्यापारासाठी विविध पात्रातून अनेक तांडे काबूलला येत असत. व्यापारी दृष्टीकोणात काबूल शहर सोई-सुविधांनी युक्त होते. मध्य आशियातील प्रसिद्ध व्यापारी केंद्र म्हणून ते प्रसिद्धीस आले होते.

**२) अहमदाबाद :** गुजरातला व्यापारी दृष्ट्या वेगळेच महत्त्व होते. सन इ.स. १४१० मध्ये साबरमती नदीच्या तीरावर अहमदाबाद या शहराची स्थापना झाली. सागरी बंदर, उत्पादक वस्तूची उपलब्धता, सागरी किनारपट्टी, वाहतूकीची साधने, कच्च्या मालाची उपलब्धता यामुळे गुजरातमधील व्यापारी बंदरांना महत्त्व आले होते. ही मोठी बाजारपेठ असल्यामुळे या शहराच्या अनेक ठिकाणी व्यापार भरत असे. हे शहर फक्त व्यापारी शहरच नव्हते तर तेथे विविध वस्तूची उत्पादने मोठ्या प्रमाणात होत असत. या शहरातील सर्व व्यवहार सुरळीत चालावा यासाठी मुघल शासकांनी अनेक कर्मचारी व अधिकारी यांच्या नेमणुका केल्या होत्या. तेथील सोनार व पेढी व्यवहार देशाबरोबरच परदेशातही संबंधीत होता. मुघल सम्राट अकबराच्या कालखंडामध्ये या शहरामधील उपनगरांची संख्या जवळ जवळ ८४ होती.

**३) आग्रा :** सिकंदर लोदीने या शहराची स्थापना केली व तिला राज्याची राजधानी बनविली. मुघल कालखंडामध्ये हे शहर व्यापारी दृष्टीने भरभराटीला आलेले होते. आग्रा हे शहर मुघल कालखंडामध्ये मध्यवर्ती केंद्र होते. त्यामुळे अनेक महामार्गांनी आग्रा हे शहर जोडलेले होते. भारताबाहेर परदेशात जाणारे महामार्ग आग्रा ते कंदाहार, आग्रा ते काबूल, आग्रा ते खंबायत, आग्रा ते सोनारगाव, आग्रा ते बुऱ्हाणपूर असे होते. आग्रा शहराला जोडणारा देश अंतर्गत मार्ग पुढील प्रमाणे होते. आग्रा ते दिल्ली, आग्रा ते सरहिंद, आग्रा ते अलाहाबाद, आग्रा ते चितोड, आग्रा ते अजमेर, आग्रा ते लाहोर, आग्रा ते काश्मीर, आग्रा ते जोधपूर, आग्रा ते फत्तेपूरसिक्री असे अंतर्गत व्यापारी रस्ते होते. आग्रा या शहरामधून शिसे, मीठ, अफू, साखर, नीळ, कापड अशा वस्तू निर्यात केल्या जात असत. तर कापड सुरत, अहमदाबाद, खंबायत येथून चैनीच्या वस्तू बंगालमधून, सुती व रेशमी कापड सिंधहून, चमड्याच्या वस्तू सिरोंजमधून, या विविध वस्तू आयात केल्या जात असत. यावरून आपणास या शहराच्या व्यापाराची कल्पना येऊ शकते.

**४) बऱ्हाणपूर :** दक्षिण भारताचे प्रवेशद्वार म्हणून बऱ्हाणपूर या शहराला ओळखले जाते. तापी

नदीच्या किनारी इ.सन १४०१ साली नसीरखान फारूकीने या शहराची स्थापना केली. मुघल कालखंडामध्ये या शहराला महत्त्वाचे स्थान होते. बऱ्हाणपूर हे शहर व्यापाराबरोबरच राजकीयदृष्ट्या ही महत्त्वाचे शहर होते. या शहरातून सूरत, अहमदाबाद, आग्रा या शहराशी व्यापारी संबंध होते. विविध प्रांतातून येणाऱ्या वस्तूंची देवघेव करण्यासाठी हे शहर महत्त्वाचे होते. अहमदाबाद व बऱ्हाणपूर या शहरामध्ये व्यापारी संबंध प्रस्थापित झाले होते.

**५) शहाजहानाबाद :** सम्राट शहाजहानने इ.स. १६३८ मध्ये शहाजहानाबाद या शहराची स्थापना केली व त्याने या शहराला राजधानीचे शहर बनविले. तेव्हापासून हे शहर भारतामध्ये महत्त्वाचे व्यापारी केंद्र निर्माण झाले. देशातील विविध ठिकाणाहून या शहरामध्ये व्यापारी लोक व्यापारासाठी येत असत या शहरामध्ये वस्तूची खरेदी विक्री मोठ्या प्रमाणात होत असे.

**६) लाहोर :** मुघलांच्या काळामध्ये भरभराटीला आलेले हे शहर होते. लाहोर हे वायव्य सरहद्दीवरील मोक्याचे ठिकाण असल्यामुळे व्यापारी दृष्ट्या त्याला महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले. अकबराच्या काळामध्ये लाहोरच्या विकासाकडे लक्ष दिले होते. फिन्च याने या शहराचे वर्णन 'लाहोर हे पूर्वेकडील सर्वात मोठ्या शहरांपैकी एक शहर होते. असे या शहराचे वर्णन केले आहे. लाहोरमध्ये होत असलेल्या सम्राटांच्या अल्पकालीन मुक्कामामुळे लाहोरच्या सौंदर्यामध्ये भर होत असे आणि सुविधामध्ये वाढ होत असे. औरंगजेबाच्या काळापासून या शहराच्या ऱ्हासाला सुरूवात झाली. लाहोर हे आयात निर्यातीचे एक मोठे मध्यवर्ती ठिकाण होते. मध्य आशिया व इतर भागातील वस्तूंची आदला बदल या शहरातून होत असे. त्यामुळे या ठिकाणी व्यापाराची वाढ झाली.

या शहराबरोबरच मुघलकाळामध्ये बनारस, लखनौ, पाटणा, सोनारगाव, डाक्का, अलाहाबाद, जौनपूर ही महत्त्वाची व्यापारी केंद्रे होती.

- **मुघलकालीन दळण वळण व वाहतूक :**

मुघलकालीन व्यापार भरभराटीला आलेला होता. वाहतूक व दळणवळणाच्या साधनांमुळे व्यापारासाठी प्रसिद्ध असलेली बंदरे, औद्योगिक केंद्रे, व्यापारी केंद्रे अनेक रस्त्यांनी जोडली होती. यातून मुघलकाळामध्ये भारतात व्यापारी मार्गाने जाळेच निर्माण झाले होते. या प्रगत व्यापारी मार्गामुळे मुघल कालखंडामध्ये अंतर्गत व परराष्ट्रीय व्यापाराला चालना मिळाली. दळण वळण व्यवस्था सुखकर व्हावी यासाठी रस्त्याच्या कडेला विविध सुविधा करण्यात आल्या होत्या. चांगले रस्ते तयार करणे, खराब रस्त्यांची दुरुस्ती करणे, नद्यांवरती पूल बांधणे, रस्त्याच्याकडेला विहिरी खोदणे, रस्त्याच्याकडेने सावलीसाठी झाडे लावणे या बरोबर रात्रीच्या मुक्कामासाठी व विश्रांतीसाठी गृहे व धर्मशाळा बांधल्या.

अशाप्रकारे मुघल काळामध्ये रस्त्यांची व्यवस्था अतिशय चांगली केली होती. मुघलकालखंडामध्ये दिल्ली व आग्रा ही शहरे मध्यवर्तीदृष्ट्या व व्यापारीदृष्ट्या महत्त्वाची असल्यामुळे या शहरातून प्रमुख महामार्ग विविध शहरांशी जोडले जात असत. पहिला मार्ग काबूलकडे, दुसरा मार्ग कंदाहारकडे, तिसरा मार्ग

खंबायतकडे, चौथा मार्ग आग्रा ते दिल्ली येथपर्यंत एकच होता. तिसरा मार्ग पटटण–नहरवाल मार्गे खंबायतला जात असे. चौथा ग्वाल्हेर वरून बऱ्हाणपूरला जात असे. पाचवा मार्ग दुहेरी असणारा आग्रा ते सोनारगाव असा जात होता. सहावा महामार्ग डाक्का ते सरहद असा असे. वायव्येकडील लाहोर ते काश्मीर या रस्त्याला राजमार्ग म्हणून ओळखले जाई. हा महामार्ग दिल्ली, मुलतान, मुलतान–कंदाहार, आग्रा–लाहोर असा होता. मध्य भागामध्ये आग्रा–फत्तेपूर सिक्री, आग्रा–जोधपूर, आग्रा–चितोड, आग्रा–अजमेर, आग्रा–सरहिंद्, आग्रा–अलहाबाद, आग्रा–इटाह, अजमेर–अहमदाबाद–सूरत, अहमदाबाद–बऱ्हाणपूर हे प्रादेशिक रस्ते होते. पूर्व भागामध्ये ओरिसा–बंगाल, बंगाल–बिर व जैनपूर–मालदाह हे प्रमुख रस्ते होते. तर हिंदुस्थानच्या दक्षिण भागामध्ये ओरिसा–बऱ्हाणपूर रस्ता व्यापारासाठी महत्त्वाचा मार्ग होता.

- **रस्ते सुधारणा :**

मुघल शासकांनी प्रवासी व व्यापाऱ्यांच्या सोयीची काळजी घेतल्याचे दिसून येते. त्यांनी व्यापारासाठी उपयुक्त असणाऱ्या रस्त्यांची मोठ्या प्रमाणात देखभाल केली होती. त्यामुळे जमिनीवरून केला जाणारा व्यापार सोयीचा झाला. मनुचीने असे होते मुघल या ग्रंथामध्ये रस्त्याबद्दल सविस्तर माहिती दिली आहे. तो म्हणतो रस्ते सरळ नाहीत कारण वाटेत डोंगर नद्या व इतर राजांचे मुलुख येतात. हे राजे प्रवाशांना मुघालांच्या भीतीने आपल्या प्रदेशातून जाऊ देत नाहीत व ते चोर दरोडेखोर लोकांना लुटतात. म्हणून हे रस्ते सुरक्षित नाहीत. विविध मुघल सम्राटांनी केलेल्या रस्ता सुधारणा –

**१) शेरशहा :** शेरशहाने रस्ते सुधारणा मोठ्या प्रमाणात केली. रस्त्याच्या दुतर्फा झाडी लावली, व्यापारी वर्गासाठी व प्रवाशांसाठी पिण्याच्या पाण्याची सोय केली, हिंदु–मुस्लिम व्यापाऱ्यांसाठी व प्रवाशी लोकांसाठी विविध ठिकाणी धर्मशाळा बांधल्या. शेरशहाने जवळ–जवळ १७०० सराया बांधल्या होत्या. या ठिकाणी राहण्याची व जेवणाची सोय होत असे.

**२) सम्राट अकबर :** ऐन–ए–अकबरी मध्ये अकबराने रस्ते सुधारणा केल्याचा उल्लेख आला आहे. रस्त्याची देखभाल करणे, सराया बांधणे याकडे त्यांनी लक्ष दिले. रस्त्यातील सराया मध्ये व धर्मशाळेमध्ये थांबणाऱ्या प्रवाशांच्या संरक्षणासाठी शासकीय अधिकारी नेमले. रस्ते व बाजार हे सुरक्षित ठेवावेत असे कोतवालाला आदेश काढले. एवढेच नव्हे तर वजने व मापे यावर लक्ष ठेवून व्यापारामध्ये सुरक्षितता आणली.

**३) जहाँगिर :** जहाँगिर बादशहाने रस्ते सुधारणा करीत असताना रस्त्यांवर पाणपोया व विहिरी बांधल्या. जहाँगिर या सम्राटाच्या कालखंडामध्ये आग्रा ते बंगाल व अटक ते आग्रा असे पक्के रस्ते होते. मुघलकाळात नद्यांवर बांधण्यात आलेल्या मुलांमध्ये जोनपूर येथील गोमती नदीवरील पूल आणि अटक येथील सिंधू नदीवरील पूल भक्कम व श्रेष्ठ होते. आग्रा ते फत्तेपूरसिक्री, आग्रा ते लाहोर आणि इतर रस्त्यांवर दुतर्फा झाडे लावलेली होती. या बरोबरच रस्त्याच्या कडेला विहिरी खोदून त्यातून पिण्याच्या पाण्याचा पुरवठा केला होता. अशा प्रकारे एकंदरीत मुघल सम्राटानी रस्ते सुधारणाकडे लक्ष दिले होते.

- **दळण–वळण व वाहतुकीची साधने :**

मुघलकालखंडामध्ये वाहतुकीसाठी निरनिराळ्या साधनांचा वापर केला जात होता. प्रवासी वाहतूकीच्या

साधनांमध्ये बैल, बैलगाड्या, घोडे, खेचर, उंट, पालखी किंवा डोली आदिंचा समावेश होता. यामध्ये बैल व बैलगाड्या ही सर्वाधिक वापरात असलेली उपयुक्त साधने होती. मुख्यत्वेकरून गुजरात व माळवा येथे वाहतुकीसाठी घोडे व खेचरे यांचा उपयोग केला जात असे. हत्तीचा वापर राजे व श्रीमंत व्यक्ती करीत असत. प्रामुख्याने स्त्रियांसाठी डोलीचा वापर केला जात असे. ती उचलण्यासाठी दोन माणसे लागत. पालखी साधारणपणे चार ते सहा माणसे उचलत असत. त्याचा वापर नेहमी केला जात असे.

- **व्यापारी जमाती :**

मुघलकालीन अंतर्गत व्यापारामध्ये निरनिराळ्या व्यापारी जमाती गुंतल्या होत्या. या जमातींनी व्यापार वाढीला हातभाल लावल्याचे दिसून येते. या व्यापारी जमातीमध्ये वंजारी, बनिया, बोहरी, पारशी व सौदागर या व्यापारी जमातींचा समावेश होता. राजपुतान्यामध्ये व आसपासच्या भागामध्ये वंजारी लोक महत्त्वपूर्ण होते. यांचे काफिले लांबवर माल घेऊन जात असत. बैल, बैलगाड्या व क्वचित प्रसंगी उंट वापरत असत. बनिया जमातीचे लोक गुजरात मधून येत असत. ते दक्षिणेकडे व भारताच्या इतर भागात व्यापार करीत. त्याच बरोबर अरबस्तानात ही त्यांचे प्रतिनिधी असत. गुजरातच्या सागरी व्यापारावर या जमातीची भरभराट झाली. फक्त अहमदाबादमध्ये बनियांच्या ८४ उपजाती होत्या. बोहरी जमातीचे लोक समुद्र मार्गाने आणि खुष्कीच्या मार्गाने व्यापार करत असत. अरबस्तान, इराण, इराक, तुर्कस्थान या पश्चिम आशियाई देशांशी त्यांचे व्यापारी संबंध होते. पारशी जमातीचे लोक गुजरातच्या व्यापारी केंद्रामध्ये स्थायिक होऊन व्यापारामध्ये भाग घेत असत. व्यापारामध्ये दलाल लोकांचा एक मोठा वर्ग होता. ते व्यापाऱ्यांना निरनिराळ्या प्रकारची मदत करीत. बंदरामध्ये व नगरामध्ये माल उतरवूण घेणे, त्यांच्या निवासाची सोय करणे, माल गोदामात पोहचवणे, स्थानिक बाजारपेठेमध्ये मालाचे वितरण करणे, इत्यादी दलालाच्या या कामामुळे तो व्यापारातील अविभाज्य घटक बनला होता.

- **मुघलकालीन परराष्ट्रीय व्यापार :**

**प्रास्ताविक :**

मुघल राज्यकर्त्यांनी प्रशासन व्यवस्थेबरोबरच व्यापार विकासालाही चालना दिली. व्यापारासाठी विविध असे मार्ग निर्माण केले. व्यापारासाठी व्यापारी वर्गाला आवश्यक ते आर्थिक सहकार्य केले. त्यामुळे मुघल कालखंडामध्ये अंतर्गत व परराष्ट्रीय व्यापाराला चालना मिळाली. भारतातून आयात होणाऱ्या वस्तू पेक्षा निर्यात होणाऱ्या वस्तूला मोठ्या प्रमाणात मागणी होती. भारतातील मसाल्याच्या पदार्थांना मोठ्या प्रमाणात मागणी होती. मांस, मासे, फळे हे टिकविण्यासाठी मसाल्याच्या पदार्थाला मोठ्या प्रमाणात मागणी असे. लहरी या बंदरातून नीळ, कागद, रेशमी, कपडे, औषधे, दोरखंड, रजया, गालिचे, कागद, चमड्याच्या वस्तू, कातडी, हिंग, हिरडे, रत्ने, हस्तीदंत, पादत्राणे, कंबायत या विविध वस्तू भारतीय बंदरातून परदेशात पाठविल्या जात असत. तर सोने, चांदी, घोडे, चिनी रेशीम, चंदनाचे लाकूड यांची भारतामध्ये आयात केली जात असे. मुघल राज्यकर्त्यांनी प्रशासन व्यवस्थेबरोबरच व्यापार विकासालाही चालना दिली. व्यापारासाठी विविध असे मार्ग निर्माण केले. व्यापारासाठी व्यापारी वर्गाला आवश्यक ते आर्थिक सहकार्य केले. त्यामुळे मुघल

कालखंडामध्ये अंतर्गत व परराष्ट्रीय व्यापाराला चालना मिळाली. भारतातून आयात होणारा वस्तू पेठा निर्यात होणाऱ्या वस्तूला मोठ्या प्रमाणात मागणी होती. भारतातील मसाल्यांच्या पदार्थांना मोठ्या प्रमाणात मागणी होती. मांस, मांसे, फळे हे टिकविण्यासाठी मसाल्याच्या पदार्थाला मोठ्या प्रमाणात मागणी होती. लहरी या बंदरातून नीळ, कागद, रेशमी कपड, औषधे, लोखंड, रजया, गालिचे, कागद, चमड्याच्या वस्तू, कातडी, हिंग, हिरडे, रत्ने, हस्तीदंत, पादत्राणे, कंबायत या विविध वस्तू भारतीय बंदरातून परदेशात पाठविल्या जात असत. आयात वस्तू सोने, चांदी, घोडे, रेशीम, चिनी, चंदनाचे लाकूड यांची भारतामध्ये आयात केली जात असे.

**१) बंदरातून केला जाणारा परराष्ट्रीय व्यापार :**

भारताला मोठा सागरी किनारा लाभला आहे. भारताच्या पूर्व आणि पश्चिम दिशांना समुद्र किनारी अनेक बंदरे होती. परदेशातून सागरी मार्गाने आलेला माल बंदरात उतरवला जाई व नंतर तो सर्व भारतभर पाठविला जात असे. भारतात तयार झालेला माल सागरी बंदरात एकत्र केला जाई व येथून तो बाहेरील देशाला निर्यात केला जात असे. यामुळे आयात निर्यातीसाठी भारतीय बंदरे महत्त्वाची होती.

भारतातील निरनिराळ्या बंदरातून परराष्ट्रीय व्यापार मोठ्या प्रमाणात चालत असे. बंगाल, सिंध, गुजरात या बंदरातून परराष्ट्रीय व्यापार चालत असे. सिंधू नदीच्या मुखाशी असणारे लहरी हे बंदर युरोपीय देश, मध्य आशिया, फ्रान्स, ऐमेन यांच्याबरोबर व्यापार केला जात असे. सुरज, खंबायत, भडोच ही गुजरात मधील बंदरे व्यापारासाठी प्रसिद्ध होती. युरोप-आफ्रिका येथे या बंदरातून वस्तू पाठविल्या जात असत. खंबायत बंदरातून प्रर्शिया, मोंबोसा, झांजीबर या भागाशी त्यांचा व्यापार चालत असे. गुजरात मधील सूरत हे बंदर व्यापारासाठी प्रसिद्ध होते. हाज यात्रेला जाणारे यात्रेकरू या बंदरातून पुढे जात असत. ५० ते ६० टन वजनाची जहाजे या बंदरातून परदेशी व्यापारासाठी जात असत.

मुघल कालखंडामध्ये सिंध, गुजरात व बंगाल या प्रदेशात असणाऱ्या बंदरातून मोठ्या प्रमाणात आयात निर्यातीचा व्यापार केला जात असे. हा व्यापार किफायतशीर होता. यातून मोठ्या प्रमाणात कर ही मिळत होता. हुगळी, सतगाव, श्रीपूर ही बंगालच्या प्रदेशातील महत्त्वाची बंदरे होती. हुगळी बंदरातून अरबस्तान, इराण, चीन, मलक्का व पश्चिमेकडील देश यांच्या बरोबर व्यापार चालत असे. सतगाव बंदरातून अरबस्तान, चीन, इराण इत्यादी ठिकाणी व्यापार चालत असे. श्रीपुर बंदरातूनही मोठ्या प्रमाणात व्यापार चालत असे. या बंदरांमधून साखर, तांदूळ, नीळ, रेशमी व सुती कापड, मसाल्याचे पदार्थ, रजया या पदार्थांच्या निर्याती केल्य जात असत. तांबे, मलमल, कथील, मोती, जड जवाहिर, चंदनाच्या वस्तू इत्यादी वस्तू आयात केल्या जात असत. मुघलकालीन भारतात बंदराचे प्रामुख्याने तीन प्रकार होते. त्यामध्ये सिंध गट, गुजराथ गट व बंगाल गट होय.

**१) सिंध गट :** सिंधू व तिच्या उपनद्या मधून केला जाणारा व्यापार महत्त्वाचा होता. या गटामध्ये व्यापारासाठी लहरी हे बंदर महत्त्वाचे होते. लहरी हे बंदर सिंधू नदीच्या मुखाशी वसलेले होते. हे बंदर मुलतान, ठठा, लाहोर या जलमार्गानी जोडलेले होते. अरबस्थान, इराण, ऑरमूझ या परदेशाशी या बंदरातून

व्यापार चालत असे. शिसे, उंट, औषधे, हस्तिदंत, पादत्राणे आदि. वस्तू या बंदरातून निर्यात होत असत. अल बरूनीने या बंदराचा सर्वप्रथम उल्लेख केला आहे. पुढे पोर्तुगिजांचे भारतातील वर्चस्व कमी झाल्यामुळे लहरी बंदराचे महत्त्व ही कमी झाले.

**२) गुजराती गट :** या तीन्ही गटामध्ये गुजराती गट परदेशी व्यापारामध्ये महत्त्वाचा होता. या गटातील प्रमुख सागरी बंदरे म्हणजे सूरत, भडोच, खंबायत ही होत. या बंदरातून आफ्रिका, अरेबिया, पश्चिम युरोप, मलाक्का आदि देशांशी व्यापार चालत असे. हे बंदर जरी मुघलांच्या मालकीचे असले तरी या व्यापारामध्ये पोर्तुगिजांचे वर्चस्व होते. या बंदरातून रेशीम, कापड, औषधे, अफू, रत्ने, गालिचे, रजया, कागद, चमड्याच्या वस्तू, साखर, लोखंड, कातडे आदि वस्तू निर्यात होत असत. या बंदरातून सोने, चांदी, तांबे, चंदनाचे लाकूड, घोडे गुलाबमाणी, चिनी रेशीम, हिंगूळ आदि. वस्तूंची आयात केली जात असे. गुजरात गटामध्ये सुरत, भडोच, खंबायत या बंदराशिवाय दिव दमण, घोग ही बंदरे व्यापारासाठी प्रसिद्ध होती. या गटामध्ये सुरत बंदर महत्त्वाचे होते. अनेक श्रीमंत व्यापारी या बंदरामध्ये राहत होते. व्यापारातून मुघल बादशहाला सूरत मधून मोठी रक्कम मिळत होती. अंतर्गत व परदेशी व्यापाराला या बंदरामध्ये महत्त्वाचे स्थान होते. या बंदराचे महत्त्वाचे वैशिष्ट म्हणजे प्रत्येक वर्षी हजच्या यात्रेला जाणारे यात्रेकरू सुरतेहून मक्केला बराच माल घेऊन जात असत. आणि परत येताना चांदी, सोने व इतर वस्तू घेऊन येत असत. यातून व्यापार व यात्रा असा दुहेरी उद्देश साध्य होत असे. भारतीय मालाच्या देवघेवीसाठी सूरत हे महत्त्वाचे बंदर होते. आयात आणि निर्यात अशी दोन्ही वस्तूंसाठी सूरत हे व्यापारी बंदर महत्त्वाचे होते.

**३) बंगाली गट :** या गटामध्ये तीन महत्त्वाच्या बंदरांचा समावेश होत होता. त्यामध्ये सतगाव, हुगळी, श्रीपूर ही महत्त्वाची बंदरे होती. गंगा नदीच्या किनाऱ्यांवर हुगळी हे शहर वसलेले होते. सतगांव पासून हुगळी हे शहर अगदी जवळ म्हणजे एक मैलाच्या अंतरावर होते. हुगळीवर प्रथम पोर्तुगिजांचे वर्चस्व होते. या बंदरातून रेशीम, रजया, जैनपुरी, गालीचे, तंबूचे समान, साखर, तांदूळ, नीळ, तूप, मिरे आदि वस्तू घेऊन अरबस्तान, इराण, चीन पूर्वेकडील मालाक्का या देशांना माल निर्यात केला जात असे तर विविध देशातून आयात केलेल्या मालामध्ये मखमल, जिरे, मोती, जायपत्री, जायफळ, लवंग यासाखे मसाल्याचे पदार्थ, फर्निचरच्या वस्तू, चंदन व इतर लाकडी वस्तू यांचा समावेश होत असे. सतगाव बंदरातून सुती व रेशीम कापड, आले, हिरडे, बेहडे, मिरे, लिंबू आणि इतर वस्तू निर्यात केल्या जात. चीन, अरबस्तान, आर्मेनिया, इराण येथून आलेली जहाजे सतगावला भेट देत असत.

**२) खुष्कीच्या मार्गाने केला जाणारा परराष्ट्रीय व्यापार :**

मुघल कालखंडामध्ये सागरी मार्गाबराबेरच खुष्कीच्या मार्गानेही मोठ्या प्रमाणात व्यापार चालत असे. खुष्कीच्या मार्गाने केला जाणारा व्यापार फारसा सुरक्षित नसला तरीही या व्यापाराला महत्त्व होते. विक्रेत्याच्या दृष्टीने फायदेशीर असेल तर खुष्कीच्या मार्गाने व्यापार केला जात असे. आणि व्यापारी लोक काफिले करून संरक्षणाची व्यवस्था करूनच जात असत. भारताच्या वायव्य दिशेला दोन खुष्कीचे मार्ग हेते. तो व्यापार दोन मार्गातून चालत असे. मुघलकाळातील खुष्कीच्या मार्गाने चालणारा व्यापार चार मार्गातून

केला जात असे. मुघलकाळात वायव्य सरहद्दीच्या प्रदेशात दोन प्रमुख खुष्कीचे मार्ग होते. १) लाहोर ते काबूल रस्ता – हा रस्ता चीन वरून युरोपला जाणारा मुख्य रस्त्याला मिळत असे. २) मुलतान ते कंदहार – हा रस्ता इराणहून इराकला जाणाऱ्या मुख्य रस्त्याला मिळत असे. वाहतुकीसाठी उंट हे साधन होते. रस्त्याची व्यवस्था चांगली नव्हती. तरीही व्यापार चालत होता. ३) ब्रह्मपुत्रेच्या खोऱ्यातून जाणारा मार्ग – ब्रह्मपुत्राच्या खोऱ्यातून जाणारा हा मार्ग होता. ४) तिबेट मार्ग – उत्तेकडून तिबेटला जाणारा हा एक महत्त्वाचा मार्ग होता. चोर व दरोडेखोर यांच्यापासून खुष्कीच्या मार्गाने जाणाऱ्या व्यापाराला भीती होती. म्हणून ते एकत्र काफिले करून जात असत. चोर व दरोडेखोर यांच्यापासून सावधता बाळगण्यासाठी व्यापाऱ्यांना सुरक्षितता बाळगावी लागत असे.

- **परराष्ट्रीय व्यापार केंद्रे :**

**१) पोर्तुगिज :**

युरोपियन, पोर्तुगिज सर्वप्रथम भारतात आले. प्रथम: वास्को-द-गामा हा पोर्तुगिज पश्चिम किनारपट्टीवर कालिकत बंदरात आला. त्याच्या येण्यामुळे युरोपियांना भारतात येणारा मार्ग समजला. त्यातून अनेक पोर्तुगिज व्यापारी भारतात आले. यांनी अनेक बंदरे व मुख्य ठाणी आपल्या ताब्यात घेतली. कालिकत, गोवा, कारवार, चौल, दीव, दमण, वसई, मंगलोर, कोचिन आदि बंदरे ताब्यात घेऊन तेथे व्यापारी वखारी घातल्या व या बंदरातून व्यापार सुरू ठेवला. परंतु तो व्यापार थोड्याच दिवसात मागे पडला. धार्मिक सहिष्णुता, पोर्तुगिजांनी अन्य देशाकडे लक्ष केंद्रित केले, इंग्रज, डच हे स्पर्धक भारतात आले, भ्रष्ट प्रशासन, लाचलुचपतखोर व्यापारी धोरण, स्पेन-पोर्तुगीज धोरण व विजयनगरच्या ऱ्हासामुळे तेथील व्यापारी पेठ नष्ट झाली. अशा विविध कारणांमुळे पोर्तुगिजांची सत्ता संपुष्टात आली.

**२) इंग्रज :**

इ. सन ३१ डिसें. १६०० मध्ये ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना झाली. इंग्लंडच्या व्यापारी भरभराटीचे हे पहिले पाऊल होते. इस्टइंडियन कंपनीने कॅप्टन हॉकिन्स याला मुघल बादशहा जहाँगिर याच्याकडे पाठवून सूरतला वखार घालण्याची परवानगी मागितली. परंतु परवानगी मिळाली नाही. पुढे सर थॉमस रो ने जहाँगिर बादशहाकडून अनेक सवलती मिळविल्या. सूरत, आग्रा, भडोच, अहमदाबाद या ठिकाणी इंग्रज वखारी स्थापन झाल्या. सन १६६८ मध्ये इंग्रजांबरोबर पोर्तुगिजांनी वैवाहिक संबंध जोडले. हुंडा म्हणून इंग्रजांना मुंबई मिळाली. चंद्रगिरी राजाकडून इंग्रजांनी मद्रास मिळविले. त्यांनी पूर्वेकडे हे मुख्य व्यापारी केंद्र बनविले. कासीम बाजार, हुगळी, पाटणा, बंगाल, बिहार, कोरोमंडल, ओरिसा इ. ठिकाणी इंग्रजांनी आपल्या वखारी स्थापन केल्या.

**३) फ्रेंच ईस्ट इंडिया कंपनी :**

इ. सन १६६४ मध्ये फ्रेंच ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना झाली. कंपनीची स्थापना झाल्यानंतर अवघ्या चार वर्षात म्हणजे इ. सन १६६८ ला सूरत येथे फ्रेंचांनी आपली व्यापारी वखार स्थापन केली. मच्छलीपट्टणम

(१६६९) पाँडेचेरी (१६७३) चंद्रनगर बंगाल (१६९०) आदि ठिकाणी फ्रेंचानी आपले व्यापारी वर्चस्व निर्माण केले. इंग्रजांनी मात्र पोर्तुगीज व फ्रेंच यांना शह देऊन भारतामध्ये व्यापारी वर्चस्व निर्माण केले.

- **वाहतुकीची साधने :**

बैल, बैलगाड्या, उंट या साधनांचा वाहतूक म्हणून खुष्कीच्या मार्गासाठी वापर केला जात असे. मुघल बादशहानेही या मार्गाच्या देखभालीकडे लक्ष दिलेले होते.

प्रामुख्याने मुघलकाळात भारतीयांनी आफ्रिका, युरोपीय राष्ट्रे, मध्य आशियाई देश, चीन, आग्नेय आशियाई देश व सिलोन या देशाबरोबर परदेशी व्यापार केलेला होता. मुघल सत्ताधीशांना या व्यापारापासून मोठ्या प्रमाणात कर रूपात उत्पन्न मिळत असल्यामुळे व्यापाऱ्यांना आवश्यक ते सहकार्य केले जात होते.

- **व्यापारी जमाती :**

मुघल काळातील परदेशी व्यापारात बनिया, बंजारी, बोहरी, फारशी, सौदागर आदि जमातींचा मोठ्या प्रमाणात सहभाग होता. मध्य आशिया, मालदिव बेटे, आग्नेय आशिया देश, अरबस्तान आदि. प्रदेशामध्ये जाऊन बनिया व्यापारी मोठ्या प्रमाणात व्यापार करीत. अरबस्तान, तुर्कस्तान, इराण, इराक या खुष्कीच्या मार्गे व समुद्रमार्गे बोहरी व्यापारी व्यापार करीत असत. या देशाबरोबर वेगवेगळ्या देशात जाऊन व्यापार करणाऱ्या व्यापाऱ्यांना त्या त्या देशातील दलाल व मध्यस्थ योग्य ते सहकार्य करीत. या बरोबरच हे दलाल वस्तूची व्रिकी व किंमत, वस्तूंचे संरक्षण या बाबत मार्गदर्शन करीत. भारतीय व्यापाऱ्यांना त्यांच्या सहकार्याने वस्तूंची विक्री करणे शक्य होत असे.

- **जकात :**

मुघल काळामध्ये परदेशाबरोबर केलेल्या व्यापारातील वस्तुंवर बसविलेल्या करातून मोठ्या प्रमाणात जकातीचे उत्पन्न मिळत असे. लहरी या एका बंदरातून मुघल बादशहांना जवळ-जवळ ६० लाख रुपये पेक्षा जास्त उत्पन्न कर स्वरूपात मिळत असे. मुघल कालखंडामध्ये परदेशी व्यापार करण्यासाठी मुस्लिम व्यापारी घराणी प्रसिद्ध होती. यांच्या मालकीची जहाजे होती. सम्राट अकबराच्या काळात निर्यात व आयात केलेल्या मालावर $२^{१}/_{२}$% (अडीच टक्के) कर घेतला जात असे.

- **सारांश :**

मध्ययुगीन कालखंडामध्ये अंतर्गत तसेच परराष्ट्रीय व्यापार मोठ्या प्रमाणात विकसित झाला होता. मुघल कालखंडामध्ये अंतर्गत व्यापाराला महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले होते. भारतीय वस्तूंना मोठ्या प्रमाणात मागणी असल्यामुळे परराष्ट्रीय व्यापाराचा मोठ्या प्रमाणात विकास झाला. भारतीय व्यापाऱ्यांनी जागतिक देशांबरोबर आपले नियमित स्वरूपाचे व्यापार संबंध प्रस्थापित केले होते असे दिसते. मुघलांचे विस्तारीत साम्राज्य उत्कृष्ट व कार्यक्षम प्रशासन, शांतता, सम्राटांचे सहकार्य यामुळे परराष्ट्रीय व्यापाराला मोठ्या प्रमाणात चालना मिळाल्याचे दिसते.

- **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न :**

**अ) योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागा भरा.**

१) मुघलकालीन अंतर्गत व्यापाराचे ............ प्रकार होते.

अ) दोन ब) तीन क) चार ड) पाच

२) ............ हे शहर सिंधू व झेलम या नद्यांच्या संगमावर वसले होते.

अ) लाहोर ब) काश्मीर क) मुलतान ड) सिंध

३) आग्रा शहराची स्थापना ............ या बादशहाने केली.

अ) अकबर ब) इब्राहिम लोदी क) सिकंदर लोदी ड) शहाजहान

४) शहाजनाने शहाजहानाबाद शहराची स्थापना ............ साली केली.

अ) १६३८ ब) १६४० क) १६४५ ड) १६५०

५) दक्षिण भारताचे प्रवेशद्वार म्हणून ............ या शहराला ओळखले जाते.

अ) अहमदाबाद ब) सुरत क) भडोच ड) बऱ्हाणपूर

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) काबूल या शहराची जकात कोणत्या मुघल बादशहाने माफ केली होती?

२) कोणत्या नदीच्या तीरावर अहमदाबाद या शहराची स्थापना झाली?

३) लहरी या बंदराचा सर्वप्रथम उल्लेख कोणी केला?

४) युरोपियन राष्ट्रामध्ये कोण सर्वप्रथम भारतात आले?

५) कोणत्या साली फ्रेंच ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना झाली?

### ४.२.३ समिश्र संस्कृती :

- **प्रास्ताविक :**

भारतामध्ये इ. सन १३ व्या शतकाच्या सुरूवापासून १९ व्या शतकाच्या सुरूवातीपासून १९ व्या शतकाच्या उत्तरार्धापर्यंत मुस्लिम सत्तेचे अस्तित्व होते. या दीर्घकाळ मुस्लिम सत्तेच्या अस्तित्वामुळे भारतामध्ये हिंदू समाजाशी त्यांचे संबंध निर्माण झाले. यातूनच या दोन समाजामध्ये सांस्कृतिक संमिश्रण झाले. दोन्ही धर्माच्या समाजावर पंपरांचे परिणाम झाले. भारतामध्ये मुस्लिम सत्तेच्या स्थापने पूर्वी ग्रीक, पर्शियन, शक, कुशाण आदि परकीयांची आक्रमणे झाली. परंतु त्यांनी भारताच्या मर्यादित प्रवेशावर आपले अस्तित्व निर्माण केले. मुस्लिम सत्ता विस्तारित व दीर्घकाळ टिकल्यामुळे हिंदू समाजाशी त्यांचा सहवास आल्यामुळे हिंदू व मुस्लिम यांच्यामध्ये सांस्कृतिक व सामाजिक संमिश्रण झालेले दिसते. मध्ययुगीन भारताच्या इतिहासात

मुघल काळामध्ये संस्कृतीत झालेली आदलाबदल भारतीय इतिहासाचे वेगळेपण आहे. हिंदू-मुस्लिम यांच्यामध्ये संस्कृतीचा झालेला संमिश्र विकास महत्त्वाचा आहे. कला, स्थापत्य, वास्तूकला, चित्रकला, गायन, वादन, संगीत, पोशाख, अन्न यामध्ये झालेला अदलाबदल कमी जास्त प्रमाणात विकसित झाला आहे.

**संमिश्र संस्कृतीचे स्वरूप :**

हिंदू-मुस्लिम यांच्या संबंधातील समस्या, दोन्ही धर्माच्या सांस्कृतिक गोष्टीत फरक असल्यामुळे भारतातील लोकांवरती महत्त्वाचा परिणाम झालेला दिसून येतो. मध्ययुगीन आणि आधुनिक कालखंडामध्ये हिंदू-मुस्लिम यांच्यातील संबधाचे स्वरूप वेगळे होते. धार्मिक समस्या मोठी होती. या धार्मिक समस्येविषयी विविध मते मांडण्यात आली आहेत. काहीनी हिंदू-मुस्लिम यांच्यातील संबंध उचलून धरले. तर काहीनी दोन्ही संस्कृती वेगळ्या दर्शविल्या. हिंदू-मुस्लिम संबंधाशी संबंधीत अनेक प्रश्न सर्वांच्या पुढे उभे होते. काही प्रश्न गुंतागुंतीचे दिसून येतात. यामध्ये दोन विरुद्ध मतप्रवाह दिसून येतात. ते दोन वर्गातून आल्याचे दिसतात. इतिहासकार ताराचंद यांच्या मते, 'जेव्हा मुस्लिम भारतात रहावयास आले, जेव्हा मुसलमानांचे भारतात आगमन झाले तेव्हा त्यांनी या देशाला आपले घर मानले. हिंदू लोकांच्या आजूबाजूला त्यांनी वस्ती करण्यास सुरूवात केली. त्यांच्याशी सलोख्याचे संबध निर्माण केले. त्यात ते यशस्वी ठरले व ते एकमेकांचे शेजारी बनले. यातून एक निर्मळ मन निर्माण झाले. हिंदू-मुस्लिम एकच आहेत. त्यांच्यात भेदभाव करू नये असे सांगण्यात आले. आणि यातून नवीन जीवनाची व नवीन संस्कृतीच्या उदयाची सुरूवात झाली. एका वेगळ्या संस्कृतीचा विकास होत गेला. फक्त धर्मच नव्हे तर कला, साहित्य आणि विज्ञान यांच्यात बदलाला सुरूवात झाली. हिंदू मन व हिंदू संस्कृती बदलत गेली. हिंदू-मुस्लिम यांनी जीवनाच्या प्रत्येक भागामध्ये सहकार्य केले. आर.सी. मुजूमदार यांच्या मते ''हिंदू-मुस्लिम यांच्यातील कोणतेही घटक व त्यांचे परिणाम असोत उदा. पोशाख, खाद्य, भाषा, संगीत, कला, विज्ञान आणि स्थापत्य आदि. घटकांना स्पर्श केल्याचे दिसून येते.'' महत्त्वाचा मुद्दा हा आहे की, हिंदू मुस्लिम एवढेच नव्हे तर इतर आदि संस्कृतीत सुद्धा मुख्य वैशिष्टे आपणास दिसून येतात. त्याचे सुद्धा योगदान मानवी संस्कृतीमध्ये महत्त्वाचे आहे. लोकशाही पद्धतीचे सामाजिक विचार मुसलमानांनी आणि स्वातंत्र्याचे चैतन्य पेरण्याचे विचार यासाठी हिंदूनी केलेला त्याग व सहनशक्ती यतून संमिश्र संस्कृतीची दर्शन घडते. हिंदू-मुस्लिम या दोन्ही ही संस्कृतीवर एकमेकांचा प्रभाव पडलेले दिसतात. दोन्ही संस्कृतीमध्ये काही बदल होताना दिसतात. या दोन घटकांमधील वेगळेपण जाणवण्याजोगे आहे. हिंदू वाद आणि मुस्लिम यांच्यामध्ये कोणतीही तफावत जाणवत नाही. अरेबिया, पर्शिया, तुर्कस्थान मध्ये इस्लाम आढळतो. भारतात देखील इस्लामाचा प्रभाव जाणवतो.

- **वास्तूकला/स्थापत्य/कला व कलाकुसर :**

हिंदू व मुस्लिम यांच्या संबंधातून मध्ययुगीन भारतामध्ये कला कुसरीच्या विविध शैली विकसित झाल्या. मुस्लिम वास्तूकलेवर तर हे संमिश्रण मोठ्या प्रमाणात दिसून येते. सुरूवातीच्या काळामध्ये भारतात मुस्लिम सत्ताधीशांनी मशिद, कबरी, घुमट व इतर वास्तू बांधण्यासाठी भारतीय कारागिरी व कामगारांचा वापर केला होता. हिंदू, जैन मंदिरांच्या अवशेषांवर सुरूवातीच्या काळात इस्लामी कला विकसित झाली.

त्यामुळे भारतात इराणी कला आलेली असली तरी तिचे पूर्णपणे मुस्लिम स्वरूप राहिलेले दिसून येत नाही. उलट त्याचे हिंदूकरणच झालेले दिसते. या काळातील वास्तूच्या निर्मितीमध्ये हिंदू कलाकारांचा प्रभाव असल्यामुळे येथील वास्तूंमध्ये इराणी व भारतीय वास्तूकलांचे संमिश्रण दिसते.

हिंदू-मुस्लिम यांच्या संबंधातून एक नवीन शैली विकसित झाली. तिला इंडो मुस्लिम शैली असे म्हणतात. हिंदूच्या मंदिर स्थापत्येने व मुस्लिमांच्या मशिदीने दोन वेगवेगळ्या शैली विकसित केल्या. मंदिर बांधकाम शैली गुंतागुंतीची व संमिश्र होती. तर मशिद बांधकामाची शैली सरळ व साधी होती. हिंदूच्या कलेचा परिणाम मुस्लिम शैलीवर व मुस्लिम शैलीचा परिणाम हिंदुंच्या शैलीवर झाल्याचे दिसते. दिल्लीमधील अलाई दरवाजा ही अलाउद्दिन खिलजी याने बांधलेली मशिद हिंदू-मुस्लिम एकत्रीत शैलीचे उदाहरण होय. इ.स. १५६६ मध्ये अकबराच्या काळामध्ये दिल्ली व आग्रा किल्ल्याच्या दरवाजाच्या बाहेरच्या बाजूस हिंदूचे प्रतिक पक्षाचे चित्र विविध प्रकारच्या डिझाईन करून कोरण्यात आले आहे. त्याच पद्धतीने मुस्लिम कला शैलीचा परिणाम हिंदू कला शैलीवर झाल्याचे दिसून येते. इ.स. १५७५ मध्ये विजयनगर येथे बांधण्यात आलेल्या लोटस महाल किंवा गार्डन पॅलेस या बांधकाम शैलीवर मुस्लिम शैलीचा वापर करण्यात आला आहे. हिंदूच्या मंदिरावर व रजपूत राजवाडावरती मुस्लिम कलाकुसर शैलीचा परिणाम झाल्याचे दिसून येते. मुघलांची दगडी बांधकाम शैली हिंदूच्या राजस्थानातील बिकानेर, जोधपूर, डाटिया राजवाड्यावर वापरण्यात आली.

डॉ. ईश्वरी प्रसाद म्हणतात, 'अकबराने बांधेली फत्तेपूरसिक्री येथील मशिद त्या मशिदीची योजना अरबी व इराणी नमुन्याची असली तरीही या मशिदीची बनावट भारतीय शैलीची आहे. अकबराच्या काळातील वास्तू बांधकामात इराणी व भारतीय शैलीचे मिश्रण झालेले दिसते. मोगल जेव्हा भारतात आले तेव्हा त्यांच्या जवळ स्वत:ची अशी वास्तूशैली होती. ती इस्लामी वास्तुशैली म्हणून ओळखली जात होती. त्यामध्ये घुमट, मिनार, कमानी, वेलबुट्टी, सुलेख आदि भौमित्तीक आकृत्यांना महत्त्व होते. परंतु भारतात त्यांनी केलेल्या बांधकामावर भारतीय स्थापत्यकलेचा प्रभाव पडला. त्यातून इंडो इस्लामिक स्थापत्यशैली विकास पावली. शेरशहाने बिहारमधील ससेराम या ठिकाणी त्याने जो भव्य मकबरा बांधला हा मकबरा एका तलावाच्या मध्यभागी बांधला आहे. या इमारतीची उंची ७१ फूट उंच आहे. त्याच्यावर हिंदू आणि मुस्लिम म्हणजेच पर्शियन शैलीचा प्रभाव जाणवतो. शेरशहाने बांधलेल्या वास्तूत हिंदू आणि मुस्लिम वास्तूकलेचे मिश्रण आढळते. अकबराच्या काळात फत्तेपूरसिक्री येथे बांधण्यात आलेला शेख सलीम चिश्तीचा दर्गा उर्फ 'मकबरा' बद्दल डॉ. व्ही. ए. स्मिथ म्हणतात, 'या मकबऱ्याच्या बांधकामावर हिंदू शैलीचा प्रभाव आहे. अकबराने बांधलेला पंचमहाल जे पाच मजले आहेत. असून इमारती बांधकामाची प्रेरणा अनेक मजली बौद्ध विहारावरून घेतली आहे. पहिल्या मजल्यावर मोठा हॉल आहे. त्याच्या खांबावर फुले, घंटी, कलश, रूद्राक्ष आहेत. वरील मजल्याकडे हे बांधकाम लहान लहान होत गेले आहे. या बांधकामावर हिंदू शैलीचा प्रभाव जाणवतो.

- **साहित्य :**

मुघलकाळामध्ये मोठ्या प्रमाणात साहित्य विकसित झाले. मुघल सम्राटांनी विविध साहित्याला राजश्रास

दिला. साहित्य व साहित्यिकांची काळजी घेतली. त्यामुळे अनेक भाषेमध्ये साहित्य विकसित झाले. अरबी, फारशी संस्कृत या भाषेतील ग्रंथांचे अनुवाद करण्यात आले. मुघल काळामध्ये विविध भाषेतून साहित्य निर्मिती झाली. सम्राट बाबर व जहाँगिर या बादशहांनी स्वत:ची आत्मचरित्रे लिहिली. सम्राट अकबराने अनेक विद्वान व कवी, साहित्यिक यांना राजाश्रय दिला. अकबराच्या दरबारामध्ये अनेक हिंदू-मुस्लिम साहित्यिक होते.

'फारसी' ही मुघल काळामध्ये राज्यकारभाराची भाषा होती. त्यामुळे या भाषेचा विकास होऊन मोठ्या प्रमाणात साहित्य निर्मिती झाली. सम्राट बाबराने तुझुक-ए-बाबरी उर्फ बाबरनामा हे आत्मचरित्र तुर्की भाषेत लिहिले. त्याने सुंदर कविताही केल्या आहेत. स्वत:चे ग्रंथालय असणारा हुमायुन हा मुघल सम्राट होता. हुमायुनची बहीण गुलबदन बेगम हिने हुमायूननामा हा ग्रंथ लिहिला. अकबराच्या काळामध्ये अनेक ग्रंथांचे लेखन झाले. अबुल फजलचा ऐन-ए-अकबरी, मुल्ला दाऊदचा तारीख-ए-अल्फी, फौजी सरहिंदीचा अकबरनामा, जिनामुद्दीन अहमद याचा तबकात-ए-अकबरी, अब्दुल बकीचा मासिर-ए-रहिमी असे अनेक ग्रंथ निर्माण झाले. हिंदूंच्या अनेक ग्रंथांची अकबराच्या आज्ञेवरून फारसी भाषेत भाषांतरे झाली. इ.स. १५८९ साली बदायुनी यांनी रामायणाचे फारसी भाषेत भाषांतर केले. तर अथर्ववेद अनुवाद हाजी सरहिंदी यांनी केला. जहाँगीर बादशहाने तुझुक-ए-जहाँगिरी हे आत्मचरित्र लिहिले. जहाँगीर बादशहा हा स्वत: लेखक व साहित्यिक विद्वान असल्यामुळे अनेक साहित्यिक व विद्वानांना त्यांनी राजश्रय दिला. शहाजहानच्या कारकीर्दीवर प्रकाश टाकणाऱ्या अनेक ग्रंथांचे लेखन झाले. अब्दुल हमीदचा पादशहानामा, इनायतखानचा शहाजाननामा या ग्रंथांची निर्मिती झाली. चारचमन ही चंद्रभानी रचना महत्त्वपूर्ण मानली जाते. शहाजहानच्या दरबारामध्ये अनेक श्रेष्ठ कवी व साहित्यिक होते.

अकबराच्या कारकिर्दीमध्ये २४००० हस्तलिखित ग्रंथांचा संग्रह करण्यात आला. हिंदू-मुस्लिम अमीर व उमरावांनी अशा ग्रंथांच्या संग्रहाकडे जातीने लक्ष दिले. बिकानेरची संस्कृत ग्रंथालय, जयपूर येथील पोथीखाना, जैसलमेर येथील ग्रंथालय अशी अनेक ग्रंथालये निर्माण झाली. रामायण, महाभारत, हरिवंश, सिंहासन बत्तीशी, हरिवंश राजतरंगिनी, कथा सरिता सागर, भागवत पुराण इत्यादी श्रेष्ठ ग्रंथांचे मुघलकाळात अनुवाद फारशीमध्ये केल्याची माहिती मिळते.

औरंगजेबाच्या कालखंडामध्ये त्याची मुलगी जेबुन्निसा हिने अनेक कविता लिहिल्या होत्या. पर्शियन कवींना दिलेला राजश्रय औरंगजेबाच्या कारकिर्दीमध्ये काढून घेण्यात आलेला होता. मिर्झा अब्दुल कादिर हा या काळातील प्रसिद्ध कवी होता. खाफीखानचा मुन्तखब-उल-लुबाब, साकी मूस्तैदखाना मासिर-ए-आलमगिरी, ईश्वरदास नागरचा फुतूहाते आलमगिरी, मुहमद कासिमंचा आलिमगीरनामा असे अनेक ग्रंथ प्रसिद्ध आहेत.

उर्दू भाषेचा उदय हिंदू-मुस्लिम संस्कृतीतून झाला. जेव्हा हिंदूचा संपर्क तुर्क आणि इतर मुस्लिमां बरोबर होत होता. तेव्हा ही उर्दू भाषा उदयास आली. व ती भाषा वापरण्यात सुरूवात झाली. या भाषेला जबन-इ-हिंदवाई या नावाने ओळखले जात होते. त्यानंतर ही भाषा उर्दू म्हणून लोकप्रिय झाली. या भाषेची उत्पत्ती तीन मार्गातून झाली. त्यामध्ये ब्रिज, पंजाबी व हरियाणी यांचा उल्लेख करावा लागेल.

- **संगीत व गायन :**

श्रोत्यांसमोर सादर केल्या जाणाऱ्या कलेमध्ये संगीत व गायन केलेला महत्त्वाचे स्थान होते. मुघल

सम्राटांनी गायन कलेला राजश्रय दिला. सम्राट अकबराच्या काळामध्ये गायन कला भरभराटीला आली. अकबराच्या दरबारामध्ये ३६ संगितकार होते त्यामध्ये तानसेन प्रमुख होता. तानसेन हा महान संगीत तज्ज्ञ व गायक होता. तानसेनचा समावेश अकबराच्या नवरत्न दरबारामध्ये होता. अबुल फजल म्हणतो ''तानसेन सारखा गायक भारतात हजारो वर्षात झाला नसेल.'' हिंदू व मुस्लिम अशा दोन्ही प्रकारचे संगीतज्ज्ञ अकबराच्या दरबारामध्ये असल्यामुळे दोन्ही शैलीचा समन्वय होऊन गझल, तराना, ठुमरती, कव्वाली आदि गायन प्रकार जन्मास आले. अकबराच्या दरबारामध्ये सूरदास, बाजबाहादूर, बाबा रामदास हे सुप्रसिद्ध गायक आपले नाव कमवून गेले. शहाजहानला ही गायनाची आवड होती. त्याच्या दरबारामध्ये रामदास व विलासखान हे त्याच्या दरबारातील श्रेष्ठ गायक होते. जगन्नाथ पंडिताने आपल्या सुंदर आवाजात काव्य म्हणून दाखविताना शहाजहान एवढा खुष झाला की त्याने स्वत:च्या वजना इतके सोने जगन्नाथ पंडिताला बक्षीस म्हणून बहाल केले. एकंदरीत गायन कलेमध्ये ही हिंदू-मुस्लिम संस्कृतीचे मिश्रण झालेले दिसून येते. सुफी संत व हिंदू संत भक्ती करताना तल्लीन होऊन नाचत असता मुस्लिम सम्राटांनी नृत्य कलेला विरोध केला. परंतु काही प्रमाणात ती विकसित झाली. या नृत्यातून हिंदू-मुस्लिम नर्तक एकत्र येऊन ती कला सादर करण्यात आली.

- **आचार-विचार व परंपरा :**

मुघल सत्ताधिशांनी राज्यकारभाराची भाषा म्हणून फारशीचा स्वीकार केला असला तरी पुढे मुघल सत्ताधिशानी फारशी आणि हिंदी या भाषांच्या मिश्रणातून तयार झालेल्या उर्दू भाषेचा स्वीकार करणे भाग पडले. पुढे मुस्लिम साहित्यिकांनी उर्दू व हिंदीतून रचना करण्यास सुरूवात केली. सम्राट अकबराच्या काळात तर मुघल दरबारात हिंदू सण साजरे करण्यास सुरूवात झाली. धर्मांतरीत मुस्लिमांनी परंपरागत जातिसंस्थेचा किंवा जातीच्या आचार विचारांचा त्याग केलेला दिसत नाही. परस्परांच्या दीर्घ सहवासाचा हा परिणाम होता. मुस्लिम समाजाच्या शासनव्यवस्थेत व दैनंदिन जीवनातही हिंदू समाजाच्या आचार विचारांचे, शासन पद्धतीचे परंपरांचे परिणाम झालेले दिसतात.

विविध हिंदू परंपरांचा स्वीकार मुस्लिम शासन व्यवस्थेत केला गेला. मुघलांनी राजपुतांच्या दरबारातील रितीरिवाज स्वीकारले. मुस्लिम सत्ताधिशांच्या महसूल पद्धतीत हा प्रभाव मोठ्या प्रमाणावर दिसून येतो. प्राचीन काळापासून भारतात सुरू असलेली महसूल व्यवस्था व परंपरेने महसूल व्यवस्थेचे काम करणारा वर्ग यांचा मुस्लिम राज्यकर्त्यांनी स्वीकार केला. महसूल आकारणीच्या दरात व पद्धतीत बदल केले असले तरी महसूल वसूल करणारे अधिकारी हिंदूच होते. शासनव्यवस्थेतील काही परंपरा व आचार विचारांवर रजपूतांच्या शासन व्यवस्थेचा प्रभाव होता.

भारतामध्ये दीर्घकाळ राजकीय सत्ता स्थापन करणाऱ्या मुस्लिम समाजावर हिंदू आचार विचार व संस्कृतीचा परिणाम झाल्याचे दिसून येतो. भारतामध्ये मुस्लिम सत्ता स्थापन झाल्यावर तुर्क, अफगाण, अरब, मंगोल, ॲबिसिनीयन, मुघल हे भारतात आले व काही दिवस ते त्याच्या भूमिकेत राहिले. परंतु जास्त दिवस ते अलिप्त राहू शकले नाहीत. काही काळातच त्यांची शासनव्यवस्था, कला, साहित्य, संगीत यावर हिंदू समाजाचा प्रभाव

पडल्याचे दिसते. हिंदूच्या वेदांतावरूनच इस्लाम धर्मातील सुफी धर्माचे तत्त्वज्ञान निर्माण झाले होते. योग, वेदांत, ज्योतिष, वैद्यकशास्त्र यांचा मुस्लिम विद्वानांनी अभ्यास केला होता. भाषेमध्येही हिंदू-मुस्लिम यांच्यामध्ये संमिश्र स्वरूप निर्माण झाले. एकमेकांच्या आचार व विचारात देवाण घेवाण झाली. खाद्य पदार्थ व वेशभूषा मुस्लिम समाजाने स्वीकारल्या. धर्मांतरीत झालेल्या भारतीय मुसलमानांनी आपल्या मूळच्या परंपरागत हिंदू चालिरिती सोडल्या नाहीत.

- **धार्मिक स्वरूप :**

दीर्घ काळ इस्लाम सत्तेचे भारतात अस्तित्व असल्यमाळे येथे मूळच्या बहुसंख्य असलेल्या हिंदू समाजाच्या जीवनावर इस्लाम आचार विचाराचा काही प्रमाणात परिणाम झाला. काही विद्वानांच्यामते मध्ययुगातील भक्ती चळवळ म्हणजे हिंदू मुस्लिम संबंधाचे संमिश्र परिणाम, स्वरूप होय. उपनिषदे व भगवद्‌गीतेमध्ये मोक्षप्राप्तीचा मार्ग म्हणून भक्तिमार्गाच्या तत्त्वज्ञानाची चिकित्सा केली होती. हिंदू धर्मातील वरिष्ठ वर्गीयानी दोन्हीही धर्म व समाजात समझोता घडवून आणण्याचे प्रयत्न केले. हिंदू व मुस्लिम धर्म म्हणजे एकाच ईश्वराकडे जाणारे दोन मार्ग आहेत. ईश्वर, अल्ला, राम, रहीम ही एकाच ईश्वराची नावे आहेत. असा उपदेश गुरुनानक, संत कबीर या संतांनी केला. मुस्लिम समाजाच्या जे त्याच्या जाणिवेच्या वागण्यामुळे या शिकवणुकीचे परिणाम झाले व शिकवणुकीमुळे धार्मिक कर्मकांड व पोरोहिताची मध्यस्थी यांना विरोध करून भक्तीचा योग्य मार्ग यावर संतांनी भर दिला असला तरी याचे परिणाम झालेले दिसत नाहीत. या उलट मुस्लिम समाजाच्या धर्मांतराच्या प्रयत्नामुळे व ताठर भूमिकेमुळे हिंदू मधील कर्मठपणात वाढ झाली. त्यामुळे समाजातील आचार विचार व रोटी बेटी व्यवहार कडक बनले. हिंदू समाजसुधारक व विचारवंतांवर इस्लाम धर्मातील समानतेच्या तत्त्वाचा प्रभाव पडला. यातून संतांनी हिंदू समाजातील सर्व जाती समान असून सर्वांना मोक्ष साधना करण्याचा अधिकार आहे असा विचार मांडण्यास सुरूवात केली.

भक्ती चळवळीच्या पंथामध्ये दोन भाग दिसून येतात. पहिला पंथ पारंपरिक पद्धतीने पुढे जाणारा होता. तर दुसरा पंथ हिंदू व मुस्लिम यांना एकतेच्या आधारे एकत्र आणण्याचा प्रयत्न करणारा होता. भक्ती चळवळीतील दुसऱ्या पंथाचे मुख्य सुत्रधार संत कबीर व गुरुनानक हे होते. त्यांनी हिंदू व मुस्लिम हे दोन्ही धर्म एकत्र आणण्याचा प्रयत्न केला. आणि त्यातून या दोन्ही धर्मांचा परस्परांशी संबंध आला. या संतांनी आपल्या उपदेशात अल्ला रहीम असे शब्द वापरले आहेत. अशा प्रकारे दोन्ही धर्मात अनेक वैशिष्ट्ये समान आहेत.

जेव्हा गुरुनानक काबूल मध्ये गेले होते तेव्हा त्यांची बाबराशी भेट झाली. काबूलमध्ये गुरुनानकांचा बाबराने आदर सत्कार केला. या भेटीमध्ये भगवंताची भक्ती ही सर्वात चांगली असल्याचे गुरुनानकांनी सांगितले. गुरुनानकाने स्थापन केलेल्या 'शिख धर्म' हिंदू व मुस्लिम या धर्मातल्या आदर्श तत्वाचा बनलेला आहे. हिंदू, मुस्लिम या दोन्ही धर्माला साजेसा गुरुनानकाचा पोषाख आहे. कपाळावर हिंदूचा केसरी टिळा, गळ्यात मण्याची माळ, डोक्यावर मुस्लिम संन्यासासारखी टोपी, अंगात लाल व नारंगी रंगाचे जाकीट व अंगाभोवती लपेटलेली सफेद चादर हे सर्व हिंदू मुस्लिम धर्माचे संमिश्र स्वरूप दिसते. एवढेच नव्हे तर त्यांच्या प्रार्थनेतून व भजनातून हिंदू मुस्लिम तेढ कमी व्हायला मदत झाली.

● **सांस्कृतिक देवाण घेवाण :**

अरबी आणि फारशी भाषा शिकण्याचा प्रयत्न हिंदू समाजातील फारच थोड्या लोकांनी केला. त्यामुळे आणि प्रादेशिक साहित्यावर अरबी आणि फारशीचा परिणाम झाला नाही. स्वतंत्र अशा काही प्रादेशिक सत्तांनी इस्लाम शासनव्यवस्थेत काही अधिकारपदे व विविध परंपरा स्विकारल्या असल्या तरीही त्याचे हिंदू समाजावर दीर्घ असे परिणाम दिसत नाहीत. इस्लाम सत्ताधिशांच्या सहवासात हिंदू समाजातील उच्च व मध्यमवर्गीय दीर्घ काळ राहिले असले तरीही त्यांच्या आचार विचारात काही मिळते जुळते दिसून येत असले तरीही यातून हिंदू समाजावर दीर्घ परिणाम दिसत नाहीत. मुस्लिम धार्मिक दृष्ट्या कठोर व सामाजिक दृष्ट्या उदार राहिले तर हिंदू धार्मिकदृष्ट्या उदार व सामाजिकदृष्ट्या कठोर राहिले. त्यामुळे त्यांच्यामध्ये सांस्कृतिक देवाण घेवाणीस अडथळे निर्माण झाले. तरीही या दोन समाजाचा सहवास दीर्घ असल्यामुळे त्यांच्यामध्ये सांस्कृतिक देवाण-घेवाण झाली असे दिसून येते.

अकबराच्या कालखंडामध्ये हिंदू-मुस्लिम संस्कृतीचे स्वरूप संमिश्र असे झाले. अकबराने हिंदू राजकन्यांशी विवाह केले. हिंदूंना राज्यकारभाराची महत्त्वाची पदे दिली. मुघल दरबारामध्ये हिंदू सन साजरे करण्यास सुरूवात झाली. अकबराच्या काळामध्ये हिंदू-मुस्लिम संस्कृतीत देवाण-घेवाण झाल्याचे दिसते. जहाँगिरनेही याच धोरणाचा पुरस्कार केला. मात्र औरंगजेबाने हे धोरण दूर सारले. तरीही ते पुढे चालू राहिले.

● **चित्रकला :**

चित्रकलेमध्ये सुद्धा हिंदू व मुस्लिम संस्कृतीचे मिश्रण जाणवते. इंडो-पर्शियन चित्रकलेची सुरूवात झाल्याचे दिसते. ही इंडो-पर्शियन चित्रकलेच्या शाळेची सुरूवात अकबर खाजा अब्दुल समाद यांनी केली. या शाळेतून अनेक चित्रकार उदयास आले. त्यामध्ये हिंदू चित्रकार मोठ्या प्रमाणात समाविष्ट होते. त्यामध्ये केशव, मुकुंद, मधु, महेश, तारा, हरबकश व राम यांचा उल्लेख करावा लागेल. भारतीय चित्रकारांच्या शैली मुघलांच्या शैली सारख्या होत्या. रजपूत स्कूलचे प्रतिनिधित्व इंपरियल कोर्ट मध्ये करण्यात आले. रामायण, महाभारत आदि भारतीय ग्रंथामध्ये जी चित्रे रेखाटली होती. त्यांचेही अनुकरण झाल्याचे दिसून येते. राज्यकारभारातील राजांचे तसेच दरबार देखावे आणि शिकार देखावे या वरती मुघल शैलीचा परिणाम झाल्याचा दिसून येतो. त्याचे तंत्रज्ञान व रंग यांचाही परिणाम झाला. यातून हिंदू-मुस्लिम चित्रशैलीच्या मिश्रणातून कागडा शैली अस्तित्वात आली.

● **पोशाख व खाद्य :**

हिंदू मुस्लिम यांची कपडे परिधान करण्याची पद्धत कमी जास्त प्रमाणात सारखीच होती. मुस्लिम आपल्या कोटाची दोरी उजव्या बाजूला बांधत तर हिंदू आपल्या कोटाची दोरी डाव्या बाजूला बांधत. कोट, शर्ट, स्लीवज, ट्रॉजर, कबा हे हिंदू व मुस्लिम यांचे समान पोशाख होते. घागरा व सलवार हे पोशाख हिंदू व मुस्लिम स्त्रीया परिधान करीत असत. हे जसे पोशाखामध्ये मिश्र स्वरूप निर्माण झाले तसेच ते खाद्यामध्ये ही झाले. खाद्य संस्कृतीत ही हिंदू-मुस्लिम यांच्यामध्ये देवाण घेवाण झाली आहे. हिंदूनी मुस्लिमांचे खाद्य स्वीकारले तसेच मुस्लिमांनी हिंदूचे खाद्य स्वीकारले. ही खाद्य संस्कृतीतील अदलाबदल हिंदू मुस्लिम यांची सवय बनली.

मुस्लिमांच्या सामाजिक चाली-रिती संस्कारावर हिंदूचा परिणाम झाला आहे. जसे की बाळ जन्मल्यानंतर प्रथम त्याच्या तोंडामध्ये मध घातला जात असे व कानात प्रार्थना म्हटली जाते. हे हिंदू मुस्लिम संस्काराचे मिश्र स्वरूप आहे. हिंदूच्या उपनयन संस्कारा सारखा मुस्लिमांमध्ये बिसमिल्ला किंवा मकतब हा कार्यक्रम केला जातो. हिंदूमध्ये विवाह प्रसंगी मेहंदी लावली जाते, हळद लावली जाते तसेच मुस्लिमांमध्ये हे केले जाते. त्यास हाफओनू म्हणतात त्याच पद्धतीला हिंदू मध्ये सोळा श्रृंगार म्हणतात.

- **विज्ञान :**

प्राचीन काळामध्ये हिंदूनी मोठ्या प्रमाणात विज्ञानात प्रगती केली होती. हिंदूची खगोलशास्त्र, गणित, विज्ञान व कलाकुसर या क्षेत्रामध्ये मोठी प्रगती होती. हे विज्ञान भारतीयकडून अरब शिकले. त्यांनी ग्रीकाकडूनही हे ज्ञान आत्मसात केले. भारतात येण्याअगोदरच मुस्लिम समाजाने विमानाच्या वेगवेगळ्या पद्धती विकसित केल्या होत्या. त्यापासून काही वैज्ञनिक गोष्टी हिंदूंनी आत्मसात केल्या. खगोलशास्त्रामध्ये हिंदू व मुस्लिम यांच्यामध्ये देवाण-घेवाण झाली. त्यांच्यातील कॅलेंडर ज्याला झिक म्हटले जायचे ते अल मजीस्ती हे संस्कृतमध्ये रुपांतरीत करण्यात आले. जसे यासाठी टेबल, उलुग बेग, नासिरउद्दीन, तुसी व इतरांचे सहकार्य घेण्यात आले. जे मुसलमानी मेटॅलिक असिड चे ज्ञान अवगत केले होते व आपल्या सोबत भारतात आणले होते. ते ज्ञान हिंदूनी वैज्ञानिक क्षेत्रात वापरण्यास सुरूवात केली. बंदूकीची दारू व पेपर तयार करण्याची कला व तंत्रज्ञान आदि सर्व देणग्या भारतीयांना मुस्लिमांनी दिल्याचे दिसते. अशा प्रकारे वैज्ञानिक क्षेत्रामध्ये हिंदू व मुस्लिम यांच्यामध्ये देवाण-घेवाण झाली.

- **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न :**

**अ) योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागा भरा.**

१) अकबराने बांधलेली फत्तेपूरसिक्री येथील मशिद भारतीय शैलीची आहे असे मत ............ इतिहास काराने मांडले आहे.

अ) डॉ. ईश्वरी प्रसाद ब) डॉ. ताराचंद

क) डॉ. न. र. फाटक ड) डॉ. एस. एन. एन. सेन

२) शहाजहानच्या दरबारामध्ये ............ हा प्रसिद्ध गायक होता.

अ) गोपीचंद ब) कुलदिप क) जगन्नाथ पंडित ड) अली खान

३) औरंगजेबाच्या कालखंडामध्ये ............ हा या काळातील प्रसिद्ध कवी होता.

अ) सुरदास ब) मिर्झा अब्दुल कादिर क) रामदास ड) शेर अली

४) ............ यानी रामायणाचे फारसी भाषेत भाषांतर केले.

अ) अबुल फजल ब) अबुल फैजी क) रामकृण ड) बदायुनी

५) ............ भाषेचा उदय हिंदू-मुस्लिम संस्कृतीतून झाला.

अ) अरबी ब) उर्दु क) फारशी ड) तेलगू

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) अकबराच्या कारकिर्दीमध्ये किती हस्तलिखित ग्रंथाचा संग्रह करण्यात आला होता?

२) कोणत्या शीख धर्मगुरुची मुघल सत्ताधीश बाबराबरोबर भेट झाली होती?

३) कोणत्या मुघल सम्राटाच्या काळात मुघल दरबारात हिंदू सण साजरे करण्यास सुरूवात झाली?

४) मुघल काळातील राज्यकारभाराची भाषा कोणती होती?

५) हिंदु-मुस्लिम चित्रशैलीच्या मिश्रणातून कोणती शैली अस्तित्वात आली?

- **पारिभाषिक शब्द :**

दस्तुर - लहान विभाग

मनसब - हुद्दा किंवा दर्जा-स्थान

नवरत्ने - नऊ विद्वान

वाकनीस - हा दप्तरखात्याचा प्रमुख

काझी - हा न्यायखात्याचा प्रमुख

खुष्कीचा मार्ग - जमिनीवरील मार्ग

## ३.३ सारांश :

भारताच्या इतिहासातील सम्राट अकबर हा मुघल शासनप्रणालीचा शिल्पकार होय. हिंदूस्थानात एक उत्तम शासनव्यवस्था निर्माण करणारा पहिला मुघल शासक म्हणून त्यांचे नाव घेतले जाते. अकबराने हिंदू-मुस्लिम यांना समानतेने वागविले. त्याने सत्तेचा कधीही गैर उपयोग केला नाही. सम्राट अकबराने सुरू केलेली राज्यव्यवस्था म्हणजे त्याचा श्रेष्ठ बुद्धीमत्तेचे प्रतिक होते. श्रेष्ठ प्रशासन हा राज्याचा आत्मा असतो. तरच प्रशासन व्यवस्था मजबुत होऊ शकते. सम्राट अकबराने निर्माण केलेली राज्य पद्धती पुढे थोड्याफार फरकाने मुघल सत्ताधिशांनी अनेक वर्षे चालू ठेवली. मध्ययुगीन कालखंडामध्ये अंतर्गत व परराष्ट्रीय व्यापार मोठ्या प्रमाणात विकसित झाला होता. मुघल कालखंडामध्ये अंतर्गत व्यापाराला महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले होते. अंतर्गत व्यापार हा प्रामुख्याने नद्यामधून चालत असे. नद्यातून चालणारा व्यापार हा अधिक सोयीस्कर व स्वस्थ व सामान्यांना परवडणारा होता. किनाऱ्याच्या प्रदेशातून केला जाणारा व्यापार व देशांतर्गत व्यापार या दोन प्रकारातून व्यापार चालत असला तरीही खुष्कीच्या मार्गाने चालणारा व्यापार ही महत्त्वाचा होता. हिंदू व मुस्लिम यांच्यामध्ये सांस्कृतिक व सामाजिक संमिश्रण झालेले दिसते. मध्ययुगीन भारताच्या इतिहासात मुघल काळामध्ये संस्कृतीत झालेली अदलाबदल भारतीय इतिहासाचे वेगळेपण आहे. हिंदू-मुस्लिम यांच्यामध्ये संस्कृतीचा झालेला संमिश्र विकास महत्त्वाचा आहे. कला, स्थापत्य, वास्तूकला, चित्रकला, गायन, वादन, संगीत, पोशाख, अन्न यामध्ये झालेला आदलाबदल कमी जास्त प्रमाणात विकसित झाला आहे.

## ३.४ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न :

१) सम्राट अकबराच्या लष्करी व्यवस्थेची माहिती द्या.

२) मनसबदारी पद्धतीचे गुण-दोष सांगा.

३) मुघलकालीन अंतर्गत व्यापाराची माहिती द्या.

४) मुघलकालीन परराष्ट्रीय व्यापाराची माहिती द्या.

५) मुघलकालीन संमिश्र संस्कृतीचे स्वरूप स्पष्ट करा.

## ३.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे :

**स्वयं अध्ययन प्रश्न क्र. १ ची उत्तरे**

**अ)** १) अबूल फजल, २) वाकनीस, ३) अरबी ४) तोडरमल ५) मिर्झा गाली

**ब)** १) आठरा, २) काझी, ३) इ.स. १५७१, ४) महाल, ५) अमीर

**स्वयं अध्ययन प्रश्न क्र. २ ची उत्तरे**

**अ)** १) तीन, २) मुलतान, ३) सिकंदर लोदी, ४) इ.स. १६३८, ५) बऱ्हाणपूर.

**ब)** १) जहाँगिर, २) साबरमती, ३) अल बरूनी, ४) पोर्तुगिज, ५) इ.स. १६६४

**स्वयं अध्ययन प्रश्न क्र. ३ ची उत्तरे**

**अ)** १) डॉ. ईश्वरी प्रसाद, २) जगन्नाथ पंडित, ३) मिर्झा अब्दुल कादिर, ४) बदायुनी, ५) उर्दू

**ब)** १) २४०००, २) गुरु नानक, ३) सम्राट अकबर, ४) फारसी, ५) कागडा

## ३.६ अधिक वाचनासाठी पुस्तके :


१) गोळे रा. मा. (अनु.) सम्राट अकबर

२) चिटणीस कृ. ना - मध्ययुगीन भारतीय संकल्पना व संस्था

३) मूरलँड - अकबरकालीन हिंदूस्थान (अनु.)

४) सरदेसाई गो. स. - मुसलमान रियासत.

५) Satish Chandra - Medieval India.

६) R. D. Tripathi-Somn Aspects of Muslim Administration.

७) Dr. R. C. Mujumdar - Medieval India.


❖ ❖ ❖

## घटक – ४

# विजयनगर

**अनुक्रमणिका :**

४.० उद्दिष्टे

४.१ प्रास्ताविक

४.२ विषय विवेचन

४.२.१ स्वरूप

४.२.२ व्यापार आणि मंदिर अर्थव्यवस्था

४.२.३ कला आणि स्थापत्य

४.३ सारांश

४.४ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

४.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

४.६ सरावासाठी स्वाध्याय

४.७ अधिक वाचनासाठी संदर्भ

## ४.० उद्दिष्टे :

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला खालील माहिती विषद करता येईल.

- विजयनगर राज्याचे स्वरूप समजून घेता येईल.
- विजयनगरकालीन व्यापाराची माहिती सांगता येईल.
- विजयनगर राज्यातील मंदिरांची अर्थव्यवस्था जाणून घेता येईल.
- विजयनगर साम्राज्याची कला समजून घेता येईल.
- विजयनगर राज्यातील स्थापत्यकलेचे महत्त्व समजून घेता येईल.

## ४:१ प्रास्ताविक :

दक्षिण भारताच्या इतिहासामध्ये विजयनगरचे साम्राज्य वैभवशाली व विस्तारित साम्राज्य म्हणून ओळखले

जाते. हरिहर व बुक्क या बंधुनी इ. सन १३३६ मध्ये विजयनगर सम्राज्याची स्थापना केली. विजयनगरच्या साम्राज्यामध्ये चार घराण्यांनी राज्यकारभार केला. १) संगम वंश १३३६ ते १४८६, २) शालुव १४८६ ते १५०५, ३) तुलुव वंश १५०५ ते १५७०, ४) अरविंद वश १५७० ते १६१४ या वंशांनी मिळून विजयनगरवर जवळ जवळ पावणे तीनशे वर्षे राज्य केले. यामध्ये संगम वंशातील १२ राजांनी, शालुव वंशातील २ राजांनी, तुलुव वंशातील ५ राजांनी व अरविंद वंशातील ७ राजांनी राज्यकारभाार सांभाळला. हरिहर व बुक्क या बंधूंनी तुंगभद्रा नदीच्या दक्षिण तीरावर हे स्वतंत्र राज्य स्थापन केले. कृष्णदेवरायने साम्राज्य अति उच्च शिखरावर पोहचले होते. विजयनगरच्या दृष्टीने कृष्णदेवरायाची कारकिर्द वैभवशाली व भरभराटीची ठरली.

## ४.२ विषय विवेचन :

### ४.२.१ विजयनगर राज्याचे स्वरूप :

- **प्रस्तावना :**

हरिहर व बुक्क या बंधुंनी तुंगभद्रा नदीच्या दक्षिण तीरावर हे स्वतंत्र राज्य स्थापन केले. विजयनगर शहराने जगभरामध्ये आपला नाव लौकिक केला. मुस्लिम स्वाऱ्यामुळे दक्षिणमध्ये अशांतता निर्माण झाली होती. याचाच फायदा घेऊन विजयनगर हे एक स्वतंत्र राज्य अस्तित्वात आले. विजयनगर साम्राज्यामध्ये चार घराण्यांनी राज्यकारभार केला. तो पुढीलप्रमाणे पाहता येईल. त्यामध्ये संगम, शालुव, तुलुव व अरविंद या घराण्यांनी विजयनगर साम्राज्यावर आपली सत्ता निर्माण केली. अशा विजयनगर राज्याचे स्वरूप पुढीलप्रमाणे सांगता येईल.

**१) संगम घराणे – हरिहर (१९३६–१३५३) :**

हरिहर व बुक्क यांनी विजयनगर शहराची स्थापना केल्यानंतर हरिहर हा विजयनगरचा पहिला राजा बनला. त्यांने तुंगभद्रा नदीच्या खोऱ्यातील फार मोठा प्रदेश जिंकून घेतला. उत्तरेकडे कृष्णा नदीपासून ते दक्षिणेकडे कावेरी नदीपर्यंत त्याच्या ताब्यात होता. हरिहर जसा योद्धा होता तसाच तो उत्तम प्रशासकही होता. प्रशासनाच्या सोयीसाठी त्याने अनेक प्रांतामध्ये राज्यांची विभागणी केली होती. प्रत्येक प्रांतावर श्रेष्ठ अधिकाऱ्यांच्या नेमणूका केल्या होत्या.

- **बुक्क पहिला (१३५३–१३७९) :**

हरिहरच्या मृत्यूनंतर बुक्क पहिला विजयनगरच्या सत्तेवर आला. त्याला बहामनी सत्तेबरोबर युद्ध करावे लागली. त्याने उत्कृष्ठ राज्यकारभारही केला. विजयनगरमध्ये अनेक बांधकामे पूर्ण केली. त्याने इ.सन १३७४ मध्ये एक शिष्टमंडळ चीनला रवाना केले होते. त्याने निधर्मी धोरणाचा पुरस्कार केला. १३७९ मध्ये त्याचा मृत्यू झाला.

- **हरिहर दुसरा (१३७९–१४०४) :**

हरिहर दुसरा याने जवळ जवळ २५ वर्षे राज्य केले. बुक्क पहिला याच्या मृत्यूनंतर तो सत्तेवर आला.

यालाही बहामनी सत्तेबरोबर युद्धे करावी लागली. आपल्या राज्यामध्ये त्याने शांतता निर्माण केली. म्हैसूर, कांची, त्रिचनापल्ली, चिंगलपुट आदि प्रदेश त्यांच्या सेनापतींनी जिंकून घेवून आपल्या साम्राज्याला जोडून टाकला. त्याने शांतताप्रिय राज्यकारभार केला. तो निधर्मी होता. सन १४९४ मध्ये तो मरण पावला.

- **विरुपाक्ष पहिला (१४०४–१४०५)**

हरिहर दुसरा याच्या मृत्युनंतर विरूपाक्ष याने एक वर्ष राज्यकारभार केला.

- **बुक्क दुसरा (१४०५–१४०६)**

विरूपाक्ष नंतर बुक्क दुसरा याने अल्पकाळ राज्य केले. त्याच्यानंतर बुक्कचा भाऊ पहिला देवराय गादीवर आला. देवरायला बहमनी बरोबर युद्धे करावी लागली. त्यानंतर विरविजय गादीवरती आला त्याने ९ वर्षे राज्यकारभार केला.

- **देवराय दुसरा (१४१९–१४४६)**

विजयबुक्क याचा पुत्र देवराय दुसरा इ. सन १४१९ ला विजयनगरच्या सत्तेवर आला. यालाही बहामनी बरोबर संघर्ष करावा लागला. याने बहामनी बरोबर लढण्यासाठी सैन्याची पुनर्रचना केली. त्याने लढाऊ मुस्लिम सैनिक भरती केली. त्याने प्रथमच मुसलमानी सैनिकांना विजयनगर सैन्यात सामील करून घेतले. परंतु त्याला बहमनी बरोबर झालेल्या लढाईमध्ये पराभवाला सामोरे जावे लागले. याच्या काळामध्ये विजयनगरचे साम्राज्य वैभवाच्या शिखरावर होते. **निकोलीस कोंटी** या इटालीयन प्रवाशाने व **अब्दुल रझाक** या पर्शियन प्रवाशाने त्याच्या दरबाराला भेट दिली होती. अब्दुल रझाकने **'विजयनगर हे एक सुंदर नगर होते'**. असे वर्णन केले आहे. दुसरा देवराय हा संगम घराण्यातील शेवटचा कर्तबगार राजा होय. त्याच्यानंतर त्याचा मुलगा मल्लिकार्जुन व विरूपाक्ष सत्तेवर आले.

- **मलिकार्जुन (१४४६–१४६५) :**

दुसरा देवरायाच्या मृत्यूनंतर त्याचा पुत्र मलिकार्जुन सत्तेवर आला. त्याने विजयनगरवर चालून आलेल्या ओरिसाच्या हिंदू राजा व बहामनी सुलतान यांचा संयुक्त हल्ला परतवून लावला.

- **विरुपाक्ष दुसरा (१४६५–१४८६) :**

मलिकार्जुन नंतर त्याचा भाऊ विरूपाक्ष दुसरा गादीवर आला. परंतु तो कार्यक्षम नसल्यामुळे बहामनीने व ओरिसाच्या राजाने विजयनगरचा बराचसा प्रदेश बळकावला.

- **शाल्व घराणे (१४८६–१५०५) :**

परकीय आक्रमणापासून विजयनगरचा बचाव करण्यासाठी नरसिंह सुलवा याने विरूपाक्ष दुसरा यास बाजूला सारून विजयनगरवर शाल्व घराण्याची सत्ता निर्माण केली. या वंशातील दोन राज्यकर्त्यांनी राज्यकारभार केला.

**१) नरसिंह (१४८६–१५०५) :**

आपल्या सहा वर्षाच्या कारकिर्दीमध्ये त्याने आपला राज्यकारभार उत्तम केला. बंडखोर प्रांतावर त्याने आपले वर्चस्व निर्माण केले. सन १४९२ मध्ये तो मरण पावला.

- **इम्मादी नरसिंह (१४९२–१५०५) :**

नरसिंहाच्या मृत्यूनंतर नरसा नायक या सेनापतीने अल्पवयीन पुत्र इम्मादी नरसिंह यास गादीवर बसविले. खरी सत्ता त्याच्याच हाती होती. तो पराक्रमी असुनही त्याने सत्ता बळकावली तो शाल्व घराण्याशी एकनिष्ठ राहिला. सन १५०५ मध्ये तो मृत्यू पावला. त्याचा पुत्र वीर नरसिंह याने इम्मादी नरसिंह यास बाजुला सारून विजयनगरच्या गादीवर तुलुव वंशाची स्थापना केली.

- **तुलुव वंश (१५०५–१५७०) :**
- **वीर नरसिंह (१५०५–१५०९) :**

वीर नरसिंह हा तुलुव घराण्याचा संस्थापक होय. त्याने इम्मादी नरसिंह याला बाजुला सारून तुलुव वंशाची स्थापना केली. तो उदार व दानशूर राजा होता.

- **कृष्णदेवराय (१५०९–१५३०) :**

कृष्णदेवराय विजयनगरचा सर्वश्रेष्ठ राजा होय. कृष्णदेवरायाच्या कारकिर्दीमध्ये विजयनगरचे साम्राज्य अति उच्च शिखरावर पोहचले होते. विजयनगरच्या दृष्टीने कृष्णदेवरायची कारकिर्द वैभवशाली व भरभराटीची ठरली. कृष्णदेवराय उत्कृष्ठ शासक होता. त्याच बरोबर कलेचा भोक्ता होता. कृष्ण देवराय विजयनगरच्या राजांमध्ये सर्वश्रेष्ठ राजा होता. त्याच्या कालावधीमध्ये विजयनगर राज्याचा सर्वांगिण विकास झाला. तो उत्कृष्ठ प्रशासक व महान राजा होता.

- **पूर्वइतिहास :**

कृष्णदेवरायाचा जन्म १६ फेब्रुवारी १४७१ मध्ये झाला. तो इ.सन १५०९ मध्ये विजयनगरच्या सत्तेवर आला. कृष्णदेवरायाची कारकिर्द विजयनगरला सर्वश्रेष्ठ बनविणारी ठरली.

- **राज्यारोहण :**

वीर नरसिंह तुलव यांच्यानंतर त्याचा भाऊ कृष्णदेवराय (१५०९–१५३०) सत्तेवर आला. तो सत्तेवर आला तेव्हा त्याला चोहोबाजूनी विरोध झाला. बहामनी, ओरिसा, उम्मतूर, आदिलशाह आदि लहान मोठे राजे कृष्ण देवरायाच्या विरुद्ध उभे राहिले. प्रथमत: त्याने अंतर्गत बंडाळ्या मोडून सर्वांवर बुद्धी चातुर्याने व कुशलतेने मात केली.

- **कृष्णदेवरायाचा साम्राज्यविस्तार / स्वाऱ्या / महिमा :**

**१) बहामनी व आदिलशाह बरोबर संघर्ष :**

कृष्णदेवरायाने राज्यारोहन केल्यानंतर लगेच बहामनी बरोबर संघर्ष करून त्याचा पराभव केला.

दक्षिणेमध्ये लगेच बहामनी राज्याची स्थापना इ.स. १३४७ मध्ये झाली. विजयनगर व बहामनी यांच्यामध्ये नेहमीच संघर्ष सुरू होता. कृष्णदेवराया सत्तेवर आल्यानंतर त्यांच्याशी संघर्ष करावा लागला. गोवळाकोंड्याच्या दक्षिणेस ७० कि.मी. अंतरावर कोविलकोंडा येथे मोठे युद्ध झाले. विजयनगर सैन्यानी विजय मिळविला. बिदर व विजापूरच्या रोखाने शत्रू सैन्य पळून गेले. कृष्णदेवरायाने पळणाऱ्या सैन्याचा पराभव केला. गोवळकोंड्याचा किल्ला जिंकून घेतला. कृष्णदेवरायाच्या नेतृत्वाखाली विजयनगरला जवळ जवळ १२५ वर्षानंतर विजय मिळाला. या युद्धामध्ये विजापूरचा युसूफ आदिलशहा व बिदरचा महामूदशहा हे दोन्ही सुलतान हजर होते. महमूदशहा जखमी झाला व युसूफ आदिलशहा याच वर्षी मरण पावला. या विजयामुळे कृष्णदेवरायाची सर्वत्र वाहवा झाली. इ.स. १५०९ मध्ये कृष्णदेवरायाने मिळविलेल्या या विजयाला महत्त्वाचे स्थान आहे. या विजयामुळे कृष्णदेवरायाची सर्वत्र प्रशंसा झाली.

**२) गंगराजाचा पराभव :**

वियनगरच्या दक्षिणेस असलेल्या या उम्मतूर येथील वाडियर राजाने प्रभुत्व झुगारून देऊन स्वतंत्रपणे स्वत:चे राज्य वाढविले. देपण्णाच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा गंगराज राजा झाला. त्याने विजयनगरवर मोहिम करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे कृष्णदेवरायाने त्याच्या विरोधी मोहिम हाती घेतली. इ.स. १५१२ साली कृष्णदेवरायने उम्मतूरवर स्वारी केली. तेव्हा गंगराजा शिवसमुद्रमच्या किल्ल्यावर जाऊन बसला. कृष्णदेवरायाने सर्व सैन्याच्या तयारी निशी किल्ल्यावर हल्ला केला. तुंबळ युद्ध झाले. अनेकजण कापले काही पळाले. स्वत: गंगराजा पळून जात असताना कावेरी नदीत पडल्याने त्याचा मृत्यू झाला. कृष्णदेवरायाला मोठा विजय मिळाला.

**३) ओरिसावरील मोहिम :**

ओरिसावरील मोहिम इ.स. १५१२ ते १५१६ अशी चार वर्षे चालली. ओरिसा बरोबर झालेल्या संघर्षाची चर्चा खालीलप्रमाणे करता येईल.

**अ) उदयगिरीचा पाडाव (१५१३-१५१४) :** गजपती राजघराणे ओरिसात सत्ता चालवित होते. उदयगिरीच्या गजपती प्रतापरुद्रने विजयनगरची महत्त्वाची स्थळे ताब्यात घेतली होती. त्यामुळे विजयनगरला धोका निर्माण झाला होता. कृष्णदेवरायाने इ.स. १५१३ च्या सुरूवातीला ओरिसावरील स्वारीला प्रारंभ केला. प्रथम: दुर्गम अशा विजयदुर्गच्या किल्ल्यावर हल्ला केला. प्रतापरुद्रचा चुलता तिरूमलने शरणांगती पत्करली व तो प्रांत कृष्णदेवरायाने आपल्या ताब्यात घेतला.

**ब) कोंडाविडू व कोंडपल्ली (१५१५) :** मध्ये ओरिसाच्या विजयानंतर कृष्णदेवरायाने सर्व तयारीनिशी कोंडाविडूवर हल्ला केला. प्रथमत: किल्ल्याला वेढा दिला. किल्ल्यावरील संपूर्ण रसद तोडण्यात आली. किल्ल्यावरील अमलदार कृष्णदेवरापुढे शरण आला. कृष्णदेवरायाने प्रतापरुद्रचा पुत्र वीरभद्रला कैद केले. कोंडाविडूच्या पराभवानंतर प्रतापरूद्राने कोंडपल्ली येथे आपला तळ ठोकला. या किल्ल्याला विजयनगर सैन्यानी वेढा दिला. विजयनगरच्या सैन्याला गजपती व कुतुबखान यांनी संयुक्तपणे विरोध केला. त्यामुळे

कृष्णदेवरायाला दोघांबरोबर लढावे लागले. अगदी सर्व तयारीनिशी व आत्मविश्वासाने कृष्णदेवरायाने संयुक्त फौजावर हल्ला केला. विजयी पराक्रम करून कृष्णदेवरायाने कोंडपल्लीवर विजय मिळविला व तो किल्ला सर केला. अशा प्रकारे कोंडविडू व कौंडपल्लीवर कृष्णदेवरायाने आपल्या वर्चस्वाखाली आणले.

**क) पोटटनुरू व सिंहाद्री ठिकाणे काबीज :** कृष्णदेवराने पोटटनुरूप हल्ला करण्याच्या अगोदर साळुव तिमाच्या सैन्याला कृष्णदेवरायाचे सैन्य मिळाले. विशाखापट्टणम जवळच्या पोटटनुरू या शहराजवळ येऊन हे संयुक्त सैन्य पोहचले. हे शहर म्हणजे प्रतापरूद्राच्या राज्याची राजधानी होती. प्रतापरूद्रानेही या युद्धाची मोठी तयारी केली. त्याने आपल्या अंकीत असलेल्या महापात्राना बोलावून घेऊन लढाण्याचे आव्हान केले होते. हे महापात्र म्हणजे स्वतंत्रपणे राज्यकारभार करणारे परंतु गजपतीचे मांडलिक असत. ही वार्ता कृष्णदेवरायाना समजताच त्याने यातून मार्ग काढण्यासाठी साळुव तिम्मा यांच्या बरोबर चर्चा केली. त्याने कृष्णदेवरायाला फोडाफोडीचे राजकारण करण्याचा सल्ला दिला. सोन्या हिऱ्यांनी भरलेल्या थैल्या प्रत्येक महापात्राकडे पाठविण्यात आल्या. त्यातील एक दोन थैल्या प्रतापरूद्राच्या हाती पडाव्यात अशी व्यवस्था करण्यात आली. महापत्राकडे पाठविलेल्या एक दोन थैल्या नेमक्या प्रतापरूद्राच्या हातात पडल्या. महापात्रापैकी बरेचजण फितूर झाल्याची त्याची खात्री झाली. आता आपला टिकाव लागणारा नाही म्हणून त्याने रणांगणातून पळ काढला. राजा पळतो आहे म्हटल्यावर महापात्राही पळू लागले. शिल्लक राहिलेल्या सैन्यावर कृष्णदेवरायाच्या सैन्यानी हल्ला केला व त्यांचा पराभव केला. अशा प्रकारे कृष्णदेवरायाने पोटटनूरूवर ताबा मिळविला. कृष्णदेवराया तेथे जवळ-जवळ सहा महिने थांबला. त्यानंतर कृष्णदेवराया सिंहाद्री येथे आला व ते ठिकाण ही त्याने ताब्यात घेतले. प्रतापरूद्र पराभूत झाल्यामुळे हातबल झाला. कृष्णदेवराय व प्रतापरूद्र यांच्यामध्ये सिंहाद्री येथे तह झाला. त्यामध्ये जिंकलेल्या प्रदेशापैकी कृष्णेच्या दक्षिणेकडील सर्व प्रदेश विजयनगरच्या साम्राज्यात समाविष्ठ व्हावा व उत्तरेकडील सर्व प्रदेश प्रतापरूद्राला परत द्यावा. या बरोबरच प्रतापरूद्राने आपली कन्या जगन्मोहिनी कृष्णदेवरायाला द्यावी.

### ४) रायचूर किंवा विजापूर संघर्ष - १५२०

रायचूर हे प्रसिद्ध शहर तुंगभद्रा व कृष्णा यांच्या दुआबात होते. ते अनेक वर्षे विजयनगरच्या ताब्यात होते. परंतु गेली ४०-५० वर्षे ते मुस्लिम सत्तेच्या ताब्यात होते. कृष्णदेवरायने हे नगर जिंकून घेण्याचे ठरवून सर्व मंत्र्यांची बैठक भरविली. रायचूर मोहिमेच्या तयारीला सुरूवात केली. आपला खास अधिकारी सिद्दी यास मोठी रक्कम देऊन घोडे विकत आणण्यासाठी गोव्याला पोर्तुगिजांकडे पाठविले. परंतु तो गोव्याला घोडी आणण्यासाठी न जाता विजापूरला रवाना झाला. इस्माईल आदिलशहाला त्याने हे सांगताच त्याने त्याच्याकडील मोठी रक्कम काढून घेतली व त्याबदल्यात त्याला दाभोळची सुभेदारी दिली. कृष्णदेवरायाने सिद्दीला आमच्या ताब्यात द्यावे असे सांगितले. मात्र ईस्माईलने त्याकडे दुर्लक्ष केले. यातूनच कृष्णदेवरायाने ईस्माईल व सिद्दी यांच्या विरोधात मोहिम हाती घेतली. लष्कराची प्रचंड तयारी करून कृष्णदेवरायाने या मोहिमेसाठी ७ लाख पायदळ, २५ हजार घोडदळ, सहाशे हत्ती अशा बलाढ्य फौजेनीशी रायचूरच्या आसपास छावण्या टाकल्या. कृष्णा नदीच्या उत्तरेला इस्माईल सैन्य होते. त्याने नदी ओलांडून राजाच्या सैन्यावर हल्ला करण्याचा धाडसी

निर्णय सैन्याचा विरोध असतानाही घेतला. कृष्णदेवराया स्वत: युद्ध मोहिमेवर युद्धाचे नेतृत्व करीत होता. विजयनगरच्या सैन्यानी रायचूर किल्ल्याला वेढा टाकला. विजयनगरच्या सैन्यामध्ये असणाऱ्या पोर्तुगिज सैन्याने महत्त्वपूर्ण कामगिरी करून रायचूर या किल्ल्यावरील तटाच्या वेशीच्या संरक्षणकांना तोफेच्या साह्याने ठार केले. त्यामुळे विजयनगर सैन्याला रायचूर जिंकणे शक्य झाले. इ.स. १५२० मध्ये कृष्णदेवरायाने रायचूर पूर्ण जिंकून घेतले. रायचूर बरोबरच कृष्णदेवरायाने सागर, सोलापूर, गुलबर्ग, विजापूर या युद्ध मोहिमावर आदिलशहाचा पराभव केला. या विजयानंतर कृष्णदेवरायाने या शहरामध्ये शांतता व सुव्यवस्था निर्माण करून शहराचा कारभार सुरळीत चालू केला.

**५) सागर, केंभावी व गुलबर्गा ताब्यात :**

विजापूर व विजयनगर या सैन्याचा इ.स. १५२१ ते १५२४ या काळात संघर्ष होतच राहिला. त्यातूनच रायचूरच्या नैऋत्येस असणाऱ्या सागर व केंभावी या ठिकाणी मोठे युद्ध झाले. आदिलशाही सैन्याचा विजयनगरच्या सैन्यानी पराभव केला. स्वत: कष्णदेवराया या मोहिमेमध्ये जातीने हजर होता. या विजयानंतर विजयनगरचे सैन्य गुलबर्गा-बिदर कडे पळाले. मोठा संघर्ष होऊन गुलबर्गा-बिदर ही शहरे कृष्णदेवरायाने आपल्या ताब्यात घेतली. अल्लाउद्दीन यास बहामनी सुलतान म्हणून जाहीर केले. त्याला तक्तावर बसविण्यात यशस्वी झाल्यामुळे कृष्णदेवरायाने स्वत:स 'यवनराज्यस्थोनाचार्य' ही पदवी धारण केली. पुढे १५२८ ते १५२९ दरम्यान कुतुबशहा व आदिलशहा यांच्यावर हल्ला करून कृष्णदेवरायाने आपला दबदबा कायम राखत त्यांना सळो की पळो करून सोडले. पुन्हा त्यांनी कृष्णदेवरायाच्या हयातीमध्ये कधीही डोके वर काढले नाही.

- **पौर्तुगिजांशी मैत्री :**

कृष्णदेवरायाच्या कारकिर्दीतील महत्त्वाचे वैशिष्ट म्हणजे त्याने पोर्तुगिजांबरोबर जोडलेले सलोख्याचे संबंध. पोर्तुगिजाकडूनत्यांने उत्तम घोडे व इतर युद्धोपयोगी वस्तू मिळविल्या. पोर्तुगिजांनी भातकल येथे किल्ला बांधण्यासाठी कृष्णदेवरायाची परवानगी मिळविली. दोघांनी ही एकमेकाबरोबर मैत्री संपादन करून चांगले संबंध निर्माण केले.

कृष्णदेवरायाने आपले साम्राज्य हिंदी महासागरातील काही बेटावर उत्तरेकडे रायचूर-दुआब व कृष्णा नदीपासून दक्षिणेकडे हिंदी महासागरापर्यंत आणि पूर्वेकडे विशाखापट्टमपासून पश्चिमेकडे दक्षिण कोकण पर्यंत वाढविले.

- **कृष्णदेवरायाची योग्यता :**

**१) प्रभावी व्यक्तिमत्त्व :**

कृष्णदेवरायाचे व्यक्तिमत्त्व रूबाबदार, भारदस्त व आकर्षक असे होते. इतरावर त्याच्या व्यक्तिमत्त्वाची छाप पडत असे. म्हणून पेज या पोर्तुगिज प्रवाशाने लिहिले आहे. 'हा राजा मध्यम उंचीचा गौरकाय रेखीव आणि धट्टाकट्टा होता. त्याच्या चेहऱ्यावर देवीचे व्रण होते. परंतु तो आकर्षक वाटे तो आंनदी व उत्साही स्वभावाचा होता. परदेशी प्रवाशांचा मान सन्मान करणारा तो एक सामर्थ्यशाली थोर सम्राट होता. तो नियमित

व्यायाम करून आपले शरीर सुदृढ व कार्यक्षम ठेवीत असे. पराक्रमी व शक्तिशाली राजा म्हणून देवरायाचे वर्णन करावे लागेल.

**२) महान विजेता व शक्तिशाली राजा :**

प्रत्येक युद्धामध्ये कृष्णदेवराय विजयी झाला होता. विजापूर ओरिसावरील विजय यातून त्याची वीरता दिसून येते. कृष्णदेवरायाचे वर्णन एक बलाढ्य व शक्तिशाली राजा म्हणून करता येईल. मुस्लिम सत्ताधिशाकडून नेहमी पराभूत होणारी सैना कृष्णदेवरायाच्या कारकिर्दीमध्ये विजयी सेना झाली. बहामनी, गजपती, उम्मतूर, ओरिसा वरील आक्रमणे त्याच्या पराक्रमाची व शौर्याची साक्ष देतात. जिद्द-आत्मविश्वासातून तो नेहमी विजयी ठरला.

**३) सुसंस्कृत विद्वान व विद्वानांचा आश्रयदाता :**

कृष्णदेवरायाने 'अमूक्त्यमल्यदा' हे दीर्घ काव्य लिहिले. ते तेलगू भाषेत आहे. त्यामध्ये राजनीती व राज्यकारभाराची माहिती मिळते. तो उत्तम वक्ता होता. त्याच्या दरबारामध्ये प्रसिद्ध आठ कवी होते. त्यांना 'अष्ट दिग्गज' असे म्हणत. तेलगू व संस्कृतला त्यांनी उत्तेजन दिले. परदेशी विद्वानांचा त्यांनी आदर-सत्कार केला.

**४) विस्तीर्ण व वैभवशाली साम्राज्याचा निर्माता :**

कृष्णेच्या दक्षिणेकडील सर्व दक्षिण भारत त्याच्या ताब्यात होता. बिदर-गुलबर्गा या मुस्लिम सत्ताधिशांच्या राजधान्या जिंकणारा तो एकमेव विजयनगरचा राजा होता. बंकापूर, भटकल, गिरसप्पा, आदि राजे त्याचे मांडलिक होते. त्याने अनेक लढाया करून बलाढ्य साम्राज्य निर्माण केले. विजयनगरचे वैभव पाहून परकीयांचे डोळे दिपून जात असत.

**५) सहिष्णु, क्षमाशील दिलदार राजा :**

कृष्णदेवरायाने आपल्या प्रजेला धार्मिक स्वातंत्र्य दिले. तो जरी स्वत: वैष्णव पंथाचा असला तरी त्याने सर्व धार्मियाना न्यायाने वागविले. ओरिसातील शत्रूंना कैद केल्यानंतर त्याच्याशी क्रूर न वागता त्यांना क्षमा करून सन्मानाने वागविले. त्याने शत्रूच्या निरपराध सैन्याची कधीही कत्तल केली नाही.

**६) उत्तम प्रशासक :**

तो फक्त विजेताच होता असे नव्हे तर उत्तम प्रशासक होता. सामान्य रयतेचे व शेतकऱ्यांचे कष्टकऱ्यांचे कल्याण हे त्याच्या राज्यकारभाराचे मुख्य ध्येय होते. सामान्य रयतेवर जुलूम-अन्याय होणार नाही. याकडे लक्ष दिले व अधिकाऱ्यांना आदेश दिले. गुंड, चोर व लुटारू यांना कडक शिक्षा दिल्या. त्यामुळे अंतर्गत शांतता व सुव्यवस्था निर्माण झाली. सर्व जाती धर्मातील व परकीय देशातील जनतेला त्याच्या राज्यामध्ये फिरता येत होते. त्यांने आपल्या साम्राज्यामध्ये धरणे व जलाशय बांधून शेतीला मोठ्या प्रमाणात पाणी उपलब्ध करून दिले. तांदूळ, ऊस, विविध फळे यांची मोठ्या प्रमाणात निर्मिती केली.

पाटबंधारे, कालवे, तलाव या कामांकडे विशेष लक्ष दिले. जंगल व्याप्त जमीन कमी करून ती लागवडी खाली आणली. तुंगभद्रा नदीला धरण बांधून त्यातील पाण्याचा वापर पिण्यासाठी व शेतीसाठी केला. नागलपूर शहर ठरविल्यानंतर त्या शहराला पाणी पुरवठा होण्यासाठी त्याने एक मोठा जलाशय बांधला.

**६) स्थापत्य प्रेमी :**

कृष्णदेवरायाने मंदिरे, कालवे, जलाशय, नवीन नगरे यातून मोठ्या प्रमाणात स्थापत्यशैलीत प्रगती केली. विजयनगर राजधानी जवळ मातोश्री नागलादेवी हिच्या स्मृतिप्रित्यर्थ नागलपूर शहराची निर्मिती केली. त्याने विजयनगर येथे कृष्णस्वामी मंदिर व रामस्वामी मंदिर बांधले. विविध गोपुरे, मंदिरे स्थापत्यकलेतील बांधकामाची साक्ष पटवितात. त्याने इ.स. १५२८ मध्ये विष्णूचा नरसिंह आवतार दर्शविणारा भव्य दगडी पुतळा बसविला. विजयनगरमध्ये अनेक बांधकामे करून शहर स्थापत्यकलेच्या दृष्टीने सुंदर बनविले.

**७) साहित्यिक व कला प्रेमी :**

कृष्णदेवरायाच्या कारकिर्दीमध्ये साहित्य, नृत्य, नाट्य व संगीत आदि क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात प्रगती झाली. ते स्वत: विद्वान असल्यामुळे त्याने अनेक विद्वान व कलाकारांना राजधाश्रय दिला. इ.स. १५११ मध्ये कृष्णदेवरायाने स्वत: तेलगू भाषेमध्ये 'अमूक्त्यमल्यदा' हे दीर्घ काव्य लिहिले. ते 'लृविषुचित्तीमयु' या नावानेही ओळखले जाते. तेलगू साहित्यातील प्रसिद्ध आठ कवी त्याच्या दरबारात होते. त्यांना 'अष्टदिग्ज' म्हणून ओळखले जाते. कृष्णदेवरायाचे 'जांबुवंतीकल्याणम' हे नाटक उपलब्ध आहे. कृष्णदेवरायाच्या राजघराण्यातील स्त्रियाही संस्कृतमधून कविता व नाटके लिहिण्यात रस घेत असत. कृष्णदेवराय स्वत: कन्नड भाषिक असूनही तेलगू व संस्कृत भाषेवर त्याचे प्रभुत्व होते. तेलगू भाषिकात आजही कृष्णदेवरायाला मानाचे स्थान आहे.

- **कृष्णदेवरायाचा मृत्यू :**

कृष्णदेवरायाने हिंदूस्थानाच्या इतिहासामध्ये एका बलाढ्य साम्राज्याची निर्मिती केली. बलाढ्य शत्रूवर मात करून विस्तीर्ण साम्राज्याची स्थापना केली. त्याने तिरूमल नामक अज्ञान मुलास गादीवर बसविले. चाळीस वर्षे राज्यकारभार केल्यानंतर तो आजारी पडला. दरबारामध्ये अंतर्गत कलहाला सुरूवात झाली. यातच विजापूरचा आदिलशहा विजयनगरवर चालून आला. त्याला तोंड देण्याच्या तयारीत असताना व मोहिमेची तयारी करत असताना इ.स. १५३० मध्ये कृष्णदेवरायाचा मृत्यू झाला.

डॉ. ईश्वरीप्रसाद, डॉ. आर. सी. मुजूमदार, डॉ. श्रीवास्तव या इतिहासकारांनी 'कृष्णदेवराय हा विजयनगरचा सर्वश्रेष्ठ सम्राट असून भारताच्या इतिहासातील थोर सम्राटांपैकी एक होय. असे गौरव उद्गार काढले. एकंदरीत कृष्णदेवरायाची कारकीर्द मध्ययुगीन कालखंडातील दक्षिण भारताच्या इतिहासातील सोनेरी पान आहे.

विजयनगर साम्राज्याच्या इतिहासात कृष्णदेवरायाचे स्थान अद्वितीय आहे. कृष्णदेवरायाचे व्यक्तिमत्व रूबाबदार होते. लष्कराला, सैन्याला, दरबाराला प्रशासनाला, शत्रूला, रयतेला त्याचा धाक वाटे. आपल्याला

आयुष्यभर युद्धे करावी लागणार याची त्याला जाणीव होती. तो नित्याने दररोज व्यायाम करत असल्यामुळे तो उत्तम मल्ल व अश्वारोहनात तरबेज होता. शत्रूबरोबर लढण्यासाठी जास्तीत जास्त मोहिमांवर व स्वाऱ्यांवर आपणच जायचे व नेतृत्व करावयाचे याबद्दल तो आग्रही असे. राज्य ही आपली कर्मभूमी आहे आणि राज्यशासन व्यवस्थित चालविणे व प्रजेला सुखी व समाधानी ठेवणे हे आपले आद्य कर्तव्य आहे. अशी त्याची विचार धारा होती. आपल्या वीस वर्षाच्या कारकिर्दीमध्ये अनेक युद्ध मोहिमा, स्वाऱ्या, मंदिरे, गोपुरे, धरणे, कालवे व नागलापूर शहराची उभारणी ही त्यांच्या कर्तृत्वाची साक्ष पटवितात.

- **अच्युतराय (१५३०-१५४२) :**

कृष्णदेवरायाच्या मृत्यूनंतर त्याचा सावत्र बंधू अच्युतराय विजयनगरच्या गादीवर विराजमान झाला. अच्युतराय भित्रा व कमकुवत होता. १५ ऑगस्ट १५३० रोजी सत्तेवर आल्यानंतर त्याने मदुरेच्या बंडखोर अमलदाराला शासन केले. त्याने विजयनगरची सत्ता रामराय व तिरूमलराय यांच्याकडे सोपविली. त्यामुळे इतर राज्यपाल नाराज होऊन त्यांनी आपला एक गट स्थापन केला. दरबारामध्ये गोंधळ व अशांतता निर्माण झााली. त्यातच अच्युतरायचा इ.स. १५४२ मध्ये मृत्यू झाला.

- **पहिला व्यंकटराय :**

अच्युतरायनंतर विजयनगरच्या सत्तेवर त्याचा पुत्र व्यंकटराय पहिला सत्तेवर आला. त्याची कारकीर्द फक्त सहा महिने टिकली. त्यानंतर त्याचा पुतण्या सदाशिवराव सत्तेवर आला.

- **सदाशिवराय (१५४२-१५७०) :**

या कालखंडामध्ये विजयनगरची खरी सत्ता सदाशिवरायाचा प्रधानमंत्री रामराय याच्या हातात होती. सदाशिवराय त्याच्या हातातील बाहुलेच बनला. विजयनगरची सर्व सत्ता रामरायाच्या हातात होती.

- **तालिकोटची लढाई (१५६५) :**

मंगळवार दि. २३ जानेवारी १५६५ राजी ही महत्त्वपूर्ण लढाई झाली. रामरायाने आपल्या कारकिर्दीमध्ये विजयनगर साम्राज्याला बळकटी आणली. त्याने साम्राज्यविस्तारासाठी शेजारी असणाऱ्या आदिलशाही व कुतुबाही या राज्यावर आक्रमणे करावयास सुरूवात केली. त्याने अतिशय चाणाक्षपणे मुस्लिम सत्ताधिशांमध्ये फूट पाडून पाडून इ. सन १५४३ मध्ये अहमदनगरच्या व गोवळकोंड्याच्या सहकार्याने विजापूर विरुद्ध संघ उभारला. विजापूरच्या वजिरामुळे तो पूर्ण होऊ शकला नाही. पुढे अहमदनगर विरुद्ध इ. सन १५५७ मध्ये रामरायाने संघ उभारण्यास प्रयत्न केला. रामरायाच्या या मुस्लिम फोडीच्या राजकारणाला मुस्लिम सत्ताधिश कंटाळले. सर्व अमीर, उमराव, राजे, विविध सत्ताधिश यांना आदिलशहा व किश्वरखानने रामरायाविरुद्ध एकत्र जमविले. बलाढ्या विजयनगर राज्याचा पराभव एकट्याने होणार नाही. म्हणून विजापूर, गोवळकोंडा, अहमदनगर व बिदर या शाह्या विजयनगर विरोधी एकत्र आल्या. या आघाडीमध्ये वऱ्हाड सत्ताधिश तटस्थ राहिले. त्यांनी काही किल्ले काही प्रांत यांची मागणी रामरायाकडे केली. ती मागणी रामरायाने मान्य केली नाही. तेव्हा या चार ही सेना विजयनगरवर चालून गेल्या. तालीकोट या कृष्णानदीवरील ठिकाणी दोन्ही सेना एकत्र आल्या. कृष्णा नदीच्या

उतारावर रक्कसगी व तंगडगी या दोन गावांजवळ ही लढाई झाली. म्हणून या लढाईला राक्षस तागडीची लढाई असेही म्हटले आहे. या तुल्यबळ युद्धामध्ये प्रथमत: रामरायाची विजयी घोडदौड सुरू होऊन प्रत्येक आघाडीवर सरशी होऊ लागली. परंतु या लढाईत रामराया ठार झाल्यामुळे त्याचे सैन्य रणांगणातून पळत सुटले. त्यामुळे विजयनगरच्या सर्व फौजा विस्काळीत झाल्या. त्यांना एकत्र करून कोणी लढणारा नसल्यामुळे विजयनगर सैन्याचा पराभव झाला. या लढाईत फार मोठ्या प्रमाणात हिंदू सैन्य ठार झाले. सर्व मुस्लिम सेना विजयनगरवर त्वेशाने तुटून पडल्या. विजयनगरची मोठ्या प्रमाणावर लूट केली. अनेकजण ठार झाले, बलाढ्य विजयनगर सत्तेचा पराभव झाला. वैभवसंपन्न शहराला स्मशानकळा प्राप्त झाली.

- **तालीकोट लढाईचा परिणाम :**

हिंदू आणि मुस्लिम यांच्यामध्ये झालेल्या या लढाईचे भयंकर परिणाम दिसून येतात. या भयानक लढाईने विजयनगरचे संपूर्ण राज्य संपुष्टात आले. या लढाईत विजयनगरची भयंकर हानी झाली. यानंतर पुन्हा एवढे बलाढ्य साम्राज्य स्थापन होऊ शकले नाही. या लढाईचे मुस्लिम सत्तांतर हे मोठे परिणाम घडून आले. दक्षिणेतील मुस्लिम राजवटीलाही मोठा धक्का बसला. जोपर्यंत बलाढ्य विजयनगर साम्राज्यापासून त्यांना धोका होता तो पर्यंत ते सावध होते. त्यांना बलाढ्य शत्रू उरला नाही. त्यामुळे नंतर मात्र त्यांच्यामध्ये संघर्ष वाढीस लागला. या संघर्षाचा फायदा उत्तरेत झालेल्या मुघल सत्तेने घेतला. या लढाईने विजयनगर शहराचा संपूर्ण नाश झाला. या शहरात कोणी उरले नाही. लोक हे शहर सोडून निघून गेले. दक्षिणेतील शह नष्ट झाले. डॉ. ईश्वरी प्रसाद म्हणतात 'तालिकोटची लढाई हिंदूस्थानच्या इतिहासातील निर्णायक लढाई पैकी एक होय. तिने दक्षिणेतील हिंदू साम्राज्याच्या मृत्यूची घंटा वाजविली आणि प्रलयावस्था निर्माण केली.

**४) अरविदू वंश (१५७०-१६१४) :**

अरविंद वंशाचा संस्थापक तिरूमल हा होय. त्याच्यानंतर त्याचा पुत्र रंग द्वितीय सत्तेवर आल. रंग द्वितीय नंतर त्याचा भाऊ व्यंकट द्वितीय गादीवर बसला. विजयनगरचा शेवटचा सत्ताधिश श्रीरंग तृतीय यांच्या कारकिर्दीत विजयनगर साम्राज्याचा शेवट झाला. विजयनगरच्या अकार्यक्षम सत्ताधिशांमुळे विजरनगरचे राज्यपाल स्वतंत्र होऊ लागले. त्यातून विजयनगरचे साम्राज्य नष्ट होऊन म्हैसूर, श्रीरंगपट्टम, मदुरा, तंजावर वगैरे राज्यांचा उदय झाला.

- **सारांश :**

हरिहर व बुक्क या बंधूंनी तुंगभद्रा नदीच्या दक्षिण तीरावर स. सन १३३६ मध्ये विजयनगर शहराची स्थापना केली. या शहराने जगभरामध्ये आपला नाव लौकिक केला. विजयनगर साम्राज्यामध्ये चार घराण्यांनी राज्यकारभार केला. विजयनगर साम्राज्याच्या इतिहासात कृष्णदेवरायाचे स्थान अद्वितीय आहे. कृष्णदेवरायाचे व्यक्तिमत्त्व रूबाबदार होते. लष्कराला, सैन्याला, दरबाराला, प्रशासनाला, शत्रूला, रयतेला त्याचा धाक वाटे. तालीकोटच्या भयानक लढाईने विजयनगरचे संपूर्ण राज्य संपुष्टात आले. या लढाईत विजयनगरची भयंकर हानी झाली. यानंतर पुन्हा एवढे बलाढ्य साम्राज्य स्थापन होऊ शकले नाही.

• **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न –१**

**अ) योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागा भरा.**

१) विजयनगर राज्याची स्थापना .................. साली झाली.

अ) १३३६ ब) १३४७ क) १३५० ड) १३६०

२) शाल्व घराण्याचा संस्थापक .................. होय.

अ) हरिहर ब) नरसिंह क) विरूपाक्ष ड) रामेश्वर

३) अमूक्त्यमल्यदा हे काव्य ............... यांनी लिहिले.

अ) रामराया ब) तिरूतमल क) व्यंकटराय ड) कृष्णदेवराय

४) तालिकोटची लढाई .................. रोजी झाली.

अ) २३ जून १५६५ ब) २३ जुलै १५६५ क) २३ जानेवारी १५६५ ड) २३ मे १५६५

५) .................. घराणे ओरिसात सत्ता चालवित होते.

अ) रजपूत ब) गजपती क) शीख ड) यादव

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) विजयनगरच्या कोणत्या राज्यकर्त्याने प्रथमच मुस्लिम सैन्य विजयनगर सैन्यात समाविष्ट करून घेतले.

२) नागलपूर शहराची निर्मिती कोणत्या राजाने केली?

३) तालीकोटच्या लढाईमध्ये विजयनगरची सेना कोणाच्या नेतृत्वाखाली लढली?

४) अरविंद वंशाची स्थापना कोणी केली?

५) तुंगभद्रा व कृष्णा यांच्या दुआबात कोणते प्रसिद्ध शहर होते?

## ४.२.२ विजयनगरकालीन व्यापार व मंदिर अर्थव्यवस्था

• **अंतर्गत व्यापार**

**प्रास्ताविक :**

दक्षिणेतील आर्थिक संपन्न व विस्तारित साम्राज्य म्हणून मध्ययुगीन कालखंडामध्ये विजयनगरला ओळखले जाते. विजयनगर सम्राटांनी निर्माण केलेली अंतर्गत शांतता व सुव्यस्था यामुळे विजयनगरच्या अंतर्गत व्यापाराला चालना मिळाली. मुलत: विजयनगर हे राजधानीचे शहरच समृद्ध व्यापारी शहर म्हणून प्रसिद्धीस आले होते. विजयनगर राज्यामध्ये विविध व्यापारी शहरे उदयास आलेली होती. जल मार्गातून व

खुष्कीच्या मार्गातून चालणारी विविध ठिकाणे भरभराटीला आली. यातूनच अंतर्गत व्यापाराला चालना मिळाली.

- **अंतर्गत व्यापाराचे प्रकार :**

विजयनगरचा अंतर्गत व्यापार तीन प्रकारचा होता. किनाऱ्यावरील व्यापार नद्यांमधून केला जाणारा व्यापार व खुष्कीच्या मार्गाने केला जाणारा व्यापार अंतर्गत  व्यापार हा प्रामुख्याने व जलमार्गाने चालत असे. खुष्कीच्या मार्गाने केल्या जाणाऱ्या व्यापारामध्ये विविध शहरे व व्यापारीकेंद्रे यामधून व्यापार केला जात असे.

- **किनाऱ्यावरील व्यापार :**

खंबायत, मलबार, कोचीन, मंगळूर, भटकळ, पुलीखत, कायल, मसुलीपटम या बंदरामध्ये लहान-लहान गलबतातून मालाची ने आण होत असे. तांदूळ, गूळ, तेल, खोबरे आणि इतर वस्तू मलबारहून खंबायत व सुरत येथे पाठवल्या जात. तेथून सुती कापड व रेशीम व इतर वस्तू मलबार किनाऱ्यावर आणल्या जात. मलबार भागातील पदार्थ मसुलीपट्टणम येथे पोचविले जात. पुलीकत येथून कापड मोटुपल्ली व मसुलीपट्टम येथून हिरे व रत्नाचे खडे गोवा, सुरत, खंबायत, मलबार येथे व बंगालच्या किनाऱ्यावर पाठविले जात असत.

- **नद्यातून केला जाणारा व्यापार :**

गंगा, सिंधू, गोदावरी, यमुना, कृष्णा, कावेरी या नद्यातून जलमार्गे व्यापार चालत असे. नद्यातून केल्या जाणाऱ्या व्यापारासाठी पुढील साधने वापरली जात असत. जलवाहतुकीसाठी प्रामुख्याने तराफे, जहाजे, लहान आकाराच्या होड्या, नाव यातून जलवाहतूक केली जात असे. ज्या ठिकाणी नद्यांची पात्रे खोल व रुंद असतील अशा ठिकाणी जलवाहतुकीसाठी गलबतांचा वापर केला जात असे.

- **खुष्किच्या मार्गाने केला जाणारा व्यापार :**

विजयनगरच्या व्यापारामध्ये खुष्कीच्या मार्गाने चालणाऱ्या व्यापाराला महत्त्वाचे स्थान होते. विजयनगर राजधानी पासून अंतर्गत व्यापारासाठी विविध असे सात मार्ग होते. १) पहिला मार्ग - विजयनगर ते गोवा, २) दुसरा मार्ग - विजयनर श्रीरंगपट्टण, ३) तिसरा मार्ग - मलबार व कोची मार्ग, ४) चौथा मार्ग - चंद्रगिरी, तिरूपती, कांची, चिंदंबरम, मदुराई व रामेश्वर या मार्गाने धनुष्यकोटी येथे जात असे. ५) पाचवा मार्ग हा मार्ग उदयगिरीपासून कोंडविडू येथे जात होता. ६) सहावा मार्ग - विजयनगर ते मसुलीपट्टण असा होता. ७) सातवा मार्ग - विजयनगर ते रायचुरच्या उत्तरेकडील शहरांना जोडणारा हा मार्ग महत्त्वपूर्ण होता. अशा प्रकारे विजयनगर साम्राज्यामध्ये विविध अशा सात मार्गांच्या अंतर्गत व्यापारासाठी वापर केला जात होता. या मार्गातून व्यापारासाठी लागणाऱ्या विविध वस्तुंची खरेदी-विक्री केली जात असे.

- **अंतर्गत व्यापाराची साधने :**

विजयनगरच्या अंतर्गत व्यापारासाठी हत्ती, घोडे, बैल, डोली, पालख्या, खेचर, बैलगाड्या, तट्टे

एवढेच नव्हेतर म्हैशी व गाढवे यांचाही वापर केला जात असे. बैल, बैलगाड्या, घोडे, खेचर, हत्ती यांच्यावर लादून व्यापारी आपल्या वस्तू व्यापारासाठी नेत असत. विजयनगरच्या व्यापाऱ्यामध्ये प्रवासासाठी मलबारहून गाढवे व ओझीवाहू गुरे यांच्यावर लादून विजयनगरला आणले जात असत.

विजयनगर सम्राटांनी रस्ते व रस्ते दुरुस्ती त्यांचे बांधकाम याकडे काळजीपूर्वक लक्ष दिले होते. विजयनगर काळामध्ये ५ ते ६ हजार बैलांच्या अंगावर धान्य लादून व्यापार करीत असत. या दळण-वळणाच्या सुविधामुळे विजयनगरचा अंतर्गत व्यापार भरभराटीला आलेला दिसून येतो.

- **व्यापारातील वस्तू :**

या व्यापारामध्ये कापड, गूळ, हळद, सुती कापड, लोखंड, सुपारी, मिरे, चंदनी लाकूड, वेलदोडे, विविध अन्नधान्ये व कडधान्ये यांचा व्यापारामध्ये समावेश होता. खुष्कीच्या व्यापारी मालामध्ये लोखंड, सुपारी, हिंग, जिरे, वेलदोडे, मोहरी, चंदनी लाकूड, विविध प्रकारच्या डाळी, हळद, सुंठ, आले, तंबाखू, मीठ, तेल, तूप, गूळ, रेशमी कापड, सुती कापड, तांदूळ तेल, खजूर, काज, चिंच, मेथी, कात, खोबरे आणि कडधान्य व अन्नधान्ये यांचा व्यापारी मालामध्ये समावेश असे. त्या बरोबरच व्यापारी प्रवास करत असताना रस्त्यावर लागणाऱ्या विविध शहरातून वेगवेगळ्या वस्तू खरेदी करत असत.

पेईस विजयनगर व्यापाराबद्दल लिहतो, 'विजयनगर मधील व्यापारी सुंदर घरामध्ये राहत असत. त्यांच्याकडे अनेक प्रकारचे हिरे, मोती, माणिक, मोती, पाचू आदि विक्रीसाठी असत. रोज संध्याकाळी एक जत्रा भरत असे. तेथे घोडे, संत्री, लिंबू, द्राक्षे इत्यादी वस्तू विक्रीसाठी ठेवण्यात येत असत. त्याला हे शहर रोमसारखे भव्य व अतिशय सुंदर वाटले. ते जगातील सर्व सुखसोयींनी युक्त असे सर्वोत्तम शहर होते.

- **आठवडी बाजार किंवा स्थानिक व्यापार :**

शहरामधून चालणाऱ्या व्यापाराबरोबरच विजयनगरमध्ये आठवडी बाजार ही स्थानिक प्रदेशातून मोठ्या प्रमाणात चालत होता. या आठवडी व स्थानिक व्यापारामध्ये फिरते विक्रेते, छोटे व्यापारी, खेड्यातील शेतकरी यांचा समावेश होता. त्या-त्या खेड्यातील शेतकरी आपल्या शेतात तयार होणाऱ्या वस्तू व अन्न धान्य, कडधान्य या आठवडी बाजारात विक्रीसाठी आणत असत. प्रामुख्याने या स्थानिक बाजारातून दैनंदिन व्यवहारामध्ये लागणाऱ्या जिवनावश्यक वस्तूंची खरेदी-विक्री होत असे. विजयनगर कालखंडामध्ये असा आठवडी बाजार भरभराटीला आलेला होता. या व्यापारातून मोठ्या प्रमाणात देवघेव होत असे.

- **व्यापारी जमाती :**

विजयनगर साम्राज्यातील अंतर्गत व्यापारात महत्त्वाच्या व्यापारी जमाती समाविष्ट झालेल्या होत्या. शेट्टी, बनिया व ब्राह्मण जमाती व्यापारामध्ये गुंतलेल्या दिसतात. शेट्टी ही जमात व्यापारामध्ये पुढारलेली होती. केरळ, कर्नाटक, तेलंगना, तमिळनाडू या ठिकाणी या जमातीचे प्राबल्य होते. शेट्टी ही जमात चीनमधून रेशीम, गोव्यातून कस्तुरी, सिलोनमधून हत्ती, पंजाबमधून कापूस आणून त्याची दक्षिण भारतामध्ये विजयनगर गुलबर्गा या शहरामध्ये विक्री करीत असत. अंतर्गत व्यापारात शेट्टी जमातीचा प्रभाव होता. विविध सत्ताधिश,

श्रीमंत, व्यक्ती शेट्टी या व्यापारी जमातीकडून विविध वस्तूंची खरेदी करीत असत. पश्चिम किनाऱ्यावर बनिया व्यापाऱ्यांची वस्ती होती. हे बनिया व्यापारी विविध प्रदेशामध्ये जाऊन वेग-वेगळ्या वस्तूंचा व्यापार करीत असत. प्रामुख्याने गुजराती, बनिये व्यापाऱ्यांनी व्यापारामध्ये आपला प्रभाव निर्माण केला होता. अंतर्गत व्यापारामध्ये काही ब्राह्मण जातीचे ही व्यापारी होते. या व्यापाऱ्यांबरोबरच परकीय पोर्तुगिज, इंग्रज, डच या परकीय व्यापाऱ्यांचाही समावेश होता. विविध शहरामध्ये जाऊन फिरस्ते व्यापार करणाऱ्या व्यापाऱ्यांना त्या-त्या शहरातील दलाल मदत व सहकार्य करीत असते. विविध वस्तूंचा पुरवठा करणे, व्यापारामध्ये मदत करणे, व्यापाऱ्यांनी आणलेल्या वस्तू स्थानिक व्यापाऱ्याकडे पोहचविणे, व्यापाऱ्यांना राहण्यासाठी लागणाऱ्या निवासस्थानासाठी मदत करणे आदि कामे दलाल त्या त्या भागामध्ये अगदी व्यवस्थितपणे करीत असत. याबरोबरच फिरस्ते व्यापाऱ्यांना किंवा एकाच ठिकाणी बसून व्यापार करणाऱ्या व्यापाऱ्यांना सरकारकडून योग्य ती मदत केली जात असे.

विजयनगर साम्राज्याच्या काळामध्ये शेट्टी, मलबारी, बनिया, रेड्डी, वीर, वणजीग या व्यापारी जमाती प्रभावशाली होत्या. कर्नाटकातून विविध वस्तू घेऊन वीर वणजीग ही जमात बैलाच्या मदतीने लांबच्या प्रदेशामध्ये जाऊन व्यापार करीत असत. सिलोन, गोवा, चीन, अरबस्तान या देशातून तेलंगणातील शेट्टी निरनिराळ्या वस्तूंची आयात करीत असत. मलबारमधील शेट्टी सिलोनमधून मोती, पोवळे, विविध रत्ने आणत असत. कलकत्ता व कोचीन येथे गुजराती बनिया स्थायिक झालेले असून ते विविध ठिकाणच्या वेगवेगळ्या वस्तूंचा व्यापार करीत असत. समुद्रमार्गे चालणाऱ्या व्यापारावर मुस्लिम व्यापारी जमातीचा प्रभाव होता. शेट्टी जातीचे लोक चारही प्रमुख विभागामध्ये म्हणजे केरळ, कर्नाटक, तेलंगना, तामिळनाडू येथे आढळत असत. शेट्टी लोक मोती, सोने, रत्ने, पोवळे, चांदी यांचे व्यवहार करीत. शेट्टी लोक गोव्याहून कस्तुरी, चीनहून सुंदर रेशीम, सिलोनहून हत्ती, ऑरमुझहून घोडे, पंजाबहून कापराची झाडे, जलनोगीहून सोने आणत असत. ते वस्तूंचे भाव वाढवू अगर कमी करू शकत असत.

- **व्यापारी श्रेणी किंवा संघ :**

व्यापाऱ्यातील व्यापारी संघ हे त्या भागातील व्यापार व्यवस्थापनाचे एक वैशिष्ट्य होते. विजयनगर राज्यामध्ये अंतर्गत व्यापार करणाऱ्या व्यापारांचे संघ किंवा श्रेणा होत्या. एकाच प्रकारच्या वस्तूंचा व्यापार करणाऱ्या व्यवसायिकांचे संघ होते. ते एका दिलाने वस्तूंची खरेदी विक्री करून योग्य नफा मिळवित असत. या विविध संघाचे एकत्रीकरण करून मोठ्या संघाची किंवा श्रेणीची या काळामध्ये निर्मिती झाल्याचे दिसून येते.

- **संघाची किंवा श्रेणीची कामे :**

संघाला किंवा श्रेणीला पुढील प्रमाणे कामे करावी लागत असत. १) व्यापाऱ्यांच्या अडचणी दूर करणे, २) व्यापाऱ्यांना मदत करणे, ३) परस्परातील संघर्ष मिटविणे, व्यपाऱ्यांना योग्य ते मार्गदर्शन करणे आदि कामे या श्रेणी करीत असत. राज्यकर्ते किंवा सत्ताधीश या व्यापारी संघावर व व्यापाऱ्यावर नियंत्रण ठेवण्याचे काम करीत असत.

## • अंतर्गत व्यापारी केंद्रे :

मुलतः विजयनगर हे राजधानीचे शहरच समृद्ध व्यापारी शहर म्हणून प्रसिद्धीस आले होते. विजयनगर राज्यामध्ये विविध व्यापारी शहरे उदयास आलेली होती. जल मार्गातून व खुष्कीच्या मार्गातून चालणाऱ्या व्यापारातून विविध ठिकाणे भरभराटीला आली. यातून विविध महत्त्वाची शहरे उदयास आली.

**१) बिदनूर :** हे एक प्रसिद्ध व्यापारी शहर म्हणून प्रसिद्धीस आले होते. शिवणनायक या राजाने दिलेल्या व्यापारी सवलतीमुळे व सहकार्यामुळे बिनदूर हे प्रसिद्ध व्यापारी केंद्र बनले होते. या व्यापारी शहरामध्ये देशाबरोबरच परदेशातूनही व्यापारी वस्तूंची खरेदी-विक्री होत असे. संपूर्ण दक्षिण भारताचे धान्याचे कोठार म्हणून बिदनूर प्रसिद्ध होते.

**२) सागर :** हे एक अतिशय प्रसिद्ध असे व्यापारी शहर होते. कापड, मिरे, लोखंड, विविध धान्ये, चंदनी लाकूड, सुपारी या वस्तूंची येथे खरेदी-विक्री होत असे. याबरोबरच चंदनी लाकूड हे येथील व्यापाराची महत्त्वाची वस्तू होती. एक बाजारपेठ म्हणून या शहराची प्रसिद्धी दूरवर पसरली होती. त्यामुळे देश विदेशातील व्यापारी येथे एकत्र येऊ लागले.

**३) गेरसोप्पा उर्फ गिरसप्पा :** हे एक महत्त्वाचे व्यापारी केंद्र होते. 'शरावती' नदीवरच्या धबधब्याला त्याचे नाव दिल्यामुळे त्या शहराचे नाव अमर झाले आहे. हे मिऱ्याच्या व्यापारासाठी प्रसिद्ध असे केंद्र होते. गिरसप्पा हे एक महत्त्वाचे व्यापारी शहर होते. येथे मिरे मोठ्या प्रमाणात तयार होत असे. ते मिऱ्याच्या व्यापाराचे मोठे केंद्र होते. तेथील राणीला परदेशी व्यापारी 'मिऱ्याची राणी' असे संबोधत असत.

**४) इक्केरी :** मलनाड प्रदेशात इक्केरी हे भरभराटीला आलेले शहर होते. चौडप्पाने या शहरात एक बाजार भरविला होता व एक धान्याचे कोठार बांधले होते. या शहराविषयी पिटर मुंडी म्हणतो ''इक्केरी हे गाव अतिशय मोठे आहे. तेथे मोठे रस्ते आहेत व मोठा बाजार आहे. या प्रसिद्ध व्यापारी शहरात अन्न-धान्याचा मोठ्या प्रमाणात व्यापार चालत असे.

**५) विजयनगर :** या शहरामध्ये देशातून व विदेशातून मोठ्या प्रमाणात व्यापारी वस्तू येत असत. त्या वस्तूची शहरातील वेगवेगळ्या बाजारात खरेदी-विक्री होत असे. जड-जवाहीर, विविध प्रकारची रत्ने यासाठी विजयनगर शहर प्रसिद्ध होते. या रत्नांच्या खरेदी-विक्रीसाठी शहरामध्ये वेगवेगळ्या बाजारपेठा स्वतंत्र होत्या.

याबरोबरच तंजावर, रामेश्वर, चिदंबरम, श्रीशैलम, मदुराई, श्रीरंगपट्टण ही दक्षिण भारतातील व्यापारी केंद्रे प्रसिद्धीस आली होती.

अशाप्रकारे मध्ययुगीन कालखंडामध्ये विजयनगरच्या स्थानिक व्यापाराला चालना मिळाली. विजयनगरच्या अंतर्गत व्यापारातील प्रगतीमुळे दक्षिणेतील शहरे व्यापारी केंद्रे म्हणून प्रसिद्धीस आली. विजयनगरच्या अंतर्गत शांततेमुळे अंतर्गत व्यापाराला मोठ्या प्रमाणात चालना मिळाली. विजयनगर सम्राटांनी व्यापाराच्या सर्वांगीण प्रगतीसाठी जलमार्ग व रस्ते या व्यापारी मार्गाचा विकास केल्यामुळे व व्यापाराला संरक्षण दिल्यामुळे अंतर्गत व्यापाराला गती मिळाली. वेगवेगळ्या व्यापाऱ्यांनी अंतर्गत व्यापारात पुढाकार घेऊन व्यापारावर आपला

प्रभाव निर्माण केला. व्यापारातून निर्माण झालेल्या श्रेणी किंवा संघाला राजकीय जीवनात महत्त्व होते. एकंदरीत विजयनगर कालीन व्यापार भरभराटीला आलेला होता. विजयनगर साम्राज्याच्या काळामध्ये विजयनगर, उदयगिरी, तंजावर, पेनकोंडी, श्रीरंगपट्टणम, बिदनूर, इक्केरी, मदूराई आदि राजधान्या व तिरूपती, रामेश्वर, श्रीरंगम, कालहस्ती, चिदंबरम, बनवासी, श्रीशैल या तिर्थक्षेत्रांना व विजापूर गुलबर्गा, गोवळकोंडा यासारख्या शहरांना याकाळात प्रसिद्ध व्यापारी केंद्रे म्हणून महत्त्व मिळाले. विजयनगर शहराचे वर्णन करताना परकीय प्रवाशी म्हणतात 'विजयनगर सारखे दुसरे शहर भूतलावर असेल असे वाटत नाही.' यासंदर्भात पेईज सारखा इतिहासकार म्हणतो 'या शहरामध्ये देशो-देशाचे व निरनिराळ्या जाती-जमातीचे लोक तुम्हाला आढळतील. कारण तेथे मोठा व्यापार चालतो व तेथे विविध मौल्यवान रत्ने विशेषत: हिरे मिळतात. त्याचप्रमाणे बिदनूर व सागर ही शहरे ही प्रसिद्ध व्यापारी केंद्रे होती. विविध देशातील व्यापारी तेथे व्यापारासाठी येत. सागर व शहराची रचना सुरेख असून तेथेही व्यापारासाठी निरनिराळ्या स्वतंत्र बाजारपेठांची आखणी केली होती असे दिसते. सामान्यत: विजयनगरच्या काळात आर्थिक क्षेत्रात करण्यात आलेल्या प्रगतीमुळे व्यापारी केंद्रांच्या विकासाला चालना मिळाली.

- **विजयनगरकालीन परराष्ट्रीय व्यापार :**

विजयनगरचा परदेशाशी असलेला व्यापार भरभराटीला आलेला होता. विजयनगर साम्राज्याचा अनेक देशांची व्यापार चालत असे. विजयनगरचा परदेशी व्यापार प्रामुख्याने सागरी मार्गाने चालत असे. पश्चिम किनारपट्टीवर विविध बंदरे असल्यामुळे परराष्ट्रीय व्यापार या बंदरातून केला जात असे.

- **व्यापारी बंदरे :**

विजयनगर साम्राज्याचा अनेक देशांशी व्यापार चालत असे. सागरी मार्गे केल्या जाणाऱ्या व्यापारासाठी विजयनगरमध्ये अनेक व्यापारी बंदरे प्रसिद्धीस आली होती. या बंदरातून परकीयांशी मोठ्या प्रमाणात वस्तूंची आयात आणि निर्यात होत असे. या बंदराचे पाच गटात वर्गीकरण करता येईल. १) कोकण गट, २) तुळूनाड गट, ३) मलबार गट, ४) कोरोमंडल गट उर्फ मलबार गट, ५) तेलंगण गट आदि विजयनगर कालखंडामध्ये जी बंदरे प्रसिद्धीस आली होती ती पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**१) भटकळ :** भटकळ हे विजयनगरकालीन महत्त्वाचे बंद होते. या बंदरातून परदेशाबरोबर मोठ्या प्रमाणात व्यापार चालत असे. या बंदरातून अनेक देशांना व्यापारी माल निर्यात केला जात असे. तांबे, हस्तीदंत, पारा, रंग, पोवळे, तुरटी या वस्तूची आयात केली जात असे. तर तांदूळ, साखर, लोखंड, नारळ, तेल, हिरडा अशा विविध वस्तूंची निर्यात केली जात असे. या बंदरामध्ये ख्रिश्चन व्यापारी मोठ्या प्रमाणात राहत असत.

**२) बसरूर :** किनाऱ्यावरी महत्त्वाचे व्यापारी शहर म्हणजे बसरूर होय. हे महत्त्वाचे बंद कुंदापूर नदीच्या मुखाशी वसलेले आहे. हे एक दळणवळणाचे मध्यवर्ती केंद्र होते. इजिप्त-अरबस्तान या देशांशी येथून व्यापार चालत असे. येथे डच व्यापाऱ्यांची वसाहत होती. हे बंदर तांदळाच्या व्यापारासाठी प्रसिद्ध होते. तांदळाबरोबरच इतर वस्तूंचा व्यापारही या बंदरातून मोठ्या प्रमाणात चालत असे.

**३) होन्नावर :** दक्षिणेतील एक महत्त्वाचे बंदर म्हणजे होन्नावर होय. होन्नावर म्हणजे 'सोन्याचे खेडे' होय. हे बंदर शरावती नदीवर वसलेले आहे. या नदीचा प्रवाह जवळ जवळ २०० ते ३०० टनाची जहाजे जातील एवढा मोठा होता. या बंदरातून मोठ्या प्रमाणात आयात-निर्यात केली जात असे. होन्नावर हे महत्त्वाचे बंदर भारतातील मोठी नदी शरावती नदीच्या किनारी वसलेले आहे. मोठमोठी जहाजे या नदीपात्रातून संचार करीत असत.

**४) कालिकत :** कालिकत हे मलबार गटातील महत्त्वाचे बंदर होय. या गटामध्ये एकूण २५ बंदरे होती. त्यातील हे एक प्रसिद्ध व महत्त्वाचे बंदर होय. सागरी व्यापार करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या जहाज बांधणीसाठी हे बंदर प्रसिद्ध होते. या बंदरामध्ये मोठमोठी जहाजे बांधली जात असत. इ. सन १९४८ मध्ये याच कालिकत बंदरामध्ये युरोपियन खलाशी वास्को-द-गामा प्रथम आला होता. या बंदरातून मक्का, तांबडा समुद्र या ठिकाणी विविध वस्तूंचा व्यापार चालत असे. या बंदरातून मोती, सुती कापड, चिनी मातीचे सामान, कस्तुरी रत्ने, मसाल्याचे पदार्थ, सुगंधी द्रव्ये आदि वस्तूंची निर्यात केली जात असे. तर सोने, चांदी, तांबे, पारा केशर, रंगीत मखमल, गुलाबपाणी, हिंगुळ, पारा, शस्त्रे या वस्तुंची आयात केली जात असे. कालिकत येथे अनेक परकीय व्यापारी होते त्यांना 'परदेशी' असे म्हटले जाई. त्यामध्ये अरब, इराणी, खोरासानी व दख्खनी लोकांचा समावेश होता. पोर्तुगिज, इंग्लिश, डच, डॅनिश आदि लोकही दक्षिण भारतातील व्यापारात भाग घेत असत. चीन, जावा, सिलोन, मालदीव बेटे येमेन, फरास येथून येणारी जहाजे कालिकतला भेट देत असत. निकोलो-दि-कोटी या बंदराविषयी म्हणतो ''ती भारताची उच्च दर्जाची व्यापारपेठ होती आणि तेथे मिरे, लाख, आले, दालचिनी, हिरडे, बेहडे या वस्तू विपूल प्रमाणात उपलब्ध होत्या.'' निकितिन म्हणतो की, ''कालिकत हे संपूर्ण हिंदी महासागरासाठी असलेले बंदर होते. या देशात मिरे, आले, सुंठ, रंगाची झाडे, मस्कत, कस्तुरी, लवंगा, दालचिन, विशिष्ट गंध असलेल्या मुळ्या आणि सर्व प्रकारचे मसाल्याचे जिन्नस तयार होतात आणि प्रत्येक गोष्ट स्वस्थ आहे.''

**५) कोचीन :** या बंदरातून सुपारी, मिरे, ताडगूळ, गूळ, कोको यांचा व्यापार दाभोळ, चौल, खंबायत, कोरोमंडल किनारा या बरोबर चालत असे. या बंदरामध्ये लहान जहाजे बांधली जात असत. येथे मिरीचे मोठ्या प्रमाणात उत्पादन केले जात असे.

**६) कुईलोन :** मलबार गटामध्ये २५ बंदरांचा समावेश होत असे. मलबार गटातील सर्वात दक्षिणेकडील सागरी बंदर कुईलोन हे होते. या बंदरातून चीन व पूर्वेकडील देशाशी व्यापार चालत असे. कुईलोनमध्ये उपलब्ध असणारे मिरे या व्यापारातील प्रमुख वस्तू होती.

या बंदराशिवाय मलबार गट व तेलंगणा गटातील बंदरे व्यापारासाठी विजयनगर कालखंडामध्ये प्रसिद्धीस आली होती.

- **प्रवासी साधने :**

विजयनगरच्या व्यापाऱ्यामध्ये प्रवासासाठी हत्ती, घोडे, बैल, डोली, पालख्या, खेचरे, बैलगाड्या तट्टे एवढेच नव्हे तर म्हशी व गाढवे यांचाही वापर केला जात असे. मलबारहून गाढवे व ओझीवाहून गुरे यांच्यावर लादून विजयनगरला मिरे आणले जात असत.

• **व्यापारी वस्तू :**

खुष्कीच्या व्यापारी मालावर लोखंड, सुपारी, हिंग, जिरे, वेलदोडे, मोहरी, चंदनी लाकूड, विविध प्रकारच्या डाळी, हळद, सुंठ, आले, तंबाखू, मीठ, तेल, तूप, गूळ, रेशमी कपडे, सुती कापड, तांदूळ, तेल, खजूर, कात, चिंच, मेथी, कात, खोबरे आणि कडधान्य व अन्नधान्ये यांचा व्यापारी मालामध्ये समावेश असे. पेईस विजयनगर व्यापाराबद्दल लिहतो 'विजयनगर मधील लोक रस्त्यावरील सुंदर घरामध्ये राहत असत. त्याांच्याकडे अनेक प्रकारचे हिरे, मोती, माणिक, मोती, पाचू, आदि विक्रीसाठी असत. रोज संध्याकाळी एक जत्रा भरत असे. तेथे घोडे, संत्री, लिंबू, द्राक्षे इत्यादी वस्तू विक्रीसाठी ठेवण्यात येत असत. त्याला हे शहर रोमसारखे भव्य व अतिशय सुंदर वाटले. ते जगातील सर्व सुखसोयींनी युक्त असे सर्वोत्तम शहर होते.

• **सरकारचे व्यापार विषयक धोरण :**

सरकार आणि व्यापार यांच्यातील संबंध अतिशय महत्त्वाचे होते. त्यामध्ये रस्त्याची सुव्यवस्था ठेवणे, वाहतूक कर कमी करणे, जकात कर जास्त करणे व कमी करणे, नवीन रस्ते बांधणे, व्यापाऱ्यांना खास सवलती देणे, आयात निर्यातीवर जकात कर लादणे, महामार्गावर विश्रांतीगृहे बांधणे, पाण्याची व्यवस्था करणे, रस्त्याच्या दोन्ही बाजूला सावलीसाठी झाडे लावणे, व्यापाऱ्यांना इतर अनेक प्रकारच्या सवलती देणे. सरकार खुला व्यापार, संरक्षण व्यापार व नियंत्रण व्यापार चालवत असे. पहिल्या पद्धतीमध्ये परदेशी वस्तूवर जकात कर वाढविता येत असे. दुसऱ्या प्रकारामध्ये व्यापाऱ्याला सर्व काही करता येत असे. तिसऱ्या प्रकारामध्ये थोडा जकात कर लादून परदेशी व देशी व्यापारामध्ये चांगले संबंध निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात असे.

• **सारांश :**

विजयनगरच्या अंतर्गत व परदेशी व्यापाराला महत्त्वाचे स्थान होते. देश-विदेशातील व्यापारी विजयनगर साम्राज्यातील व्यापारासाठी येत असत. वैभवसंपन्न शहर सर्वच व्यापाऱ्यांना आकर्षक होते. या शहराची महती सर्वदूर पसरली होती. या शहरामध्ये हिरे, माणके, उघड्या मैदानावर विकली जात असत. विजयनगरच्या विविध वस्तूंना देश-विदेशामध्ये मोठ्या प्रमाणावर मागणी होती. विजयनगर हे शहरच वैभवसंपन्न असे व्यापारी शहर होते. त्यामुळे विजयनगरची व्यापारी दृष्टीकोणातून भरभराट झालेली होती.

• **मंदिर अर्थव्यवस्था :**

**प्रास्ताविक :**

मंदिर संस्कृती ही मानवी जीवनामध्ये सकारात्मकता निर्माण करते. मंदिराला भेटी दिलेल्या लोकांमध्ये एक प्रकारची ऊर्जा निर्माण होते. अशा पवित्र ठिकाणाला सढळ हाताने दान धर्म केले जातात व मंदिरांना मोठ्या प्रमाणात देणग्या दिल्या जातात. यातून मंदिर अर्थशास्त्र मजबूत होते. प्राचीन काळापासून हिंदूसाठी मंदिर (देऊळ) मुसलमानांसाठी दर्गा आणि ख्रिश्चनांसाठी चर्च ही दैवी प्रतिके आहेत. प्रत्येक धर्मामध्ये या ठिकाणाला पवित्र समजले जाते. अशा आणि त्या ठिकाणी असंख्य माणसे, भक्त व धार्मिक पर्यटक श्रद्धा

ठेवून भेट देतात. भारतामध्ये विविध धर्मांची अनेक ठिकाणे पवित्र आहेत. त्यापैकी हिंदू धर्माची मोठ्या प्रमाणात मंदिरे आहेत. प्राचीन काळी मंदिरे सामाजिक, आर्थिक व धार्मिक कृतीची केंद्रे होती. मध्ययुगीन कालखंडामध्ये विजयनगरकालीन मंदिर अर्थव्यवस्थेला महत्त्व प्राप्त झाले होते.

- **ऐतिहासिक भूमिका :**

धर्म ही एक सामाजिक संस्कृती आहे. यामध्ये धर्माची खूप मोठी भूमिका आहे. इतिहासातील पुराव्यानुसार जीवनात प्राचीन काळापासून ते आधुनिक काळापर्यंत धर्माची भूमिका मत्त्वाची राहिली आहे. समाजाची निर्मिती जेव्हा झाली तेव्हापासून धार्मिक कृतीतून समाजाची कृती ओळखली जाते. म्हणजेच धार्मिक कृतीतून मानवाचा दृढ विश्वास व्यक्त होतो. समाजाची घट्ट बांधणी झाल्यावर सुद्धा आपल्या आपल्या लक्षात येते की समाजावर धर्माचे प्रभुत्व आहे. आज आधुनिक काळात सुद्धा धर्माचा प्रभाव आपणास जाणवतो.

धर्माची ताकत जी मानवावर आहे. ती त्याच्या सामाजिक आणि आर्थिक कृतीतून व्यक्त होत असते. आर्थिक कृती समाजातून उपलब्ध होत असते. या कृतीला धार्मिक कृती म्हणून संबोधले जाते. वेगवेगळ्या संस्कृतीतून आपल्याला समजते की, मानवाच्या सामाजिक आर्थिक कृतीवर धर्माचा पगडा आहे. परंतु आपल्या निधर्मीय देशातही धर्माचा परिणाम मानवाच्या कृतीवरती मोठ्या प्रमाणात झालेला दिसून येतो. या घटकावरती पडलेला प्रकाशझोत म्हणजे धर्माचा अर्थशास्त्रीय अभ्यास होय. जेथे सामाजिक व सांस्कृतिक अर्थशास्त्रावर धार्मिक कृतीचा परिणाम झालेला दिसून येतो. त्यातूनच धार्मिक अर्थशास्त्राचा पाया मजबूत होतो. इतिहासाच्या मंदिर संस्कृतीतून अर्थशास्त्रीय अभ्यासाचा पाया घट्ट झाला. राजे, राजवाडे यांनी मंदिर संस्कृती विकसित केली व यातून मंदिर अर्थशास्त्र मजबूत झाले.

- **अर्थशास्त्रीय संकल्पना :**

विजयनगर साम्राज्यामध्ये मंदिरे व विविध देवदेवतांच्या मूर्ती या वास्तूकलेचा मोठा विकास झाला होता. ही मंदिरे स्वतंत्र विजयनगर शैली म्हणून ओळखली जातात. या मंदिरावरती जे मूर्तीकाम केले आहे ते सर्वांना मोहीत करणारे आहे. त्यामुळे एक योग्य आकार धर्मशास्त्रीय अभ्यासाला प्राप्त होतो. अर्थशास्त्रीय दृष्टीने ही वैशिष्ट्यपूर्ण बाब आहे. कौटिल्याने आपल्या अर्थशास्त्र या ग्रंथामध्ये वेग वेगळ्या मार्गावर भर दिला आहे. यातून राज्यकर्ते उत्पन्न वाढीवर भर देतात. ॲरिस्टॉटल यांनी राजकीय आणि आर्थिक कृतींना नैतिक महत्त्व दिले आहे. अर्थशास्त्राचे जनक ॲडमस्मिथ यांनी धर्माचे वेगवेगळे पैलू स्पष्ट केले आहेत. यातून त्यांनी धर्माच्या अर्थशास्त्रावर भर दिला आहे. धर्माच्या अर्थशास्त्राची पायाभरणी झाली. त्यामुळे उत्तरोत्तर धार्मिक अर्थशास्त्राला महत्त्व प्राप्त झाले. संस्कृती आणि धार्मिक संस्कृती यातील संबंध वैशिष्ट्यपूर्ण मानले जातात. अर्थशास्त्रीय अभ्यासातील धार्मिक संस्कृतीमध्ये विविध उपघटकांचा समावेश होतो. यातून सर्व सामाजिक वैज्ञानिक घटकांचा अभ्यास केला जातो. त्याला धर्माचे अर्थशास्त्र असे म्हटले जाते. धर्माचे अर्थशास्त्र एक असा अभ्यास की ज्यातून धर्माच्या वागणूकीचा अभ्यास होतो. तो अभ्यास अर्थशास्त्रीय दृष्टीकोणातून होत असतो.

- **धार्मिक संस्कृतीचे प्रकार :**

**अ) अर्थ संस्कृती :**

संपूर्ण आर्थिक कृती या अर्थसंस्कृतीतून निर्माण होत असते. जी मानवासाठी महत्त्वाची आहे. ही अर्थ संस्कृती मानवला वेगवेगळ्या वर्गाची जीवनशैली सादर करीत असते. यातून मंदिराची अर्थव्यवस्था सक्षम होत असते. जेणे करून ते त्या राज्याचे उत्पन्नाचे साधन बनते.

**ब) राजकीय संस्कृती :**

मानवी संस्कृतीचा उप विभाग म्हणजे राजकीय संस्कृती होय. प्रत्येक व्यक्ती विविध राजकीय कृतीतून प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रित्या धार्मिक कृती करीत असतो. तो आपापल्या रूढी, परंपरा सादर करीत असतो.

**क) मंदिर संस्कृती :**

मंदिर संस्कृती ही मानवी संस्कृतीचे महत्त्वाचे वैशिष्ट आहे. आर्थिक विकासाच्या मार्गातील मंदिर अर्थशास्त्र अविभाज्य घटक आहे. मंदिर हे भक्तीचे व चांगल्या गोष्टीचे प्रतिक आहे. जेथे भक्ती मोठ्या प्रमाणात केली जाते तेथे मंदिर संस्कृती उदयास येते व मंदिर अर्थकारणाला सुरूवात होते. त्या-त्या लोकसंख्येनुसार मंदिराच्या अर्थशास्त्राचे गणित मांडले जाते. त्या मंदिराच्या भक्ताच्या भेटीतून ते बजेट व पैसे दान तसेच देणग्याच्या माध्यमातून अर्थकारण मजबूत होते.

- **धर्म व अर्थशास्त्रीय अभ्यासातील मूलभूत तत्त्वे :**

१) हा एक ऐतिहासिक व चालू धर्माचा अभ्यास होय. यामधून अर्थशास्त्रीय, सामाजिक, नैतिक, वैज्ञानिक, आणि तंत्रज्ञानिक घटकांचा अभ्यास होतो.

२) तो एक धार्मिक विश्वास, वर्तणूक आणि संघटन याचा आर्थिक अभ्यास आहे. ज्यातून संभाषित योगदान स्पष्ट होते.

३) हा अभ्यास धार्मिक रूढी, परंपरा, अर्थशास्त्राची पद्धत यावर प्रकाश टाकतो.

४) हा एक धार्मिक बाजारपेठेचा अभ्यास होय. ही अर्थशास्त्रीय पद्धत धार्मिकतेचा एक बदल आहे. जो परंपरेतून केला जातो. त्यामध्ये नाविण्यता आणि स्पर्धा यातून धार्मिक बाजारपेठेचा विकास होतो.

५) या अभ्यासाचे योगदान मोठे आहे. धार्मिक वर्गाचे परिणाम मोठे आहेत. एखाद्याचा विकास, कुटुंब, तरूण पिढी, राष्ट्र यासाठी हा अभ्यास महत्त्वाचा आहे.

६) या अभ्यासातून राज्यातील धार्मिक नियम, धार्मिक स्वातंत्र्य, देऊळ मंदिर राज्य संबंध, लोकांना दिली जाणारी वागणूक आदि घटकांवर विश्वास व्यक्त करतात.

- **मंदिरांची अर्थशास्त्रीय भूमिका :**

१) गावातील प्रशासक व पंचायत मंदिरामध्ये चालत असे.

२) मंदिराच्या माध्यमातून सरकारला कर प्राप्ती होत असे.

३) मंदिराच्या आजूबाजूला बाजार भरत असत.

४) अनेक सांस्कृतिक कार्यक्रम मंदिरामध्ये आयोजित केले जात असत.

५) मंदिर संस्कृतीतून रोजगाराची पुर्नबांधणी केली जात असे.

- **विविध संस्कृतीतील मंदिर अर्थकारण :**

मानवी संस्कृतीमध्ये अंतर्गत वेगवेगळे संबंध दर्शवितात. मानवी संस्कृती ही चार घटकांशी संबंधित आहे. त्यामध्ये धार्मिक संस्कृती, सामाजिक संस्कृती, आर्थिक संस्कृती व राजकीय संस्कृती या उप घटकामध्ये विभाजित आहे. मानवी संस्कृतीला हे सर्व घटक एकमेकांशी संबंधित आहेत. राजकीय संस्कृती ही आर्थिक संस्कृतिशी संबंधित आहे. आर्थिक संस्कृती ही धार्मिक संस्कृतीतून स्पष्ट होते. सामाजिक रचनेतील महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे विविध जातीचे वर्गीकरण विविध सामाजिक दर्जा स्पष्ट करते. उदा. मंदिरातील कामगार या सर्वांच्या कृतीतून अर्थव्यवस्था मजबूत होते. अधार्मिक व धार्मिक कृती ह्या एकमेकांवर प्रत्यक्ष अप्रत्यक्षरित्या विसंबून राहतात. ते आर्थिक संस्कृतीच्या बाजारावर अवलंबून असतात.

मंदिर संस्कृती दोन मार्गानी व्यक्त करता येते. धार्मिक कृती व अधार्मिक कृती आर्थिक कृती ही धार्मिक कृतीच्या अंतर्गत विविध परिणामात दिसून येते. बहिर्गत कृतीचा परिणामही त्यावर होत असतो. मंदिर संस्थानाचे सभासद हे आर्थिक संस्कृतीशी निगडीत असतात. कठीण प्रसंगी या संस्थांना ते परवडण्यासारखे नाही. मंदिर अर्थ कारणातून अनेकविध परिणाम झालेले दिसतात. विविध संस्कृतीतील दलाल हे मंदिराच्या अर्थकारणाशी संबंधीत आहेत. मंदिर संस्कृतीतून येणारा महत्त्वाचा परिणाम म्हणजे बहिर्गत परिणाम होय. सकारात्मक परिणामातून एक म्हणजे यातून पवित्र ठिकाणाची उत्पत्ती होत असते. नकारात्मक परिणाम बहिर्गतरित्या ठिकाणांचे महत्त्व नष्ट करीत असतो.

- **सकारात्मक बहिर्गत :**

सकारात्मक बहिर्गत ही मंदिर संस्कृतीतून विकसित झाली. ही सकारात्मकत: लोकप्रिय मंदिरांच्या दंतकथेतून, दळण वळणातून, सुविधातून आदि घटकातून निर्माण होत असते. देवाने निर्माण केलेले सकारात्मक मार्ग धार्मिक गरजा पूर्ण करते. याचे अनुकरण भक्ताकडून होत असते. आपल्या धार्मिक गरजा पूर्ण करण्यासाठी अनेक भक्त या ठिकाणाला भेटी देतात. यातून मंदिराच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात आर्थिक उलाढाल होत असते.

- **विजयनगरची मंदिर संस्कृती :**

विजयनगरच्या सम्राटानी सुंदर व प्रेक्षणीय अशी मंदिरे व विविध धार्मिक वास्तू मोठ्या प्रमाणावर बांधल्या. ओरिसाच्या गजपती राजावर मिळविलेल्या विजयाचे स्मारक म्हणून कृष्णदेवरायाने इ. सन १५१६ मध्ये सुंदर असे कृष्ण मंदिर उभारले. कृष्णदेवरायाने कृष्ण स्वामी मंदिराच्या जवळ नृसिंहाचा २५ फूट उंच

व १७ फूट रुंद मोठा दगडी पुतळा कोरला आहे. विजयनगरच्या मंदिरावरील शिल्पे व मूर्तीकाम बघणाऱ्याचे डोळे दिपवून टाकणारे आहे. हंम्पीचे विठ्ठल मंदिर विजयनगर स्थापत्याचा सर्वोच्च बिंदू दर्शविते. मंदिर शिल्पाचा सर्वश्रेष्ठ आविष्कार म्हणजे विठ्ठल स्वामी मंदिर होय. विजयनरगमधील अत्यंत सुंदर असे हे मंदिर आहे. या वास्तूवर केलेले शिल्पकाम आकर्षक व कोरीव आहे. नृत्यातील विविध मुद्रा विठ्ठल स्वामी मंदिरातील संगीत मंडपाच्या पाठीवर कोरलेल्या आहेत. त्यामध्ये छोटासा खडा घेऊन वाजविले असता सा रे ग म प या सारखे संगीताचे स्वर कानावर पडतात. विजयनगरमधील अनेक मंदिरामध्ये असे संगीत स्तंभ आढळतात. हजारा राम मंदिरामध्ये केलेले मूर्तिकाम श्रेष्ठ व सुंदर आहे. विजयनगर शैलीतील सुंदर व वैभव संपन्न अशी मंदिरे कांचीपुरम, कुंभकौणम, ताडपत्री, वेलोर, विरंचीपूरम, श्रीरंगम आदि ठिकाणी बांधली आहेत.

- **आर्थिक देवाण-घेवाण :**

विजयनगर साम्राज्याचा सामाजिक, आर्थिक व धार्मिक बाबतीमध्ये मोठ्या प्रमाणात विकास झाला. विजयनगर सम्राट धार्मिक वृत्तीचे असल्यामुळे मंदिर संस्कृतीचा मोठ्या प्रमाणात विकास झाला. या काळामध्ये मोठ्या प्रमाणात नवीन मंदिरे बांधण्यात आली व जुन्या मंदिरांची डागडुजी करून ती मजबूत व सुंदर करण्यात आली. विजयनगर साम्राज्यामध्ये मंदिरांचे उत्सव मोठ्या प्रमाणात साजरे केले जात असत. या उत्सवाच्या प्रसंगी कुस्ती, घोड्याच्या शर्यती, दारूकाम, नाचगाणे यासारखे कार्यक्रम आयोजित केले जात असत. हे कार्यक्रम १० दिवस चालत. यावेळी मोठ्या प्रमाणात आर्थिक उलाढाल होत असे. अनेक भागातून अनेक पर्यटक खास या मंदिरांना भेटी देण्यासाठी येत असत. त्यातून विविध माध्यमातून पैशाची देवाण घेवाण होत असे. त्यामुळे विजयनगरची अर्थव्यवस्था मजबूत होत गेली.

विजयनगरचे राजे धार्मिक यात्रांना जात असत. कृष्णदेवरायाने कांची, श्रीशैल, तिरूपती, कलाहस्ती, श्रीकाकुलम, सिंहाचलम, अरूवाचलम या धार्मिक स्थळांबरोबरच शालिवाहपुरम, कन्याकुमारी, सेतू, रामेश्वर, धनुष्यकोठी, कारूवनल्लुर, तिरूचेंदूर या स्थळांनाही भेटी दिल्या होत्या. या मंदिरांना भेटी देऊन मोठ्या प्रमाणात देणग्या दिलेल्या दिसून येतात. विजयनगरच्या या मंदिराला दिलेल्या देणग्यातून मोठ्या प्रमाणात पैसा मिळत असे. या धार्मिक स्थळांना भेटी देण्यासाठी येणाऱ्या भक्तापासून मंदिराला सढळ हाताने मदत केली जात असे. सोने, पैसे या माध्यमातून विजयनगर मंदिरे श्रीमंत बनली होती. मंदिरांच्या यात्रा आणि जत्रांच्या कालखंडामध्ये पैशाची मोठ्या प्रमाणात उलाढाल होत असे.

- **सारांश :**

इतिहासाच्या मंदिर संस्कृतीतून अर्थशास्त्रीय अभ्यासाचा पाया घट्ट झाला. राजे, राजवाडे यांनी मंदिर संस्कृती विकसित केली व यातून मंदिर अर्थशास्त्राला महत्त्व प्राप्त झाले. विजयनगरच्या या मंदिराला दिलेल्या देणग्यातून मोठ्या प्रमाणात पैसा मिळत असे. या धार्मिक स्थळांना भेटी देण्यासाठी येणाऱ्या भक्तापासून मंदिराला सढळ हाताने मदत केली जात असे. सोने, पैसे या माध्यमातून विजयनगर मंदिरे श्रीमंत बनली होती. मंदिरांच्या यात्रा आणि जत्रांच्या कालखंडामध्ये पैशाची मोठ्या प्रमाणात उलाढाल होत असे.

- **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – २**

**अ) योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागा भरा.**

१) विजयनगरचा अंतर्गत व्यापार ........... प्रकारचा होता.

अ) दोन  ब) तीन  क) चार  ड) पाच

२) पश्चिम किनाऱ्यावर ............ व्यापाऱ्यांची वस्ती होती.

अ) बनिया  ब) मलबारी  क) खोरसानी  ड) अरब

३) दक्षिण भारताचे धान्याचे कोठार म्हणून .......... शहर प्रसिद्ध होते.

अ) बिदनूर  ब) भटकळ  क) बसरूर  ड) कालीकत

४) ............. येथील राणीला परदेशी व्यापारी 'मिऱ्यांची राणी' असे संबोधत असत.

अ) इक्केरी  ब) सागर  क) गिरसप्पा  ड) मलबार

५) ............ हे बंदर कुंदापूर नदीच्या मुखाशी वसलेले आहे.

अ) होन्नावर  ब) भडोच  क) चौल  ड) बसरूर

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) कोणत्या बंदरास सोन्याचे खेडे म्हणतात?

२) मलबार गटामध्ये किती बंदरांचा समावेश होत असे?

३) कोणत्या साली वास्को-द-गामा भारतात आला?

४) विजयनगरचे राजे कोणत्या यात्रांना जात असत?

५) मंदिर हे कशाचे प्रतिक आहे?

### ४.२.३ विजयनगरकालीन कला व स्थापत्य :

- **प्रास्ताविक :**

संगम, शालुव, तुल्व व अरविंद या चार वंशातील पराक्रमी राजांनी आपली सत्ता विजयनगर साम्राज्यावर निर्माण केली. विजयनगरची ख्याती दूर पसरली होती. विजयनगरचे वैभव परकीय प्रवाशांना आकृष्ट करणारे होते. नुनीझ, पेस बार्बोसा, फेरीस्ता, निकापलो कोंटी, अब्दुल रज्जाक यांनी भेटी दिल्या होत्या. त्यांनी आपल्या प्रवासातील वर्णनामध्ये विजयनगर शहराच्या कलावैभवाचे वर्णन केलेले असून स्थापत्यशास्त्राच्या दृष्टीकोनातून मंदिरे, गोपूरे, राजवाडे, महाल, तटबंदी, जलाशय, सभागृहे यांच्या वर्णनाची माहिती येते. यातून आपणास विजयनगर सौंदर्याची माहिती मिळते.

- **विजयनगरकालीन स्थापत्य :**

विजयनगर हे शहरच स्थापत्यकलेचा आदर्श व उत्कृष्ट नमुना आहे. अनेक वास्तू या शहरामध्ये निर्माण केलेल्या आहेत. त्या अतिशय देखण्या व सुंदर अशा आहेत. विजयनगरचे साम्राज्य स्थापत्य व कलेचे सुवर्णयुगच होते. विजयनगरची कला व स्थापत्यनगरचे साम्राज्य पुढीलप्रमाणे सांगता येईल.

हरिहर दुसरा हा शंकराचा भक्त होता. त्यामुळे त्याने आपल्या साम्राज्यात शंकराची अनेक मंदिरे बांधली. दुसरे हरिहरचे शिलालेख दक्षिण हिंदुस्थानात सापडले आहेत. दुसरा देवरायाच्या कालखंडामध्ये स्थापत्य कलेचा मोठ्या प्रमाणात विकास झाला होता. दुसरा देवरायच्या काळामध्ये विजयनगरमध्ये अनेक मंदिरे व देवालये गोपूर वाडे, तट अशा स्थापत्य बांधण्यात आली. यातून विजयनगरचे शहर सुशोभित करण्यात आले होते.

कृष्णदेवरायाच्या कारकिर्दीमध्ये विजयनगरचे साम्राज्य अतिउच्च शिखरावर पोहचले होते. विजयनगरच्या दृष्टीने कृष्णदेवरायची कारकीर्द वैभवशाली व भरभराटीची ठरली होती. कृष्णदेवराय उत्कृष्ट शासक होताच. त्याच बरोबर कलेचा भोक्त होता. देवरायाच्या कारकिर्दीमध्ये निर्माण झालेले स्थापत्य भारताच्या इतिहासामध्ये श्रेष्ठत्व प्राप्त करून जाते. विजयनगर शहरामध्ये त्यांनी अनेक वास्तू निर्माण केल्या. नागलादेवी मातेच्या स्मरणार्थ कृष्णदेवरायाने नागलापूर हे नगर वसविले. हजारस्वामी व कृष्णस्वामी ही दक्षिण भारतामध्ये प्रसिद्ध अशी मंदिरे बांधली. विजयनगर राजधानीमध्ये एक विशाल तलाव बांधला. कृष्णस्वामीच्या मंदिराजवळ नृसिंहाचा २५ फूट उंच व १७ फूट रुंदीचा प्रचंड दगडी पुतळा कोरला आहे.

विजयनगरकालीन मंदिर बांधकामशैलीची दोन वैशिष्ट्ये जाणवतात. १) एक म्हणजे पदर सुटणाऱ्या दगडाचा वापर तर, २) दुसरे वैशिष्ट म्हणजे ग्रेनाईट दगड विजयनगरमधील बांधकामासाठी जास्तीत जास्त ग्रेनाईट दगडाचा वापर केल्याचे दिसून येते. विजयनगर मधील वास्तुकला ही स्वतंत्र विजयनगर शैली म्हणून प्रसिद्धीस आली. मंदिराची सजावट, आकार, धार्मिक आचार व विचार यातून मंदिर परिसरातील वास्तूंची संख्या अनेक पटीने वाढली. हजार स्तंभानी युक्त असे मंडप बांधलेले असत. हे स्तंभ बांधकामाला व वरच्या तुलांना आणि छपराला मजबूत आधार देणारे देवतेचे मंदिर मध्यभागी व आकाराने विस्तृत असे ईशान्य बाजूला देवाच्या देवतेचे म्हणजेच पत्नीचे मंदिर लहान असे. मुख्य सभामंडपाचा वापर उत्सव-नृत्य व प्रार्थनेसाठी केला जात असे. विजयनगरकालीन मंदिराच्या स्तंभावर मोठ्या प्रमाणात शिल्पे कोरलेली आढळतात.

हाजाररामा मंदिर व विरूपाक्ष मंदिर ही दोन मंदिरे विजयनगर शैलीची उत्कृष्ट उदाहरणे आहेत. ही मंदिरे आजही चांगल्या अवस्थेत आहेत. आजही ती कला आविष्कार म्हणून अभ्यासनीय आहेत. ही मंदिरे विजयनगर राजवाड्याच्या जवळ असल्यामुळे त्यांना विशेष महत्त्व आहे. या वास्तू मध्ये मुख्य मंदिर, अम्मा मंदिर व भव्य सभा मंडप आहे. मंदिराच्या मंडप गाभाऱ्यात वर उंच शिखर आहे. हे शिखर द्रविड शैलीचे आहे. मंदिराच्या बाहेरील भिंतीवर रामायणातील शिल्पे कोरलेली आहेत. मंडपाचे स्तंभ तुला व कर्णावर विपूल नक्षीकाम केलेले आहे. पूर्वेकडे गोपूर बांधलेले आहे.

- **विठ्ठल स्वामीचे मदिर :**

हे मंदिर हाजारराम मंदिरापेक्षा तिप्पट पटीने मोठे आहे. तीन बाजूला प्रवेशद्वारे बांधलेली आहेत. तीन्हीही बाजूच्या प्रवेशद्वारावर गोपुरे बांधलेली आहेत. सुंदर शिल्पकलेने मढविलेले मंडप अतिशय सुंदर आहेत. दगडी स्तंभावरील शिल्पकला अगदी सुंदर आहे. तेथील संगीत स्तंभ सुंदर आहे. अतिशय सुंदर कल्याण मंडप व दगडी रथ आहे. मंदिराचे मुख्य शिखर पूर्ण न होताही अतिशय सुंदर आहे. एकूणच हे एक विजयनगर शैलीचे एक उत्कृष्ट मंदिर आहे.

- **विठ्ठलस्वामी मंदिर :**

या मंदिरातील संगीत मंडपाच्या पीठावर नृत्याच्या वेगवेगळ्या मुद्रा कोरलेल्या आहेत. या मंडपातील स्तंभामध्ये जे उपस्तंभ कोरलेले आहेत. या उपस्तंभावर खडा घेऊन वाजविल्यास सा रे ग म सारखे संगीत स्वर आपल्या कानावरती पडतात. वाळूपासून बनविलेला, कुरुंदाचा दगड या मंदिराच्या बांधकामासाठी वापरलेला आहे. हे दगड आतील भागातून पोकळ असल्यामुळे असा आवाज व नाद उमटतो.

विजयनगरच्या मंदिराच्या स्तंभावर अतिशय सुंदर असे मूर्तीकाम व शिल्पकाम केलेली आहे. ही मंदिरे अत्यंत भव्य व सुंदर अशी आहेत. या मंदिराच्या प्रमुख खांबामध्ये लहान उपस्तंभ कोरले आहेत. अतिशय नाजूक असे शिल्पकाम या स्तंभावर कोरले आहे. मंडप स्तंभावर पौराणिक कथामधील पात्रे कोरलेली आहेत. ती अतिशय सुंदर अशी आहेत. अशा मंदिरामध्ये वास्तू व शिल्प यांचा सुंदर मिलाफ आढळतो. विजयनगरची मंदिरे म्हणजे शिल्पकलेचा व स्थापत्यकलेचा उत्कृष्ट नमुना होता. ही विजयनगरकालीन स्थापत्य व वास्तूकला म्हणजे वैज्ञानिक प्रगतीचे द्योतक म्हणावे लागेल. मंडप हे विजयनगर मंदिराचे वैशिष्ट्य होय. कल्याणमंडप हे देवदेवतांच्या विवाह विधीसाठी अंजलमंडप हे देवांच्या जयंती उत्सवासाठी म्हणजेच देवांना पाळण्यात घालण्यासाठी, वसंत मंडप हे वसंतोत्सवासाठी, कानडी मंडप हे आरसा दाखविण्यासाठी त्याच बरोबर सध्या मंडप, रंग, मंडप, उत्सव मंडप, वाहन मंडप, चित्रा मंडप अशा विविध मंडपावरून मंदिराच्या विस्तारीकरणाचे स्वरूप समजते.

- **शिवशंकर मंदिर :**

या मंदिरातील बारा स्तंभ बारा राशीचे नेतृत्व करतात. या मंदिराचा पाया खगोलशास्त्रावर आधारीत आहे. सूर्य जेव्हा एका राशीतून दुसऱ्या राशीत प्रवेश करतो तेव्हा त्या-त्या राशीच्या स्तंभावर प्रथमत: सूर्याची किरणे पडतात.

विजयनगरमध्ये मोठी मंदिरे, मोठ्या मूर्ती, मोठे विजयस्तंभ दिसतात. तेथे मोठ-मोठ्या गणपतीच्या मूर्ती तयार करण्याची पद्धत होती. तेथे वीस फूट उंचीचे गणपती आहेत. तेथील भव्य व दिव्य रसिकवुल गणपती होय.

- **विजयविठ्ठल मंदिर :**

कृष्णदेवरायाने गजपतीराजाच्या विरुद्ध मिळविलेल्या विजयाचे प्रतिक म्हणून हे मंदिर उभारले आहे.

इ.स. १५१३ ला विजयविठ्ठल मंदिराचे काम सुरू झाले. कृष्णदेवरायाने इ.स. १५१६ मध्ये एकशे आठ स्तंभाचा शतस्तंभी म्हणून ओळखला जाणारा मंडप बांधला. यातील पाषाण स्थळ ही एक अतिसुंदर वास्तू आहे. रथाची चाके उचलून त्याच्या आसाभोवती फिरविता येतात. ती चाके फिरविल्याने पुण्य लागते अशी समजूत असल्यामुळे भेट देणारी माणसे अनेक वर्षे ते फिरवत आहेत. विजयनगरमध्ये एक उंच चौथरा आहे. तो सिंहासनाचा चौथरा म्हणून ओळखला जातो. कृष्णदेवरायाने ओरिसावर मिळविलेल्या विजयाप्रीत्यर्थ बांधला आहे. विजयनगरमध्ये चोहो बाजूनी पायऱ्या असणारे जलकुंड आहे. राजघराण्यातील स्त्रियांना पोहण्याचा तो जलतलाव होता.

या वास्तू बरोबरच वेल्लोर, श्रीरंगम, कांचीपुरम, कुंभकोणम, विरंचीपुरम, कांचीपुरम, ताडपत्री आदि ठिकाणी विजयनगरशैलीची अनेक मोठ-मोठी सुंदर मंदिरे आहेत. कृष्णदेवरायाने ओरिसाच्या गजपती राजाचा पराभव करून उदयगिरीहून जी लूट आणली त्यामध्ये बाळकृष्णाची सुंदर मूर्ती होती. ती मूर्ती कृष्ण देवरायाला खूप आवडली. तिच्यासाठी कृष्ण देवरायाने इ.स. १५१४ मध्ये कृष्णस्वामी मंदिराची उभारणी केली.

- **कृष्णदेवरायाची स्थापत्य कलेतील प्रगती :**

कृष्णदेवरायाने विविध वास्तू, अनेक शिल्पे, जलाशये, अनेक कालवे आदि. वास्तू बांधल्यामुळे विजयनगरच्या वास्तू शैलीला कळसास पोहचविले. वास्तुशिल्पामध्ये कृष्णदेवरायाने मौलिक कामगिरी केली. कृष्ण देवरायाच्या कारकिर्दीमध्ये वास्तूशिल्पे पुढीलप्रमाणे आहेत.

**१) होस्पेट / अणंतशयनगुडी :**

कृष्ण देवरायाच्या सर्वश्रेष्ठ कार्याचे फलीत म्हणजे होस्पेट शहर होय. नागलपूर या नावाने ते ओळखले जात होते. हे शहर विजयनगरच्या कृष्णदेवरायाने निर्माण केले. इ. सन १५१६ मध्ये या नगराच्या बांधकामास सुरूवात झाली. पुढे इ.सन १५२० मध्ये ते पूर्ण झाले म्हणजे जवळ जवळ चार वर्षे या बांधकामासाठी लागली. हे नगर कृष्णदेवरायाच्या आवडीचे होते. तो तेथे अनेक दिवस मुक्कामास असे. हे शहर सर्व बाबतीमध्ये वैभवशाली होते. शहरातील रस्ते अतिशय सुंदर होते. रस्त्याच्या दोन्ही बाजूला बाजार भरत असे. रस्त्याच्या दुतर्फा हिरवी गार झाडी होती.

- **अनंतशयनगुडी :**

कृष्णदेवरायाने इ.सन १५२४ मध्ये ही उपनगरे स्थापन केली. आपल्या पुत्राच्या जन्मवर्षी त्याच्या नावाने ही नगरी वसविली आहे. या नगरीमध्ये कृष्ण देवरायाने अनंतशरन हे मंदिर उभारले. हे देवालय १४७ x ८५ मीटर एवढे विस्तीर्ण असे आहे. हे मंदिर २७ मीटर लांब व २५ मीटर रूंद आहे. या मंदिरातील सभा मंडपाची उंची २७ मिटरहून अधिक लांब आहे व त्याची रुंदी २३ मीटर आहे. गाभाऱ्यातील घुमटाची १० मीटर आहे. या घुमटाचा आकार अतिशय मनोवेधक आहे. मंदिराच्या सभोवतालच्या भिंतीची उंची जवळ-जवळ २४ मीटर आहे. सध्या या मंदिराचा काही भाग उध्वस्त झालेला दिसतो.

- **जलाशय :**

कृष्णदेवरायाने इ. सन १५२० साली प्रचंड जलाशयाचे काम केले आहे. या कामासाठी कृष्णदेवरायाने पोर्तुगित अभियंत्याची मदत घेतल्याचे दिसून येते. हा जलाशय मोठे दोन पहाड जोडून निर्माण केला आहे.

- **राजनगरी :**

कृष्णदेवरायाची राजनगरी म्हणजे सौंदर्याचा उत्कृष्ट नमुना होय. या वैभवशाली राजनगरीमध्ये विविध वास्तू होत्या. राजप्रसाद, शासकीय इमारती, सेनापती, प्रधान व इतर अधिकाऱ्यांची निवासस्थाने होती. या नगरीमध्ये विविध उपविभाग होते. या नगरीत विश्रांमगृहे, सभागृहे, खलबतखाने आणि मौल्यवान वस्तू किंवा शस्त्रास्त्रे ठेवण्यासाठी तळघरेही होती. अशा विविध इमारतीनी राजनगरीची शोभा वाढविली होती.

इ. सन १५२३ मध्ये कृष्णदेवरायाने दसरा डब्बा किंवा भमहानवमी डिब्बा ही वास्तू उभी केली. या बांधकामांना विजय मंदिर आणि भुवनविजय अशी नावे देण्यात आली. याच नावाने या वास्तू पुढे प्रसिद्धीस आल्या. कृष्णदेवरायाने इ. सन १५१३ मध्ये हजाराराम नावाचे मंदिर उभारले. काही ठिकाणी मोठ-मोठे तलाव बांधले. संपूर्ण रामायण उठावाच्या शिल्पात कोरलेले आहे. या मंदिरातील सभोवतालची शिल्पे कलाविष्काराचे दर्शन घडविते. कृष्णदेवरायाच्या कारकिर्दीमध्ये वैष्णव मंदिर, कृष्ण स्वामी मंदिर विजयनगर मधील सर्वात ५२ मीटर उंचीचे गोपूर आहे. भव्य असे विजयविठ्ठल मंदिर तेवढेच सुंदर ही आहे. कृष्णदेवरायाने बांधलेले श्रीकृष्णाचे भव्य मंदिर आजही अप्रतिम स्थापत्यकलेचा उत्कृष्ठ नमुना आहे. उंच गोपूरे व हजार खांबाचे मंडप ही त्याने निर्माण केलेल्या वास्तू कलेचे उत्तम नमुने आहेत. नरसिंह पुतळा, विरुपाक्ष मंदिराची रचना व गोपुरे, विठ्ठलस्वामी मंदिर आदि त्यांनी केलेली बांधकामे उत्कृष्ठ अशीच आहेत. कृष्णदेवरायाच्या कारकिर्दीमध्ये विजयनगर राज्याने प्रगतीचे शिखर गाठले होते. इतिहासकार डॉ. ईश्वरी प्रसाद म्हणतात, 'दक्षिण भारताच्या इतिहासात त्याची बरोबरी करणारा कोणीही हिंदू किंवा मुस्लिम शासक झालेला नाही.'

- **नाट्य कला :**

कृष्णदेवरायाच्या कारकिर्दीमध्ये नाट्यकला बहरास आली होती. गायक, वादक, नर्तक, अभिनेते त्याला साथ देणारे गट हे एकत्र मिळून जो संच तयार होई त्याला त्याला 'मेळा' असे म्हटले जाई. हे मेळे गावोगावी फिरून आपली कला सादर करीत. उघड्या मैदानावर तंबू ठोकून मंच तयार केला जात असे. प्रेषक उघड्या मैदानावर बसून ती नाटके पाहत असत. प्राचीन कथा घेऊन हे कलाकार नाटक सादर करून मनोरंजन करीत असत. अशा कलाकारांना खूप लोकप्रियता मिळत असे. त्यातून त्यांना चांगले बक्षीसही मिळत असत. अशी नाट्यकला सादर करण्यासाठी काही ठिकाणी नाट्यगृहे ही बांधल्याचा उल्लेख आहे. या नाट्याप्रकारामध्ये स्त्री पात्रे ही असत ती पात्रे स्वत: स्त्रीया करीत असत. तसे उल्लेख शिलालेखात आले आहेत. हुबेहुब भासतील असे सजिव व नैसर्गिक देखावे रंगमंचावरील पडद्यावर साकारले जात असत. नद्या, पर्वत, ओढे, नाले, अरण्ये, पशुपक्षी विविध प्राणी आदि देखावे रंगमंचावर उभे केले जात असत. जी पात्रे काम करणार आहेत अशा कलावंताना केलेल्या केशभूषा व वेशभूषा हुबेहुब वाटत. कृष्णदेवरायाच्या कालखंडामध्ये 'बोग्मलाट' हा छायानाट्याचा प्रकार खूप लोकप्रिय होता.

● **संगीत व नाट्य :**

कृष्णदेवरायाच्या कारकिर्दीमध्ये संगीत व नृत्यकला भरभराटीला आलेली होती. विजयनगरच्या शिल्पामधून स्त्री-पुरुषांनी तंतुवाद्ये व चर्मवाद्ये हातात घेतल्याचे जथेच्या जथे दिसतात. विजयनगरच्या विविध वास्तूवर या छटा कमी जास्त प्रमाणात दिसून येतात. कृष्णदेवराय स्वत: आपल्या कृष्ण या गुरुकडे वीणावाद शिकला होता. एवढेच नव्हेतर कृष्ण देवरायाने राजस्त्रियांना गायन व वादन शिकविण्यासाठी उत्तम अशा संगीत शिक्षकाची नेमणूक केली होती.

● **विजयनगरीची दैवते :**

श्रीराम, हनुमान, कृष्ण, शिव, पार्वती, विष्णू, लक्ष्मी, कृष्ण, बाळकृष्ण ही विजयनगरची लोकप्रिय देवते होती. आपले उद्दिष्ट साध्य करण्यासाठी आपली मनोकामना पूर्ण करण्यासाठी देव-देवतांची आराधना, शांती व मंत्रांचे प्रयोजन ही त्याकाळची वैशिष्टे होती. गणेशमंत्र, दुर्गामंत्र, नारदमंत्र, श्रीसुक्त, त्र्यंबकमंत्र, उपासना, आराधना विविध आणि वेगवेगळ्या प्रकारच्या शांती, वारूण शांती, नैत्य शांती अशा प्रकारे देव-देवतांना प्रसन्न करण्यासाठी विविध उपवास व आराधना केल्या जात असत.

शांती, समाधान, समृद्धी लाभावी यासाठी वास्तुशास्त्राचा मोठ्या प्रमाणात वापर केल्याचे दिसून येते. वास्तूतील विविध दिशा शुभ मानल्या होत्या. उत्तर दिशा सुर्वणशाला, दक्षिण शयनानगर, पूर्व स्नानगृह, पश्चिम भोजनालय, अग्नेय पाकशाळा, शान्य देवमंदिर, नैक्तंत शस्त्रभांडार, वायव्य रत्नमंदिर आदि.

● **चित्रकला :**

दशावतार, वालीवध, रावणवध, रावणाच्या दरबारात हनुमान, राम रावण युद्ध, कालियामर्दन, कृष्णाच्या विविध लिळा, रामायण, महाभारत या प्राचीन प्रसंगाचे चित्रकलांचे चित्रीकरण मोठ्या प्रमाणात विजयनगर साम्राज्यात झाले होते. हिरवा, लाल, राखाडी या रंगाचा वापर विजयनगरकालीन चित्रकलेमध्ये दिसून येतो. अंडाकृती चेहरा व अनुकुचीदार नाक हे या चित्रकलेचे वैशिष्ट होते. विविध प्राण्यांचे डोळे माणसांच्या डोळ्या प्रमाणे होते. हे डोळे, पापण्या व भुवयासह काढण्याची पद्धत होती. विजयनगर दरबारातील चित्रकला कळसास पोहचली होती. विजयनगरच्या दरबारामध्ये परकीयही चित्रकार होते. त्यामध्ये इंग्रज, पोर्तुगिज या चित्रकारांचा उल्लेख करावा लागेल. विविध चित्रावरून विजयनगर कला व सौंदर्य प्रचिती येते. इंग्रजी चित्रकार अलेक्झांडर फेम याने काढलेली विजयनगर दरबारातील चित्रे सौंदर्यपूर्ण आहेत.

● **वीरगळ :**

वीरगती प्राप्त करणाऱ्या वीरांच्या प्रती कृतज्ञतेच्या भावनेतून मरणोत्तर आदर व्यक्त करणे किंवा एखादे महान कार्य करीत असताना धारातीर्थी पडणाऱ्याचे कायम स्वरूपी स्मरण करण्याच्या हेतूने वीरगळ निर्माण करण्याची प्रथा विजयनगर संस्कृतीमध्ये होते. वीरमरण देणाऱ्याच्या प्रती समाजामध्ये श्रेष्ठ स्थान राहते. गावाचे रक्षण करत असताना वीरमरण प्राप्त करणाऱ्यांची स्मारके ही विजयनगर मध्ये उभारल्याचे दिसून येतात. त्यांच्याबद्दल समाजामध्ये आदर असे.

- **सतीशिला :**

पतीच्या मृत्यूनंतर पत्नीने त्या शवासोबत जिवंत दहन करणे किंवा पतीच्या शवाबरोबर पत्नीला जिवंत पुरणे, पती निधनानंतर पत्नीने स्वत:ला जाळून घेणे किंवा पुरुन घेणे प्रतिष्ठेचे मानले जात असे. अशा अनेक सतीशिळा विजयनगरमध्ये आढळून येतात. विठ्ठल मंदिरामध्ये आढळलेल्या सती शिला विजयनगरकाळाचे वैशिष्ट्य दर्शवितात.

- **सारांश :**

विजयनगर शहराचे कलावैभव अतिशय सुंदर असे आहे. आजही ती कलाकुसर पाहताना पाहणाऱ्याचे डोळे दिपून जातात. स्थापत्यशास्त्राच्या दृष्टीकोणातून विजयनगरची मंदिरे, गोपुरे, राजवाडे, महाल, तटबंदी, जलाशय, सभागृहे, सौदर्यकलेचा अविष्कारच आहेत. मंडप हे विजयनगर मंदिराचे वैशिष्ट होय. मंदिरामध्ये वास्तू व शिल्प यांचा सुंदर मिलाफ आढळतो. विजयनगरची मंदिरे म्हणजे शिल्पकलेचा व स्थापत्यकलेचा उत्कृष्ट नमुना होत. ही विजयनगरकालीन स्थापत्य व वास्तूकला म्हणजे वैज्ञानिक प्रगतीचे द्योतक म्हणावे लागेल. कृष्णदेवरायाच्या कारकिर्दीत तर हे वैभव कळसास पोहचले होते. त्यांनी केलेली बांधकामे उत्कृष्ट अशीच आहेत. कृष्णदेवरायाच्या कारकिर्दीमध्ये विजयनगर राज्याने प्रगतीचे शिखर गाठले होते.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न :**

**अ) योग्य पर्याय निवडून रिकाम्याजागा भरा.**

१) विजयनगरचा .............. राजा शंकराचा भक्त होता.

अ) हरिहर दुसरा ब) देवराय दुसरा क) सदाशिवराय ड) अच्युतराय

२) विजयनगर बांधकामासाठी ........... दगडाचा वापर करण्यात आला आहे.

अ) लाल ब) काळा क) ग्रेनाईट ड) यापैकी नाही

३) कृष्णदेवरायाच्या कालखंडामध्ये .............. हा छायानाट्याचा प्रकार खूप लोकप्रिय होता.

अ) बोग्मलाट ब) सोमलाट क) कृष्णलाट ड) गोमलाट

४) ............... या इंग्रजी चित्रकाराने काढलेली विजयनगर दरबारातील चित्रे सौंदर्यपूर्ण आहेत.

अ) विल्सन ब) अलेक्झांडर फ्रेम क) अलेक्झांडर ड) जॉन्सन

५) विजयनगर संस्कृतीमध्ये ............. निर्माण करण्याची प्रथा होती.

अ) पुतळे ब) समाधी क) स्मारके ड) वीरगळ

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) विजयनगरमध्ये दसरा डब्बा ही वास्तू कोणत्या राजाने निर्माण केली?

२) कृष्णदेवरायाने इ. सन १५२४ मध्ये कोणती उपनगरी स्थापन केली?

३) कोणत्या मंदिरातील बारा स्तंभ राशीचे नेतृत्व करतात?

४) कोणत्या मंदिरामध्ये आढळलेल्या सती शिळा विजयनगरकाळाचे वैशिष्ट्य दर्शवितात?

५) कृष्णदेवरायाने कोणत्या साली हजारा राम नावाचे मंदिर उभारले?

- **पारिभाषिक शब्द :**

  खुष्कीच्या मार्ग - जमिनीवरील मार्ग

  अष्ट दिग्गज - प्रसिद्ध आठ कवी

  बोग्मलाट - छायानाट्याचा प्रकार

  स्तंभ - खांब

  वीरगळ - वीरमरण प्राप्त करणाऱ्याचे स्मारक

  शस्त्रभांडार - युद्ध साहित्य ठेवण्याचे ठिकाण

## ४.३ सारांश :

विजयनगरचे साम्राज्य बलाढ्य व वैभवशाली साम्राज्य म्हणून ओळखले जाते. संगम, शालुव, तुलुव व अरविंद या घराण्यांनी विजयनगर साम्राज्यावर आपली सत्ता निर्माण केली. कृष्णदेवराय विजयनगरचा सर्वश्रेष्ठ राजा होय. कृष्णदेवरायाच्या कारकिर्दीमध्ये विजयनगरचे साम्राज्य अतिउच्च शिखरावर पोहचले होते. विजयनगरच्या दृष्टीने कृष्णदेवरायची कारकीर्द वैभवशाली व भरभराटीची ठरली. विजयनगरच्या अंतर्गत व परदेशी व्यापाराला महत्त्वाचे स्थान होते. देश-विदेशातील व्यापारी विजयनगर साम्राज्यातील व्यापारासाठी येत असत. वैभवसंपन्न शहरामध्ये सर्वच व्यापाऱ्यांना आकर्षण होते. विजयनगरची मंदिरे, गोपुरे, राजवाडे, महाल, तटबंदी, जलाशय, सभागृहे, सौंदर्यकलेचा अविष्कारच आहेत. मंडप हे विजयनगर मंदिराचे वैशिष्ट होय. मंदिरामध्ये वास्तू व शिल्प यांचा सुंदर मिलाफ आढळतो. विजयनगरची मंदिरे म्हणजे शिल्पकलेचा व स्थापत्यकलेचा उत्कृष्ट नमुना होय. एकंदरीत विजयनगरचे साम्राज्य सर्वच आघाडीवर ठरते.

## ४.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे :

**स्वयं अध्ययन प्रश्न क्र. १ ची उत्तरे**

**अ)** १) इ.स. १३३६, २) नरसिंह, ३) कृष्णदेवराय, ४) २३ जानेवारी १५६५, ५) गजपती

**ब)** १) देवराय दुसरा, २) कृष्णदेवराय, ३) रामराया ४) तिरूमल, ५) रायचुर

**स्वयं अध्ययन प्रश्न क्र. २ ची उत्तरे**

**अ)** १) तीन, २) बनिया, ३) बिदनूर, ४) बसरूर

**ब)** १) होन्नावर, २) २५, ३) १४९८, ४) धार्मिक, ५) भक्तीचे

**स्वयं अध्ययन प्रश्न क्र. ३ ची उत्तरे**

**अ)** १) हरिहर दुसरा, २) ग्रेनाइट, ३) बोग्मलाट, ४) अलेक्झांडर फ्रेम, ५) वीरगळ

**ब)** १) कृष्णदेवराय, २) अनंतशयनगुडी, ३) विवशंकर, ४) विठ्ठल, ५) इ.स. १५१३

## ४.६ सरावासाठी स्वाध्याय :

१) विजयनगर राज्याचे स्वरूप थोडक्यात स्पष्ट करा.

२) कृष्णदेवरायाच्या कार्याचे मूल्यमापन करा.

३) तालिकोटच्या लढाईचे वर्णन करा.

४) विजयनगर कालीन अंतर्गत व्यापार सांगा.

५) विजयनगरकालीन परराष्ट्रीय व्यापार स्पष्ट करा.

६) विजयनगरची मंदिर अर्थव्यवस्था सांगा.

७) विजयनगरकालीन स्थापत्य कलेची प्रगती सांगा.

## २.७ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके :


१) Dr. M. P. Patil - Court Life under the Vijaynagar Rulers.

२) Shastri K. A. History of South India.

३) Heras H. D. - Begining of Vijaynagar History

४) Setin Burton – Vijaynagara

५) चिटणीस कृ. ना. - मध्ययुगीन भारतीय संकल्पना व संस्था.


❖ ❖ ❖